म. रा. सा. सं. मं. ग्रंथालय
प्र/२५२
१
ग्रंथालय

# वंश आणि वंशवाद

२५२
१

[ ...टलिखित ' Race and Racism ' या पुस्तकाचा अनुवाद ]

अनुवादिका

**सौ. मीनाक्षी दीक्षित**

महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ, मुंबई

# वंश आणि वंशवाद

[ रूथ बेनेडिक्टलिखित ' Race and Racism ' या पुस्तकाचा अनुवाद ]

म. रा. सा. सं. मं. ग्रंथालय
254/7
मंत्रालय.

अनुवादिका

सौ. मीनाक्षी दीक्षित

महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ, मुंबई

प्रथमावृत्ती :
१ जुलै १९८४

प्रकाशक :

सचिव, महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ
मंत्रालय, मुंबई ४०००३२

© प्रकाशकाधीन

मुद्रक :
नाना डेंगळे
साधना प्रेस
४३० / ३१ शनवार पेठ, पुणे ४११०३०

किंमत : १९ रुपये

# निवेदन

महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळाच्या वतीने रूथ बेनेडिक्ट लिखित ' Race and Racism ' या ग्रंथाचा सौ. मीनाक्षी दीक्षित यांनी ' वंश आणि वंशवाद ' हा अनुवाद केला आहे. तो प्रसिद्ध करण्यास मंडळास आनंद होत आहे.

— सुरेंद्र बारलिंगे
अध्यक्ष
महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ

मंत्रालय,
मुंबई, ४०० ०३२
दिनांक : १ जुलै १९८४

# विभाग १ : वंश

## प्रकरण १ ले

# वंशवाद : आधुनिक जगातील एक (वि) वाद, 'इझम्'

बऱ्याच पूर्वी, म्हणजे १८८० च्या अखेरीस एक फ्रेंच आर्याभिमानी वॅथे द लपूज (Vacher de Lapouge) याने लिहिले, "माझी खात्री आहे की, पुढील शतकात कपालांकांमध्ये १ किंवा २ अंशांचा फरक आहे या एवढ्याच कारणाकरिता-लाखो लोक एकमेकांचे गळे कापतील." वरवर पाहता, जागतिक युद्धाकरिता हे एक वेफाट कारण दिसते. आणि खरोखरीच हे एक अश्रुतपूर्व युद्धसमर्थक कारण होते. त्याचे म्हणणे बरोबर होते काय? त्याचा अर्थ काय असू शकेल? कपालांक म्हणजे डोक्याच्या जास्तीत जास्त रुंदीला डोक्याच्या लांबीने भागल्यास येणारा भागांश. जगातील काही लोकांच्यात आणि काही जमातींमध्ये हा भागांश जास्त असतो, काहींच्यात कमी. असंस्कृत आदिवासी आणि सुसंस्कृत, बलवान असे पश्चिम युरोपीय या दोहोंतही अरुंद डोक्याचे लोक असतात तसेच रुंद डोक्याचेही. जगातले सगळे अरुंद डोक्याचे लोक किंवा सगळे रुंद डोक्याचे लोक एकत्र केले तरी दिव्य भवितव्य, विशेष लायकी किंवा विशेष सद्गुण यांच्या बाबतीत कोणाही एका गटाची मक्तेदारी असल्याचे दाखविता येणार नाही. कोणत्याही एखाद्या युरोपियन राष्ट्रात किंवा अमेरिकेत विशेष कर्तृत्ववान माणसांपैकी काही अरुंद डोक्याची तर काही रुंद डोक्याची असल्याचे आढळेल. मग, 'डोक्याच्या आकारात फरक आहे म्हणून लाखो लोक एकमेकांचे गळे कापतील' याचा अर्थ तरी कसा लावायचा?

जगाच्या प्रदीर्घ इतिहासात युद्ध करून एकमेकांना ठार मारण्यासाठी कितीतरी तऱ्हेतऱ्हेच्या सबबी माणसांनी पुढे मांडलेल्या सापडतात : दुसऱ्या लोकांची सपाट व सुपीक जमीन, त्यांचे गुरांचे कळप, टोळीप्रमुख आणि राजे यांच्या महत्त्वाकांक्षा, निराळ्या धर्मश्रद्धा, भावनाप्रक्षोभ, सूड इ. इ. पण या सगळ्या लढायांमध्ये दोन्ही बाजूंना बळी पडलेल्यांची शिरे ओळखून वेगवेगळी करता येणार नाहीत इतकी ती सारख्या आकाराची होती. आणि युद्धनेत्यांनीही कधी शत्रूच्या डोक्याच्या आकारावरून आपल्या अनुयायांना चिथावणी दिली नाही. त्यांनी शत्रूंना मूर्तिपूजक म्हटले असेल, रानटी, पाखंडी म्हटले असेल, स्त्रिया व मुलांची हत्या करणारे भ्याड म्हटले असेल, पण '८२ कपालांक असलेला' आपला शत्रू असे कधी म्हटले नसावे.

उच्च युरोपियन संस्कृतीनेच मरणान्तिक छळ आणि युद्ध यांकरिता असले कारण पुढे करावयास आणि प्रत्यक्षात आचरणात आणावयास सुरवात केली. दुसऱ्या शब्दांत सांगावयाचे म्हणजे वंशवाद हे आमच्या काळाचेच अपत्य आहे. मेंढ्या एडक्यांपासून वेगळ्या काढायची ती एक नवी रीत आहे. न्यू टेस्टामेंट– 'नवा करार'–मधील जुन्या बोधकथेत मनुष्यजातीची विभागणी एक एक व्यक्ती घेऊन केलेली आहे. ज्यांनी चांगले आचरण केले त्या व्यक्ती एका बाजूला आणि ज्यांनी वाईट आचरण केले त्या दुसऱ्या बाजूला, अशी ती विभागणी आहे. आधुनिक रीतीने ही विभागणी आनुवंशिक शरीरवैशिष्ट्यांवरून केली जाते– डोक्याचा आकार, त्वचेचा रंग, नाकाचा आकार, केसांची ठेवण, डोळ्यांचा रंग यांबाबत काही वैशिष्ट्ये असलेल्यांची गणना दुर्बळ आणि संस्कृतिनिर्मितीला नालायक अशी केली जाते आणि त्यांच्या विरुद्ध वैशिष्ट्ये असणारे जगाचे आशास्थान मानले जातात. एका गटावर श्रेष्ठतेचा आणि दुसऱ्यावर कनिष्ठतेचा असे शिक्के मारणारा वंशवाद हा एक प्रकारचा नवा कॅल्व्हिनिझमच[1] म्हटला पाहिजे. वंशवादास अनुसरून आपण आपले शत्रू कसे ओळखतो? त्यांनी आमच्यावर केलेल्या आक्रमणांवरून नव्हे किंवा त्यांचे धर्मपंथ, त्यांची भाषा यावरून नव्हे, आपल्याला हवी असलेली संपत्ती त्यांच्याकडे आहे यावरूनसुद्धा नाही. तर, त्यांच्या आनुवंशिक शरीररचनेवरून आपण शत्रू ओळखून काढतो. कारण, चित्त्याला काही आपले ठिपके बदलता येत नाहीत. आणि त्या ठिपक्यांवरून हा चित्ता असे आपण बरोबर ओळखू शकतो.

म्हणून व्यक्तीच्या दृष्टिकोणातून वंशवाद याचा अर्थच असा की, तिला या जगात नरकाची प्राप्ती होणार की निर्वाणाची ते तिचा गर्भसंभव झाला त्या क्षणीच ठरले. व्यक्ती सदाचरणी आयुष्य कंठीत असली तरी तिच्या बाजूस तराजूचा काटा झुकणार नाही आणि व्यक्तीचे शारीरिक विशेष मान्य अशा प्रकारचे असतील तर ती व्यक्ती दुराचरणी असून शकणार नाही. केवळ जन्माच्या योगानेच या वंशविशेषातील माणूस उच्च जातीचा ठरतो आणि इतर वंशीयांना बाजूस सारून 'सुखं च मे शयनं च

मे ' असा अधिकार सांगू लागतो. आपले वैयक्तिक कर्तृत्व किंवा सद्गुण यांवर आपली प्रौढी अवलंबून ठेवण्याचे त्याला काहीच कारण नाही. तो जन्मालाच मुळी उच्च वर्णात आला आहे.

या गृहीतकृत्यावरून वंशवाद आणखी एक निश्चित विधान वंशासंबंधी करतो. ते हे की, ' ज्यांचे दिव्य भवितव्य इतिहासात नेहमीच सिद्ध झाले आहे अशा एका शुद्ध वंशाची, चांगली शरीरवैशिष्ट्ये ही मक्तेदारी आहे. ' एखादे कुलाचे मानचिन्ह धारण केल्याने जसे बरे वाटते तसे वाटण्यासारखी दीर्घ आणि आकर्षक अशी पूर्वजांची वंशावळ या वंशविशेषाच्या वारसांना मिळवून देण्यासाठी वंशवाद्यांनी इतिहासाचे पुनर्लेखन केले आहे. ते या वारसांची खात्री पटवू पाहतात की, त्यांच्या वंशाचे बल आणि जोम ही निसर्गनियमांनीच प्राप्त होत असून अक्षय राहणारी आहेत. फक्त, इतर कमी प्रतीच्या वंशांशी संकर टाळून त्यांनी आपल्या रक्ताची शुद्धता राखली पाहिजे. हे न पाळल्यास वंशाचा ऱ्हास होईल आणि त्याचे श्रेष्ठत्व जाईल. गेल्या पिढीत सर्व जगभर हरएक तऱ्हेच्या संघर्षांमध्ये या सिद्धान्ताच्या आधारे आवाहन करण्यात आले आहे : कधी हा संघर्ष वंशाने सारखेच असणाऱ्या फ्रेंच व जर्मन लोकांप्रमाणे राष्ट्रीय पातळीवर असेल, केव्हा पाश्चिमात्यांना पिवळ्या चिन्यांची भीती वाटून निर्माण झाला त्याप्रमाणे वर्णभेदावर आधारलेला असेल, केव्हा फ्रान्समध्ये घडले त्याप्रमाणे वर्गकलहाच्या रूपात असेल आणि केव्हा अमेरिकेत झाला त्याप्रमाणे आधी आणि मागाहून आलेल्या वसाहतवाल्यांत झाला असेल. या सिद्धान्ताचे लोकांना वेडच लागले आहे.

जेथे सगळेच लोक आपणच सर्वांत उंच असल्याचा दावा करतात, तेथे प्रत्येकजण काही बरोबर असणार नाही. या वंशश्रेष्ठतेच्या बाबतीत जेथे सगळेच विज्ञानाला आवाहन करतात, तेथे संबंधित विज्ञानशाखा या परस्परविरोधी दाव्यांच्या कोलाहलातून निवड करून एक निर्णय देऊ शकेल काय ? की, हा खोटी आधारविधाने आणि कमअस्सल विज्ञान यांचाच कारभार आहे ? आधुनिक जगात आपल्याला जगायचे असेल तर वंशवाद समजावून घेणे आणि त्या वादातील युक्तिवाद तपासता येणे हे अत्यावश्यक आहे. आपल्याला वंशासंबंधीची वास्तवता प्रथम समजावून घेऊन, मग या वस्तुस्थितीचा ज्यात उपयोग करून घेतला आहे, तो हा सिद्धान्त समजावून घेणे आवश्यक आहे. कारण, आज या जगात प्रत्येकासमोरच वंशवाद या ' इझम 'ला बळी पडण्याचा धोका आहे, त्याच्या बाजूने किंवा विरुद्ध आपण उभे राहिलेच पाहिजे. जो निर्णय आपण घेऊ त्यावरच उद्याच्या इतिहासात कसा फरक पडणार ते अवलंबून राहणार आहे.

### ते म्हणतात—

( १ ) यात नवीन असे काहीच नाही. जेव्हा एखाद्या तत्त्वचिंतकाला दुसऱ्या कोणत्या रीतीने एखाद्या गोष्टीचा खुलासा करता येत नाही, तेव्हा तो एखाद्या मानव-वंशाच्या गूढ अशा गुणधर्माला बिनदिक्कत त्या गोष्टीचे कारण बनवून टाकतो.

Walter Bagehot, *Physics and Politics.* London, George Routledge and Sons Ltd.

( २ ) सौंदर्य, बुद्धिमत्ता आणि ताकद या गोष्टी मुळात केवळ गौरवंशाकडे ( आज येथे 'नॉर्डिक' वाचावे ) फक्त होत्या. इतर वंशांशी ( संदर्भासाठी पाहा : अल्पाइन, मेडिटेरेनियन ) संयोग पावून संकरित प्रजा उत्पन्न झाली. ही मिश्र प्रजा सुंदर असली तरी बलशाली नव्हती, बलशाली असली तरी बुद्धिवान नव्हती आणि जर बुद्धिवान असेल तर अशक्त आणि कुरूप होती.

**Arthur de Gobineau,** *Essay on the Inequality of Human Races.* Translated by Adrian Collins. London, William Heinemann, 1915, P 209.

**शुद्ध ट्यूटन मानवाच्या शारीरिक वैशिष्ट्यांची यादी :**

मोठे तेजस्वी दिव्य नेत्र, सोनेरी केस, भव्य यष्टी, स्नायूंचा समप्रमाण विकास, दीर्घाकार लांबट कवटी ( अधिकाधिक प्रगतीकरिता तीव्र इच्छा बाळगल्याने सदा कार्यरत असलेल्या मेंदूने पशूंच्या संतुष्टतानिदर्शक अशा गोलाईच्या रेषा बदलून पुढील बाजूस अधिक वाढविल्या, म्हणून आकार लांबट झाला. ), उच्च अशा आध्यात्मिक जीवनाच्या अभिव्यक्तीकरिता आवश्यक असा अन्य चेहरामोहरा.

**Houston Stewart Chamberlain,** *The Foundations of the Nineteenth Century,* London John Lane, 1910, Vol. I.

**वंशवादी आपल्या स्वतःच्या वंशाविषयी काय म्हणतात ?**

(१) अचूक निर्णयशक्ती, सत्यवक्तेपणा आणि उत्साह ही नॉर्डिक माणसाची वैशिष्ट्ये आहेत. न्याय आणि सत्य यांबद्दल त्याला तीव्र ओढ असते. मनोविकारांचा उद्रेक किंवा लैंगिक जीवनाची तीव्र इच्छा या अर्थाने वासना ही गोष्ट त्याच्या बाबतीत अर्थशून्य असते. त्याच्यात नेहमीच एक तऱ्हेचे राजन्यत्व असते.

**Hans F. K. Gunther.** *The Racial Elements of European History.* Translated from the second German edition by G. C Wheeler, London, Metheun and Co , 1927, pp. 51, 52.

( २ ) बुद्धिमत्तेचे वरदान असणाऱ्यांमध्ये नॉर्डिक वंश सर्व मानवजातीच्या आघाडीवर आहे.

**Baur, Fischer and Lenz.** *Human Heredity.* Translated by Eden and Cedar Paul, London, Allen and Unwin, 1931, p. 655.

## इतर जनसमूहांविषयी वंशवादी काय म्हणतात ?

(१) 'ज्यू हासुद्धा एक माणूसच आहे' या जुन्या वाक्प्रचाराचा आधार देऊन काही बुद्धिवंत ज्यूंना मदतीचा हात देऊ पाहतात. होय. तो माणूस आहे. पण कशा प्रकारचा ? माशीसुद्धा एक प्राणीच आहे की !

**Goebbels,** reported in *Time*, July 8, 1935, p. 21.

(२) नॉर्डिकेतर लोक जर नॉर्डिक लोकांपेक्षा माकडे आणि वानर ( शेपूट नसलेले माकड ) यांना अधिक जवळचे आहेत, तर मग नॉर्डिक लोकांशी त्यांचा समागम होऊ शकतो, पण वानरांशी तो शक्य असत नाही असे का व्हावे ? त्याचे उत्तर असे की, नॉर्डिकेतर लोकांचा वानरांबरोबर समागम अशक्य आहे असे अजून सिद्ध झालेले नाही.

**Herman Gauch.** *New Fo undations for Research into Socia Race Problems.* Berlin, 1933. Cited by J. Gunther, *The Nation*, February 5, 1935.

## काचेच्या घरात राहणारे लोक

आपल्या पूर्वजांविषयी मते—

(१) ख्रि. पू. १ ले शतक : तुमचे गुलाम इंग्लंडमधून आणू नका. ते अतिशय मूर्ख असून कोणतीही गोष्ट शिकायला अगदी नालायक असतात. अथेन्समधील कुटुंबाचा घटक म्हणून राहण्यास ते पात्र नाहीत.

Cicero to Atticus.

(२) इ. स. ११ वे शतक : पिरेनिज पर्वताच्या उत्तरेला राहणारे मानववंश थंड स्वभावाचे असून त्यांना प्रौढत्व कधी प्राप्त होत नाही. ते अंगापिंडाने थोराड व रंगाने गोरे असतात. पण बुद्धीची कुशाग्रता व आकलनशक्तीचे सर्वगामित्व यांचा त्यांच्यात संपूर्ण अभाव आहे.

Said of Toledo ( a Moorish Savant ) quoted in Lancelot. Thomas Hogben, *Genetic Principles in Medicine and Social Service.* London, Williams and Norgate, 1931, p. 213.

## टीप

(१) नवा कॅल्व्हिनिझम : कॅल्व्हिनिझम असे मानतो की, देवानेच माणसाला जन्माला घालताना हा अमुक माणूस मुक्त होऊ शकेल की नाही यासंबंधी ठरविलेले असते. माणसास आपले भवितव्य घडविता येत नाही. प्रस्तुत संदर्भात, 'विशिष्ट वंशात जन्म घेतला की, भवितव्य वंशाप्रमाणेच ठरते' हा अभिप्राय.

◎ ◎

## प्रकरण २ रे

# वंश म्हणजे काय नव्हे ?

चिनी लोकांचा रंग पिवळट व डोळे तिरके असतात. निग्रोंची कातडी काळी व नाके रुंद आणि बसकी असतात. कॉकेशियन लोक वर्णाने उजळ आणि अरुंद व उंच नाकांचे असतात. या सर्व लोकांच्या त्वचेच्या रंगात आणि नाकाच्या आकारात जसा फरक आहे, तसा त्यांच्या केसाच्या रंगात आणि ठेवणीतही आहे. ज्यांच्यामुळे आपण माणसांचा वंश ओळखू शकतो अशा या बाह्य स्वरूपाच्या आणि दृश्य अशा खुणा आहेत. या खुणा म्हणजे वंशनिदर्शक वैशिष्ट्ये होत. आनुवंशिकतेने आलेल्या वैशिष्ट्यां-वरून केलेले वर्गीकरण अशी वंश याची अत्यंत सुटसुटीत व्याख्या करता येईल. म्हणून जेव्हा आपण वंश या संकल्पनेविषयी बोलतो तेव्हा आपण दोन गोष्टींसंबंधी बोलत असतो. एक म्हणजे आनुवंशिकता आणि दुसरी म्हणजे एका संबंधित समूहाच्या सर्वच घटकांचे वैशिष्ट्य दाखविणारे, आनुवंशिकतेने आलेले गुणधर्म अथवा लक्षणे. वंश या विषयाची चर्चा करताना पहिली गरज आहे ती वंश म्हणजे काय नव्हे त्याची रूपरेखा देण्याची. आनुवंशिक असलेली वैशिष्ट्ये व समाजजीवनातून अर्जित केलेली वैशिष्ट्ये यांची गल्लत करण्यामुळेच वंश या संकल्पनेबाबत खूप गोंधळ माजतो.

ध्यानात घ्यावयाची पहिली गोष्ट ही की, वंश आणि भाषा ही एक नव्हेत. खरे तर, हे अगदीच उघड, स्पष्ट असावयास हवे. कारण की, अरबी भाषा बोलणारे सगळेच लोक काही अरेबियन वंशाचे नसतात आणि इंग्रजी भाषा वापरणारे सगळे लोक गौरवंशीय नसतात. तरीसुद्धा भाषा व वंश यांच्याबद्दल घोटाळा नेहमीच होत असतो.

कोणत्याही व्यक्तीची आनुवंशिक वैशिष्ट्ये आणि ती व्यक्ती बोलते ती भाषा ही दोन्ही दोन अत्यंत भिन्न अशा परिस्थितीवर अवलंबून असतात. व्यक्तीची आनुवंशिक अशी शरीररचना ही तिच्या दूरदूरच्या पूर्वजांवर अवलंबून असते. आणि ती व्यक्ती लहान बालक असताना तिच्याभोवती जी भाषा बोलली जात असे त्यावरून ती व्यक्ती कोणती भाषा बोलेल हे ठरत असते. मानवी शरीररचनाशास्त्राच्या दृष्टीने पाहता या दोन्ही गोष्टींचा एकमेकांशी मुतराम संबंध नाही. घशाच्या पोकळीचा आकार व स्वर-तंतूंची रचना ही आनुवंशिक कारणांमुळे कशीही असोत, आपल्या अवतीभोवती जी कोणती भाषा बोलली जात असेल, ती मूल शिकते. आणि कंठ, ताळू इत्यादींचा आकार एकसारखा असणारी मुलेही अत्यंत भिन्न प्रकारचे उच्चारण असलेल्या वेगवेगळ्या भाषा बोलतात. जर माणसाच्या वागिंद्रियांवरसुद्धा तो कोणती भाषा बोलेल हे अवलंबून नाही, तर त्वचेचा रंग, कपालांक, डोळे आणि केस यांसारख्या वंशनिदर्शक वैशिष्ट्यां-वरून त्याची मातृभाषा निश्चित करणे अगदीच शक्य नाही. ज्या भाषिक प्रदेशात ते राहतात, त्या त्या प्रदेशानुरूप अमेरिकेतील निग्रो लोक इंग्लिश, स्पॅनिश, पोर्तुगीज किंवा फ्रेंच बोलतात. व गौरवर्णीयांचे रक्त अंगी नसलेले निग्रोही त्या भाषा संकरित निग्रोंच्या-इतक्याच सहजतेने बोलतात. त्यांच्याभोवतीचा समाज जसा असेल त्यानुसार त्यांचे उच्चारण गरीब गोऱ्या लोकांप्रमाणे किंवा गोऱ्या उच्चभ्रूंप्रमाणे असेल. आणि ही गोष्ट काही जगात अभूतपूर्व अशी नाही. म्हणून तर सायबेरियन टंड्रा प्रदेशातून चीनमध्ये आलेले प्राथमिक अवस्थेतील मांचू शतकानुशतके शुद्ध चिनी भाषा बोलत आलेले आहेत आणि नवव्या शतकानंतर उत्तर आफ्रिकेत खूप मोठ्या भूभागावरील निग्रो रक्ताच्या लोकांमध्ये अरबी भाषेचा प्रसार झाला.

काही काही आदिम जमातींमध्ये निदर्शनास येते त्याप्रमाणे केव्हा केव्हा असे दिसते की एका वंशाचे लोक एकच भाषा बोलतात आणि ती भाषा फक्त त्याच वंशाच्या लोकांत बोलली जाते. परंतु, वंश आणि भाषा परस्परावलंबी आहेत म्हणून हे घडत नाही, तर त्या दोन्ही गोष्टी तिसऱ्याच एका घटकावर अवलंबून असतात म्हणून घडते. शारीरिक आकार आणि भाषा या दोहोंनाही जिच्या प्रभावामुळे वैशिष्ट्यपूर्ण घाट मिळतो ती परिस्थिती म्हणजे इतरांपासून अलगपणा. प्रागैतिहासिक काळात जगाची लोकवस्ती विरळ होती. अलग पडलेल्या प्रदेशांमध्ये लोकांची शरीराची ठेवण आणि त्यांची भाषा ही दोन्हीही जगातील इतर कोणत्याही भागातल्यापेक्षा निराळी बनू शकत. ही निराळे घडण्याची प्रक्रिया इतकी साहजिक आहे की, अशा घटना याहून अधिक प्रमाणात घडल्या नाहीत हेच विशेष. अशा घटना जास्त प्रमाणात न घडण्याचे प्रमुख कारण म्हणजे हा प्रादेशिक अलिप्तपणा वरचेवर भंग पावत असे. जेव्हा दोन भिन्न लोकसमूह युद्धातील विजय किंवा परस्पर–विवाहसंबंध यांमुळे एकमेकांत पूर्णपणे मिसळून जात तेव्हा त्यांचे वंशज वंशदृष्ट्या मिश्र प्रकारचे होत, परंतु भाषा मात्र दोन्ही समूहांच्या भाषांपैकी कोणतीतरी एकच वापरत.

अत्यंत प्राचीन काळापासून इतिहासात आणखी एका कारणघटकाचे सामर्थ्य दिसून येते. भाषेच्या तुलनेने वंशप्रकार अधिक मोठ्या भूभागावर अधिक काळपर्यंत टिकाव धरुन राहतात. एकाच भाषाकुलातून उत्पन्न झाल्या असे ज्यांविषयी म्हणता येणार नाही अशा अनेक भाषा वंशदृष्ट्या एकाच प्रकारचे लोक सर्रास वापरत असतात. मानवी इतिहासाच्या आरंभकाळात हे आजच्यापेक्षाही अधिक खरे असले पाहिजे. कारण, आज खूप विस्तृत प्रदेशावर पसरलेल्या बांटू व पॉलिनेशियन भाषा एका काळी छोट्या गटांपुरत्या सीमित होत्या. तौलनिकदृष्ट्या अलीकडच्या काळातच त्या खूप लांबवर पसरल्या आहेत. कॉकेशस किंवा कॅलिफोर्नियातील आदिवासी वस्तीचा भाग अशा जगातील काही भागात पूर्वीचीच स्थिती अद्यापही टिकून आहे. वर उल्लेखिलेल्या या भागातील भाषा एखाद्या दरीच्या काठाशी आल्या की त्यांची मर्यादा संपते. पण मानववंशप्रकार मात्र बऱ्याच मोठ्या भागावर तोच राहतो. म्हणून म्हणता येते की भाषा आणि मानववंश या दोहोंचे प्रसरणप्रकार वेगवेगळे आणि इतिहासही निरनिराळे आहेत. पाने पिसून ठेवलेल्या पत्त्यांच्या जोडाप्रमाणे आधुनिक जगात भाषिक गट आणि वांशिक गट यांचे बेमालूम मिश्रण झाले आहे.

वंशापासून भाषेपर्यंतचा किंवा भाषेपासून वंशापर्यंतचा प्रवास तर्कदृष्ट्या अशक्य आहे असे असूनसुद्धा त्या दोहोंची नेहमी गल्लत केली जात असते. आज जर्मनीमध्ये 'आपल्या' वंशाला 'आर्यन' असे संबोधिले जाते. वास्तविक आर्य हे एका भाषा-समूहाला असलेले नाव आहे. या समूहात प्राचीन भारतातील संस्कृत व प्राचीन इराण-मधील भाषा यांचा समावेश होतो. आर्यन ही संज्ञा याहून बऱ्याच मोठ्या अशा म्हणजे युरोभारतीय भाषाकुलालाही दिली जाते. या भाषाकुलात केवळ संस्कृत व जुनी पर्शियनच नव्हे तर जर्मन, इंग्लिश, लॅटिन, ग्रीक, आर्मेनियन आणि स्लाव्ह भाषाही अंतर्भूत आहेत. यांपैकी कोणत्याही अर्थाने जरी आर्यन हा शब्द उपयोगात आणला तरी ती एक भाषाविषयक संज्ञा आहे आणि तिचा जर्मनीतील विशिष्ट वांशिक वारशाशी काही संबंध नाही. आर्यन पहिल्या अर्थाने वापरणे अगदीच निरुपयोगी असल्याने, नाझींनी जेव्हा ती संज्ञा निवडली, तेव्हा त्यांच्या डोळ्यांपुढे दुसरा, युरोभारतीय, हाच अर्थ असणार हे उघड आहे. पण युरोभारतीय भाषा बोलणाऱ्या लोकांत कोणत्याच प्रकारचे वांशिक साम्य नाही; त्वचा, डोळे, केस, कपालांक, शरीराचा बांधा या प्रत्येक बाबतीत फरक आहे

आर्यन भाषांचा गेल्या शतकातील प्रमुख अभ्यासक मॅक्स मुल्लर याने इ. स. १८८० इतक्या पूर्वीच यातील तर्कदुष्टता सामर्थ्यपूर्ण रीतीने उघड करून दाखविली होती. हा तर्कदोष टॉमस कार्लाइल ( Thomas Carlyle ), ब्रिटिश इतिहासकार जे. आर. ग्रीन ( J. R. Green ) व फ्रेंच वंशवादी काँ द गोबिनो ( Count de Gobineau ) यांच्या लिखाणातून सगळीकडे आधीच पसरला होता.

मॅक्स मुल्लर लिहितो, " मी वरचेवर हे स्पष्ट केले आहे की, मी जेव्हा आर्य किंवा आर्यन असा उल्लेख करतो तेव्हा मला रक्त, अस्थी, केस किंवा कवटी अशा गोष्टी अभिप्रेत नसतात. आर्य म्हणजे आर्यभाषा बोलणारे लोक एवढाच माझा अर्थ असतो. मी त्यांच्याविषयी बोलतो तेव्हा त्यांच्या कोणत्याही शारीरिक वैशिष्ट्यांना मी बांधून घेत नाही. आर्यांचा वंश, आर्य रक्त, आर्यांचे डोळे आणि केस अशा तऱ्हेने बोलणारा एखादा मानववंशशास्त्रज्ञ हा माझ्या दृष्टीने 'अरुंद डोक्याचा शब्दकोश' किंवा 'रुंद डोक्याचे व्याकरण' असे बडबडणाऱ्या कोणाही भाषाशास्त्रज्ञाइतकाच अपराधी आहे."[१] तरीसुद्धा युरोपातील वंशवादाच्या इतिहासाचा अभ्यास करताना आपण पाहणारच आहोत की अशा अपराध्यांची संख्या मॅक्स मुल्लरच्या वेळेपेक्षा कमी न होता बरा वाढलीच आहे.[२]

भाषा आणि वंश यांची समव्याप्ती का मानू नये याचे मूलभूत कारण असे की, भाषा हे माणसाचे अर्जित वर्तन आहे तर वंश हे आनुवंशिक वैशिष्ट्यांवर आधारित असलेले वर्गीकरण आहे. शारीरिक प्रकाराशी संबंध नाही अशा रीतीने मनुष्याच्या अर्जित वर्तनामध्ये कसे फरक पडत जातात याचे भाषा हे फक्त एक उदाहरण आहे. चीनमध्ये मांचू लोक केवळ चिनी भाषा शिकले एवढेच नव्हे तर त्यांनी चिनी शिल्पशास्त्र, कुटुंबपद्धती, नैतिक संकेत, वाङ्मय आणि अन्नप्रकार या सर्वांचा अंगीकार केला. अमेरिकन निग्रो नुसते इंग्रजी भाषा बोलतात असे नाही. ते बॅप्टिस्ट किंवा मेथॉडिस्ट अशांपैकी खिस्ती धर्मसंप्रदाय उचलतात आणि संप्रदायाचे धार्मिक जीवन स्वीकारतात त्याचप्रमाणे आगगाड्यांवरचे हमालही होतात. आफ्रिकेतल्याप्रमाणे कौल लावण्यासाठी 'अस्थिक्षेपणां'चे गुंतागुंतीचे तपशील शिकण्याऐवजी लिहायचे आणि वाचायचे कसे ते शिकतात. आफ्रिका आणि तुर्कस्तान वगैरे भागातील 'मंकाला' हा अवघड खेळ शिकण्याऐवजी ते स्कॅप माशांची शिकार करायला शिकतात. त्यांची संस्कृती अमेरिकन होते.

कारण, समाजशास्त्रात संस्कृती ही संज्ञा जे जन्मतः प्राप्त नसते अशा अर्जित वर्तनाकरिता वापरली जाते गांधीलमाश्या किंवा मुंग्या यांच्या वर्तनाप्रमाणे 'संस्कृति'रूपी वर्तनबीजपेशींनी नियत होत नाही, तर प्रत्येक नवीन पिढीला आधीच्या पिढीतील प्रौढ मंडळींकडून नव्यानेच ती आत्मसात करावी लागते. जगातील इतर प्राण्यांपेक्षा माणसाचे जे श्रेष्ठत्व आहे ते अशा रीतीच्या अर्जित वर्तणुकींनी प्राप्त केलेल्या मानवी कृतींमध्ये सामावलेले आहे. माणसाला 'संस्कृतीला जन्म देणारा प्राणी' म्हटले जाते ते योग्यच होय. त्याला पंख नसतील किंवा समुद्र तरून जाण्यासाठी कल्लेही नसतील. पण तो जहाजे आणि विमाने तयार करतो आणि ती तयार करण्याची व वापरण्याची विद्या ही संस्कृतिद्वारा संक्रमित होते. शत्रूला मारण्यासाठी त्याला अणकुचीदार नख्या किंवा सुळे नाहीत. त्याकरिता बंदुकीची दारू आणि स्वयंचलित तोफा यांचा शोध माणसाने लावला

आहे. जीवशास्त्रीय नियमांहून अन्य रीतीने होत असणाऱ्या या संक्रमणाचा मोठा फायदा असा की, परिस्थितीशी जुळते घेण्याला त्यात मोठा वाव राहतो. परंतु जैव पद्धतीने संक्रमित होणाऱ्या वर्तनांचे महत्त्व त्यामुळे उत्तरोत्तर कमी होत जाते.

वंश ही संकल्पना समजण्यासाठी हे मूलभूत सत्य समजावून घेणे आवश्यक आहे. वंशाचे संक्रमण हे जैव अथवा शारीरिक असते. समाजशील कीटकांत आणि जरा कमी प्रमाणात मांसभक्षक प्राण्यांतसुद्धा अन्नप्रकारांची आवड, ते प्राप्त करण्याची रीत, आत्म-संरक्षणाकरिता आक्रमकपणा किंवा आक्रमकतेचा अभाव हीसुद्धा शरीरद्वाराच संक्रमित होत असतात. ' चित्ता आपले ठिपके बदलू शकत नाही ' याचा अर्थ असा की, चित्ता एका विशिष्ट प्राणिजातीचा घटक असल्यामुळे तो नेहमी आपले भक्ष्य जंगल धुंडाळूनच मिळवताना दिसणार. परंतु मानवजातीमध्ये मात्र कालचे घोर आक्रमक आजचे सौम्य शांतिप्रेमी लोक होऊ शकतात. नवव्या शतकात जरी स्कॅंडेनेव्हियन लोकांचा समुद्रावरील आक्रमक व्हायकिंग असा दरारा होता तरी या पिढीत ते शांततावादी, अनाक्रमणवादी, सहकारी संस्थांचे प्रणेते आणि ' मध्यममार्गी ' बनलेले दिसतात.

पण याहीपेक्षा अधिक वेळा हल्लीच्या दिवसांत कालपर्यंत अनाक्रमक असलेले लोक आज चढाईखोर झालेले दिसतात. त्यांचा वंश काही बदलला नाही. बदलली ती त्यांची वर्तणूक. जपानच्या शांतिपूर्ण व अनाक्रमणाच्या इतिहासास पाश्चात्त्य जगाच्या इतिहासामध्ये तोड सापडणार नाही. ज्ञात जपानी इतिहासाच्या पहिल्या अकरा शतकां-मध्ये जपानने परकीय भूमीवर फक्त एकच लढाई केली. हा एकमेव संघर्ष १५९८ मध्ये संपला आणि तेव्हापासून १८५३ मध्ये जपानने बाह्य जगाच्या संपर्कासाठी आपले दरवाजे खुले केले तोपर्यंत सामुद्रिक वाहतुकीस योग्य अशी जहाजे बांधण्यास शाही फर्मानाने मनाई करण्यात आली होती. जपानचे अलिप्ततावादी धोरण टिकून राहावे यासाठी हा बंदीहुकूम. जपान्यांचे उत्सवावडंबर, चैनीपणा, सौंदर्यपिपासा हीच वैशिष्ट्ये त्यांचे खास गुण समजले जात. १८५३ पासून जपान्यांनी परदेशात पाच लढाया केल्या आणि आज जपान जगातील अत्यंत आक्रमक आणि युद्धखोर अशा राष्ट्रांपैकी एक बनण्याच्या अगदी मार्गावर आहे. मानवजातीमध्ये शतकानुशतके कोकरासारखे संघर्ष-मुक्त अस्तित्व ही उद्याची पिढी सिंह बनणार नाही याची ग्वाही नव्हे.

वंश आणि संस्कृती या भिन्न गोष्टी आहेत या सत्याला आणखी एक पैलू आहे. जगाच्या इतिहासात असे दिसते की एका संस्कृतीच्या निर्मितीला हातभार लावणारे सगळे लोक काही एकाच वंशाचे नसतात, आणि एकाच वंशाचे लोक सर्व मिळून एकच संस्कृती निर्माण करीत नाहीत. शास्त्रीय परिभाषेत बोलायचे तर संस्कृती हे वंशाचे फलन (function) नव्हे.

कोणत्याही एका संस्कृतीचे चढउतार जसजसे आपण अधिक जाणून घेऊ, तसतसे आपल्या ध्यानात येते की, ती संस्कृती कोणा एखाद्या अमिश्र वंशाची खास

निर्मिती नसते. इतिहासपूर्व इतक्या प्राचीन काळाबाबतही हे खरेच आहे. एका नामवंत पुरातत्त्वशास्त्रज्ञाने म्हटले आहे की, पुरातत्त्वशास्त्राने सिद्ध केलेले मोठे सामाजिक सत्य हे की, वंश नाहीसा झाला तरी संस्कृती टिकाव धरून जिवंत राहते. जेते म्हणून किंवा शांतिप्रिय असे वसाहत करणारे म्हणून येणारे नव्याच वंशाचे लोक जितांची वा आधीच्या रहिवाशांची जुनीच जीवनपद्धती अंगीकारून पुढे चालू ठेवतात. कित्येक शतके पाठीमागे पाहाणाऱ्या पुरातत्त्वशास्त्रज्ञाला दिसते की, संस्कृतिवाहक एका वंशाच्या लोकांवर दुसऱ्या वंशाच्या लोकांनी मात केली तरी पहिल्यांची संस्कृती अजिबात नष्ट झाली असे झाले नाही. एक वंश जाऊन दुसऱ्याच्या करवी तिच्या इतिहासाचे सातत्य टिकून राहते. युरोपियन जुन्या अश्मयुगात मानवी समाजाच्या वाढीमध्ये वांशिक सातत्य नाही पण सांस्कृतिक सातत्य आहे. निआंडरथल मानवाची संस्कृती तो नाहीसा झाल्यावर क्रो-मॅग्नान मानवाने पुढे नेली. जुन्या अश्मयुगातील माणसांनी तिलाच सजविले आणि नव्या अश्मयुगातील निरनिराळ्या मानववंशांनी तिचेच संवर्धन केले. मानवाचे एवढे शेवटले दोनच प्रकार आधुनिक मानवाचे वांशिक अर्थाने पूर्वज म्हणता येतील. युरोपमध्ये पुराणवस्तुसंशोधन अधिक झालेले आहे म्हणून जगातील इतर भागांपेक्षा युरोपच्या प्रागैतिहासिक काळात युरोपात असलेला वांशिक सातत्याचा अभाव अधिक स्पष्ट रीतीने दाखवून देता येतो. पण प्रागैतिहासिक काळाबाबत चाललेल्या संशोधनावरून आफ्रिकेत, आशियात, मध्य अमेरिकेत जे उघडकीला येते, प्रकाशात येते, त्यात हीच कहाणी आहे.

इतिहासाच्या उषःकालापासून हीच कथा पाश्चात्त्य संस्कृतीमध्ये अनेकवार घडली आहे आणि याविषयीचा पुरावा सतत गोळा होत आहे. एका शतकापूर्वी पाश्चात्त्य संस्कृतीचे इतिहासकार इतिहासाची सुरवात ग्रीसपासून करण्यावर संतुष्ट असत. परंतु आज ते अपुरे ठरते. इतिहासाच्या अभ्यासाने त्याची कालमर्यादा अधिकाधिक विस्तृत होत असलेली आपण पाहत आहोत. ग्रीक लोक हे आधीच्या पौर्वात्य संस्कृतींचे वारसदार होते आणि ग्रीकांच्या सुरवातीसुरवातीच्या जीवनपद्धतीवर इजिप्शियनांचा खूपच प्रभाव होता. आमच्या संस्कृतीचे पायाचे दगड म्हणून आपण समजतो ते सगळे शोध दुसऱ्या वंशाच्या लोकांचे आहेत. आमची संस्कृती पोलाद आणि बंदुकीची दारू यांवर उभारली आहे असे आम्ही केव्हा तरी म्हणतो. परंतु पोलादाचा शोध भारतात किंवा तुर्कस्तानात लागला आणि चिनी लोकांनी बंदुकीच्या दारूचा शोध लावला. छापखाने आणि साक्षरता यांची पाश्चात्त्य संस्कृतीशी सांगड घालायला आपल्याला क्वचित आवडते. पण कागद आणि छपाई दोन्हींकरिता आपण चीनचीच उसनवारी केली आहे. आपले आर्थिक जीवन आणि तदंगभूत दाट लोकवस्ती ही शेती पिकविणे आणि गुरांची निपज करणे यांवर आधारलेली आहेत. हे दोन्ही शोध आशियात नवाश्मयुगाच्या काळात लागलेले आहेत. मका आणि तंबाखू यांचा मानवासाठी प्रथम उपयोग करण्याचा मान अमेरिकन इंडियनांचा आहे. निसर्गावर आपण मिळविलेले प्रभुत्व हे मुख्यतः

गणिती मोजमापांच्या साहाय्याने मिळविलेले आहे. पण सर्व जटिल गणिताकरिता अत्यावश्यक अशी जी अरबांची म्हटली जाणारी अंकमापनपद्धती ती रोमन काळापर्यंत युरोपला अज्ञात होती. तिचा शोध आशियात लावला गेला आणि आमच्या संस्कृतीला तिची ओळख मूर लोकांमुळे झाली. बीजगणिताची मापनपद्धती ही आशियाई लोकांची युरोपियनांनी केलेली उसनवारी आहे.

आपण जिकडे पाहू तिकडे आपल्या मनावर हेच सत्य ठसेल की, आपल्या संस्कृतीच्या वाढीकरिता खूप निरनिराळ्या वंशांचे हात लागले आहेत आणि आपण जेव्हा संस्कृती हा स्थिरांक मानतो तेव्हा वंश हे परिवर्त्य असते. आज जपान आहे तसे गौरववंशीय एके काळी उसनवारी करणारे होते. या उसनवारीच्या प्रक्रियेत जपानची काही दशकेच गेली असतील तर युरोपची शतकेच्या शतके गेली आहेत. याच मापाने मोजावयाचे तर काही शब्दनिष्ठ पंडित गौरवंशीयांपेक्षा जपानी लोकांना वंशदृष्ट्या अधिक श्रेष्ठ ठरवतील !

वंश आणि संस्कृती यांच्या भिन्नत्वाकडे आपण दुसऱ्या बाजूने पाहू. या वेळी वंश हा स्थिरांक धरू. मग आपल्याला दिसेल की, कोणत्याही एका मानववंशाची संस्कृती ही अनेक अंशी गुंतागुंतीची असते. दिलेल्या एकाच मानववंशापकी काही समूह अधिक प्रगत होतात आणि मोठमोठी राज्ये निर्माण करतात, वास्तुशिल्पशास्त्राची विजयचिन्हेच जणू अशा भव्य नगरी वसवतात, सार्वजनिक उपयोगाची मोठमोठी कामे पार पाडतात तर त्याच वंशातील आणखी काही लोकसमूह केवळ मागासलेले भटके गुराखी बनून राहतात. सबंध वंशाच्या वंश असा एका वेळी प्रगती करीत नाही. उदा. अरबांच्या काही टोळ्यांनी सुलतानांच्या आधिपत्याखाली शाही वैभवाने नटलेली मोठमोठी राज्ये उभारली, तेथे कला आणि विज्ञान यांची भरभराट झाली, ते अरब त्यांच्या काळी सुधारणेच्या, संस्कृतीच्या आघाडीवर होते. त्यांच्याच वंशाचे दुसरे लोक मात्र कुरणां-मागून कुरणांवर आपल्या गुरांच्या कळपांमागे हिंडणारे सावेमुधे 'बदाऊन' राहिले होते. तसेच पाहता, सैबेरियातील अमुर नदीच्या काठच्या आदिम जमाती, अथवा सैबेरियन टंड्रा प्रदेशातील युकागीर लोक आणि सुसंस्कृत असे चिनी लोक हे सगळे एकाच वंशाचे आहेत. मलेशियातही मलायी द्वीपकल्पाच्या किनाऱ्यावर मलायी वंशाच्या अर्धवट रानटी स्थितीतील जमाती आहेत आणि अंतर्भागी उच्च प्रकारच्या संस्कृतीची केन्द्रेही आहेत. म्हणून असंस्कृत लोकांपासून सुसंस्कृत लोक वेगळे ओळखण्यासाठी वंश हा निकष लावता येणार नाही. ज्यांचे पूर्वज रानटी होते असे अनगड लोकही अत्यंत प्रगत संस्कृती आत्मसात करून घेतात आणि तिच्या प्रगतीला आपलाही हातभार लावू शकतात असे दिसून आले आहे.

मांचू ही एक असंस्कृत आणि दुर्लक्षित अशी भटकी तुंगू जमात होती. पण प्रथमतः मंगोल लोकांच्या सहवासाने आणि नंतर इसवी सनाच्या सतराव्या शतकाच्य

मध्यास चीनवर मिळविलेल्या विजयामुळे त्यांनी इतकी प्रगती केली की, त्या काळी वैभवात आणि कीर्तीमध्ये अतुलनीय अशा देशाचे राज्यकर्ते घराणे मांचूंचे झाले. जिकडे आपण पाहावे तिकडे, मग ते मलायी असोत, की मांचू, मंगोल असोत वा अरब किंवा नॉर्डिक, ही एकच गोष्ट पुन्हा पुन्हा घडत असलेली आपल्याला दिसेल.

नॉर्डिक लोकांचाही या यादीत समावेश आहे. त्यांच्या 'सुस्पष्ट ऐतिहासिक नियती'बद्दल जे भरमसाट दावे केले जातात, त्याबद्दल कोणीच भांडायला उठण्याचे कारण नाही. फक्त, ज्यांनी मानवी संस्कृतीच्या संवर्धनात आपला वाटा उचलला आहे अशा इतर सगळ्या मूळच्या आडदांड मानवसमूहांबाबत तसलेच दावे मान्य केले म्हणजे झाले. पण जेव्हा नॉर्डिक लोकांचा खास निर्देश केला जातो आणि संस्कृति-संवर्धनातील त्यांच्या भागीदारीचे श्रेय इतिहासाच्या वैश्विक प्रक्रियेला न देता त्यांच्या वंशप्रकाराला दिले जाते तेव्हा त्यामागील पक्षपाती तरफदारी ही सहज लक्षात भरते. हूटन ( Hooton ) म्हणतो त्याप्रमाणे ज्यांच्या धाडींमुळे जुन्या युरोपची शांती भंगून गेली असे 'उत्तरेकडील दांडगट मवाली'[३] असे त्यांचे वर्णन करणे किंवा हॅन्किन्स (Hankins) करतो त्याप्रमाणे 'त्यांनी जितक्या संस्कृती निर्माण केल्या त्याहून अधिक नष्ट केल्या'[४] इकडे लक्ष वेधविणे हेच वास्तव इतिहासाला अधिक धरून होईल. परंतु खरा ध्यानात घेण्याचा मुद्दा हा आहे की, नॉर्डिक लोक हा आनुवंशिक वैशिष्ट्ये असणारा एक जनसमूह आहे आणि ते लोक जरी कोण्या एका काळी असंस्कृत होते तरी नंतर ते एका महान संस्कृतीचे उद्गाते झाले व त्या संस्कृतीचे संवर्धन करण्याच्या त्यांच्या कर्तृत्वाच्या आड त्यांचा पहिला असंस्कृतपणा मुळीच येऊ शकला नाही.

इतिहास हा कोणा एका विशिष्ट मानववंशाची मालमत्ता आहे असे समजून लिहिता येणार नाही. संस्कृतीची उभारणी ही धीरे धीरेच होत असते. कधी एक मानव-वंश त्या उभारणीत सहभागी असतो तर कधी दुसरा. संस्कृतिनिर्मितीचे सर्व श्रेय जेव्हा नॉर्डिक लोकांना दिले जाते तेव्हा तो दावा आणि एखाद्या मानववंशशास्त्रज्ञापुढे केव्हाही आदिम जमाती मांडतील तो दावा यांत काहीच फरक उरत नाही– आदिम जमाती आपली स्वतःची हकीकत सांगतील एवढेच. त्यांचासुद्धा असाच विश्वास असतो की, जगातील सगळ्या महत्त्वाच्या गोष्टींची सुरवात त्यांच्यापासून झाली आणि शेवटही त्यांच्याबरोबरच होणार; ज्या काही चांगल्या गोष्टी आहेत त्या विधात्याने खास त्या जमातीला म्हणूनच जगाच्या सुरवातीस दिल्या आणि त्या जमातीचा जेव्हा सर्वनाश होईल तेव्हाच ईश्वर जगाचाही विनाश करून टाकील. एखाद्या छोट्याशा आणि असंस्कृत अशा अमेरिकन इंडियन जमातीने किंवा उघडेनागडे हिंडणाऱ्या न्यू गिनीमधील पापुअनने असे प्रतिपादन केले म्हणजे आपल्याला हसू येते. पण हेच उपहासाचे हत्यार आपल्यावरसुद्धा उलटू शकेल. तसे पाहिले तर या टोळ्यांच्या दुनियेची मर्यादा

त्यांच्या सीमेच्या फक्त जराशीच पलीकडे असते आणि लोककथा हाच त्यांचा इतिहास असतो. ते करीत असलेले अतिशयोक्त दावे म्हणजे त्यांच्या अज्ञानाचा परिणाम होय. आजच्या काळात हाच असंस्कृत संकुचित प्रादेशिकतावाद मोठ्या विद्वत्तापूर्ण रीतीने पुढे मांडण्यात येतो. आजपर्यंत इतिहासकारांनी जे पुराव्यानिशी सिद्ध केले आणि आधुनिक काळात सर्व जगाचे जे ज्ञान आपणांला झाले, त्यांच्या अपेक्षेने ही प्रांतवादी मांडणी म्हणजे अगदीच पोरकट आणि रानटी म्हणावयास हवी.

संकुचित प्रादेशिकतेच्या आहारी जाऊन इतिहासाचे पुनर्लेखन करता येईल आणि इतिहासकाराला आपल्याच वंशाच्या लोकांच्या कृतींचा डांगोरा पिटता येईल. पण तरी तो प्रांतवादच; इतिहास नव्हे. इतिहासाचे तात्पर्य हेच आहे की, संस्कृतिवर्धनातील अधिकतम प्रावीण्य हे एका वंशाकडून दुसऱ्या वंशाकडे, एका खंडातून दुसऱ्या खंडात असे जात आलेले आहे. साकल्याने एका वंशाला असे ते कधीच प्राप्त झाले नाही. काही विशिष्ट ऐतिहासिक कारणांमुळे ज्यांना एखाद्या कालखंडात अनुकूलता लाभली अशा एखाद्या मानव-वंशाच्या काही विभागांनाच हे प्रावीण्य मिळू शकले, काही काळपर्यंत शांतता लाभली किंवा काही गटांना शोषणमुक्त होता आले. त्या मानववंशांपैकी जे या स्थितीचा फायदा घेण्याच्या कक्षेत होते, त्या समूहांना तीपासून फायदा उठवता आला आणि जीवनोपयोगी कला-कौशल्याची भरभराट झाली; त्यांपैकी काही व्यक्तींनी– मग तो मानववंश कोणता का असेना– या संधीचा बरोबर उपयोग केला आणि पुष्कळ वेळा त्यांची नावे इतिहासात नमूद होऊन राहिली. मेसोपोटेमिया, चीन, भारत, इजिप्त, ग्रीस, रोम आणि इंग्लंड या सर्व ठिकाणी हे घडले. यावरून उघड होते की, प्रगत संस्कृती ही कोणत्याच वंशाची मक्तेदारी नाही.

म्हणून असुक एका वंशामुळे मानवी संस्कृतीतील उच्चतर गोष्टी लभ्य झाल्या असे आगाऊच न मानता आपण वंशविषयक अभ्यास ऐतिहासिक, जीवशास्त्रीय आणि मानवमिति-विषयक दृष्टीने करणे हे योग्य ठरेल. वंश हा शास्त्रीय अभ्यासविषय आहे. पण शरीर-रचनेच्या मोजमापांच्या नोंदीपेक्षा मानवी इतिहास खूपच गुंतागुंतीचा आहे आणि सांस्कृतिक प्रगती ही कोणत्याही वंशाच्या लोकांना वारसाहक्काने मिळालेली आणि यांत्रिक तऱ्हेने संक्रमित झालेली नसते.

## ते म्हणतात—

(१) ज्या अर्थी जैव फरक हे हळूहळू घडत असतात आणि सांस्कृतिक फरक दर पिढीला पडतो त्या अर्थी संस्कृतीचा भरभर वाहणारा ओघ वंश हा स्थिरांक धरून उलगडणे शक्य होणार नाही. या ओघाचे स्पष्टीकरण पुष्कळदा आपल्याला इतर जनसमूहांशी संपर्क, वैयक्तिक प्रतिभासंपन्नता, भौगोलिक परिस्थिती अशा तऱ्हेच्या घटनांवरून देता येते. पण वंशभिन्नत्वावरून मात्र कधीच देता येणार नाही.

**R. H. Lowie**, *An Introduction to Cultural Anthropology*. New York, Farrar and Rinehart, 1934, p. 9. This author's '*Are We Civilized ?*' London, George Routledge and Sons Ltd. 1929.

( २ ) वंशभेदांविषयी निश्चल औदासीन्य पत्करूनच आतापर्यंत संस्कृतीचा प्रसार व वृद्धी होत आलेली आहे. ज्या जनसमूहांना संस्कृती आत्मसात करण्याची संधी मिळाली त्यांनी संस्कृती केवळ प्राप्त करून घेतली असे नव्हे तर तिच्या आशयात भरही घातली. उलट पक्षी, जेव्हा एखादा गट बाह्य संपर्काच्या अभावी अलग पडला तेव्हा त्याला समृद्ध अथवा संकुल अशा संस्कृतीची निर्मिती जमलेली नाही.

**Ralph Linton**, *The Study of Man*. London, D. Appleton Century, 1936, p. 54.

( ३ ) वंश याचा जो एकच आकलनीय म्हणजे जीवशास्त्रीय अर्थ आहे, त्या अर्थाने पाहता भाषा आणि संस्कृती या दोहोंच्या इतिहासाशी वंशसंकल्पनेला काही कर्तव्य नाही. पदार्थविज्ञानाच्या आणि रसायनशास्त्राच्या नियमांच्या आधारावर भाषांच्या व संस्कृतीच्या इतिहासाचे स्पष्टीकरण जितपत देता येईल तितपतसुद्धा वंशसंकल्पनेद्वारा देता येणार नाही एवढी आपण पूर्णपणे खात्री करून घेतली म्हणजे आपण एक दृष्टिकोण आत्मसात केला असे होईल. त्या दृष्टिकोणामुळे स्लाव्होफिलिझम, अँग्लोसॅक्सनडम् , ट्यूटॉनिझम, लॅटिन प्रतिभासंपन्नता असल्या गूढतेचे आवरण असलेल्या घोषणांकडे आपण फार तर जरा लक्ष पुरवू, पण त्यांच्यापैकी कशामुळेच भुलणार मात्र नाही.

**Rdward Sapir**, *Language*, New York, Harcourt, Brace and Co., 1921, pp. 222-223.

## नॉर्डिक लोकांचे इतिहासदत्त कार्य

वंशश्रेष्ठतावादी म्हणतात—

केवळ लाजिरवाणा वैचारिक आळस किंवा लज्जास्पद असा इतिहासविषयक खोटेपणा एवढ्याच गोष्टीमुळे हे नजरेआड करता येईल की, जर्मन जमातींच्या जागतिक इतिहासातील प्रवेशामुळे दुःखात पिचणाऱ्या मानवतेची चिरंतन पाशवी अवस्थेतून सुटका झाली.

**Houston Stewart Chamberlain**, *The Foundations of the Nineteenth Century*, Translated by John Lees, London, John Lane, 1910, Vol. I, p. 495.

इतिहासकार म्हणतात—

(१) नॉर्डिक लोकांची भौतिक संस्कृती ही मुळात डॅन्यूब नदीकाठचे शेतकरी किंवा बृहदश्मयुगीन लोक यांच्या संस्कृतीपेक्षा श्रेष्ठ दर्जाची नव्हती. ट्रॅन्ससिल्व्हानियात ते आपल्याला उघडउघड विध्वंसक म्हणून दिसतात. पूर्वेकडील प्राचीन देशात आणि एजियन समुद्राच्या आसपास काही काळ त्यांनी तेथील जुन्या व अधिक प्रगत संस्कृतींची हानी केली व नंतर त्यांचा स्वीकार केला.

**V. Gordon Childe,** *The Aryans,* London, Kegan Paul, 1926, p. 207.

(२) राजकीय आणि लष्करी दृष्टिकोणातूनसुद्धा नॉर्डिक लोकांच्या मध्ययुगातील सर्वश्रेष्ठत्वाबद्दल खात्रीलायक पुरावा पुढे करता येणार नाही.

**H. E. Barnes and H. David,** *The History of Western Civilization.* New York, Harcourt, Brace and Co., 1935, Vol. I, p. 446.

## त्यांना एकमेकांच्या भाषा आवडत नाहीत.

फ्रेंच

वर्णांच्या उच्चारासंबंधी मेंदूकडून येणाऱ्या आज्ञा पाळण्यात मेडुला ओब्लोंगाटा ( मस्तुक ) च्या मज्जातंतुकेंद्रांना येणाऱ्या नैसर्गिक किंवा अर्जित अडचणी हे जर्मनभाषी लोकांच्या बाबतीतील एक दुर्दैवी सत्य आहे. ही अडचण आजसुद्धा उघड दिसते. ते va ऐवजी fa आणि ba ऐवजी pa म्हणतात.

**Honore' Joseph Chave'e,** *Bulletin Sociale Anthropologie,* 1873, p. 505, Quoted by Jaques Barzun in *Race, A Study in Modern Superstition.* London, Methuen and Co., 1938.

जर्मन

विनासायास स्पष्ट शब्दोच्चार हे फक्त नॉर्डिक वंशीयच करू शकतात. उलट, नॉर्डिक नसलेले लोक आणि मानववंश यांचे शब्दोच्चार अशुद्ध, प्रत्येक उच्चार अरळ अरळ आणि जास्त करून, जनावरांनी काढलेल्या आवाजांसारखे असतात.

**Herman Gauch,** *New Foundations for Research into Social Race Problems.* Berlin, 1933, p. 165.

## सारांश

मानवी कृती व निर्मिती यांतील भिन्नभिन्नपणाबद्दल केशसंबंधित खुलासा म्हणून जे स्पष्टीकरण देण्यात येते ते एक तर मूर्खपणा आहे किंवा लबाडी आहे.

Arnold Joseph Toynbee, *A Study of History*, London, Oxford University Press, 1934, Vol. I, p. 245.

## संदर्भ व टीपा

( १ ) लेखक : मॅक्स मुल्लर – *Biography of words and the Home of the Aryans*, London, 1888, P. 120.

( २ ) वास्तविक भाषावाचक अशी स्लाव्ह ही संज्ञा मी स्वतःसुद्धा वंशवाचक म्हणून या पुस्तकात वापरली आहे. या समूहाची जैविक संज्ञा म्हणता येईल, असा काही शब्द लोकांच्या वापरात नाही.

( ३ ) Hooton, Earnest A., *Up from the Ape*. London, Allen and Unwin, 1931, p. 525.

( ४ ) Hankins, Frank H., *Racial Basis of Civilization*. New York 1926, p. 350; London, Knopf. 1927.

◎ ◎

रा. सा. सं. मं. ग्रंथालय
प्र/२५२/१
मंत्रालय.

## प्रकरण ३ रे

# स्वतःचे वर्गीकरण करण्याचे माणसाचे प्रयत्न

ज्याबद्दल तज्ज्ञांमध्ये जास्तीत जास्त मतभेद आहेत असा आधुनिक शास्त्रांचा भाग म्हणजे मानववंशांचे वर्गीकरण हा होय. काहींनी वंशविभाग हे भौगोलिक विभागांना अनुसरून पाडले आहेत. काहींनी त्वचेच्या रंगावरून तर काहींनी कपालांकाच्या आधाराने वंश विभागले आहेत. इतर काही लोकांनी अनेक गुणवैशिष्ट्ये एकत्र करून त्यांच्या आधारावर मानववंशांचे वर्गीकरण केले आहे. काहीजण मानवजातीची विभागणी तीन वंशांमध्ये करतात, काही सतरा तर अन्य काही चौतीस मानववंश मानतात. एखाद्या वांशिक गटास काही तज्ज्ञांनी प्राथमिक मानले तर अन्य काहींनी त्यासच दुय्यम ठरविले आहे. ही मतभिन्नता शास्त्रज्ञांच्या हेकेखोरपणामुळे नसून मानवी इतिहासातील काही घटनांमुळे व आज ज्ञात असलेल्या जीवशास्त्रीय सिद्धांतांमुळे आहे. या दोन विषयांची चर्चा आपण पुढील प्रकरणांतून करणारच आहोत. परंतु प्रथम मानववंशांचे कोणतेही वर्गीकरण ज्या गोष्टींच्या आधारावर केले पाहिजे आणि ते करताना जी अंतिम विभजनपद्धती वापरावयाची त्यांचा विचार प्रथम केला पाहिजे.

मानवजातीच्या वंशविभागणीची पूर्वपीठिका तशी सुप्रतिष्ठित आहे. वनस्पतिशास्त्र किंवा प्राणिशास्त्र यातील तशाच तऱ्हेचे वर्गीकरण हे बूफाँच्या ( Buffon ) अठराव्या शतकातील ढोबळ प्रकारीकरणापासून प्रगत होत आधुनिक काळात उपयोजित असलेल्या अधिक मौलिक वर्गीकरणापर्यंत आले आहे. या आधुनिक वर्गीकरणात जीवांच्या विविध

प्रकारांचे वांशिक संबंध दर्शवून गट केलेले असतात आणि त्यातून उत्क्रांतीचा क्रम सूचित केलेला असतो.

मानवेतर जातींच्या अभ्यासातून प्राप्त झालेले निष्कर्ष शास्त्रज्ञापुढे असतात आणि भासमान सादृश्यात लपलेले खाचखळगे त्याला माहीत असतात. उदाहरणार्थ, प्राणिशास्त्रात जर व्हेलला पोहावयास येते म्हणून त्याला माशांच्या वर्गात घातले तर ते वर्गीकरण कृत्रिम मानले जाते. प्रजोत्पादनपद्धती आणि श्वसनासाठी फुफ्फुसांनी हवा आत घेणे यात साम्य असल्यामुळे व्हेलचा सस्तन प्राण्यांच्या वर्गात समावेश केल्याने ते वर्गीकरण मूलभूत ठरते. सस्तन प्राण्यांचा अभ्यास करताना त्यांच्यात उघड आणि स्पष्ट दिसणाऱ्या कितीतरी भिन्न भिन्न शारीरिक वैशिष्ट्यांना दुय्यम महत्त्वाचे मानावे लागते आणि त्यांचा विचार केवळ माशाप्रमाणे पोहणाऱ्या व्हेलबरोबरच नव्हे तर पक्ष्यांप्रमाणे उडणाऱ्या वटवाघुळाच्या बरोबरही करावा लागतो. शिवाय व्हेल मासे व वटवाघुळे यांचा अभ्यासही खूर असलेली जनावरे आणि मानवप्राणी यांच्या जोडीनेच केला पाहिजे. कारण, ते सर्वच सस्तन प्राणी आहेत.

म्हणूनच मानववंशांचे अभ्यासक, मानवाचे असे एक वर्गीकरण करण्याची आशा धरून होते की जे केवळ उथळ आणि वर्णनात्मक न होता 'सस्तन प्राणी' या वर्गीकरणास जे प्रामाण्य आहे ते त्यास लाभावे.

डार्विनच्या काळापूर्वी अशा तऱ्हेच्या वर्गीकरणासाठी वापरले जाणारे विभजन-तत्त्व मूलतःच निराळे होते. मानवजातीची उत्पत्ती एकोद्भव आहे की बहुद्भव आहे हा त्या काळचा वादाचा मुद्दा होता. बायबलमध्ये वर्णन केलेली आणि चर्चने मान्य केलेली भूमिका अशी की ॲडम हा सर्व मानवांचा आद्य पिता होय. कोलंबसपूर्व युरोपात हेच मत रूढ होते. परंतु, नवीन जगाच्या शोधार्थ समुद्रपर्यटने आणि माणसांच्या डोळ्यांपुढे विस्तारत असलेले जग यांमुळे मानवोत्पत्तीची दुसरी एक उपपत्तीही लक्षवेधी ठरू लागली. कारण, मानवाची उत्पत्ती अनेक ठिकाणी वेगळी वेगळी झाली नाही असे मानले तर पिवळ्या, काळ्या, ताम्रवर्णी अशा विविध प्रकारच्या माणसांचा खुलासा कसा करावयाचा? आपण हे ध्यानात ठेवले पाहिजे की, त्या काळी कोणालाच काळ्या, ताम्रवर्णी अथवा पीत मानववंशात, वंशातल्या वंशातच किती खूप फरक असतात हे माहीत नव्हते किंवा हे विविध मानवगट छटाछटांचा फरक होत होत एकमेकात मिसळून गेलेले असतात हेही ठाऊक नव्हते. आपल्या भूगोलाच्या प्राथमिक पुस्तकात चित्रीकरण करतात त्याप्रमाणे सर्व वंश हे परस्परांपासून अत्यंत भिन्न असे भासत असत.

मानवाची उत्पत्ती एकोद्भव आहे या मताचे काही विचारवन्त मानीत की, हवामानातील विविधतेमुळे भिन्न मानववंश निर्माण झाले. या विचारवंतांपैकी बारों द मॉतेस्क्यू (Baron de Montesquieu) हा सगळ्यात प्रसिद्ध होता. त्याचे Spirit of

Laws हे पुस्तक १७४८ साली प्रसिद्ध झाले. असे काही अनेकोद्‌भववादीही होते की, ज्यांच्या मते मानवामानवातील फरक हे भिन्न भिन्न ईश्वरी संकल्प असून त्यांचा एकमेकांशी काही संबंध नाही. फ्रेंच अकादमीमधील जॉफ्रे सेंट हिलेरी ( Geoffroy st. Hilaire ) याने १८३० मध्ये या विषयावर एकोद्‌भववादी कुव्हिए (Cuvier) याच्याशी खूप वाद केला. कुव्हिए याचे म्हणणे होते की सर्व मानववंश हे नोव्हापासून त्याच्या हॅम, शेम आणि जापेत या तीन पुत्रांद्वारा उत्पन्न झाले. गटेच्या भावना या वादविवादामुळे किती उफाळून आल्या होत्या हे पाहिले म्हणजे तत्कालीन विचारविश्वात या चर्चाविषयाचे किती महत्त्व होते हे ध्यानात येईल. " या महत्त्वाच्या घटनेसंबंधी तुम्हांला काय वाटते ? " गटे आपल्या एका मित्राला म्हणाला. " जणू ज्वालामुखीचा उद्रेक झाला आहे. प्रत्येक गोष्ट अग्नये स्वाहा झाली आहे आणि ही काही आता चार भिंतीआड घडणारी क्षुल्लक घटना राहिली नाही. या भेटीचा वृत्तान्त ऐकून माझी मनःस्थिती कशी झाली याची तुम्हांला कल्पनाही करता येणार नाही. " १

प्रत्येक मानववंश ही एक सुटी सुटी अशी गोष्ट आहे या संकल्पनेला आव्हान देणारे विद्वान अभ्यासक डार्विनच्या पूर्वीसुद्धा होतेच. पहिला महान मानववंशशास्त्रज्ञ थिओडोर वाइट्झ ( Theodor Waitz ) याने निरनिराळ्या मानववंशांच्या शारीरिक मोजमापांच्या आधारावर त्या संकल्पनेला विरोध केला. त्याने दाखवून दिले की, मानवाचे मानीव वांशिक साचे वास्तवाला धरून नाहीत. पीतवर्णीय अथवा ताम्रवर्णीय मानवांमध्ये अशा प्रकारच्या श्रेणीच्या श्रेणी होत्या की, त्यांचे त्यांच्याच वंशातील अन्य गटांपेक्षा इतरांशी, उदाहरणार्थ, युरोपियनांशी अधिक साम्य होते. Origin of Species हा ग्रंथ प्रसिद्ध झाला त्याच वर्षी त्याचा Anthropology हा ग्रंथ प्रसिद्ध झाला. पण वाइट्झला डार्विनच्या सिद्धान्तासंबंधी काहीच माहिती नव्हती. आणि म्हणूनच तो जुना वाद शेवटचा टोला हाणून संपुष्टात आणण्याचे श्रेय केवळ डार्विनच्या सिद्धान्ताला देता येणार नाही. तरी पण डार्विनची प्राण्यांच्या उपजातीसंबंधी कल्पना आणि नर व उच्चतर वा-नर (apes) जाती यांच्यातील शारीरिक साम्याचे त्याने दिलेले स्पष्टीकरण यामुळे मूळ वादातील हवाच निघून गेली. त्यामुळे सर्व चर्चेला अधिक व्यापक संदर्भ प्राप्त झाला. या संदर्भात सर्व मानववंश आणि मानवसदृश इतर प्राणी एकाच वंशवृक्षाच्या शाखा ठरल्या.

डार्विनच्या वेळेपासून वंशविषयक सर्वच अध्ययनाला पूर्वीच्या चर्चाविषयांपेक्षा अगदी निराळा असा पार्श्वपट मिळाला आहे. सर्वच मानवजात ज्यात अंतर्भूत आहे असा एकच एक वंशवृक्ष या अभ्यासातून स्वीकारला जातो आणि माणसांतील प्रकारभेदांना जीव-शास्त्राच्या दृष्टीने काय महत्त्व हे ठरविण्याचा प्रयत्न होतो.

ज्यांच्या संयोगाने संतती होत नाही अथवा झाल्यास ती प्रजोत्पादनक्षम असत नाही त्याच पूर्णत्वाने भिन्न जाती होत हाच डार्विनच्या मते जातिभिन्नत्वाचा योग्य निकष होय

हा निकष लावल्यास मनुष्यमात्रात अनेक जाती सामावलेल्या नाहीत हे लगेच स्पष्ट झाले. आपापल्या वंशाचा अगदी खास नमुना म्हणता येईल अशा गौरकाय आणि मंगोलियन व निग्रो व्यक्तींच्या मीलनापासून प्रजोत्पादनसमर्थ अशीच संतती निपजते हे अगदीच उघड होते. इतिहासात निरनिराळ्या वांशिक गटांचा संकर नेहमीच घडत आला आहे आणि वाहतुकीच्या साधनांच्या प्रचंड विपुलतेमुळे माणसाच्या स्थलांतरशीलतेचा वेग वाढला वा परिणामतः वंशसंकर अधिकाधिक होऊ लागला.

परंतु, त्या काळातील सर्वच विचारप्रवाहाच्या बुडाशी 'जाति 'भिन्नता ही संकल्पन स्थिर होती आणि माणसामाणसातील प्रकारभेद हे जर परस्परसंयोगातून प्रजोत्पादनक्षमतेच्या अभावातून वेगळे करता आले नाहीत तर शारीरिक वैशिष्ट्यांची काही कसोटी लावली पाहिजे असे वाटू लागले. वंशविषयक निकष म्हणून वापरण्यासाठी ही शरीरवैशिष्ट्ये कोणत्या तरी रीतीने त्या वंशाच्या सर्वच लोकांत आणि केवळ त्यांच्यातच दिसून आली पाहिजेत; उदाहरणार्थ, अतिशय काळा असा त्वचेचा रंग, कुरळे केस आणि एक विशेष प्रकारचे रुंद, बसके नाक या गोष्टी इतर कोणामध्ये न सापडता केवळ निग्रो वंशाच्या लोकांतच दिसून येतात. अशा तऱ्हेच्या बऱ्याच वैशिष्ट्यांचा अभ्यास करण्यात आला आहे आणि या दृष्टिकोणातून वंशविषयक निकष म्हणून त्यांचा वापरही करण्यात आला आहे. या सर्व अभ्यासांचे निष्कर्ष जाणून घेणे वंशविषयक आधुनिक कल्पना समजण्यासाठी आवश्यक आहे.

**त्वचेचा रंग :** भिन्न मानववंशांमधील तत्काळ लक्ष वेधून घेणारा फरक त्वचेच्या रंगात असतो. प्राचीन इजिप्तमधील चित्रकारांनी भित्तिचित्रांत त्यांना माहीत असलेल्या चार प्रकारच्या लोकांकरिता मानवी त्वचेचा वर्ण दाखविण्यासाठी चार रंग वापरलेले दिसतात. त्यांचा स्वतःचा तांबडा वर्ण, आशियातील त्यांच्या शत्रूंचा पिवळा, उत्तरेकडील लोकांचा गोरा व निग्रोंचा काळा असे ते चार रंग होत. या वर्गीकरणात एक वर्ग कमी करून उरलेल्यांच्या बाबतीत ग्रीक पारिभाषिक शब्द वापरलेले आहेत. या वर्गीकरणाचे महत्त्व असे की, प्राणिशास्त्रदृष्ट्या होऊ शकणारे मानवांचे ते सर्वांत व्यापक वर्गीकरण आहे. Leucodermi गौरत्वचायुक्त, Xanthodermi पीतत्वचायुक्त व Melanodermi कृष्णत्वचायुक्त अशा रीतीने माणसांचे तीन वर्ग त्यात केले आहेत. हे वर्गीकरण कॉकेसॉइड ( गौर ), मोंगोलॉइड ( पीत ) व निग्रॉइड ( कृष्ण ) या सामान्य व्यवहारातील विभागणीशी मिळतेजुळते आहे. अगदी उघड उघड दिसणारे आणि लक्ष वेधून घेणारे असे हे मानवांचे प्रकार आहेत. या तीन गटांशी आणखीही शारीरिक वैशिष्ट्ये निगडित आहेत हे आपण पुढे पाहूच. या प्रत्येक गटाची भौगोलिक व्याप्ती खूप विस्तृत आहे आणि ते गट खरेखुरे फरक दाखवतात.

परंतु या प्रमुख ( प्राथमिक ) वांशिक वर्गीकरणासाठी म्हणून त्वचेच्या वर्णाला फारच मर्यादित शास्त्रीय महत्त्व आहे. या प्रत्येक गटाचा अंतर्गत भेदविस्तार फार मोठा आहे आणि गौरवंशातील काही गट काही निग्रोंपेक्षाही काळे दिसतात. ब्रॉके ( Broca ) या फ्रेंच भौतिक मानवशास्त्रज्ञाने मानवी त्वचावर्णाच्या चौतीस छटा मानल्या तर डेनिकेर

( Deniker ) याने त्यांना नवात आणून बसविले. एका दिशेने पाहिले असता रंगछटांमधील फरक हा समूहांचे पृथक्त्व ठरविण्यास उपयोगी आहे. पण पुष्कळदा त्यामुळे दोन भिन्न समूह एकमेकांना छेदणाऱ्या वर्गात पडतात ही गोष्ट अधिक गंभीर ठरते.

जेव्हा शंकास्पद गटांना मुख्य वंशात स्थान द्यावयाचे असते तेव्हा त्वचेच्या वर्णाची वंशपृथक्त्वाकरिता निकष म्हणून निवड करण्यातील उथळपणा हा खरोखर अडचणीत टाकणारा ठरतो. निग्रोंच्या मानलेल्या रंगछटा ऑस्ट्रेलियनांच्या सर्वाधिक जवळ आहेत म्हणून ऑस्ट्रेलियनांना निग्रो म्हणावयाचे का? फिकट रंगाचे आर्मेनियनांचे प्रकार त्यांचा रंग जवळजवळ गोऱ्या लोकांसारखाच आहे म्हणून गौरवंशीयांत मोजावयाचे काय? सर्वच अभ्यासक मानतात की असले युक्तिवाद हे उथळ आहेत.

म्हणून असे म्हणता येईल की, खूप मोठ्या प्रदेशातील माणसांचे वंशविभाग पाडत असताना त्वचेचा वर्ण हा विभजनाचा निकष म्हणून थोडा उपयोगी आहे. पण त्याचा वापर जरा सैलपणेच केला पाहिजे. शास्त्रीय निकष म्हणून त्याचा उपयोग स्थूल मानाने करता येतो. पण काटेकोरपणाने करता येत नाही.

## डोळ्यांचा रंग आणि आकार

लोकांची शारीरिक मोजमापे घेताना साधारणपणे डोळ्यांचा रंगही नोंदवितात. पण त्यावरून एखाद्या व्यक्तीची विशिष्ट वंशाचा घटक म्हणून निश्चिती करता येत नाही. काळे डोळे हे सर्वच मानववंशांमध्ये असतात, त्यामुळे डोळ्यांचा काळेपणा एक वंश दुसऱ्यापासून पृथक् करण्यासाठी उपयोगी ठरत नाही. 'डोळ्यांच्या रंगाचा निळेपणा' यासारखे अधिक विशिष्ट प्रकारसुद्धा कोणत्याही सर्वंकष्या सबंध वांशिक गटाशी समव्याप्त असलेले दिसत नाहीत.

डोळ्यांच्या आकाराचे वर्णन वंशवर्णनात मुख्यतः येते ते पीतवर्णी आशियायी लोकांचे वैशिष्ट्य असलेल्या तिरकस डोळ्यांच्या संदर्भात. डोळ्यांच्या या प्रकाराला मोंगोलॉइड नेत्रप्रकार म्हणतात. डोळ्यांचा हा तिरकेपणा दिसतो तो डोळ्याचा आतील बाजूचा कोन झाकणाऱ्या त्वचेच्या घडीमुळे. या घडीला epicanthic fold म्हणतात. तसे डोळे पुष्कळ गौरवर्णीयांत लहानपणी असतात परंतु प्रौढावस्थेपर्यंत ते सहसा तसे राहात नाहीत. काही निग्रोंमध्येही हा नेत्रप्रकार सापडतो आणि काही अमेरिकन इंडियन लोकांमध्येही तो असतो. ( तेही मोंगोलॉइड वंशाचे होत. ) परंतु बहुतेक अमेरिकन इंडियनांचे डोळे असे असत नाहीत.

## केसांचा रंग आणि प्रकार

काळ्या डोळ्यांप्रमाणेच काळे केससुद्धा सर्वच मानवजातींमध्ये इतक्या विस्तृत प्रमाणावर दिसतात की त्यावरून वंश ठरविणे शक्य होत नाही. आणि निळ्या डोळ्यां-

प्रमाणेच पिंगट केससुद्धा एका विशिष्ट वांशिक गटात सर्वसमान आहेत असे दिसत नाही. केसांच्या आकारांचेसुद्धा वर्गीकरण करता येते. त्यांचे तीन मुख्य प्रकार आहेत.

( १ ) Leiotrichy– सरळ आणि लांबसडक केस ( उदा. चिनी, एस्किमो );

(२) Cymotrichy – तरंगसदृश केस ( उदा. युरोप, भारत, ऑस्ट्रेलिया येथील लोक );

( ३ ) Ulotrichy– लोकरीसारखे कुरळे केस ( उदा. निग्रो, मॅलेनेशियन )

सूक्ष्मदर्शकाखाली एका केसाचा अडवा छेद पाहिला असता त्या छेदाचा आकार जसा दिसेल त्यावरून केसांचा एकूण प्रकार अजमावता येतो. सरळ केसाचा छेद वर्तुळाकार दिसतो, कुरळ्या केसाचा अतिशय लंबवर्तुळाकार असतो आणि तरंगसदृश केसाचा छेद वरील दोन्हींच्या मध्ये कुठे तरी पडतो.

परंतु त्वचेच्या रंगाप्रमाणेच हे केसांचे वेगवेगळे प्रकारही विस्तृत भौगोलिक प्रदेशात विखुरलेल्या वांशिक समूहांत सापडतात आणि या समूहांचे वैशिष्ट्य म्हणून त्यांचा निर्देश करताना तो फक्त वर्णनात्मक ठरतो. वंशाचे व्यवच्छेदक लक्षण म्हणून निर्देश केल्यास त्यांच्या बाबतीत अडचण अशी येते की, एरवी इतर लक्षणांवरून वेगवेगळ्या केलेल्या वंशगटांतून ते सरमिसळ झालेले सापडतात. युरोपियन लोकांसारखेच ऑस्ट्रेलियातील कृष्णवर्णी लोकांचेही केस मऊ व तरंगसदृश असतात. पण म्हणून ते युरोपियन नव्हेत. किंवा चिन्यांसारखे लांबसडक, सरळ केस आहेत, म्हणून एस्किमो लोक चिनी वंशाचे नव्हेत. तरंगसदृश मऊ केस हे युरोप, इजिप्त आणि भूमध्य समुद्राच्या पूर्वभागापासून भारतापर्यंत आणि भारतातीलही आशियायी लोकांचे वैशिष्ट्य आहे. आणि अर्थातच हे वैशिष्ट्य असणाऱ्या लोकांच्या इतर शारीरिक वैशिष्ट्यांत खूपच विविधता सापडते. तरीसुद्धा वंशांच्या विभागणीचा अभ्यास करताना केसांच्या प्रकाराला काही मूल्य निश्चितच आहे. पश्चिम पॅसिफिकमधील काळे मॅलेनेशियन– उदा. सॉलोमन बेटांचे मूळ रहिवासी– हे वंशदृष्ट्या आफ्रिकन निग्रोंशी संबंधित आहेत असे आपल्याला त्यांच्या इतर शरीरवैशिष्ट्यां-बरोबरच केसांच्या प्रकाराचा अभ्यास करून ठरविता येते.

## नाकाचा आकार

माणसाच्या नाकाच्या प्रकारांची मोजमापे घेण्याकडे भौतिक मानवशास्त्रज्ञांनी बरेच लक्ष पुरविले आहे. नाकाचे आकार मुख्यतः दोन तऱ्हेचे असतात.

( १ ) Leptorrhine– अरुंद नाकपुड्या ( उदा. युरोपियन, एस्किमो )

(२) Platyrrhine– बसक्या, रुंद नाकपुड्या (उदा. निग्रो, टास्मानियन लोक ).

याशिवाय नाकाच्या हाडाच्या आकारावरून काही प्रकार केलेले आहेत: अंतर्वक्र, बहिर्वक्र, गरुडाच्या चोचीसारखे, सरळ इ. इ.

आता इथेसुद्धा असे होते की, नाकाच्या वरील प्रकारांचे आत्यंतिक नमुने जगातील अगदी विशिष्ट लोकांच्यातच सापडतात. उदा. काही एक प्रकारच्या रुंद, बसक्या नाकपुड्या फक्त काही जातींच्या निग्रोंमध्येच असतात तर एक तऱ्हेच्या सरळ, अरुंद नाकपुड्या केवळ काही कॉकेशियनांच्याच असतात. पण हा निकष लागत नाही म्हणून असुक एक माणूस कॉकेशियन अथवा निग्रो नाही असे ठरविता येत नाही. इतर वैशिष्ट्यांवरून त्याला कॉकेशियन अथवा निग्रो ठरवावे लागते. कारण, या दोन्ही वंशांत नाकाच्या आकारात मोठ्या प्रमाणावर फरक पडत जातात.

## माणसाचा बांधा

शरीराची उंची हे एक अशा शरीरवैशिष्ट्याचे उत्तम उदाहरण आहे की, जे आनुवंशिक असून परिस्थितीमुळे त्यात सहज फरक पडू शकतो. पुष्कळ उदाहरणांवरून हे दाखवून देण्यात आले आहे की, वजन आणि बांधा यांवर जेवणखाण, आजारीपणा आणि आयुष्यातील इतर परिस्थिती यांचा पुष्कळच परिणाम होत असतो. म्हणून बहुतेक वेळा वांशिक संबंध दाखविण्यासाठी त्याला विश्वसनीय खूण मानता येत नाही. या नियमाला एक चांगला अपवाद फक्त पिग्मी लोकांचा आहे; त्यांचा बांधा हा उघड उघड आनुवंशिक असतो व प्राणिशास्त्रीय वर्गीकरणासाठी व्यवच्छेदक लक्षण म्हणून उपयोगी ठरतो. दुसऱ्या काही बाबतीत मात्र बांधा हा आनुवंशिक असला तरीही इतर लक्षणांवरून लोक एकाच वंशाचे ठरूनसुद्धा त्यांच्यातच उंचीने लहान व मोठे गट सरमिसळ झालेले दिसून येतात. मोजमापे घेण्यात आलेले सगळ्यात उंच व सगळ्यात ठेंगु गट हे दोन्ही निग्रोच आहेत आणि टिएरा डेल फ्यूगो– (Tierra del Feugo) सारख्या अतिदूरच्या बेटावरसुद्धा एक अतिशय उंच अशी अमेरिकन इंडियन जमात दुसऱ्या एका अगदी ठेंगण्या अशा जमातीची शेजारी आहे. बांधा हे प्रमाण वंशनिकष म्हणून फारच फसवे आहे.

## कपालांक

वरून पाहिले असता दिसणाऱ्या मस्तकाच्या जास्तीत जास्त रुंदीचे, मस्तकाच्या जास्तीत जास्त लांबीशी असणारे गुणोत्तर म्हणजे कपालांक होय. कपालांक हा प्रतिशत प्रमाणात सांगितला जातो. मस्तकाच्या ह्या स्वरूपांशाचे साधारणपणे तीन प्रकार मानले आहेत. (१) Dolichocephalic अरुंद शिरस्क कपालांक ७५ पेक्षा कमी. (२) Mesocephalic मध्यमान शिरस्क कपालांक ७५ ते ८० पर्यंत (३) Brachycephalic पृथुशिरस्क कपालांक ८० च्या वर.

मानवी शरीराच्या सर्व मोजमापात कपालांकाचे मापन हे भौतिक मानवशास्त्रात सर्वांत जास्त केलेले असते, आणि कोणत्याही एका लोकसमूहाच्या बाबतीत कपालांकाविषयी

नोंदलेली माहिती मिळण्याचा जास्तीत जास्त संभव असतो. याचे कारण असे की, कपालांक हा निश्चित स्वरूपाचा आणि मोजायला सोपा असतो. शिवाय, कातडीच्या जाडीचा भाग सोडून दिल्यास, मृताची कवटी आणि जिवंत माणसाचे डोके या दोहोंच्याही मोजमापास तो वापरता येतो.

श्वेतवंश हा निग्रो किंवा मोंगोलॉइड वंशापासून वेगळा ओळखण्यासाठी कपालांकाचा उपयोग करता येत नाही किंवा कोणत्याही एका प्राथमिक वंशगणनेत तो स्थिर असतो असेही नाही. उदाहरणार्थ, काही अमेरिकन इंडियन जमाती अशा आहेत की, आजपर्यंत मोजण्यात आलेली सर्वांत रुंद मस्तके व सर्वांत अरुंद मस्तके ही त्या एकाच जमातीत सापडली आणि तरीही इतर वैशिष्ट्यांवरून पाहता त्या जमाती एकाच वंशात मोडतात. त्याचप्रमाणे सर्व कॉकेशियन समूहांच्या बाबतीत कपालांक एकत्र असण्याऐवजी, त्यांतील काही उपगट एकमेकांपासून भिन्न करण्याकरिता त्यांच्या त्यांच्या कपालांकांचा उपयोग होऊ शकतो. दुसऱ्या शब्दांत सांगावयाचे म्हणजे कपालांकांचा आलेख काढल्यास एरवी साम्य असलेल्या विशाल गटामध्ये तो खूप वर चढतो आणि खालीही येतो आणि त्याचा उपयोग छोटे स्थानिक फरक दाखविण्याकरिताच मुख्यतः होतो.

वांशिक वैशिष्ट्ये म्हणून ज्यांचा उपयोग करतात त्यांमध्ये सर्वांत अधिक महत्त्वाचे शारीरिक आकारविशेष, वर ज्यांचे वर्णन केले आहे तेच होत. जरा थोड्या निराळ्या क्षेत्रात रक्तगटांचाही अभ्यास केला जातो. माणसास रक्त देताना असा अनुभव आला की, काही माणसांचे रक्त इतर काही माणसांच्या शरीरात घातले तर त्या इतर माणसांचा मृत्यू ओढवतो. या अनुभवातून रक्तांचे निरनिराळे गट असतात हे ज्ञान प्राप्त करून घेण्यात आले. वेगवेगळे असे रक्ताचे कमीत कमी चार प्रकार आहेत असे दिसून आले. हा शोध वंशशास्त्राच्या अभ्यासकांना विशेष उत्साहजनक वाटला. रक्ताचा गट अजमावण्याचे तंत्र अगदी साधे आहे आणि वंशसंबंधात या तंत्राच्या पहिल्याच उपयोगाने दिसून आले की आशियायी मोंगोलॉइड लोकांमध्ये एक रक्तगट, पश्चिम युरोपीय लोकांचा दुसरा एक रक्तगट आणि नेहमीच्या वर्गीकरणात मोंगोलॉइड समजले जाणाऱ्या एस्किमो व अमेरिकन इंडियन यांच्यामध्ये तिसराच एक रक्तगट विशेषेकरून दिसून येतो.

रक्ताचे गट हे संपूर्णपणे आनुवंशिक असून अतिशय स्थिर स्वरूपाचे असतात. उदाहरणार्थ, ज्याच्या रक्ताचा गट ' ए ' आहे, त्या माणसाचे आई व बाप यांपैकी एकजण किंवा दोघेही रक्तगट ' ए ' असलेले असले पाहिजेत. म्हणून जेव्हा एखाद्या लोकसमूहात वेगवेगळे रक्तप्रकार दिसून येतात तेव्हा तो लोकसमूह मिश्रवंशीय होय असे जवळजवळ निश्चितपणे म्हणता येईल. परंतु ऑस्ट्रेलियन आदिवासींसारख्या अगदी एकाकी पडलेल्या वंशगटात ' ए ' रक्तगटाची खूपच मोठी टक्केवारी दिसून येते आणि ' ए ' रक्तगट तर पश्चिम युरोपचे खास वैशिष्ट्य आहे. भारत आणि पूर्व आशियातील लोकांचे वैशिष्ट्य,

असलेला ' बी ' रक्तगट सर्व युरोपभर आढळून येतो, रक्तगटांच्या अभ्यासातून निघणारा पुरावा हेच ठोसपणे दाखवून देतो की, अगदी पूर्वीच्या काळापासूनच सगळीकडे वंशमिश्रण चालूच आहे.

जीवशास्त्राच्या दृष्टीने प्रमाणभूत ठरतील अशी मानवजातीची वर्गीकरणे करू पाहणाऱ्या वंशशास्त्राच्या अभ्यासकांपुढे ज्या समस्या वारंवार उभ्या राहतात त्यांपैकी काही समजावून घेण्याची आपली आता तयारी झाली आहे. कॉकेसॉइड, मोंगोलॉइड आणि निग्रॉइड या नावांनी ज्यांचा उल्लेख होतो त्यांपैकी प्रत्येक गट जगाच्या वेगवेगळ्या भागात विकसत आलेल्या शरीररचनाविषयक विशेषतांचे प्रतिनिधित्व करीत आहे याबद्दल कोणालाच शंका नाही. परंतु अशी किती तरी माणसे आहेत की, जी वर सांगितलेल्यांपैकी अनेक निकष वापरूनसुद्धा यांपैकी कोणत्याच एका वंशगटातील म्हणता येत नाहीत. काही श्वेत-वंशीय व्यक्ती काही निग्रॉइडपेक्षाही काळ्या असतात. काळे डोळे आणि काळे केस सर्वच वंशाच्या लोकांत आढळून येतात. परस्परांहून पराकाष्ठेने भिन्न असलेल्या वंशांच्या काही गटांतून कपालांक समान असलेला दिसून येतो. ऑस्ट्रेलियन आदिवासी आणि पश्चिम युरोपीय यांसारख्या अत्यंत भिन्न स्वरूपाच्या वंशगटांत केसांचे वळण मात्र पुष्कळदा एकसारखे दिसते. शिवाय असे की, रक्तगटांवरूनही वंशनिश्चिती करता येणार नाही.

तरी पण ही शरीररचनाविषयक काही वैशिष्ट्ये एकत्र करून त्यांच्या आधारे भिन्न भिन्न वंश वेगवेगळे ओळखणे शक्य असते. परंतु ही वैशिष्ट्ये नेहमी व एकत्रित सापडतील असे नाही. समजा, एखाद्या अभ्यासकाने प्रथम त्वचेचा रंग विचारात घ्यायचे ठरविले, तर स्वीडनमध्ये त्याला बऱ्याच मोठ्या संख्येने गौरवर्ण लोक सापडतील. आता या पहिल्या वर्गलक्षणात त्याने भुरे केस व निळे डोळे यांची भर टाकली तर नवीन होणारा गट त्याला संख्येने बराच लहान करावा लागेल. त्या वर्गलक्षणात जर उंच शरीरयष्टीची आणखी भर घातली तर तयार होणारा मानवगट आणखीच रोडावणार. ' अरुंद–मस्तक असणे ' हे लक्षण त्यात मिळवले म्हणजे संख्या आणखी कमी झाली. आता त्याने अभ्यासलेला गट उंच, भुरे केस असलेल्या, निळ्या डोळ्यांच्या, गोऱ्या रंगाच्या, अरुंद मस्तक असलेल्या व्यक्तींचा असा झाला. पण हे स्वीडनमधील काही थोड्या व्यक्तींचे वर्णन झाले. स्वीडनची जनता अशी आहे असे नव्हे. स्वीडन हा देश आताच सांगितलेल्या शरीरवैशिष्ट्यांच्या सह–अस्तित्वाविषयी प्रसिद्ध आहे. त्यातील नव्याने भरती झालेल्या हजारो सैनिकांची रेत्सीअस ( Retzius ) ने मोजमापे घेतली. आणि त्याला आढळून आले की, वर वर्णन केलेल्या वैशिष्ट्यांशी मिळतेजुळते असलेले लोक त्यात फक्त शेकडा ११ निघाले – ते सुद्धा रेत्सीअसने लावलेल्या कसोट्यांपैकी तीन गौरवर्ण, निळे डोळे आणि भुरे केस हे एकाच तऱ्हेच्या नैसर्गिक स्वरंगाचे ( पिंजकाचे ) निरनिराळे आविष्कार असून आणि तिन्ही एकत्र सापडावेत अशी साहजिक अपेक्षा असूनसुद्धा आपल्या अभ्यासासाठी त्याने

आणखी काही शरीररचनाविषयक कसोट्या वापरल्या असत्या तर तशा रीतीने तयार झालेला गट आकाराने आणखीच लहान झाला असता.

अशा घटनेचे महत्त्व ध्यानात येण्यासाठी आपण अशी कल्पना करू की, एका प्राणिशास्त्रज्ञाने काळ्या अस्वलांचा एक प्रकार निराळा ओळखून काढण्यासाठी त्यांच्या पाच वैशिष्ट्यांची एक यादी केली. मग जगातील अस्वलांच्या सगळ्या समूहांतून ही पाच वैशिष्ट्ये असणाऱ्यांचा एक गट तयार करून त्यांची मोजदाद केली आणि त्याला दिसून आले की, केवळ शेकडा अकरा अस्वलेच दिलेल्या कसोटीला उतरतात. तो अर्थातच पुढील दोनपैकी एक निर्णय घेईल. एक तर त्याने निवडलेली वैशिष्ट्ये त्या गटात इतकी अस्थिर आहेत की, गटनिश्चिती करायला ती निरुपयोगी आहेत. किंवा, त्या गटात इतर प्रकारच्या वैशिष्ट्यांचे मिश्रण आहे आणि म्हणून तो गट मूलभूत प्रकारचा म्हणता येणार नाही.

बरोबर अशाच रीतीने भौतिक मानववंशशास्त्रज्ञाला या दोनही शक्यता ध्यानात घेतल्या पाहिजेत. त्याने निवडलेली वैशिष्ट्ये ही स्वीडिश लोकांची लक्षणे नसून केवळ त्याच्या वैयक्तिक, वरवरच्या निरीक्षणातून त्याला सुचलेली असावीत. आपण पूर्वी पाहिल्या-प्रमाणे काळे केस, काळे डोळे आणि सावळा त्वचावर्ण ही लक्षणे सर्वत्र मानवजातीत पसरलेली आहेत. म्हणून या वैशिष्ट्यांच्या अगदी उलट अशा भुरे केस, निळे डोळे आणि गौर वर्ण स्वीडनमध्ये सापडणाऱ्या वैशिष्ट्यांनी त्याचे लक्ष वेधून घेतले. वैशिष्ट्य, मग ते कसलेही असो, पराकाष्ठेचे असेल तर बाजवीहून जास्तच उठून दिसते. आपल्या कसोट्या या तऱ्हेने लावून पाहण्याला कारणीभूत झालेली पिंगट रंगाबाबतची त्याची संवेदनक्षमता ही काही पिंगट रंग हा स्वीडिशपणाचा आंतरिक भाग आहे म्हणून आली नाही, तर इतर लोकांच्या काळसर रंगापेक्षा यांचा पिंगट रंग एकदम वेगळा दिसतो त्या वेगळेपणामुळे आहे. नेम न धरता अंधारात दगड फेकावा– लागला तर लागला– अशी ती कृती होती. प्रत्यक्ष मोजमापांनी तिचा पाठपुरावा करता आला नाही.

याच्या उलट, भौतिक मानववंशशास्त्रज्ञाला दुसरीही एक शक्यता ध्यानात घ्यावी लागेल. त्याने निवडून काढलेले शेकडा ११ लोक– जे उंच, गोरे, निळ्या डोळ्यांचे, पिंग्या केसांचे, अरुंद मस्तक असलेले असे आहेत– तेच कदाचित मूळच्या एका शुद्ध वांशिक गटाचे प्रतिनिधित्व करीत असतील. हाच गट आंतरजातीय विवाहांमुळे शबल झाला असेल व देशात बाहेरून आलेल्या इतर लोकांच्या लोंढ्यामुळे उसकटून गेला असेल. तरीसुद्धा मूळच्या शुद्ध वंशाचा तो खरा प्रतिनिधी असू शकेल. ही सिद्धान्त-कल्पना पत्करल्यास त्या भौतिक मानववंशशास्त्रज्ञाने आनुवंशिकतेसंबंधीच्या जीवशास्त्रीय नियमांना अनुसरून आपली उपपत्ती तपासून बरोबर करून घेतली पाहिजे. विशेषतः तांत्रिक परिभाषेत ज्याला विलग्नी-भवनाचे अनवलंबित्व ( Independence of Segragation ) म्हणतात, त्यासंबंधीची वस्तुस्थिती त्याने ध्यानात घेतली पाहिजे. विलग्नीभवनाचे अनवलंबित्व म्हणजे दोन्ही पूर्वजांच्या

वंशातून आलेल्या आनुवंशिक गोष्टी, उदा. केसांचा रंग, बुद्धिमत्ता या आंतरवंशीय विवाहां-मुळे होणाऱ्या वंशसंकरात एकत्र न राहता विभागल्या जातात आणि नवीन प्रजेत त्यांची नवी नवी संयुगे बनत असतात (पाहा पृष्ठ ६६–७०). वडिलार्जित वैशिष्ट्ये ही नेहमी अशीच क्रियाशील असतात. म्हणून एकदा वंशसंकर झाल्यावर कोणतेही एक उदाहरण हे मूळच्या वंशाचा अस्सल नमुना म्हणून राहात नाही. अर्थात, बाह्य चिन्हे न दिसताही, त्या मूळ वंशाचे रक्त ज्यांच्या नसांत खेळते आहे अशा काही व्यक्ती प्रत्यक्षात व्यात असतात.

भौतिक मानववंशशास्त्रज्ञाने कोणतेही लोक तपासले, मग ते स्वीडिश असोत किंवा अल्जेरियन, चिनी असोत अथवा ग्रीक असोत, वर निर्दिष्ट केलेली अडचण येतेच. खूप मोठ्या प्रमाणात झालेल्या वंशसंकराचे अगदी उघड परिणाम वारंवार त्याच्यापुढे येऊन उभे राहतात किंवा त्याने 'आदर्श' म्हणून ठरविलेल्या प्रकाराचे सार्वत्रिक अस्तित्व एखाद्या ठराविक समूहात सापडेल ही त्याची अपेक्षा मृगजळ ठरते. त्याने निवडलेल्या गटासंबंधीच्या त्याच्या निरीक्षणांची दुसऱ्या एखाद्या संशोधकाने दुसऱ्या एखाद्या गटाच्या केलेल्या निरी-क्षणांशी तुलना केली– उदा. स्वीडिश लोकांविषयीच्या निरीक्षणाची सिसिलियन लोकां-संबंधीच्या निरीक्षणाशी– तर त्यात आढळून येते की, त्याच्या गटाची त्याने हुडकून काढलेली वैशिष्ट्ये दुसऱ्या गटाच्या व्यक्तींमध्ये अजिबातच नाहीत असे होत नाही. त्यांचे संख्या-शास्त्रीय वितरण भिन्न असेल एवढेच. एखादी पक्ष्यांची जात वेगळी काढावी तसे एका विशिष्ट तऱ्हेची शरीररचना असलेला माणसांचा गट निवडून बाजूला काढण्याचा त्याचा यत्न होता. पण त्याने गोळा केलेल्या पुराव्यांवरून हेच सिद्ध झाले की, या बाबतीत माणसांची आणि पक्ष्यांची परिस्थिती एकसारखी नाही.

म्हणून कुत्री आणि पक्षी यांच्याशी तुलना करण्याने भौतिक मानववंशशास्त्रज्ञाचे निभावणार नाही. तशी तुलना करावयाचे सोडून देऊन, त्याने स्वतः गोळा केलेल्या पुराव्यावरूनच प्रत्यक्ष परिस्थितीशी जुळणारे काही वर्गीकरण त्याने शोधले पाहिजे. तो जेव्हा असे करील तेव्हा त्याला म्हणावे लागेल की : जगाच्या विस्तृत भूभागांवर मानवजातीमध्ये शरीररचनाविषयक काही विशेषीकृत प्रकार तयार झाले आहेत. त्यांच्यापैकी अगदी निश्चित स्वरूपाचे प्रकार म्हणजे कॉकेसॉइड, मोंगोलॉइड व निग्रॉइड. अगदी याच रीतीने, पण यापेक्षा कमी प्रमाणात, जास्त मर्यादित भूभागांवर या प्रकारांचे आणखी विशेषीकरण झाले आहे. परंतु या अधिक विशेषीकृत प्रकारातसुद्धा, कपालांकांप्रमाणे इतर अनेक बाबतीतही सर्व मूलभूत वंशांशी सारखेपणा दिसून येतो. हे शरीररचनामूलक विशेष प्रकार फार प्राचीन काळीच तयार झाले आणि ज्ञात इतिहासाच्या उषःकाली स्पष्टतया विभक्त झाले होते. उच्च सांस्कृतिक विकास मात्र त्या मानाने अलीकडचा आहे आणि कधी तो जगाच्या एका भागात दिसून येतो तर कधी दुसऱ्या. वंश हा शब्द मुख्य तीन मानवगटांना उद्देशून वापरला अथवा त्यांच्या अधिक विशेषीकृत उपप्रकारांना अनुलक्षून वापरला तरी उच्च सांस्कृतिक विकास हा वंशानुसारी नाही असे दिसून येते (पाहा पृष्ठे १०९–११२). जगातील

सध्याचे शरीरप्रकारांचे भौगोलिक वितरण समजावून घ्यायचे असेल तर ते फक्त अगदी आद्य पुराश्मयुगापासून ते आतापर्यंत होत आलेल्या जनसमूहांच्या स्थलांतरांच्या ऐतिहासिक ज्ञानाच्या योगेच शक्य आहे (पाहा– प्रकरण ४ थे). आणि या ज्ञानामुळे पाश्चात्त्य संस्कृतीच्या कोणत्याही एका केंद्रात कधी तरी 'शुद्ध वंशाचे' अस्तित्व होते हे असिद्ध ठरते.

म्हणून आपणापुढे प्रथम मूलभूत मानववंशांचे आणि नंतर त्यांच्या अगणित स्थानिक विशेषीकृत प्रकारांचे वर्णन करणे हेच काम उरते. अर्थातच समूहान्तर्गत असे अनेक स्थानिक उपप्रकार समजावून घेतल्यामुळे प्रमुख मानवसमूहांची वैशिष्ट्ये सामान्य स्वरूपात सांगावी लागणार आहेत.

कॉकेशियन माणूस हा इतरांच्या तुलनेने अधिक केसाळ असतो. त्याचे केस मऊ (तरंगसदृशपासून कुरळ्यांपर्यंत) असतात. त्यांचे जबड्याचे हाड चेहऱ्याच्या इतर भागापेक्षा फार पुढे आलेले नसते. नाक बरेचसे उंच व अरुंद असते आणि डोळे सरळ असतात. [वि सू. कॉकेशियन माणसांची कपालांक, शरीराची उंची, केसांचा अथवा डोळ्यांचा रंग याबाबत खास वैशिष्ट्ये नसतात. त्यांची नाके बहिर्वक्र (रोमन प्रकार) अथवा अंतर्वक्र असतील आणि त्वचेच्या रंगात कितीतरी फेरफार पडलेले दिसतील.]

मोंगोलॉइड व्यक्तींना सर्व अंगावर आणि चेहऱ्यावर केस फारच कमी असतात आणि त्यांचे डोक्यावरचे लांब आणि सरळ असतात. (वि. सू. त्यांच्या त्वचेचा रंग अमुक एक असा न सांगता येण्याइतका निरनिराळा असतो. तिरके डोळे हा स्थानिक प्रकार आहे. अमेरिकन इंडियनांमध्ये तिरके डोळे अतिशय तुरळक प्रमाणात दिसतात, जवळजवळ नसतातच म्हटले तरी चालेल. कपालांकांचे शक्य ते सर्व प्रकार त्यांच्यात असतात व नाकेही अंतर्वक्र ते बहिर्वक्र यांमधील कशाही आकाराची असतात.)

निग्रॉइड प्रकारची माणसे सगळ्यात काळ्या रंगाची असतात. त्यांचे केस अतिशय कुरळे, ओठ जाडे, नाक बसके आणि जबड्याचे हाड पुष्कळदा पुढे आलेले असते. (वि. सू. निग्रोंची उंची व कपालांक अतिशय अनिश्चित असतात. माहीत असलेले सगळ्यात ठेंगणे व सगळ्यात उंच मानवसमूह निग्रो आहेत. त्यांचा कपालांक कोणताही असू शकतो. तरी त्यातल्या त्यात मस्तक अरुंद असण्याचे प्रमाण अधिक.)

बोआॅ (Boas) यांनी सुचविले आहे की, वंशशास्त्रदृष्ट्या या तीन प्रमुख वंश-गटांचीसुद्धा खरे तर दोनच वंशगटांत वर्गवारी केली पाहिजे, एक निग्रॉइड आणि दुसरा मोंगोलॉइड. कॉकेशियन प्रकार हा मोंगोलॉइड वंशाचाच एक स्थानिक, विशेषीकृत प्रकार म्हणावयास हवा. ते दाखवून देतात की, असे करण्यामुळे जपानमधील एक आदिम जमात ऐनू हिच्यात दिसून येणाऱ्या कॉकेशियन वैशिष्ट्यांचे स्पष्टीकरण देताना आपल्याला वस्तु-

स्थितीची फार ओढाताण करावी लागत नाही. ऐनूंचे श्वेतवर्णीयांशी असलेले साम्य सर्वच निरीक्षकांच्या नजरेस आले आहे. ऐनूंचा केवळ रंगच गोरा असतो असे नव्हे तर त्यांच्या अंगावर केसही विपुल असतात. या केसाळरंगामुळे भोवतालच्या मोंगोलॉइड लोकांतून ते एकदम वेगळे असे ओळखता येतात. ऐनू आणि इतर श्वेतवर्गीय यांचा हा प्रकार जर मोंगोलॉइड वंशात सुप्तपणे होताच असे म्हटले तर ऐनू व श्वेतवर्गीय यांच्यातील साम्य हे दोन ठळक अशा समांतर विकासांचे उदाहरण म्हणता येईल आणि त्यासाठी इतर पुरावा नसताना देशान्तराची कल्पना करून त्या सारखेपणाचे स्पष्टीकरण द्यावे लागणार नाही.

'नव्या जगा'चा शोध लागल्यानंतर, आधीच्या जगातील लोकवस्तीचा मांड थोडा उधळला गेला. आजचे तीनही प्रमुख मानवसमूह त्यापूर्वी प्रत्येकी एका मोठ्या जलाशयाच्या भोवताली असे पसरलेले होते. भूमध्य समुद्राभोवती कॉकेशियन लोकांची वसती होती. हिंदी महासागराच्या कडेकडेने निग्रॉइड लोक पसरले होते आणि पॅसिफिक महासागराच्या बाजूबाजूला मोंगोलॉइड लोक राहात होते. विशेषतः निग्रो लोक हे केवळ आफ्रिकेतच आहेत असे नाही, तर पश्चिम पॅसिफिक सागरामध्येही आहेत. या सामुद्रिक निग्रॉइडना मलेनेशियन म्हटले जाते. मलेनेशियन या शब्दाचा अर्थच 'बेटावरले काळे लोक' होतो. मोंगोलॉइड हे केवळ आशियातच होते असे नव्हे तर 'नव्या जगाच्या' भूभागावर सर्वदूर ते पसरले होते. नव्या जगातील मोंगोलॉइडना अमेरिकन इंडियन म्हणतात.

ज्यांची वंशशाखा अनिश्चित आहे असे मानवगट या ना त्या प्रमुख मानववंशात टाकण्याने कोणताच वैज्ञानिक हेतू साध्य होत नाही हे स्पष्ट आहे. कॉकेशियन, मोंगोलॉइड व निग्रो हे जगात सगळ्यात जास्त प्रमाणात पसरलेले गट आहेत आणि त्यांची शरीरवैशिष्ट्ये निश्चितपणे ओळखता येणारी आहेत हे मात्र खरे. तीन या संख्येला असे काही पावित्र्य चिकटले नाही की, त्यामुळे आता तुरळकपणे अस्तित्वात असणाऱ्या मानवसमूहांपेक्षा या तीन लोकसमूहांचा इतिहास निराळा अथवा प्राचीनतर आहे असा निश्चित निर्णय करावा. जितकी अधिकाधिक शरीरवैशिष्ट्ये लक्षात घेऊ, त्याप्रमाणे जास्त जास्तच गट निराळे काढावे लागतील. ऑस्ट्रेलियन आदिवासी किंवा अगदी बुशमन-हॉटेन्टॉट लोकसुद्धा एका काळी विस्तृत भूभागावर पसरलेल्या मानववंशांचे अस्तित्व दाखविणारे आजचे अल्पसंख्य वंशज असू शकतील. या उलट, आजचे पॉलिनेशियन लोक हे पूर्वी कधी काळी झालेल्या एखाद्या वंशसंकरामुळे उत्पन्न झालेली रेखीव वंशशाखा असू शकेल. मानवी प्राणिशास्त्राकडून जर मूलभूत, स्थिर असे निरनिराळे मानववंश निर्देशिले जात असतील तर या सर्व प्रश्नांची उत्तरे मिळणे अगत्याचे आहे. परंतु ज्या अर्थी, सर्व उपलब्ध पुरावा एकाच मानववंशाचे स्थानिक आणि हळूहळू वाढणारे भेद दाखवणारा आहे, त्या, अर्थी ह्या प्रश्नाला आता प्राणिशास्त्रदृष्ट्या काही महत्त्व राहिलेले नाही.

शरीरलक्षणांमध्ये हे सतत वाढत्या प्रमाणातील आणि स्थानिक स्वरूपाचे वैशिष्ट्यपूर्ण बदल मूलभूत वंशगटातून व ऑस्ट्रेलियन, पॉलिनेशियन अशा सुस्पष्ट वंशशाखातून घडून

आले असे नव्हे. खूप पसरलेल्या अशा प्रत्येकच वंशगटात हे बदल घडत राहिले, या बदलामुळे झालेले त्यातील उपगट केव्हा कपालांकांच्या बाबतीत वेगळे झाले तर कधी उंची किंवा केसांचा रंग किंवा त्वचेचा वर्ण यात फरक पडला. नेहमीच्या उपयोगातील मानववंशशास्त्रीय मोजमापांवर आधारलेल्या वर्गीकरणांप्रमाणे पाहता युरोपातील कॉकेशियन वंशाच्या तीन उपशाखा होतात. नॉर्डिक, अल्पाइन व भूमध्य सामुद्रिक. पैकी, नॉर्डिक हे उत्तर युरोपात दिसतात. बहुतेक करून त्यांच्या केसांचा रंग पिंगट व अंगाचा रंग गोरा असतो, शरीरयष्टी उंच असते व ते अरुंद मस्तक असलेले असतात. रशिया, फिनलंड, इस्टोनिया, लिथुआनिया, स्कँडेनेव्हिया, हॉलंड, बेल्जम, जर्मनी, फ्रान्स आणि इंग्लंडमध्ये नॉर्डिक लोक सापडतात. मध्य युरोपातील अल्पाइन शाखेचे लोक विविध शरीरबांध्यांचे पण साधारणपणे जाडजूड असे, निमगौर रंगाचे आणि पृथुमस्तक असतात. ते जर्मनी व फ्रान्समध्ये बहुसंख्येने असून युरोपच्या मध्यवर्ती पठारावर आणि पूर्वेकडे रुमेनियाच्या पूर्वभागापर्यंत पसरले आहेत. ॲड्रियाट्रिक समुद्राच्या पश्चिमेला दक्षिण युरोपमध्ये असलेले भूमध्यसामुद्रिक शाखेचे लोक बांध्याने सडपातळ, रंगाने जरा काळसर आणि नॉर्डिक लोकांप्रमाणे अरुंद मस्तक असलेले असतात. ही विभागणी मुख्यतः या गटांतील लोकांच्या संख्याबाहुल्याच्या संदर्भात आहे. कारण, युरोपीय देशांतील जनतेमध्ये ज्यांच्या गटाचे केंद्रीकरण इतर प्रदेशात झालेले आहे असे लोक सर्व ठिकाणी लक्षणीय संख्येने आहेत. तरी पण कपालांकांच्या मोजमापाप्रमाणे झालेली विभागणी ही लक्षात भरणारी आहेच. शारीरिक लक्षणांवरून होणारी ही विभागणी युरोपच्या नकाशाला साधारणतः अडवे छेद देते. जर्मनी, फ्रान्स वगैरेसारखी युरोपातील आजची राष्ट्रे या गटांच्या अनुरोधाने निराळी करता येत नाहीत. जर्मनी आणि फ्रान्स या दोहोंचीही उत्तरेकडील एक अरुंद पट्टी नॉर्डिक लोकांनी व्यापली आहे तर उरलेल्या बऱ्याच मोठ्या पट्टयावर अल्पाइन लोक बहुसंख्य आहेत.

भूमध्यसामुद्रिक आणि अल्पाइन या दोन्ही प्रकारांत युरोपियनांशिवाय बाहेरच्या इतर पुष्कळ लोकांचा अंतर्भाव होतो.

भूमध्यसामुद्रिक वसतीच्या उत्तरेला अल्पाइन उपशाखेचा एक पट्टा युरोपातून, आशियापर्यंत पसरला आहे. म्हणून काही वेळा या उपशाखेस युरेशियन म्हटले जाते. कार्लटन कून ( Carleton Coon ) नावाच्या एका अधिकारी व्यक्तीने अगदी अलीकडेच युरोपियनांसंबंधीच्या भौतिक मानववंशशास्त्रावर लिखाण केले आहे. तो म्हणतो : 'अल्पाइन मानवशाखेचा भौगोलिक विस्तार खूपच मोठा आहे. ती फ्रान्सपासून चीनपर्यंत पसरली आहे. या सर्व प्रदेशात या शाखेचा आकृतिबंध जवळजवळ अचल आहे. या आकृतिबंधात उंची, चेहरा व मस्तक यांची मापे, केसांची ठेवण आणि व्याप्ती इत्यादी बाह्यांगांचा समावेश होतो. [२]

सेमेटिक भाषागटातील भाषा बोलणारे आणि म्हणून सेमाइट म्हटले जाणारे लोक आणि इजिप्तमध्ये बहुसंख्य असलेले हेमाइट लोक यांचाही भूमध्यसामुद्रिक मानवशाखेत

अंतर्भाव होतो. Coon च्या शब्दांत सांगावयाचे तर अरबस्तानातील बदाऊन (Bedouin) लोक हे 'शुद्ध भूमध्यसामुद्रिक वंशाचे' आहेत.[१] आणि त्याच तज्ज्ञाच्या मताप्रमाणे इराण व अफगाणिस्तानमधील इराणी व अफगाण लोक हेही या भूमध्यसामुद्रिक वंशाचेच होत.

वंश आणि एखादे सार्वभौम शासन या दोन्हींमध्ये काहीच परस्परसंबंध नाही हे उघडच आहे. जर्मनी अथवा फ्रान्स यांची धोरणे आवडणाऱ्या व्यक्ती किंवा आपल्या राष्ट्राच्या युद्धातील जयाबद्दल रस्त्यावर एकत्र येऊन जयघोष करणाऱ्या व्यक्ती या काही आपले कपालांक सारखे आहेत किंवा वंशवृक्ष एक आहे अशा कारणांमुळे एकत्र आलेल्या नसतात. एकच वर्तमानपत्र त्यांच्या वाचनात येते, ज्याकरिता प्राणार्पण करायला त्यांना हाक येईल तो ध्वजही एकच असतो अशा कारणांमुळे ते एकत्र आलेले असतात. जर्मनीमधील अल्पाइन माणूस आणि कॉकेशसच्या परिसरातील जॉर्जियन अथवा रशियन तुर्कस्तानमधील ताजिक माणूस हे सर्व जरी एकाच मानववंशशाखेचे असले तरी त्यामुळे जर्मन अल्पाइन व्यक्तीला ताजिक अथवा उग्र स्वरूपाच्या जॉर्जियन माणसांबद्दल विशेष गूढ असा आपलेपणा वाटत नाही किंवा त्यांचे आणि आपले काही समान उद्दिष्ट आहे असेही वाटत नाही. हीच गोष्ट इटालियन भूमध्यसामुद्रिक व्यक्ती आणि एखादा बदाऊन यांच्या बाबतीतही खरी आहे. परस्परांहून अत्यंत भिन्न अशा संस्कृतींच्या अनेक लोकसमूहांत अल्पाइन आणि भूमध्यसामुद्रिक वंशांचे लोक बहुसंख्येने आहेत. वंशवादी तत्त्वज्ञान त्यांना मुद्दाम पढविले नसेल तर त्या त्या वंशशाखांचे लोक आपली शारीरिक रचना वेगळ्या प्रकारची आहे, एवढ्याकरिता परस्परांविरुद्ध लढाईला उभे ठाकत नाहीत.

ऐतिहासिक काळातील स्थलांतरे, जयापजय आणि लोकांचे झालेले संमिश्रण यांचा थोडा आढावा घेतल्याशिवाय निरनिराळ्या शारीरिक प्रकारांची म्हणजे वांशिक गटांची आज जगात असलेली विभागणी, विशेषतः युरोपातील त्यांचे विस्कलन समजणार नाही. या आढाव्याकडे आपण पुढच्या प्रकरणात वळू या.

ते म्हणतात :–

वंश नावाचे मानवी अस्तित्वाचे अंतिम प्रकार आहेत हे कल्पनेचे अपत्य आहे.

Jean Finot, *Race Prejudice*. Translated by Florence Wade Evans. London, Constable & Co., 1906, P. 317.

प्राण्यांच्या जातीप्रमाणे सुस्पष्ट, एकसारख्या आणि स्थिर स्वरूपाच्या अशा वैशिष्ट्यांवरून माणसांचे वंश वेगवेगळे करता येणार नाहीत. जे फरक आहेत ते अस्थिर आहेत आणि कळून न देणाऱ्या टप्प्याटप्प्यांनी ते एकमेकात मिसळून जात असतात.

J. C. Prichard, *Natural History of Man*. London, H. Bailliere, 1855, P. 47४.

एखाद्या थोराड आणि पिळदार बांध्याच्या भूमध्यसामुद्रिक माणसाच्या अस्थींहून एखाद्या खुरटलेल्या नॉर्डिक माणसाच्या अस्थी वेगळ्या ओळखता येणार नाहीत. नॉर्डिक माणसाचा चेहरा जास्त लांबट आणि अरुंद असतो. भिवयांचा उंचवटा अधिक मोठा असतो, कपाळ अधिक उतरते असते, तसेच नाक अरुंद, उंच आणि लांबट असते व हनुवटी ठसठशीतपणे पुढे आलेली असते असा समज आहे. परंतु मला नाही वाटत की, कोणाही भौतिक मानवशास्त्रज्ञाला भूमध्यसामुद्रिकांची उपशाखा, जी अरब वंश, त्यातील उंच व्यक्तीचे हाडाचे अवशेष आणि एखाद्या नॉर्डिक व्यक्तीचे हाडाचे अवशेष यांत निश्चितपणे काही फरक दाखवता येईल.

E. A. Hooton, *Up from the Ape*, London, Allen and Unwin, 1931, P. 526.

## संदर्भ


(1) Gesprache mit Eckermann. III p. 240, quoted by Jarues Barzun in Race, A study in Modern Superstition, London, Methuen and Co., 1938, p. 63.

(2) Coon, Carleton, The Races of Europe, London, Macmillon and Co., 1931, p. 646.

(३) वरील पुस्तकातील ( क्रमांक २ च्या ) पृ. ६२३.


◎ ◎

## प्रकरण ४ थे

# जनसमूहांचे स्थलांतर व संमिश्रण

मनुष्यजातीइतकीच मनुष्याची भटकन्ती जुनी आहे. प्राचीन जगात कुठे तरी आपले अरण्यवासी पूर्वज मानवी पातळीवर येऊन ठेपले आणि त्याच वेळी पहिल्या आणि अतिप्रचंड अशा मानवी स्थलांतराची सुरवात झाली. आज आपणाला निअँडरथल मानव हा असहाय, अरक्षित आणि वानरासारखाच प्राणी वाटतो. पण त्याच्याजवळ निदान अग्नी आणि दगडाची हत्यारे होती. हिमनद्यांच्या आदिकाळात तो आशियातून युरोपात पसरला आणि युरोपचा बराच भाग त्याने व्यापला. परंतु निअँडरथल माणसाच्या मागाहून आलेल्या सुरवातीच्या 'बुद्धिवान' माणसांच्या स्थलांतरांशी तुलना करता, निअँडरथलचे स्थलांतर काहीच नव्हे. ऐतिहासिक काळाच्या सुरवातीला हळूहळू पण अप्रतिहतपणे माणसाने सर्व भू-गोल व्यापला होता. जमिनीचा शेवट आला म्हणून तो थांबला नाही तर बेरिंगच्या सामुद्रधुनीतून नव्या जगातसुद्धा त्याने धडक मारली होती. आणि अलास्कापासून टिएरा डेले फ्यूगोपर्यंत दोन्ही अमेरिका खंडे त्याने व्यापून टाकली. नौका नाहीत, शेती नाही, पशुपालन नाही अशा अवस्थेतही, अगदी साध्या साधनसामग्रीच्या बळावर तो माणूस ऑस्ट्रेलियातदेखील पोचला आणि तेथील जीवघेण्या वाळवंटात तग धरून राहिला.

इतर कोणत्याच प्राणिजातीला असा नेत्रदीपक इतिहास नाही. पर्यावरणाच्या अशा पराकाष्ठेच्या भिन्न भिन्न स्थितीत इतर कोणीच असा टिकाव धरलेला नाही. दमट हवा-मानाच्या विषुववृत्तीय अरण्यात किंवा वैराण अशा आर्क्टिक टंड्रा प्रदेशात वसती करून

राहण्याच्या प्रयत्नात असहाय अशा प्राथमिक मानवाचे शरीर निरनिराळ्या प्रकारचे बनले असते, त्याच्या अवयवांनी भिन्न भिन्न आकार घेतले असते असे मानणे सयुक्तिक दिसले असते. दुसऱ्या शब्दांत सांगायचे म्हणजे, जसे एकाच मृगकुलाच्या आर्क्टिकसन्निध प्रदेशात रेनडियर व एल्क आणि मध्यम हवामानाच्या व उष्ण कटिबंधातील प्रदेशात नेहमीच्या हरणाच्या निरनिराळ्या जाती आहेत तशा माणसाच्याही वेगवेगळ्या प्राणिजाती झाल्या असे दिसले असते. परंतु आश्चर्याची गोष्ट ही की, मनुष्याचा भौतिक आकार स्थिर राहिला आणि उलट, या सगळ्या अवघड परिस्थितीतही निरनिराळे शोध लावून तो तगून राहिला. हे शोध म्हणजे घरे बांधण्याच्या रीती, वस्त्रप्रावरणाच्या रीती, अन्न मिळविण्याच्या रीती अशा बाबतीतील होत. टिकून राहण्याच्या दृष्टीने ज्याला महत्त्व आहे असे एकच शारीरिक समायोजन त्याने केले आहे. ते म्हणजे त्वचेचा रंग. सूर्यापासून निघणारे अतिनील किरण हे जास्त प्रमाणावर पडले असता माणसाला उपद्रवकारक असतात. असे किरण गाळले जावे याकरिता त्वचेच्या काळ्या रंगाचा उपयोग होता असे सिद्ध करून देण्यात आले आहे. म्हणून उष्ण कटिबंधातील लोकांना त्यांचे ' काळा रंग ' हे वैशिष्ट्य फायद्याचेच ठरणार. डोक्याच्या कवटीच्या आकारातील फरक, सरळ अथवा कुरळे केस, इतकेच काय पण, उंच किंवा ठेंगू शरीरयष्टी अशा इतर शरीरवैशिष्ट्यांना टिकून राहण्याच्या दृष्टीने स्वतःचे असे काही खास महत्त्व असल्याचे दिसत नाही. आणि या दृष्टीने पाहता, ती वैशिष्ट्ये जवळजवळ निरर्थक आहेत.

परंतु एका निराळ्या दृष्टिकोणातून पाहता ही वैशिष्ट्ये बिलकुल निरर्थक नाहीत असे दिसून येते. इतर अनेक घटनाक्रमांपेक्षा माणसाला आपल्या स्वतःमध्ये आणि माणसांच्या अनेक प्रकारांमध्ये फार रस वाटतो. जे भेद उंदरांच्या विविध प्रकारांत सापडले असता दुर्लक्षिले जातील, तेच भेद माणसांच्या निरनिराळ्या प्रकारांत दिसून आले तर मात्र सतत छळवाद आणि हद्दपारी यांना कारणीभूत होतात. तरी पण प्राणिशास्त्राच्या दृष्टिकोणातून ही वैशिष्ट्ये फारच किरकोळ आणि बिनमहत्त्वाची ठरतात.

माणसांतील शारीरिक भेदांच्या अनुरोधाने भूगोलाचा नकाशा समजावून घेण्यासाठी आपल्याला इतिहासाच्या अभ्यासक्रमाकडे नजर वळविली पाहिजे. सर्व जगभर मानव-जातीचा जो नाट्यपूर्ण प्रसार झाला, त्याला दोन बाजू आहेत. जगाच्या सर्व भागांमध्ये माणसाने हळूहळू केलेला प्रवेश ही एक बाजू आणि काही काही भागांमध्ये तुलनात्मक दृष्टीने पाहता कायमची वसती करून त्या भूप्रदेशातच स्थानिक होऊन राहणे व इतरांपासून अलग पडणे ही दुसरी बाजू. म्हणजे असे की, मनुष्य हा केवळ नेत्रदीपकपणे फिरस्ता आहे असे नव्हे तर स्थायिक होण्याकडेही त्याचा कल असतो. जगात अश्मयुगात मनुष्यवस्ती तशी तुरळक तुरळकच होती आणि एखाद्या भूभागावर वसती करून राहिलेला जनसमुदाय शतकानुशतके तेथेच राहू शके. त्या सर्व काळात कोणाही परकीयांची त्यांच्यावर धडक येत नसे. पिढ्यानुपिढ्या त्या लोकसमूहात जनन आणि मरण यांचे चक्र, तो समूह एखादे

स्वतंत्र जग असल्याप्रमाणे, सुरू राही. या स्वयंपूर्ण जगातील लोकसमूह लहान असो व मोठा असो, त्यामध्ये अन्तर्जनन ( स्वीय संग ) अनिवार्य होते आणि त्या प्राचीन काळी तो समूह बहुधा छोटासाच असावयाचा. अशा परिस्थितीत कोणाही दोन व्यक्तींचे लग्न झाले तरी त्यांचे कितीतरी पूर्वज एकच असावयाचे. त्यामुळे अर्थात जी शरीरलक्षणे इतरत्र क्वचितच आढळतील, ती या अंतर्जननप्रक्रियेमुळे येथे जणू नियमाने अवतरत. परिणामतः फारच चमत्कारिक वैशिष्ट्ये निर्माण होत. लॅप लोकांमध्ये ( जिभेच्या वरच्या बाजूस ) टाळ्याच्या मध्यावर एक पडदा असतो, तर पेरूतील इंका लोकांमध्ये कवटी आणि शीर्षीय अस्थी यांच्यामध्ये विशेष प्रकारचे एक हाड असते. ही वैशिष्ट्ये म्हणजे प्रथमतः जनुक-परिवर्तनामुळे उत्पन्न झालेले सूक्ष्म शारीरिक फरक होत ( पाहा पृष्ठ ७३ ). जगाच्या या दूरच्या भागात त्याच त्याच वंशशाखात अंतर्जनन होत राहिल्यामुळे ते फरक इथे सर्व वंश-गटाला समान असलेली वैशिष्ट्ये बनले आहेत.

एखाद्या भूप्रदेशावर राहणारा एखादा समूह अंतर्जननप्रक्रियेमुळे निर्माण झालेल्या काही दुय्यम वैशिष्ट्यांच्या बाबतीत इतरांपासून भिन्न झाला असेल तर अशा भूप्रदेशाला ' विशेषलक्षणदर्शी प्रदेश ' म्हटले जाते. [1] उदा. पूर्व आशिया हा भाग तिरकस डोळ्यांच्या बाबतीत विशेषलक्षणदर्शी होता. तर भारतापासून पश्चिम युरोपपर्यंतच्या विस्तीर्ण भूभागावर मऊ, तरंगमय केसांचे वैशिष्ट्य दिसून येते. फार प्राचीन काळातील मानवाची परिस्थिती पाहता, त्या काळी हल्लीच्या मानाने मानवी स्थलांतराचा वेग किती तरी कमी असणार, अशा वेळी काही विशेषलक्षणदर्शी प्रदेशातील लोकांमध्ये शतकानुशतके अंतर्जनन होत राहिल्याने, ज्याला शुद्ध वंश म्हणावे अशा तऱ्हेची शरीरलक्षणे त्यांच्यात उद्भवली असली पाहिजेत. वंश शुद्ध आहे याचा शास्त्रीय अर्थ असा की, संततीची शरीरलक्षणे पितरांच्या सारखीच असतात. जननशास्त्रज्ञ असे मानतात की, जवळजवळ सतरा पिढ्या विना-अपवाद अंतर्जनन करीत राहिले तर, जननशास्त्रीयदृष्ट्या ज्याला शुद्ध मानता येईल असा वंशप्रकार आपल्याला मिळू शकतो. लक्षात घ्या की, सतरा पिढ्या चाललेल्या अंतर्जनन-प्रक्रियेस कोलंबसाच्या जन्माच्या आधीपासून आतापर्यंत एवढा काळ लागेल. प्रयोगशाळेत अशा शुद्ध वंशाच्या प्राप्तीसाठी शास्त्रज्ञ केवळ एकाच जोडप्याच्या संततीत संयोग घडवून आणतात. तसे न करून त्यांना चालत नाही. अशा तऱ्हेचे अंतर्जनन हे मानवी समाजात नेहमीच अतिशय दुर्मिळ असले पाहिजे. परंतु काही निवान्त भागात जवळपास या तऱ्हेच्य अंतर्जननाची प्रक्रिया घडली असणे अगदी शक्य आहे आणि एकूण परिस्थिती आदर्श परिस्थितीपर्यंत पोचायला जरा कमी पडली असली तरी या कारणामुळेच एकाच अखिल मानवजातीमध्ये शरीरप्रकारात विविधता आली असली पाहिजे.

परंतु असे अंतर्जनन करणारे जनसमुदाय जेव्हा एकत्र येतात तेव्हा त्यांच्य संकरातूनही वर सांगितल्या तऱ्हेचेच विशेषलक्षणदर्शी भूभाग तयार होतात. हवामानातील बदल किंवा दुसऱ्या जमातींचा रेटा अशा कारणांनी एकाच ठिकाणी वसती करून राहणे

जमत नाही आणि अशी अस्थिरता उत्पन्न झाल्यामुळे पूर्वी एकाकी पडलेले जनसमुदाय एकमेकांच्या संपर्कात आले असता असे आढळून आले आहे की, त्या जनसमूहांनी परस्परांशी विवाहसंबंध केले आहेत. त्यांच्या वंशजांची शारीरिक मोजमापे घेऊन हे निश्चित करता येते. एकेकाळी असा समज होता की, निदान बुद्धियुक्त मानवाने निअँडरथल मानवाशी संबंध केले नसतील. निअँडरथल मानव हा बुद्धियुक्त मानवाचा अधिक वानरसदृश असा युरोपातील पूर्वज होय. पण दोघांच्या मधील असा उत्क्रांतीचा एक टप्पा दर्शविणारे सांगाडे नुकतेच उत्खननात सापडले त्या सांगाड्यांवरून असे दिसते की, या एकमेकाहून पराकाष्ठेचे भिन्न असलेल्या ज्ञात अशा या दोन्ही मानवप्रकारांचा एकमेकांशी शरीरसंबंध घडून आला आणि आता तर काही अभ्यासकांनी आधुनिक युरोपीय मानववंशात निअँडरथल वंशाचे वारसाने उमटलेले ठसे हुडकून काढले आहेत. वास्तविक, कोणत्याही एका प्रदेशात कोणतेही वंश एकत्र आले म्हणजे त्यांच्यात विवाहसंबंध होऊन प्रजोत्पत्ती व्हायची हे त्या वेळेपासूनच चालत आले आहे. ज्या देशात असा संकर घडला ते देश विशेषलक्षणदर्शी झाले. हळूहळू मूळ जनकसमुदायांच्या आनुवंशिक वैशिष्ट्यातून असा एक समुदाय उत्पन्न होतो की, तो आपल्या सर्वच पूर्वजांहून काही बाबतीत निराळा होतो आणि स्वतःची अशी काही स्थिर शारीरिक वैशिष्ट्ये टिकवून राहतो.

हल्लीच्या जगातही अजूनसुद्धा असे काही विशेषलक्षणदर्शी प्रदेश आहेत. त्या प्रदेशांत मानववंशाचे नवेच नमुने अगदी अलीकडे स्थिरावले आहेत. अशा अनेक प्रदेशांचा अभ्यास करण्यात आला आहे. त्यांच्या विशेषलक्षणदर्शित्वाबाबत संशयाला जागा नाही. कारण, ज्या जनकवंशांचा संकर झाला, ते आपणांला माहीत आहेत आणि हा नवा स्थिर प्रकार उत्पन्न व्हायला किती काळ जावा लागला तेही आपणांला ठाऊक आहे. अशा संयोगाच्या जुन्या दाखल्यांशी तुलना करायला नवे उदाहरण हवे ते भिन्नवंशीय पितरांच्या प्रजेचा संकर झाल्याचे असावयास हवे. आवश्यक अशी अलगता भौगोलिकही असू शकेल. अशी भौगोलिक अलगता पिटकेर्न ( Pitcairn ) बेटावरील रहिवाशांच्या बाबतीत आहे. प्रसिद्ध अशा बाउंटी ( Bounty ) बोटीवरील बंडातील सहा बंडखोर ब्रिटिश खलाशी तेथे जाऊन राहिले. त्यांच्याबरोबर ताहितीमधील काही पॉलिनेशियन स्त्रिया गेल्या. अशा रीतीने १७९० साली सुधारलेल्या जगापासून ते दूर निसटून गेले. त्या वेळेपासून त्यांच्यात अंतर्जननाची प्रक्रिया चालू आहे. पण पुष्कळदा वांशिक अलगता ही सामाजिक स्वरूपाची असते आणि मिश्र रक्ताचे लोक, मूळचे रहिवासी आणि गोरे लोक या दोहोंपेक्षाही भिन्न असा एक आपसात विवाहसंबंध घडवून आणणारा समूह बनवतात, दक्षिण आफ्रिकेतील बॅस्टार्ड लोकांच्या बाबतीत असे घडले आहे. स्थानिक हॉटेन्टॉट स्त्रिया आणि बोअर (डच) लोक यांच्या मिश्र संततीने एक अंतर्जनन करणारा गट बनवला आहे. आणि कित्येक पिढ्या अंतर्जनन घडत असल्यामुळे दोन्हीही पूर्वजसमूहांहून भिन्न असा एक स्थिर प्रकार त्यांच्या-

तून उत्पन्न झाला आहे. तीच गोष्ट हिंदुस्थानातील अँग्लोइंडियन लोकांची आहे. मोठाल्या शहरांतूनदेखील त्यांच्यात अंतर्जननच रूढ आहे.

आजच्या जगात 'वंश' ही संकल्पना समजावून घेण्याच्या दृष्टीने पहिली व महत्त्वाची पायरी म्हणजे वर उल्लेखिलेले हे विशेष लक्षणदर्शी प्रदेश संख्येने अमित आहेत या वस्तुस्थितीचे भान ठेवणे ही होय. पूर्वीच्या काळी असे विशेष लक्षणदर्शी भूभाग निश्चितच पुष्कळ होते की, ज्यांचे प्रतिनिधित्व करणारे लोक आज सापडत नाहीत. आज टिकून असलेल्या मानववंशातून त्यांचे 'रक्त' निरनिराळ्या प्रमाणात मिसळून गेले आहे; आता त्याचा वेगळेपणा बाजूला काढता येत नाही. त्यांचा मूळचा शरीरप्रकार कल्पनेने आणि बुद्धीने पुनः एकसंध करून पाहणे अशक्य आहे. त्यांचे सांगाडे नष्ट झाले आहेत आणि काही उपलब्ध असलेच तरी वंशभिन्नता दाखविणारी पुष्कळ शरीरवैशिष्ट्ये त्यातून कायमचीच लुप्त झाली आहेत. दुसऱ्या काही विशेषलक्षणदर्शी प्रदेशातून मानवांच्या झुंडी बाहेर पसरल्या. दोन खंडे व्यापून तेथे ते स्थायिक झाले. बाह्य परिस्थिती अनुकूल असेल अशा ठिकाणी त्यांची लोकसंख्या बरीच वाढली. त्या दूरच्या खंडांतील आधीच्या रहिवाशांशी त्यांचे विवाहसंबंध जुळले आणि विशेषलक्षणदर्शी असे नवीन प्रदेश तयार झाले.

आपण हे लक्षात आणले पाहिजे की, विशेषलक्षणदर्शी प्रदेशापुरते पाहता, तेथील वसती आणि अंतर्जनन या दोहोंचेही काही सातत्य असणारच. आजच्या पाश्चात्त्य संस्कृतीतील नागरी केंद्रांतून परिस्थिती इतकी भिन्न आहे की, त्या भिन्नत्वाच्या परिणामांची आपल्याला जाणीवही नसते. या प्रचंड केंद्रामध्ये जगाच्या कानाकोपऱ्यातून माणसे येत असतात आणि आर्थिक लाभाची नवीन काही क्षेत्रे दिसली की, ती माणसे ते केंद्र सोडून नव्या क्षेत्राकडे जावयास तयार असतात. हा सर्व प्रकार मानवी इतिहासात नवीन आहे. मानववंशाचे काही प्रकार जेथे सहजगत्या स्थिरावू शकतील अशी अनुकूल परिस्थिती या नागरी केंद्रांतून असत नाही. तसे पाहता, अशी अनुकूल परिस्थिती युरोपमधील शेतीव्यवसायाच्या लोकवस्तीच्या भागात पुष्कळशी आहे. जी जमीन ते कसतात, तीत त्यांची पाळेमुळे रुजली आहेत आणि त्यांचे विवाहसंबंध मर्यादित प्रदेशात होत असतात. आमची शहरेसुद्धा विशेषलक्षणदर्शी भाग होतील. पण केव्हा? सर्व राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय यंत्रणा मोडून पडली, प्रत्येक नागरिकाचे जीवन लंडन किंवा बर्लिनच्या तटबंदीच्या आतच केवळ सुरक्षित राहू लागले आणि असे पिढ्यानुपिढ्या घडत राहिले तर या क्षणाची ही बहुविध स्वरूपाची लोकवस्ती समजातिक होऊन जाईल. मग त्या समजातिक समुदायाला 'स्थिर वंश' असे नाव देता येईल.

अशा या अनेक विशेषलक्षणदर्शी भागात काही आनुवंशिक वैशिष्ट्ये पक्की होतात, मग दुसऱ्या भागातील इतर काही आनुवंशिक वैशिष्ट्यांबरोबर त्यांचे मीलन होते आणि

अशा मीलनानंतर आणखी एखादा निराळाच प्रकार स्थिरावतो. हे चक्र चालूच राहते. अशा या विशेषलक्षणदर्शी भागांच्या पार्श्वपटावरच जगातील मानववंशांची विभागणी आपण समजावून घेतली पाहिजे. जगात जेथे जेथे अंतर्जननाच्या प्रक्रियेमुळे संततीत पितरांसारखी शरीरलक्षणे दिसून येतात, तेथील लोकांच्या शारीरिक मोजमापांवरून एवढेच म्हणता येईल की, ते ते प्रदेश सद्यःकालीन विशेषलक्षणदर्शी आहेत. त्या मोजमापांवरून आपणांस असे थोडे मूळ मानववंश निश्चित करता येणार नाहीत की, ज्यांच्या मिश्रणाने अथवा मिश्रणाशिवायही मागाहून झालेले आजचे विविध मानववंश उत्पन्न झाले असे म्हणता येईल. मानवाचा इतिहास जसा वास्तवात आहे तसाच तो आपण स्वीकारला पाहिजे. थोड्या मूळ वंशांच्या परिभाषेत विचार न करता विशेषलक्षणदर्शी अशा अगणित भूभागांच्या परिभाषेत विचार केला पाहिजे. आपण पाहिलेच की असले बहुतेक सगळे भूप्रदेश पूर्वीच स्थिरावलेल्या अनेक मानवप्रकारांच्या वैशिष्ट्यांचे पुन्हा एकदा संमीलन होऊन उत्पन्न झालेले आहेत. ज्यूलिअन हक्सले (Julian Huxley) हा जीवशास्त्रज्ञ म्हणतो की, “ वैशिष्ट्यपूर्ण लक्षणांनी आधीच विभक्त झालेल्या गटांत व प्रकारांत इतका वारंवार संकर घडून येण्याच्या दृष्टीने मानवप्राणी हा सगळ्या प्राणिजातीत एकुलता एक आहे. म्हणून कोणत्याही मानवसमूहाची प्रकृती आणि उद्गम पाहताना त्यांचे समान पूर्वज शोधणे जेवढे जरूरीचे आहे, तेवढे तरी त्यांचे विभिन्न पूर्वज शोधणे महत्त्वाचे आहेच. ” २

पूर्वज अनेकवंशीय होते या गोष्टीला प्राचीन आणि स्थिरावलेल्या मानववंशांच्या इतिहासात महत्त्वाचे स्थान आहेच. पण अर्वाचीन युरोप आणि अमेरिकेतसुद्धा ही घटना अधिकच ठळकपणे दिसून येते. या दोन्ही प्रदेशांत प्राचीन लोकवस्तीवर बाहेरच्या लोकांचे दडपण अधिकच आले, कारण दळणवळणाच्या अधिक चांगल्या सोयी झाल्या. तसेच केव्हा केव्हा राजकीय अथवा धार्मिक कारणांनीही लोकांनी स्थलांतर केले. परिणामतः लोकांचे अभूतपूर्व असे स्थलांतरण झाले. परंतु यातील मूलभूत प्रक्रिया काही नवीन नाही. ती शतकानुशतके चालत आलेली आहे. जर्मन म्हणा, फ्रेंच म्हणा अथवा जुने अमेरिकन घ्या, त्यांच्या समान कुलपरंपरेविषयी सहजगत्या बोलण्यापूर्वी आपण अनेक शतकांच्या स्थलांतरांमुळे घडून आलेल्या अनेकशाखीय पूर्वजपरंपरेचे सार्वत्रिक अस्तित्व ध्यानात घेतले पाहिजे.

व्हॉलटेअरने (Voltaire) एकदा एक पुस्तक वाचले. त्याची सुरवात होती, ‘आपण फ्रेंच माणसे ज्यांच्या वंशात उत्पन्न झालो ते फ्रँक लोक... ’ व्हॉलटेअरने लेखकाला लिहिले, “ प्रिय मित्रा, कोणी सांगितले तुला हे ? ” इसवी सनाच्या सहाव्या शतकात ज्यांनी आक्रमण करून गॉल पादाक्रांत केला, त्या ट्यूटॉनिक वंशाच्या रानटी लोकांपैकी फ्रँक ही एक छोटीशी तुकडी होती. फ्रान्सच्या आणि जर्मनीच्या अनेकशाखीय पूर्वजपरंपरेमध्ये त्या फ्रँक लोकांचा वाटा होता. परंतु जरी फ्रान्सला त्यांनी आपले नाव बहाल केले तरी वास्तविक ते ट्यूटॉनिक लोकांचा एक केवळ उपविभाग होते. या ट्यूटॉनिक

लोकांनी संस्कृतीचा विध्वंस केला असे जरी त्या वेळी वाटले, तरी लवकरच ते मूळच्या लोकांत मिसळून गेले. लोकांच्या ज्या स्थलांतरामुळे फ्रान्सच्या वंशपरंपरेवर परिणाम घडून आला आहे, त्याच्या दीर्घ इतिहासातील फ्रँक लोकांचे आगमन ही एक छोटीशी घटना आहे. प्राचीन अश्मयुगात हा प्रदेश ज्या लोकांनी व्यापला होता ते दक्षिण आशियातून उत्तर आफ्रिका, स्पेन अशा मार्गे शेवटी फ्रान्सला पोचले होते. नवाश्मयुगाच्या काळात भूमध्यसामुद्रिकवंशीय मानवाच्या बऱ्याच टोळ्या व अल्पाइन लोकांचे पहिले थवे पूर्वेकडून येथे आले. खि. पू. ७ व्या शतकाच्या आसपास केल्टिक लोकांच्या आक्रमणांनी आधीच्या रहिवाशांच्या वांशिक स्वरूपात धमाल उडवून दिली. खि. पू. १ ल्या शतकात रानटी टोळ्यांनी फ्रान्सवर जी आक्रमणे केली त्यांचे नेतृत्व डेन्मार्कमधून आलेल्या बेल्ज (Belgae) व सिंब्री (Cimbri) लोकांकडे होते. रोमन साम्राज्याच्या विस्तारामुळे या आक्रमणाला बराच काळ पायबंद बसला असला तरी इसवी सनाच्या १ ल्या शतकात व्हॅन्डॉल जमातीच्या लोकांनी गॉल पादाक्रांत केला होता आणि विसिगॉथ लोकांनी दक्षिण फ्रान्सवर राज्य स्थापले होते. हे राज्य इसवी सनाच्या सातव्या शतकापर्यंत टिकून होते. पाचव्या शतकात रोमन साम्राज्याचा अस्त झाला. त्याच सुमारास फ्रँक लोकांनी फ्रान्सचा बराच प्रदेश बळकावला. गॉथनी दक्षिणी प्रांतांवर स्वाऱ्या केल्या आणि ॲटिलाच्या नेतृत्वाखाली हूण गॉलमध्ये शिरले.

निरनिराळ्या विशेषलक्षणदर्शी भागातून एकामागोमाग एक अशा आलेल्या या निरनिराळ्या लोकांमधून, अर्वाचीन फ्रान्समध्ये निरनिराळ्या भागांत काही स्थानिक वंश प्रकार उद्भवले आहेत. अशीही एक शक्यता आहे की, या भागातील जुन्या, अश्मयुगाच्या पहिल्या काळातील रहिवाशांचाही ठसा काही दक्षिणी प्रांतांतील लोकांवर उमटलेला असावा. तसे त्यांच्या शरीरयष्टीवरून वाटते. उदा. डोर्डो प्रांत व पिरॅनिज पर्वतभागातील जिल्हे. भूमध्यसमुद्रकिनाऱ्यालगतचे लोक जरा बुटके, काळसर व अरुंदमस्तक असे आहेत. ते भूमध्यसामुद्रिक वंशाचा एक उपप्रकार होत. सेव्हॉय व ब्रिटनीचा डोंगराळ भाग व फ्रान्सच्या मध्यभागात एक पट्टाच्या पट्टा ठळकपणे अल्पाइन वंशाचा दिसतो. दक्षिणमध्य फ्रान्सच्या काही भागात पृथुमस्तकता अधिकतम आहे. उत्तरेला नॉर्मन्डी भागात, विशेषतः सीन नदीचे मुखापाशी पिंगट केस व अरुंद मस्तक असलेल्या नॉर्डिक लोकांची वसती थोडी दाट आहे. यांपैकी कुठलाही एक प्रकार फ्रान्सचेच खास वैशिष्ट्य असा नाही आणि फ्रान्सच्या कोणत्याच एका भागात यातील केवळ एखादाच प्रकार सापडतो असेही नाही. ज्याला स्थिर वंश असे म्हणता येईल असे गट म्हणजे ऱ्होन नदीच्या दूरदूरच्या दऱ्याखोऱ्यातून दीर्घ काळ वसलेले आणि आपापसातच विवाहसंबंध करणारे शेतकरी हे आहेत.

फ्रान्समधील वंशमिश्रणाचा इतिहास युरोपात अपवादात्मक आहे असे नव्हे. काही दृष्टींनी तर जर्मनीच्या वंशेतिहासाच्या मानाने ते मिश्रण कमी प्रमाणातच आहे. कारण पूर्व जर्मनीत वंशगणना करताना आपल्याला स्लाव्ह लोकही लक्षात घ्यावे लागतात. स्लाव्ह

लोकांचा विशेषलक्षणदर्शी प्रदेश हा पोलंडच्या पूर्वेला कुठेतरी येईल. इसवी सनाच्या पहिल्या काही शतकांत स्लाव्ह लोकांनी हल्लीच्या पूर्व जर्मनीचा सर्वच प्रदेश व्यापला होता. आणि नंतर जर्मनीत वसाहत करणाऱ्यांपैकी काही लोक परत माघारी फिरल्यामुळे या भागात जर्मन भाषा सुस्थिर झाली तरी शारीरिक प्रकाराच्या बाबतीत जनता मुख्यतः स्लाव्ह वंशाशीच राहिली आहे. " पुष्कळशा भागात तर पूर्व जर्मनीत स्लाव्ह अंश रशियापेक्षाही अधिक आहे. "

स्थलांतरे व वंशमिश्रणे यांच्या इतिहासाच्या बाबतीत युरोपची परिस्थिती अपवादात्मक आहे असे नव्हे. आफ्रिका आणि आशिया यांची तीच कथा आहे. आणि कोलंबसानंतरची अमेरिका व युरोपीय वसाहती यांच्याबाबत ही परिस्थिती पराकाष्ठेला पोचली आहे असे जरी आपल्याला वाटत असेल तरी, अंशतः तरी त्याचे कारण आपण स्वतःच्या डोळ्यांनी हे वंशमिश्रण पाहतो, केवळ ऐतिहासिक अवशेषांवरून अनुमान करीत नाही, हे आहे. परंतु मूलतः पाहता, ती नेहमीच घडत राहिलेली गोष्ट होय. जुन्या जगात मानवजातीची जी इतस्ततः परिभ्रमणे होती, ती सर्व जर कोणी थोडक्यात, अर्धा एक तास चालणाऱ्या चित्रपटात दाखवू शकेल तर, आज पेन्सिल्व्हानिया अथवा मिनेसोटामध्ये जे चालू आहे, तसेच लोकांचे संमिश्रण युरोपियन देशांत होत आलेले आहे हे अमेरिकनांना ओळखू येईल. पेन्सिल्व्हानियामधील जर्मन, डच, अथवा मिनेसोटामधील स्वीडिश लोक जसे हळूहळू आपला अलगपणा सोडून एके काळी परकीय वाटणाऱ्या जमातींशी विवाहसंबंध करीत आहेत याचप्रमाणे युरोपात केल्ट, लॅटिन, स्लाव्ह, नॉर्डिक यांची सरमिसळ झालेली आहे. जसे अमेरिकेत अजूनसुद्धा काही ठिकाणी पिंगट केसांचे लोक अथवा मोठ्या नाकांचे लोक जास्त प्रमाणात एकत्रित दिसतात तसे युरोपातही काही वंशप्रकारांचे काही ठिकाणी दाटी दिसून येते. परंतु अमेरिकेत घडत असलेली संमिश्रणाची ही प्रक्रिया इतकी सुस्पष्टपणे माहीत आहे की, कॅलिफोर्नियातील सगळ्या लोकांची कवटीची मोजमापे घेऊन त्यांची एक घटक म्हणून ओहिओतील लोकांच्या कवटीच्या मोजमापांशी तुलना करणे ही गोष्ट किंवा इलिनॉय आणि पेन्सिल्व्हानियातील लोकांच्या रंगांची तुलना करणे ही गोष्ट ह्या किती हास्यास्पद आहेत हे आपल्या चटकन ध्यानात येते. अशा तऱ्हेच्या मोजणीला काही जीवशास्त्रीय अर्थ नाही हे आपल्याला समजते. परंतु जर्मन 'वंश' अथवा फ्रेंच 'वंश' या कल्पनाही अशाच अर्थशून्य पायावर उभारल्या आहेत आणि जीवशास्त्रीयदृष्ट्या अशाच निरर्थक आहेत.

अमेरिकेप्रमाणेच युरोपमध्येही एकाच भूप्रदेशात राहणाऱ्या अनेक जमातींचे 'रक्त' एकमेकांत मिसळतेच आणि होणाऱ्या संततीत उभय बाजूंची वैशिष्ट्ये उतरत असतात. या मिश्रणाच्या प्रक्रियेमुळे भूतकाळामध्ये संस्कृतीच्या प्रगतीला अडथळे आले असे झाले नाही. या मिश्रणाचे परिणाम चांगले होतात की वाईट याविषयी युक्तिवाद जमवणे व्यर्थ आहे. कारण की, ही प्रक्रिया मानवजातीच्या इतिहासात सर्वत्र आणि

नेहमीच घडत आलेली आहे. मानवी प्रगती काय किंवा मानवजातीवरील गंडांतरे काय यांपैकी कशाचेही कारणत्व वंशसंमिश्रणाकडे देता येणार नाही. हे अर्थात स्पष्टच आहे की, ज्यांचा या रक्तसंमिश्रणाशी काहीही संबंध नाही अशा काही ऐतिहासिक कारणांमुळे, स्थलांतरे आणि लढाईतील विजय यांचे परिणाम केव्हा चांगले दिसतात तर केव्हा वाईट दिसतात. ज्या काळात मूल्यांकन केले जाते त्या काळातील दृष्टिकोणावर ते अवलंबून आहे. यातून जे उरेल ते म्हणजे या बाजूची अथवा त्या बाजूची वकिली होय.

रोमच्या अधःपाताचे स्पष्टीकरण करण्याचे जे अनेक प्रयत्न प्रसिद्ध आहेत, त्या प्रयत्नांत हा वकिली कावा स्पष्टपणे प्रतीत होतो. उज्ज्वल इतिहास असलेल्या या मोठ्या साम्राज्यावर रानटी टोळ्यांनी आक्रमणे केली व ते व्यापून टाकले. या घुसखोरपणामुळे रोमन साम्राज्याचा ऱ्हास झाला अशी कारणमीमांसा खुद्द रोमन लोक देत असत. त्या साम्राज्याच्या अंतापूर्वी दोन शतकेपर्यंत ज्या चुका करण्यात आल्या होत्या त्यांचे वा स्वतःच्या दोषांचे त्यांनी कधी विश्लेषण केलेच नाही. (त्यांच्या मते) अरिष्ट ओढवले ते रानटी लोकांमुळे. युरोपच्या प्रबोधनाच्या काळातही हीच विचारसरणी उपयोगी पडली. अभिजातवादी विचार-सरणीदृष्टिकोणास बांधिलकी असलेल्या प्रबोधनकालीन विद्वानांनी अशी पुस्ती जोडली की, व्हॅन्डॉल या रानटी टोळ्यांनी या अभिजात संस्कृतीचा नाश करून युरोपला आठ शतके-पर्यंत तमोयुगात ढकलले. जे जे म्हणून सुंदर व मौल्यवान असेल त्याचा विध्वंस म्हणजे 'व्हॅन्डॅलिझम' असे समीकरणच देशी भाषांतून होऊन गेले. आपल्या ट्यूटॉनिक पूर्वजां-विषयी अभिमान बाळगणाऱ्या, नंतरच्या काळातील युरोपियनांनी याबाबत जरा वेगळे स्पष्टी-करण देऊ केले. चिरकालीन पशुतेपासून या ट्यूटननी युरोपला वाचविले. जगातून एक स्त्रैण असा मानववंश निपटून काढणारे ते जणू तरुण, मानवरूपधारी देवच होते. पण या ट्यूटॉनिक वंशश्रेष्ठतावाद्यांच्या प्रवक्त्यांनी हेही स्पष्ट केले की, रोमच्या पाडावातून आपणांस आजही एक धडा शिकता येण्याजोगा आहे. रोमन लोकांच्या रक्तात रानटी टोळ्यांच्या रक्ताची भेसळ झाली म्हणून रोम पडले असा तो धडा होय. अशा संमिश्रणाला प्रतिबंध करणारे कायदे रोमन सत्तेने केले असते तर तिला आपला विध्वंस टाळता आला असता. अशा तऱ्हेने ट्यूटॉनिक वंशश्रेष्ठतावाद्यांना रोमचा पाडाव ही वांशिक शुद्धतेची गरज दाखवून देणारी जणू एक नीतिकथाच मिळाली.

इतिहासात या घटनेचे स्वरूप अगदीच भिन्न असल्याचे दिसते. चौथ्या व पाचव्या शतकात रोमन सत्तेने इतिहासाची घोडदौड रोखून धरण्याकरिता वंशशुद्धीविषयी कायदे केले असते तर ते कॅन्यूट राजाने समुद्राच्या लाटांना थांबून राहण्याची आज्ञा देण्यासारखेच झाले असते. अशा कायद्यांनी काही रोमन सम्राटांना जगावरील रोमन अधिसत्तेच्या जीवन-तत्त्वाचा ऱ्हास थांबविता आला नसता अथवा योग्य नेतृत्वाच्या अभावामुळे होणारी हानी भरून काढता आली नसती. अंतर्गत घडामोडींमुळे रोमन साम्राज्य दुबळे झाले होते. या दुबळेपणाचा फायदा ट्यूटॉनिक टोळ्यांनी बरोबर घेतला. काही शतके आधी, या साम्रा-

ज्याच्या ताकदीपुढे ज्या निष्प्रभ ठरल्या होत्या. रोमन साम्राज्यांचा ऱ्हास म्हणजे अंतर्गत हिंसाचार आणि दूरदृष्टीचा अभाव यांची दीर्घ आणि गुंतागुंतीची कथा होय. अखेर असे झाले की, रोमकडे जगाचे स्वामित्व राहिले नाही. जेव्हा तिच्यात पुरेसा जोम होता तेव्हा रोमच्या अधिसत्तेने अनेक परकीय जमातींचे रोमनीकरण केले. वंशमिश्रण हे तिच्या भर-भराटीच्या काळातही चालू होते आणि ऱ्हासाच्या काळीही होते. रोमच्या ऱ्हासाची वंशवादी स्पष्टीकरणे ही केवळ सत्य घटनांची विडंबने होत.

म्हणून वांशिक आरोग्यासाठी आखलेल्या कार्यक्रमांविषयी जे अतिशयोक्त दावे केले जातात ते ऐतिहासिक पुराव्यापुढे टिकत नाहीत. तरी पण बहुतेक पाश्चात्त्य देशांतील देशभक्त आपल्या नागरिक बांधवांना, एखाद्या कमी दर्जाच्या वंशगटाशी रक्तमिश्रण होण्यातील धोक्यासंबंधी इशारे देत असतात. अमेरिकेत आपल्याला सांगितले जाते की, दक्षिण युरोपीय लोकांच्या संसर्गापासून नॉर्डिक लोकांनी आपला बचाव करून स्वतःचे शुद्धत्व राखले पाहिजे. एखाद्या जर्मनी व्यक्तीशी विवाह केल्यामुळे जर्मनीत वंशशुद्धीला डाग लागत नाही पण ज्यू व्यक्तीशी विवाह केल्यास भ्रष्टाकार होतो. भारतामध्ये इंग्लिश माणसाने अन्य वंशीयाशी विवाह करणे म्हणजे श्वेतवर्णीयांना आपल्या श्रेष्ठत्वाचा विश्वासघात होय असे वाटते. जर्मनीत अथवा भारतात अशा तऱ्हेचे मनाई असलेले वंशमिश्रण झालेच तर त्याच्या दुष्परिणामांविषयी शंकाच असत नाही. कोणाही निरीक्षकाला ते स्पष्ट दिसतातच. ज्यांनी असे मिश्रविवाह केले ते आणि त्यांची संतती यांची परिस्थिती इतकी असमाधानकारक असते की, वंशसंकरातून निर्माण होणाऱ्या दुःखाचे ते बोलका पुरावा होऊन राहतात.

परंतु वंशमिश्रणाच्या दुष्परिणामांची ही आधुनिक कालातील उदाहरणे, ही वंश-मिश्रण जीवशास्त्रीयदृष्ट्या अनिष्ट आहे असे सिद्ध करू शकत नाहीत. पहिले म्हणजे इतिहासाने हे दाखवून दिले आहे की, वर्णभेद ओलांडून झालेल्या वंशमिश्रणाच्या अगदी टोकाच्या उदाहरणातसुद्धा असे मिश्र वंशगट हे प्रगती करू शकतात व भरभराटीस येऊ शकतात. अरबी लोक कॉकेशियन वंशाचे आहेत आणि ते जेथे असतील तेथील स्थानिक स्त्रियांशी सर्रास विवाह करतात. उत्तर आफ्रिकेत ते सर्व दूर विखुरले आहेत आणि त्यांच्या-पासून उपजलेली एक काळ्या-गोऱ्यांची मिश्र जमात सुसंपन्न आणि वैभवशाली राज्ये स्थापू शकली. पश्चिम सुदानमध्ये याच राज्यातून बोर्नूचे विशाल साम्राज्य सोळाव्या शतकात उदयास आले. कुळपरंपरेला मुस्लिम लोकांनी कधीच महत्त्व दिले नाही आणि त्यांच्या जनानखान्यातील तद्देशीय स्त्रिया व अरब यांपासून झालेल्या संततीला त्यांच्यात कधी भेद-भावाने वागविले गेले नाही. उलट पक्षी, अशा वंशमिश्रणातून महान राजकीय नेते आणि श्रीमान पुरुष उदयास आले आणि उच्चतर संस्कृतीच्या प्रसाराला त्यांचा हातभार लागला.

आधुनिक जगाच्या काही भागांतसुद्धा वांशिक मिश्रणाचे काहीही दुष्परिणाम दिसून येत नाहीत. याचे उदाहरण म्हणून अभ्यासक नेहमी हवाई बेटांकडे बोट दाखवतात.

हवाईमध्ये वंशावंशात भेद करणारे कायदे अभावानेच चमकतात. तेथे जे वंशमिश्रण होते ते बेकायदेशीर असतच नाही. परस्परांहून पराकोटीने भिन्न अशा वंशीयांची लग्ने चर्चमध्ये लागतात. त्यातून निर्माण होणाऱ्या मिश्र संततीविरुद्ध कसलाही भेदभाव बाळगण्यात येत नाही. अंगी कर्तबगारी असेल तर त्या व्यक्ती उच्च पदे भूषवू शकतात. गव्हर्नरकडील स्वागतसमारंभात अथवा विद्यापीठातील नृत्यसमारंभात वर्णमूलक भेद असत नाहीत. तरीही हवाईच्या सांस्कृतिक प्रगतीला त्यामुळे अडथळा आलेला नाही.[२]

म्हणून, जेव्हा अशा संकरोत्पन्न प्रजेच्या निकृष्ट क्षमतेची झगझगीत उदाहरणे जगाच्या वेगवेगळ्या भागांतून आपल्यापुढे दिसतात, तेव्हा त्या प्रजेला ज्या सामाजिक भेदभावांना तोंड द्यावे लागते त्यांचे जरा निरीक्षण करणे अगत्याचे आहे. जेथे वंशवादी भावना जोरावर असते तेथील युरेशियन अथवा युरोआफ्रिकन (मिश्रवर्णीय) याला आपल्या आईच्या आप्तेष्टांमधूनही तिरस्कारले जाते आणि बापाचे नातलगही त्याला वाळीत टाकतात. त्याच्या आईला पोटापाण्याला फारसे मिळत नाही आणि तो जेव्हा मोठा होईल तेव्हा त्याच्या इतर जातिबांधवांप्रमाणेच हलके समजले जाणारे धंदे करणे त्याच्या नशिबी येते. दैवाचे फासे त्याच्याविरुद्ध पडलेले असतात. अशा तऱ्हेचा सामाजिक भेदभाव आज जगभरच चाललेला दिसतो. आणि अत्यंत तटस्थ असे निरीक्षक स्पष्टपणे म्हणतात की, अशा परिस्थितीत दिवस काढावे लागले तर प्रभावी अशा श्वेतवंशाच्या व्यक्तींनासुद्धा याहून अधिक चांगले नशीब काढता येणार नाही. गरिबीत जन्मलेले आणि समाजबहिष्कृत म्हणून वाढलेले काही गौरकाय लोक समाजात मानमान्यता मिळवतात हे खरे, पण काही संकरज लोकांतही असे घडते, हेही तितकेच खरे आहे.

मानवमितिशास्त्रीय संशोधनातून असे आढळून आले आहे की, जगातील बहुतेक भागांत संकरोत्पन्न प्रजेची जी दुरवस्था दिसून येते, तिची कारणे जीवशास्त्रीय नसून सामाजिक आहेत. अमेरिकन इंडियन व श्वेतवर्णीय यांपासून उत्पन्न झालेल्या प्रजेसंबंधीच्या अभ्यासातून दिसून आले की, मिश्रवंशीयांमध्ये ज्याला 'संकरोत्पन्न जोम' म्हणावे, तो असतो. अशा प्रजेची शरीरयष्टी आईच्या अथवा वडिलांच्या वंशाच्या शरीराच्या ठेवणी-पेक्षा अधिक उफाड्याची असते. असेही वरचेवर आढळून येते की, अशा मिश्ररक्त माणसांची प्रजननशक्ती अधिक असते. पिटकेर्न बेटावरील इंग्लिश-ताहितियन मिश्ररक्ताच्या वंशजांचा प्रजोत्पादनाचा वेग सुरवातीच्या काळात, आजपर्यंत ज्ञात असलेल्या अधिकतम वाढीच्या वेगांपैकी एक होता. सकृत्दर्शनी तरी असे दिसते की, मिश्ररक्ताच्या माणसांनी शारीरिकदृष्ट्या कमी प्रतीचे जन्मावे असे काही निसर्ग ठरवीत नाही.

उत्कृष्ट मानवप्राणी जन्माला येण्याकरिता पाळावयाचा नियम हा की, त्याची माता-पितरे दोघेही शरीराने धडधाकट व उत्तम मानसिक क्षमता असलेली असावीत. या कसोटीवर लावून पाहता, जगाच्या एकूण लोकसंख्येपैकी उत्तम अशा चौथाई भागात सर्व

वंशांतील लोकांचा समावेश होतो. आजपर्यंत शोधून काढलेल्या कोणत्याही मोजमापाने पाहता हे म्हणणे खरे ठरते. म्हणून मानवप्राण्याची वांशिक उन्नती ही वंश अलग ठेवण्यावर अवलंबून नाही. आजच्या जगात ' उत्तम कुलपरंपरा ' याला वंशवादी अर्थ चिकटविला आहे आणि कोणत्याही प्रकारच्या मोजमापांनी जे शारीरिक व मानसिक दृष्ट्या अतिशय कमकुवत ठरतील अशा जन्मदात्यांचाही या उत्तम कुलपरंपरेत समावेश केला जाऊ शकतो. आपणांला हे माहीतच आहे की, अशा प्रकारच्या प्रतिकूलतेतूनसुद्धा काही अपत्ये वर येतातच. परंतु सामाजिक परिस्थिती काही असली तरी पितरांची दुर्बलता ही अडचणच ठरणार हे आपण लक्षात घेतले पाहिजे. जेथे समर्थ आणि निरोगी असे मातापिता लाभतात तेथे संकरोत्पन्न अपत्यांना निसर्गाकडून काही उणेपणा आल्याचे दिसत नाही. ज्यूलियन हक्सले म्हणतो, " जर यदाकदाचित मिश्र रक्ताच्या व्यक्तीमध्ये काही उणेपणा खराच असेल तर तो केवळ, ज्या प्रतिकूल सामाजिक वातावरणात त्या व्यक्ती वाढतात, त्या वातावरणाचाच परिपाक असण्याची शक्यता अधिक आहे. त्यांचे आईवडील निर-निराळ्या वंशगटांतील आहेत याचा काही विपरीत परिणाम होणे जीवशास्त्रीयदृष्ट्या फारच क्वचित घडेल. ४

पृथ्वीच्या पाठीवर माणसांचे जे गमनागमन चालते, त्यामुळे वंशमिश्रण हे होणारच आणि प्रागैतेहासिक काळापासून ते होतही आलेले आहे. त्यात अंगभूत असे वाईट काही आहे याविषयी कोणालाही पुरावा देता आलेला नाही. वंशमिश्रण हे केव्हा केव्हा समाजाला फायदेशीर ठरते तर कधी वाहत्या जखमेसारखे, समाजपुरुषाचे आरोग्य ते धोक्यात आणू पाहाते. वंशमिश्रणाला सामाजिक आपत्तीचे स्वरूप देणे सोपे आहे आणि जेथे अशी परिस्थिती निर्माण झाली असेल त्या ठिकाणी सुज्ञ लोक त्या आपत्तीत भर घालावयाचे टाळतात आणि आपल्या मुलांनी भिन्न जातीयांशी विवाह केले तर दुःखी होतात. जग जसे आहे तसे आपण पत्करले पाहिजे. वंशमिश्रणाने काही अहित होईल असे म्हणण्याला जे अपरिवर्तनीय निसर्गनियम ज्ञात आहेत त्यांमध्ये काही आधार नाही. वंशवादाच्या सिद्धान्तांना पुष्कळ गोष्टींचा जाब दिला पाहिजे. परंतु मिश्र रक्ताच्या लोकांची आजच्या जगातील दुर्दैवी स्थिती हे वंशवादाचे एक कटुतम फळ आहे.

ते म्हणतात :—

अशा रीतीने सर्व प्रकारच्या लोकांच्या मिश्रणातून इंग्लिश माणूस ही अनेकजिनसी चीज जन्माला आली.

Daniel Defoe, *The True-Born Englishman.*

आपल्याला माहीत असलेला प्रत्येक सुसंस्कृत मानवगट हा संकरोत्पन्न समाजच असतो. ही गोष्ट लक्षात ठेवल्यास शुद्ध वंशाच्या लोकांपेक्षा मिश्रवंशीय लोक कमी प्रतीचे असतात या सिद्धान्ताचा फोलपणा पूर्णपणे सिद्ध होतो.

Ralph Linton, *The Study of Man,* London, D. Appleton-Century, 1936, p. 34.

अन्य वंशीयांसंबंधी मनात वैर असण्याची एक विशिष्ट स्वरूपाची सार्वत्रिक सहज-प्रेरणा आहे असे गृहीत धरण्याची काही जरूरी नाही. उलट पक्षी, अशी काही सहज-प्रवृत्ती नसते असे सिद्ध करावयास चांगला सबळ आणि निश्चित पुरावा आहे. वंशाशी ज्यांचा संबंध नाही अशा ऊर्मी व प्रेरणा यांयोगे वांशिक विद्वेषाचे पुरेसे स्पष्टीकरण देता येते.

या ऊर्मी व या प्रेरणा मुळात जरी वंशोद्भव नसल्या तरी अन्य वंशांसंबंधीच्या विचारांशी मनात त्यांचे साहचर्य घडून त्यांना वांशिक स्वरूप येऊ शकते. अशा तऱ्हेचे साहचर्य घडून येते तेव्हा त्या दुसऱ्या वंशातील कोणत्याही माणसाशी संबंध आला तरी भावना चेतावतात आणि सहजप्रवृत्तिमूलक वैरभावनेला जोर असतो तो सर्व त्यांच्या ठिकाणी येऊन त्या कार्य करू लागतात.

J. H. Oldham, *Christianity and the Race Problem*, London S. C. M. 1924, p. 43.

वंशश्रेष्ठतावादी म्हणतो :

नॅशनल सोशॅलिस्टोचा ( जर्मनीतील तिसऱ्या राजसत्ताधाऱ्यांचा ) वंशविषयक दृष्टिकोण यथातथ्यपणे असा मांडता येतो : जगातील प्रत्येक वंश हा ईश्वराच्या मनातील एक एक प्रत्यय होय. आमचा विश्वास आहे ती गोष्ट नेमकी हीच होय. आणि म्हणून ईश्वरी प्रत्यय पुसट होऊ नये व मिश्ररक्ताच्या व्यक्तींमधून त्याचे विडंबन होऊ नये याकरिता वेग-वेगळ्या रक्ताच्या माणसांमध्ये आपण सुस्पष्ट भेद राखला पाहिजे.

W. Gross in *Racio-Political Foreign Correspondence* published by the Bureau for Human Betterment and Eugenics. Berlin, April 1935.

परंतु जीवशास्त्रज्ञ म्हणतो :

मानवी समाज आज जसा आहे तसा असण्यात समाधान मानणारा समाजशास्त्रज्ञ खुशाल वंशमिश्रणाला दोष देऊ दे. पण केवळ सामाजिक कारणांनीच त्याने त्याचे समर्थन करावे. कसल्याही जीवशास्त्रीय कमतरतेमुळे मिश्र वंश नाहीसे होतील अशी वाट पाहात राहाणे मात्र व्यर्थ ठरेल.

W. E. Castle, "*Biological and Social Consequences of Race-Crossing.*" American Journal of Physical Anthropology. Vol IX, p. 156.

आणि एक ब्राझिलियन मुत्सद्दी म्हणतो :

दक्षिण अमेरिकेत शतकांच्या अनुभवातून आम्ही शिकलो आहोत की, निरनिराळ्या वंशांच्या एकरस मिश्रणामुळे जेवढे परस्परांचे आकलन होते तेवढे अन्य कशाने होत नाही.

Dr. Oliviera Lima, Quoted by Cedric Dover in *Half-Caste*. London, Secker and Warburg, 1937, p. 248.

## संदर्भ

(1) Hadden, A. C., *Wanderings of Peoples,* London, 1912, p. 47.

(2) Huxley, Julian, and Hadden, A. C., *We Europeans*. London, Jonathan Cape, 1935, p. 95.

(3) Adams, Romanzo, " The Unorthodox Race Doctrine of Hawaii. " in *Race and Culture Contacts*. edited by E. B. Reuter, New York; 1934, p. 145 ff.

(4) Huxley, J. S., Eugenics and Society. Galton Lecture, Eugenics Society, London, 1936.

◎ ◎

म. रा. सा. सं. मं. ग्रंथालय
प्र/२५२
१
मंत्रालय.

# प्रकरण ५ वे

# कोणती लक्षणे आनुवंशिक असतात ?

आनुवंशिकता म्हणजे विशेष लक्षणांचे पितरांपासून अपत्यापर्यंत संवाहन. एखाद्या जुन्या अमेरिकनाची आनुवंशिकता त्याच्या वंशातील पूर्वजांकडून आलेली असते तर दुसऱ्या एखाद्या अँग्लोसॅक्सन माणसाची आनुवंशिकता त्याच्या वंशातील पूर्वजांकडून येते. दोघांच्याही पूर्वजांमध्ये समान असे काही असू शकेल, पण वैधर्म्यसुद्धा पुष्कळ प्रमाणात असते. नेमकी तीच माणसे दोघांचे पूर्वज नव्हेत. म्हणून त्यांची आनुवंशिकताही एकच असणार नाही. एखाद्या माणसाने आपल्या आर्यन, अँग्लोसॅक्सन अगर ज्यूइश वंशदायासंबंधी बोलणे हे जीवशास्त्रदृष्ट्या अर्थशून्य आहे. कारण, जे रक्ताच्या नात्याने स्वतःचे पूर्व पितर नाहीत असे अगणित लोक अशा बोलण्यात एकत्र ढकलले जातात आणि जे वास्तविक आपले पूर्वज होते त्यांची प्रकारभिन्नता लक्षात घेतली जात नाही. जंगली प्राण्यांच्या ज्या वेगवेगळ्या जाती मानलेल्या आहेत, त्यांच्या परस्परसंयोगातून अपत्यसंभव अशक्य असतो. माणसांचे भिन्न प्रकार जर अशा तऱ्हेचे असते तर आर्यन, अँग्लोसॅक्सन वगैरे नावांखाली येणाऱ्या सर्वांना त्या त्या गटात पडणाऱ्या माणसांचे पूर्वज म्हटले तर ती चूक गंभीर ठरणार नाही. तांबड्या हरिणांच्या कोणत्याही कुलाचे पूर्वज एल्क नव्हते. ते सर्वच्या सर्व केवळ तांबडे हरीणच होते. परंतु आपण पाहिलेच आहे की, जीवशास्त्रदृष्ट्या मानव-प्राण्यांच्या अशा तऱ्हेच्या जाती नसतात. भिन्नलक्षणांकित मानवी प्रकारांचे परस्परसंयोग होतात. त्यातून जन्मलेल्या अपत्यांचेही परत संयोग होतात. म्हणून कोणत्याही एका व्यक्तीचे पूर्वज म्हणजे केवळ त्या व्यक्तीचे प्रत्यक्षात होऊन गेलेले पूर्वज असतात. आनुवंशिकतेचा


हा अर्थ घेतला तर जीवशास्त्राचे नियम तीमध्ये फारच काटेकोरपणे पाळले जातात असे म्हणावे लागते. त्या नियमांपैकी काही आपल्याला ज्ञात आहेत. पण पाश्चात्य संस्कृतीत, ज्याला वांशिक अनुवृत्ती मानले जाते ते एक कपोलकल्पित आहे. प्रत्येक घराण्याच्या वंशवेलीमधून आनुवंशिकता वाहत असते. हीच वास्तवता आहे. वंशाला पूर्वज म्हणणे अवास्तव आहे. जननवैज्ञानिकांच्या व्याख्येप्रमाणेसुद्धा वंश हे एक विमूर्तन आहे. भौतिक, मानवशास्त्रज्ञाच्या संख्याशास्त्रीय व्याख्येप्रमाणे तर त्या व्याख्येत पराकोटीचे विमूर्तन आहे. समागम वंशा-वंशाचा होत नाही. प्रजोत्पत्तीही वंशाच्या कुशीत होत नाही.

जननविज्ञानात पितरांपासून अपत्याकडे येणाऱ्या आनुवंशिकतेचा अभ्यास केलेला असतो. १८५९ मध्ये प्रसिद्ध झालेल्या डार्विनच्या Origin of Species या ग्रंथामुळे जननविज्ञानाचा पाया घातला गेला असला तरी आधुनिक जननविज्ञान हे मेंडेलने केलेल्या वाटाण्यासंबंधीच्या प्रायोगिक अभ्यासावर उभारले गेले आहे. हे त्याचे प्रयोग Origin of Species या ग्रंथाच्या प्रकाशनानंतर थोड्याच दिवसांत केले गेले. परंतु १९०० सालपर्यंत लोकांना त्यांची माहिती नव्हती. निरीक्षणान्ती मेंडेलला जी प्रत्यक्ष उदाहरणे दिसली ती डार्विनला अनुसरणाऱ्या उत्क्रांतिवाद्यांच्या अपेक्षेपेक्षा बरीच वेगळी होती. थेंब थेंब ओघळणारी शाई आणि थेंबाथेंबाने वाहणारे पाणी एकत्र मिसळून एकजीव अशी पातळ शाई तयार व्हावी त्याप्रमाणे आईकडून आनुवंशिकतेने येऊ शकणारी वैशिष्ट्ये आणि वडिलांकडून येऊ शकणारी आनुवंशिक वैशिष्ट्ये यांचे मुलांमध्ये सुघट मिश्रण होत असते अशी काहीशी कल्पना आनुवंशिकतेच्या कार्यपद्धतीविषयी जुन्या उत्क्रांतिवाद्यांच्या मनात होती. पण हे अतिसुलभीकरण होय. मेंडेलच्या प्रयोगाने सिद्ध झाल्याप्रमाणे स्त्रीपुरुषसंयोगाने होणाऱ्या प्रजोत्पादनाची कार्यपद्धती याहून फारच गुंतागुंतीची आहे. आपल्याला मिळणारी आनुवंशिक वैशिष्ट्ये ही आई व वडील याकडून मिळालेली गुणांची एक दीर्घ मालिका असते. हे गुण शाई व पाणी याप्रमाणे एकमेकांत मिसळून जाणारे मानावयाचे नसून व्यक्तीच्या बाबतीत, विखुरलेल्या अनेक मण्यांतून निवडून काढून जणू त्यांची एक राशी बनवलेली आहे अशा स्वरूपाचे मानावयाचे असतात. पुष्कळ गुणांच्या बाबतीत ही निवडीची रीत काही संख्याशास्त्रीय नियम पाळताना आढळते. या सर्व प्रक्रियेचा अभ्यास मेंडेलने आपल्या वाटाण्यांवरील प्रयोगात तपशीलवार केला आहे. आणि मानवी आनुवंशिकतेमधील अनेक जीवशास्त्रीय समस्यांची उकल अद्यापी झालेली नसल्यामुळे अजूनही ही मानवी वंशदायाची प्रक्रिया वर्णन करताना वनस्पती व पशू यांच्या बाबतीतील निरीक्षणाचा आधार घेणे आवश्यक आहे.

वाटाण्यांच्या अनेक पिढ्यांतील उंचपणा अथवा ठेंगूपणा, पिवळा रंग अथवा हिरवा रंग अशा लक्षणांच्या इतिहासावर मेंडेलने आपले लक्ष केंद्रित केले होते. याचा अर्थ असा की, एकमेकांना पर्यायी असलेल्या अशा दोन लक्षणांच्या एका एका जोडीवर एका वेळेस एक याप्रमाणे मेंडेलने आपले लक्ष केंद्रित केले होते. त्याने उंच जातीच्या वाटाण्याचा ठेंगू जातीच्या वाटाण्याशी संकर केला आणि संकरित पीक सर्वच्या सर्व उंच जातीच्या वाटाण्यांचे

आले. या नवीन पिढीतील वाटाण्यांचा त्याने आपसातच संकर घडवून आणला आणि आता चित्र बदलले. दुसऱ्या पिढीतील संकरित पिकापैकी तीन-चतुर्थांश वाटाणे जरी उंच जातीचे असले तरी उरलेले एक-चतुर्थांश ठेंगू जातीचे होते आणि त्यांचा हा ठेंगूपणा अशा प्रकारचा होता की जणू त्यांच्या पूर्वीच्या पिढीतील वाटाण्यांचा कधी उंच जातीशी संयोग झालाच नव्हता. अशा प्रयोगांच्या दीर्घ मालिकांतून आढळून आले की, गुळगुळीतपणा आणि सुरकुतलेपणा, पिवळेपणा आणि हिरवेपणा अशा पर्यायी गुणांच्या जोड्यांप्रमाणेच उंचपणा आणि ठेंगूपणाही अपत्यांमध्ये उमटतात पण प्रत्येक गुण आपली पृथगात्मता राखून ठेवतो. जीवशास्त्रीय परिभाषेत लक्षणांच्या अशा जोडीला 'वैकल्पिक गुण-युगल' म्हणतात. ते दोन गुण म्हणजे एकाच प्रकारच्या वैशिष्ट्याचे व्यावर्तक पर्याय असतात. बहुतेक सर्वच वैशिष्ट्यांच्या बाबतीत या दोन विकल्पांपैकी (पर्यायांपैकी) एक गुण दुसऱ्यापेक्षा प्रभावी असतो म्हणजेच तो प्रकट असतो. याचाच अर्थ असा की, त्यातील जो अप्रभावी अथवा माघार घेणारा गुण असेल तो पुढच्या पिढीत आनुवंशिकतेने संक्रामित होत असला तरी त्या त्या अपत्यांमध्ये प्रकट होणार नाही. उंचपणा या प्रभावी वैशिष्ट्याचे दोन जनुक (gene) (उं, उं) वाटाण्याच्या मूळ जोडीपैकी पूंबीजामध्ये होते. आणि मूळ जोडीतील स्त्रीबीजात मागे राहणाऱ्या म्हणजे अप्रभावी अशा ठेंगूपणा या वैशिष्ट्याचे दोन जनुक ( ठें, ठें ) होते. उंचपणा हे वैशिष्ट्य प्रभावी असल्यामुळे पहिल्या पिढीतील ( पि१ ) सर्व वाटाणे उंच जातीचे निघाले. प्रत्येकामध्ये उंचपणाचा एक जनुक व ठेंगूपणाचा एक जनुक ( उं. ठें. ) होता. पैकी ठेंगूपणाचा जनुक अप्रकट राहिला. परंतु ठेंगूपणा हे वैशिष्ट्य नष्ट झाले नव्हते. पुढच्या अन्तर्जनन झालेल्या पिढीत (पि२) दोन्हीही पितरांकडून उंचपणा व ठेंगूपणा यांचे एक एक जनुक ( उं, ठें ) अपत्यांना मिळाले. दोन लांब काड्या व दोन छोट्या काड्या यांच्या जोड्या जितक्या रीतीने जमविता येतील तितक्या रीतीने जमविल्यास जितके विविध (म्हणजे, ४) प्रकार होतील, तितक्याच प्रकारात जनुकांची विलरण नवीन पिढीतील वाटाण्यात झाली. त्यामुळे या ( पि२) पिढीतील वंशदाय लक्षणांचे प्रमाण उं, उं; उं. ठें; ठें, उं; व ठें, ठें; असे होते.

**आकृती १**



उंचपणाचे जनुक प्रभावी असल्यामुळे वाटाण्यांच्या पहिल्या तीन गटांचे स्वरूप सारखेच दिसत होते. म्हणजे ज्या गटांच्या व्यक्तीमधील दोन्ही जनुके उं, उं अशी होती, त्याचे स्वरूप आणि इतर दोघांचे स्वरूप सारखेच होते. त्यामुळेच मेंडेलच्या प्रयोगातील पि² या पिढीतील वाटाण्यांपैकी एक-चतुर्थांश ठेंगू जातीचे व तीन-चतुर्थांश उंच आले.

वंशदायासंबंधीच्या या नियमाचे महत्त्व असे की, वैशिष्ट्यांची जी नवीन नवीन मिश्रणे होतात ती निर्माण करण्यात स्त्री-पूं-संयोगाचे नेमके कार्य काय हे समजावून देणाऱ्या उपपत्तींचा पाया त्या नियमाने घातला गेला. जनुकांच्या एका वैकल्पिक गुणयुगुलाऐवजी दोन वैकल्पिक गुणयुगुलांमध्ये ज्यांच्यात फरक आहे असे स्त्री-पूं-जनक घेतले असता अपत्यात काय फरक पडतात हे मेंडेलने आणखी पुढे जाऊन पाहिले. उंच ( उं ) आणि पिवळ्या (पि) वाटाण्यांचा ठेंगू (ठें) आणि हिरव्या (हि) वाटाण्यांशी त्याने संयोग करून पाहिला. जसे ठेंगूपणापेक्षा उंचपणाचे जनुक प्रभावी असते तसे हिरव्या रंगाच्या जनुकापेक्षा पिवळ्या रंगाचे जनुक प्रभावी असते. नेहमीच हिरवेपणा आणि ठेंगूपणा मिळून असतात आणि पिवळेपणा व उंचपणा नेहमीच एकत्र राहातात की काय ते शोधून काढावयाचे होते. परंतु मेंडेलला असे आढळून आले की अंतर्जननाने निर्माण झालेल्या दुसऱ्या पिढीतील अपत्यांमध्ये गुणवैशिष्ट्यांच्या वाटणीचा मूळच्या जोडीतील वैशिष्ट्य विभागणीशी काही संबंध नव्हता. एक एक काडी घेऊन काड्यांचा संच बनवावा किंवा सुटे सुटे मणी घेऊन त्यांचे गट करावेत त्याच रीतीने जणू एक एक सुटे वैशिष्ट्य घेऊन त्यांचे गट बनविलेले असतात या ठिकाणी दोन वैकल्पिक गुणयुगलांशी संबंध येत असल्यामुळे दुसऱ्या पिढीत वैशिष्ट्यांचे विभाजन पूर्वीप्रमाणे ( म्हणजे जेव्हा एकाच वैकल्पिक गुणयुगलाचा प्रपंच होता त्या वेळेप्रमाणे ) चारीच्या पटीत न होता सोळाच्या पटीत होते.

गणितदृष्ट्या शक्य होतील तेवढी सर्व संयुक्ते दुसऱ्या पिढीत घडून आली. ९ उंच+पिवळे, ३ उंच+हिरवे, ३ ठेंगू+पिवळे व १ ठेंगू+हिरवा. त्यांच्या मूळ जनकांपैकी एक उंच+पिवळा व दुसरा ठेंगू+हिरवा असूनही दुसऱ्या पिढीतील १६ अपत्यांपैकी ६ अपत्यांची वैशिष्ट्यसंयुक्ते मूळ जनकांमध्ये नसलेल्या प्रकारांची होती म्हणजे तीन उंच+हिरवे आणि तीन ठेंगू+पिवळे या प्रकारांचे होते.

म. रा. ... ग्रंथालय
मंत्रालय

## आकृती २

स्त्री बीज (पि$^{1}$)

| | | उं+पी | उं+हि | ठें+पी | ठें+हि |
|---|---|---|---|---|---|
| पुं बीज (पि$^{1}$) | उं+पी | पि$^{2}$ उं पी / उं पी | पि$^{2}$ उं हि / उं पी | पि$^{2}$ ठें पी / उं पी | पि$^{2}$ ठें हि / उं पी |
| | उं+हि | पि$^{2}$ उं पी / उं हि | पि$^{2}$ उं हि / उं हि | पि$^{2}$ ठें पी / उं हि | पि$^{2}$ ठें हि / उं हि |
| | ठें+पी | पि$^{2}$ उं पी / ठें पी | पि$^{2}$ उं हि / ठें पी | पि$^{2}$ ठें पी / ठें पी | पि$^{2}$ ठें हि / ठें पी |
| | ठें+हि | पि$^{2}$ उं पी / ठें हि | पि$^{2}$ उं हि / ठें हि | पि$^{2}$ ठें पी / ठें हि | पि$^{2}$ ठें हि / ठें हि |

वैशिष्ट्यांच्या नवीन संयुक्तांच्या निर्मितीच्या बुडाशी जे जीवशास्त्रीय तत्त्व आहे त्याला "एकेका (अविभाज्य) गुणवैशिष्ट्याच्या विभक्तीकरणाचे अनवलंबित्व (independence of segregation of unit characteristics)" असे म्हणतात. मानवी वंशदायांसंबंधीच्या बऱ्याच गोष्टी अजून दुर्गम्य असल्या तरी 'वैकल्पिक गुणयुगलांच्या आनुवंशिकतेबाबत वरील तत्त्व क्रियाशील असते यात संदेह नाही. दीर्घशिरस्कता, पिंगट केस व गोरा वर्ण ही नॉर्डिक लोकांची वैशिष्ट्ये म्हणून निवडलेली आहेत तर पृथुशिरस्कता व रंगाचा काळसरपणा ही अल्पाइन लोकांची वैशिष्ट्ये मानली जातात. परंतु पिंगे केस व गोरा रंग यांची दीर्घ शिरस्कतेपासून फारकत होते व काळसरपणा व पृथुशिरस्कता हेही फुटून वेगळे होतात. या घटनेत आज काही गूढ राहिलेले नाही. उदाहरणार्थ, युरोपातील शरीरप्रकारांचा नकाशा पाहा. इतके सगळे वेगवेगळ्या प्रकारांचे लोक युरोपियनांच्या पूर्वजात समाविष्ट असल्यावर तो नकाशा जसा दिसावा अशी अपेक्षा करता येईल, तसाच तो दिसतो. मातापितरांच्या प्रकारात निरनिराळ्या सुट्या गुणवैशिष्ट्यांच्या बाबतीत जितके अधिक फरक असतील, त्या प्रमाणात दुसऱ्या आणि नंतरच्या पिढ्यांतून

मानवी प्राण्यांच्या बाबतीत संयुक्तांच्या विविधतेची शक्यता वाढते. जर आपण एक एक अशी दहा सुटी गुणवैशिष्ट्ये वेगळी करू शकलो आणि या दहाही वैशिष्ट्यांबाबतीत जर आई आणि बाप एकमेकांपासून भिन्न असले तर त्या गुणवैशिष्ट्यांची १०२२ संयुक्ते शक्य होतील [ $२^{१०}$ = १०२४. १०२४–२ (मातापित्यांची वैशिष्ट्ये) = १०२२ ]. अशा रीतीने मानवी जननपेशिका मूळच्या वंशदायात अगणित परिवर्तने घडवून आणू शकतात आणि जगाच्या सर्व भागात तशी परिवर्तने घडून आलेलीही आहेत.

अशा रीतीने आधुनिक जननविज्ञानाच्या संदर्भात शुद्ध वंशाचा प्रश्न निराळाच दिसू लागतो. तरीही पुष्कळदा भौतिक मानववंशशास्त्रज्ञ अशा रीतीने बोलतात की जणू काय खरी समस्या आहे ती म्हणजे मूळचे मानववंश शोधून काढून त्यांची लक्षणे निश्चित करण्याची. उदाहरणार्थ, दीर्घशिरस्कता आणि गोरा रंग व पिंगट केस या गोष्टी ज्यात एकत्र आहेत असा एक नॉर्डिक नावाचा प्रकार वेगळा काढणे. मग एक अभ्यासक दीर्घशिरस्कता व काळसर वर्ण असलेल्या मानवगटांचा अभ्यास करून रंगाच्या कारणावरून त्यांचा नॉर्डिक प्रकाराशी काहीही संबंध नाही असे म्हणेल तर दुसरा अभ्यासक कपालांकाच्या कारणावरून त्यांचा नॉर्डिक प्रकाराशी संबंध शाबीत करेल. असा वाद वाढतच जातो. पण जननविज्ञानाच्या सिद्धान्ताप्रमाणे पाहता दोन्हीही वैशिष्ट्ये महत्त्वाची आहेत. आनुवंशिकतेची रीतच अशी आहे की, पूर्वजांची सही सही प्रतिकृती नाहीत असेच प्रकार वारंवार पुढच्या पिढ्यांतून उत्पन्न होत असतात. कोणताही एक अभ्यासक मूळ प्रकाराचा निदर्शक म्हणून जो लक्षणसमूह धरून चालेल त्याला जननविज्ञानदृष्ट्या महत्त्व नाही. स्वतःचा पुरावा व्यवस्थित मांडण्यासाठी एक सोय एवढेच त्याचे महत्त्व.

मिश्र वंशापासून शुद्ध वंश वेगळा ओळखून काढण्याचा शास्त्रीय साधनाचा एकमेव आधार म्हणूनसुद्धा जननविज्ञानाच्या तत्त्वांना मानववंशाबद्दलच्या ज्ञानसाधनेत महत्त्वाचे स्थान आहे. वांशिक संकराचा अभ्यास करताना एक सर्वस्वी निराळी अध्ययनपद्धती अवलंबिणे मेंडेलच्या सिद्धान्तामुळे जरूरीचे ठरते. आपण पाहिले आहेच की, जर आई-बाप भिन्न शारीरिक प्रकारांचे असतील तर त्यांच्या वैशिष्ट्यांच्या संततीत होणाऱ्या विभागणीमुळे अपत्ये एकमेकांहून वेगळी दिसणारी होतात. पण जर आईबाप एकाच प्रकारचे असतील तर त्यांची मुलेसुद्धा एकसारखी दिसणारी असणार. ही दुसरी अवस्था जेथे अस्तित्वात आहे म्हणजे जेथे एका कुटुंबातील भावंडांत म्हणण्याजोगे फरक दिसत नाहीत असा एकही मानवसमूह आढळात आलेला नाही. यामुळे, हाती असलेल्या सर्व मनुष्यरूपी सामग्रीवरून दिसते की, अगदी अलग पडलेल्या मानवसमूहातसुद्धा कुठेतरी बहुविध पूर्वजपरंपरा असते आणि काही अपत्ये एका पूर्वजपरंपरेकडे झुकलेली असतात तर दुसरी काही दुसऱ्या पूर्वजपरंपरेकडे कलतात. एखाद्या वंशाच्या सर्वच व्यक्तींमध्ये एकाच तऱ्हेची लक्षणवैशिष्ट्ये आहेत या अर्थाने वांशिक शुद्धता इतिहासास ज्ञात नाही. परंतु उप-आर्क्टिक प्रदेशात शेकडो वर्षे अलग पडलेल्या एस्किमो लोकांच्या काही लहान लहान

गटांमध्ये गौरवर्णीयांशी त्यांचा संपर्क येण्यापूर्वी अशी वांशिक शुद्धता अस्तित्वात असण्याची शक्यता आहे. कोणत्याही मानवसमूहात वांशिक शुद्धता याचा अर्थ एवढाच होऊ शकतो की, सख्ख्या भावंडांचा एक गट म्हणजे दुसऱ्या एखाद्या सख्ख्या भावंडांच्या गटाची आनुवंशिक वैशिष्ट्यांच्या बाबतीत प्रतिकृती असणे. म्हणजे असे की, जरी जननविज्ञानाच्या सिद्धान्ताप्रमाणे सख्ख्या भावंडांच्या एकेका गटात काही वैशिष्ट्यांची नवीन संयुक्ते होत असली तरी, पिढ्यानुपिढ्या इतके अन्तर्जनन होत राहते की, हे सर्व गट एकमेकांसारखेच दिसू लागतात– एकाच वंशदायामध्ये ते सहभागी असतात. अलग पडलेल्या टेनेसी नदीच्या दऱ्याखोऱ्यातील गौरवर्णी अमेरिकन लोक, प्रथम आलेले युरोपियन पुरुष वसाहतवाले व हॉटेन्टॉट स्त्रिया यांच्या अपत्यांची संतती म्हणून असलेले दक्षिण आफ्रिकेतील बॅस्टार्ड लोक, मलाय द्वीपसमूहातील किसार बेटावरील डच बाप व मलाय आई अशा जोडप्यां-पासूनची निपजलेली जमात अशा सगळ्या मानवसमूहांमध्ये, प्रत्येक समूहातील भावंडांचे सर्व गट जननविज्ञानदृष्ट्या एकमेकांना समान असतात. टेनेसीच्या डोंगराळ भागातील श्वेतवर्णीयांच्या गटापेक्षा दक्षिण आफ्रिकेतील व किसार बेटावरील समूहांतील सख्ख्या भावंडांच्या गटातील भावंडाभावंडामध्ये अधिक फरक आढळतात. कारण असे की, त्यांच्या वंशदायांमध्ये अंतर्गत भिन्नता फारच आहे. तरी पण अन्तर्जननामुळे त्यांच्यात वांशिक एकजिनसीपणा बऱ्याच मोठ्या प्रमाणावर निर्माण झाला आहे. एखाद्या भौतिक मानव-शास्त्रज्ञाने या समाजातील एखाद्या भावंड-गटाची मोजमापे घेतली तर ती मोजमापे इतर भावंड-गटांच्या मोजमापांच्या जवळजवळ येतील. त्यातील कोणताही एक गट सर्व गटांचा समुचित नमुना ठरेल.

कोणत्याही वंशविषयक संशोधनात वंशाचा एकजिनसीपणा कोणत्या मर्यादेपर्यंत साधला आहे हे अजमावण्यासाठी वरील रीत ही निश्चित गमक आहे. युरोपातील नागरी केंद्रातून अनेक कुटुंबे एकमेकांशी काही संबंध नसलेली असतात. तेथे हा एकजिनसीपणा निर्माण झालेला असत नाही. तेथे भावंडांच्या एका गटाची मोजमापे ही बहुधा अन्य गटांचे प्रतिनिधित्व करू शकत नाहीत. परंतु मानवजातीचा विचार करता 'शुद्ध वंश' याला काही अर्थ द्यावयाचा झाल्यास तो म्हणजे वरील रीतीने मापलेला एकजिनसीपणा एवढाच होय. मानवशास्त्रदृष्ट्या पाहणी करता, ज्यांच्यामध्ये शुद्ध वंश अस्तित्वात नाही असे दिसते, तीच युरोपीय राष्ट्रे आपल्या शुद्ध रक्ताचा डांगोरा पिटून आपले श्रेष्ठत्व मिरवू पाहतात हे एक दैवदुर्विलसित आहे.

अलीकडच्या काही वर्षांत जननविज्ञानाने आनुवंशिकतेसंबंधीच्या ज्ञानात आणखी एक महत्त्वाची भर घातली आहे. असे दाखविले गेले आहे की, काही अचानक परिवर्तन (Mutation) घडूनही नवी वैशिष्ट्ये उत्पन्न होऊ शकतात. आपल्या एकत्रित केलेल्या वंशदायातून ज्यांची उत्पत्ती दाखविता येत नाही अशी काही नवीन वैशिष्ट्ये घेऊनच एखादी खोडमाशी अथवा एखादे वासरू जन्माला येते आणि आपली अपत्ये व त्यांची संतती

यांच्यात ही नवीन वैशिष्ट्ये संक्रमित करते. हिअरफोर्ड या जातीची गुरे कॅनडा आणि अमेरिकेतील पशूत्पादनक्षेत्रात फार काळपर्यंत फार लोकप्रिय आहेत. जेव्हा १८८९ मध्ये कान्सासमधील एका शेतावर एक बिनशिंगाचे वासरू निपजले, तेव्हा पशूत्पादन व्यावसायिकांच्या ध्यानात बिनशिंगाच्या गुरांचे महत्त्व चटकन आले. हल्लीची सगळी बिनशिंगाची हिअरफोर्ड गुरे म्हणजे त्या कान्सासच्या पाड्याचीच संतती होय. असे परिवर्तन घडते ही वस्तुस्थिती आहे हे आज नाकारता येणार नाही. आणि काही विशिष्ट परिस्थितीमुळे परिवर्तनांचा संभव वाढतो हेही सर्वांना माहीत आहे. उदाहरणार्थ, जास्त उंचीच्या प्रदेशात विकिरणाच्या ( radiation ) प्रभावामुळे अथवा प्रयोगशाळांतून क्ष-किरणांच्या शक्तीमुळे परिवर्तनाची शक्यता वाढते.

अशी नवीन वैशिष्ट्ये कशी उद्‌भवतात यासंबंधी पहिल्या पहिल्या उत्क्रांतिवाद्यांची एक अगदीच वेगळी विचारसरणी होती. अर्जित गुण आनुवंशिकतेने पुढे सरकतात यावर डार्विनचा विश्वास होता. अधिकाधिक उंचीवरचा पाला मिळवणे भाग पडल्यामुळे जिराफांच्या माना जास्त जास्त लांबत गेल्या आणि प्रत्येक नव्या पिढीत या अर्जित गुणाचे आनुवंशिक संक्रमण झाल्यामुळे ती जास्त लांब मानेची निपजत गेली. किंवा, पाण्याखालील गुलातील माशांची दृष्टी कधी उपयोग न करावा लागल्यामुळे नाहीशी झाली आणि त्यांचा हा नवीन अंधळेपणा त्यांच्या वंशजांत उतरला. त्याच रीतीने मानवजातीतही मातापित्यांची अर्जित वैशिष्ट्ये त्यांच्या संततीत उतरतात असे मानले जाई.

आधुनिक जननविज्ञानाने प्रयोगामागून प्रयोग केले. त्या प्रयोगांमधून असे निष्पन्न झाले की डार्विन व त्याचे समकालीन यांचे म्हणणे चुकीचे होते. अर्जित गुण आनुवंशिक होत नाहीत. नवीन वैशिष्ट्ये परिवर्तनाने उत्पन्न होतात आणि आत्यंतिक अंतर्जनन करणाऱ्या वंशवेलीतही, ती उत्पन्न होऊ शकतात. ही परिवर्तने केवळ ' यद्वा तद्वा ' अशी असतात आणि त्या बदलांपासून त्या विशिष्ट व्यक्तीला काही फायदा होतोच असेही नाही. वेगवेगळ्या मानवंशांची विविध वैशिष्ट्ये अशा रीतीने यदृच्छया परिवर्तने घडून निर्माण झाली, उदा. निळे डोळे. मानवाच्या प्राचीन इतिहासात जेथे जेथे मानवांचे समूह स्थायिक होऊन विशेषलक्षणदर्शी प्रदेश तयार झाले तेथे तेथे अंतर्जननामुळे ही वैशिष्ट्ये खूप मोठ्या लोकसंख्येची विशेष लक्षणे बनून गेली. परंतु पूर्वजांची अर्जिते ही त्यांच्या वंशजांमध्ये संक्रमित होत असतात ही कल्पना मात्र संपूर्णतया त्याज्य ठरली आहे. संस्कृतीच्या वैभवाविषयी आनुवंशिकता उदासीन असते. मग ते वैभव विज्ञानात असू दे अथवा तंत्रज्ञानात अथवा कलांमधील असू दे. पिढ्यांमागून पिढ्यांमध्ये ह्यांचे संक्रमण नैसर्गिकरीत्या होत नाही, मानवी प्रयत्नांनी त्यांची जोपासना करावी लागते.

ते म्हणतात—

जीवशास्त्रज्ञ : एक व्यावसायिक जीवशास्त्रज्ञ म्हणून माझ्या शब्दांबद्दल माझ्यावर असलेले दायित्व ध्यानात घेऊन मी ठामपणे म्हणतो की, मानवसमाजाची शारीरिक

वैशिष्ट्ये आणि सांस्कृतिक कर्तबगारी यांचा अन्योन्य संबंध काय व कसा आहे यासंबंधीचे सर्व उपलब्ध आणि खरेखुरे ज्ञान हे एखाद्या पोस्टाच्या तिकिटाच्या मागील बाजूस लिहिता येईल.

Lancelot Hogben, "Preface on Prejudices" in Cedric Dover, *Half-Caste*, London, Secker and Warburg, 1927.

महत्त्वाच्या वैशिष्ट्यांबाबत बोलावयाचे झाले तर दोन वंशांमध्ये असलेले फरक हे दोन व्यक्तींमधील तशा फरकांपुढे अगदीच क्षुल्लक ठरतात— इतके क्षुद्र की, सुप्रजननाचे निष्पक्षपाती शास्त्र बनवावयाचे झाल्यास त्याच्या कार्यपद्धतीत दोन वंशांच्या लक्षणामधील भेद लक्षातही घ्यावयास नकोत.

H. J. Muller, *Out of the Night : a Biologist's View of the Future*. London, Gollancz, 1936.

समाजाच्या दोन थरांमधील बुद्धिमत्तेत असलेला फरक हा आनुवंशिक कारणांमुळे थोडा तरी पडतो की काय यासंबंधी आपणांला अजून निश्चित माहिती नाही आणि या फरक पडण्याला परिस्थिती ही काही प्रमाणात निश्चितपणे कारणीभूत आहे हे ध्यानात घेता सर्वसाधारण बौद्धिक दर्जा वाढविण्याच्या कामी वंशशास्त्रीय पद्धती वापरण्यापेक्षा परिस्थिती सुधारण्याची पद्धती वापरणे किती जरुरीचे आहे ते उघडच आहे.

C. H. Waddington, *An Introduction to Modern Genetics*. London, Allen & Unwin, 1939, p. 358.

◎ ◎

## प्रकरण ६ वे

# श्रेष्ठ कोण ?

अमुक एका वंशाच्या श्रेष्ठपणाशी अथवा कनिष्ठपणाशी काही संबंध नाही अशा किती तरी गोष्टी मानववंशांच्या शास्त्रीय अभ्यासातून निष्पन्न होतात. ज्यांची नोंद नाही व विस्मरण झालेले आहे अशा पूर्वेतिहासातील घटना व मानवसमूहांची स्थलांतरे यांसंबंधी त्यातून माहिती मिळते. दोन भिन्न मानववंशांच्या मिश्रणातून वैशिष्ट्यांची कोणती नवी संयुक्ते उत्पन्न होतात ते समजते. एक राष्ट्र म्हणून असलेला मानवसमूह आणि जीवशास्त्रदृष्ट्या एकाच प्रकारचा (म्हणजे एका वंशाचा) असलेला मानवसमूह यांच्यातील फरकही त्यामुळे स्पष्ट होतो. अगदी सुरवातीपासूनच, असा शास्त्रीय अभ्यास हे मानववंशशास्त्राचे एक अविभाज्य अंग बनले आहे. माणसाची हाडे व इतर शारीरिक वैशिष्ट्ये यावर कोरलेली मानवजातीच्या इतिहासाची शकावली या अभ्यासद्वारा मिळते. आणि या अभ्यासातून मानववंशशास्त्रज्ञांना असे संपूर्णपणे प्रत्ययास आले की, मानवाच्या श्रेष्ठतेशी अथवा कनिष्ठतेशी त्याच्या वंशाचा संबंध नाही. एक आद्य मानववंशशास्त्रज्ञ थिओडोर वाइट्झ् (Theodor Waitz) याने १८५९ साली या प्रश्नाचा अभ्यास केला. तेथपासून तो अगदी अलीकडच्या फ्रँझ बोॲा (Franz Boas) पर्यंत सर्वजण हेच पुनःपुन्हा सांगतात की, या बाबतीत वंशांच्या अभ्यासातून मिळणारा पुरावा केवळ नकारात्मक आहे.

तरी पण सगळ्या मानवी समस्यांपेक्षा वंशाच्या श्रेष्ठत्व अथवा कनिष्ठत्वाच्या समस्येने मानवी हृदयात घर केलेले असते. साध्याभोळ्या रानटी माणसासारखाच, सुसंस्कृत माणूसही

त्याला अगदी जवळच्या वाटणाऱ्या गोष्टी, केवळ आपल्याला अत्यंत प्रिय आहेत असे म्हणत नाही, तर विश्वात त्या सर्वांत महत्त्वाच्या आहेत असे मानतो. थोडक्यात म्हणजे, त्या श्रेष्ठ आहेत असे म्हणतो. कोणतीही माहिती हाताशी आली की, आपल्या श्रेष्ठत्वा-विषयीच्या विश्वासाचा पुरावा म्हणून तो तिची काळजीपूर्वक छाननी करतो. तेव्हा वंश-विषयक नवी नवी सत्ये उजेडात आल्यावर त्यांचा परत परत या दृष्टिकोणातून अभ्यास व्हावा हे अपरिहार्यच होते. यात वंशकल्पनेचे काही वैशिष्ट्य आहे असे नव्हे. धर्मांचीही अशी वर्गवारी झालेली आहे आणि ठाम निर्णय जाहीर झालेले आहेत. वर्गभेद आणि लिंगभेद यांचीही तीच गत होते. इतकेच काय, पण दोहोंचा वांशिक पोत एकच असूनही एक राष्ट्र आणि दुसरे राष्ट्र, एक जहागीर आणि तिच्या शेजारची दुसरी जहागीर यांच्या-कडेही याच दृष्टिकोणातून पाहिले जाते. एकोणिसाव्या शतकाच्या मध्यानंतर वंशविषयक ज्ञान जसे वाढत गेले, तसे एक वांशिक गट दुसऱ्या गटापेक्षा निसर्गतःच श्रेष्ठ अथवा कनिष्ठ आहे की काय हे ठरविण्यासाठी काही शास्त्रीय आधार शोधावयाचा अभ्यासक प्रयत्न करीत राहिले. तीन क्षेत्रांतून याविषयी काम करण्यात आले. शरीरविज्ञान, मानस-शास्त्र व इतिहास ही ती क्षेत्रे होत.

## शरीर वैज्ञानिक क्षेत्र :

आपल्या मानवपूर्व पूर्वजांपासून ते गौरवर्णीय मानववंशापर्यंत मानवाची शारीरिक उत्क्रान्ती एका सरळ रेषेत होत आली आहे असे पहिल्या पहिल्या उत्क्रान्तिवाद्यांचे मत होते. उत्क्रान्तीची प्रक्रिया म्हणजे जणू एक शिडीच. आणि या शिडीची प्रत्येक वरची पायरी म्हणजे बिनशेपटीच्या वानरापासून होत असलेल्या प्रगतीचा एक एक ठळक टप्पा होय असे त्यांनी धरले होते. पाहा की, त्या बिनशेपटीच्या वानरांचे नाक रुंद आणि बसके असते. तशीच रुंद, बसकी नाके आफ्रिकेतील बुशमेन, निग्रो आणि ऑस्ट्रेलियातील आदिवासी यांची असतात. तर युरोपियन लोकांचे नाक अरुंद आणि उठावदार असते. त्या अर्थी, अवयवांची कमी लांबी व उठावदार नाक ही उत्क्रान्तिप्रक्रियेची इष्ट फलिते होत आणि ही फलिते श्वेतवर्णीयांचे वैशिष्ट्य होय.

मानव व कपी ( ape ) यांच्या शरीररचनाप्रकारांचा गेल्या पन्नास वर्षांत जो अभ्यास झाला त्यावरून दिसते की, उत्क्रांतिवाद्यांचा मानवशरीराच्या सरळरेषाकृती उत्क्रांती-वरील विश्वास अनाठायी होता. मानवसदृश प्राणी आणि मानवजाती या दोहोंतही वैशिष्ट्यपूर्ण वाढीच्या अवस्था विशिष्ट प्रदेशात होत आल्या आहेत. विकासाच्या या अवस्था एकाच सरळ रेषेवर मांडून दाखविता येणार नाहीत. मानव आणि वानर यांतील सगळ्यात ठळक फरक माणसाची नितळ त्वचा व मानवसदृश प्राण्यांची केसाळ कातडी यांत आहे. सर्व मानववंशांत मोंगोलॉइड लोकांच्या अंगावर सगळ्यात कमी केस असतात तर ऑस्ट्रेलियन आदिवासी, इतर वंशांतील काही प्रदेशनिष्ठ जमाती आणि गौरवर्णीय लोक ह्यांच्या शरीरावर सर्वांत जास्त प्रमाणात लव असते. मानवसदृश प्राण्यांचे ओठ पातळ असतात. त्यांच्या

अगदी उलट, ज्याला खरा मानवी विकास म्हणता येईल ते म्हणजे निग्रोंचे जाड ओठ होत. हा निकष लावल्यास श्वेतवर्गीयांचे पातळ ओठ त्यांची अप्रगत अवस्था दाखवितात. अंगावरील केसांचे प्रमाण अथवा ओठांची जाडी हे निकष म्हणून वापरले तर असे ठरणार नाही की, शरीररचनादृष्ट्या आजचे श्वेतवर्णीय लोक प्राचीन मानवापासून सर्वात पुढे सरकलेले आहेत. उत्क्रांतिप्रक्रियेचे शेवट गाठण्याची मक्तेदारी कोणत्याही एका वंशाची नाही आणि केवळ श्वेतवर्णीयांना अनुकूल म्हणून निवडून काढलेल्या वैशिष्ट्यांच्या आधारावर त्यांची श्रेष्ठता सिद्ध करता येणार नाही.

सुरवातीसुरवातीच्या उत्क्रांतिवाद्यांचे महत्त्वाचे म्हणणे असे होते की, मेंदूने व्यापण्याची मस्तकातील जागा अधिक असणे हा वंशश्रेष्ठतेचा पुरावा होय. वानरांचे कपाळ मागे ओढलेले असते व मेंदू लहान आकाराचा असतो तर मानवाचे कपाळ उठावदार व मेंदू आकाराने मोठा असतो. म्हणून कोणत्याही मानववंशातील मेंदूच्या सरासरी आकारावरून उत्क्रांतीच्या शिडीवरील त्याचा टप्पा निश्चित करता येईल. शरीराच्या एकूण वजनाच्या तुलनेने मेंदूचे सरासरी वजन हे मोंगोलॉइड लोकांच्या मानाने निग्रोंमध्ये कमी भरते व श्वेतवर्णीयांच्या मानाने मोंगोलॉइड लोकांच्या मेंदूचेही जरा कमीच असते. हे फरक सरासरी-मधील फरक आहेत. परंतु त्यात इकडचे तिकडे होणे इतक्या मोठ्या प्रमाणावर असते, की, जवळजवळ कोणताही मानवी मेंदू तिन्ही प्रमुख वंशांपैकी कोणत्याही वंशाच्या व्यक्तीचा असू शकेल. त्या सरासरीतील निव्वळ फरकही फार मोठा नाही. पिग्मी लोक वगळता, इतर मानवी मेंदूंचा आकाराचा कमीजास्तपणा फार मर्यादित असतो. त्याच्या तुलनेने मानव-सदृश वानर व मानव यांच्यातील फरक फारच मोठा आहे. वानरांच्या मेंदूचा सगळ्यात मोठा आकार ६२१ घनसेंटिमीटर असतो असे बूले ( Boule )[१] म्हणतो. तर निग्रोंच्या बाबतीत तोच लेखक, १४७७ घ. सें. मी. आणि पॅरिसच्या नागरिकांच्या बाबतीत १५५० घ. सें. मी. असे आकडे देतो. तर पिअर्सनच्या[२] पाहणीतील युरोपियन पुरुषांच्या मेंदूच्या आकाराची सरासरी १४९० घ. सें. मी. आली. ही सरासरी जवळजवळ बूलेने दिलेल्या निग्रोंच्या सरासरीइतकी आहे. या उलट, पिअर्सनच्या पाहणीप्रमाणे निग्रो पुरुषांच्या बाबतीतील सरासरी १३५० घ. सें. मी. पडते. त्यावरून असे दिसते की, मानवजातीचे मेंदूच्या आकाराचे सरासरी आकडे एकमेकाजवळच येतात व मानवपूर्व प्राण्यांच्या सरासरी आकड्यांपासून ते खूपच दूर आहेत. मानवपूर्व प्राणी आणि मानव यांच्या सरासरीच्या मध्यंतरी पडणारे आकडे मानवी मेंदूच्या बाबतीत फक्त पिग्मी वंश व इतर अत्यंत लहान शरीरयष्टी असलेल्या जमाती यांचे असतात. लहानच आकाराच्या व्यक्तीची मोजमापे घेत असल्यामुळे इतर मापे जशी कमी येणार तसेच मेंदूचेही मोजमाप कमी असते. या लहान शरीरयष्टीचा परिणाम म्हणून उपजतच त्यांना काही मानसिक न्यून असते अशा निर्णयावर उडी मारणे हे अधिक पुराव्याच्या अभावी चुकीचे आहे.

ज्यांची शरीरयष्टी साधारण सारखीच आहे अशा वंशांमध्ये, अगदी टोकाची उदाहरणे

सोडली तर, एका वांशिक गटातील मेंदूचे आकार हे दुसऱ्या गटातील मेंदूच्या आकारांहून भिन्न नसतात. आणि म्हणून ज्यांचा वंश आपल्याला आधी माहीत नाही अशा व्यक्ती केवळ मेंदूच्या आकाराच्या मापावरून कोणत्याही एका वंशाच्या म्हणून ठरविता येणार नाहीत. मेंदूच्या आकारातील फरक व्यक्तीव्यक्तींमध्ये खूप मोठ्या प्रमाणात असतो. पण वंशातील व्यक्तींची सरासरी घेतली तर दोन वंशांच्या सरासरीत तो फारच थोडा असतो. पिग्मी आणि अर्धपिग्मी गट सोडता, सगळ्यात मोठ्या आकाराचे मेंदू असलेली जगातील चौथाई लोकसंख्या सर्व वंशांच्या व्यक्तींची मिळून बनलेली असेल. व्यक्तीची श्रेष्ठता ठरविण्यासाठी मेंदूच्या आकाराचा निकष बरोबर आहे अशी जर खरोखरीच आपली खात्री असेल, तर व्यक्ती कोणत्या वंशाची आहे याला महत्त्व न देता सगळ्याच मोठ्या मेंदूच्या व्यक्तींविषयी आपुलकी ठेवणे हे अधिक यथार्थपणाचे होईल.

परंतु वैयक्तिक श्रेष्ठता त्या व्यक्तीच्या मेंदूच्या आकारावर अवलंबून आहे या दाव्याची सत्यतासुद्धा शंकास्पदच आहे. कित्येक सुविख्यात युरोपियनांचे मेंदू अतिशयच लहान होते. मेंदू कार्य कशा रीतीने करतो हा खरा महत्त्वाचा मुद्दा आहे. जेवढ्या मर्यादेपर्यंत या कार्याचे अधिष्ठान शारीरिक आहे, तेवढ्या मर्यादेपर्यंत ते मेंदूच्या एकूण आकारावर अवलंबून नसून मेंदूच्या पृष्ठभागाच्या क्षेत्रफळावर अवलंबून असते. मेंदूला चुण्या जेवढ्या जास्त तेवढे त्याचे क्षेत्रफळही अधिक असते. दोन मेंदूंमध्ये त्यांच्या अतिसूक्ष्म घटकांमुळे काय फरक पडतात याविषयी जवळजवळ काहीच माहिती नाही आणि वांशिक फरक काय असतात यासंबंधी तर काहीच माहिती नाही.

केवळ मेंदूतील पेशींच्या फरकामुळे श्रेष्ठत्व अथवा कनिष्ठत्व ठरत नाही. शरीर-बांध्याच्या दृष्टीने समान असलेला एक वंश दुसऱ्या वंशापासून वेगळा करण्यासाठी लक्षात घ्यावे असे फरक मेंदूच्या रचनेत नसल्यामुळे, अन्य कोणत्याही इंद्रियाच्या अभ्यासाप्रमाणे, मेंदूच्या अभ्यासाच्या बाबतीतही मुख्य समस्या ही मेंदूची रचना आणि त्याचे कार्य यांच्या संबंधाची आहे. अगदी आपल्या वैयक्तिक आयुष्यातसुद्धा आपले एखादे ठराविक इंद्रिय घेतले तरी त्याच्या कार्यपद्धतीत पडत असलेले फरक आपल्याला दिसून येतात. मध्येच एखाद्या रोगाने आक्रमण केले नाही तर यौवनापासून तो वृद्धावस्थेपर्यंत आपले हृदय आणि फुप्फुसे अगदी तीच असतात. परंतु या इंद्रियांच्या कार्यपद्धतीत खूपच फरक पडत असतो. आपण एखादा डोंगर चढत असतो तेव्हा छातीचे ठोके जोरात पडत असतात आणि श्वासोच्छ्वास जलद होत असतो. जेव्हा आपण निद्रेसाठी अडवे होतो तेव्हा हृदयाचे ठोके हळू पडत असतात आणि श्वसन दीर्घ व नियमित होते. समुद्रसपाटीपासून उंचावर असलेल्या ठिकाणी आपण उन्हाळा काढतो अथवा उष्ण कटिबंधातील एखाद्या ठिकाणी हिवाळ्यात वास्तव्य करतो तेव्हा फुप्फुसे व हृदय यांच्या कार्यपद्धतीत तात्पुरते बदल होत असतात. हृदयाची किंवा फुप्फुसाची रचना तीच असते. फक्त त्यात सुरक्षिततेसाठी बराच वाव ठेवलेला असतो. त्यामुळे परिस्थितीला अनुरूप असे बदल घडत राहिले तरी त्यांच्या

अस्तित्वाला धोका येत नाही. आयुष्यात आपण अनुभवाने जी ही घटना शिकतो ती मानवसमूहांची तुलना करतानाही मूलभूत ठरते. त्या ठिकाणीही आपणाला सुरक्षिततेसाठी इकडे तिकडे होण्याला अवकाश असलेला आढळेल. ज्यांचे संचयन (metabolism) मुळात कमी आहे असे मानववंश, ज्यांचे संचयन मुळात जास्त आहे अशा मानववंशांबरोबर नांदताना पुष्कळ प्रदेशात दिसतात. त्यांच्यातील हा शारीरिक फरक त्यांच्या एकमेकांशी जुळवून घेण्याच्या आड आलेला दिसत नाही. वैद्यकीय तपासणी केल्यास निरनिराळ्या मानवगटांची दृष्टी सारखीच ठरेल. परंतु नवे प्रदेश हुडकणाऱ्या गोऱ्या संशोधकांना त्यातील काही आदिवासींची दृष्टी अशी तीक्ष्ण वाटली की जणू ते सूक्ष्मदर्शकातून अथवा दुर्बिणीतून पाहत आहेत. काही विशिष्ट परिस्थितीमुळे सूक्ष्म तपशिलाकडे इतक्या बारकाईने नजर देण्याला ते शिकलेले असतात की, परिणामतः इतरांना ते सर्व अद्‌भुत वाटते. या उलट, आपण एखाद्या छापील पानावरील अक्षरे एकमेकांपासून वेगळी करू शकतो ही गोष्ट रानटी लोकांना मोठी अद्‌भुत वाटते. इथे फरक नेत्रेंद्रियात नाही तर ज्या रीतीने काम करण्याचा त्या इंद्रियाला नेहमी अनुभव आहे त्या रीतीत आहे.

मेंदूची अवस्था तीच आहे. मेंदूची रचना सारख्याच प्रकारची असणारे लोक आपले मेंदू अगदी वेगवेगळ्या प्रकारे वापरतील आणि हे घडेल ते त्यांच्या मनांना नेहमी ज्या वेगवेगळ्या अनुभवांतून जाण्याची सवय असते त्यामुळे. आनुवंशिक रचना आणि अर्जित कार्यपद्धती यांच्यात घोटाळा करणे हा कमालीचा गांवढळपणा आहे. तसे पाहता, कमकुवत हृदय किंवा अनेकाग्र दृष्टी यासारख्या इंद्रियांच्याही काही मर्यादा आहेत, पण ऐंद्रिय दोष असलेला मेंदू असलेल्या व्यक्ती सगळ्याच मानववंशांत जन्माला येतात. मनाचा कमकुवतपणा हा एखाद्या सबंध मानववंशात असणारा दोष असत नाही.

मेंदूच्या आकाराविषयीच्या या सगळ्या चर्चेतून मी पिग्मी व पिग्मीसम मानववंशांना गाळले आहे. आधुनिक संस्कृती या वंशांना पचेल का हा केवळ तात्त्विक चर्चेचा प्रश्न आहे. ती काही जिवंत समस्या नाही. कारण सामाजिक कारणांमुळे त्यांचा नाश नियत आहे. त्यांच्या पिढ्यानुपिढ्यांच्या वसतिस्थानातून त्यांना वाळवंटाकडे अथवा पर्वतांच्या दऱ्याखोऱ्यात हुसकून लावण्यात आले आहे. मोलिवना हॉफमन (Malvina Hoffman) यांच्या छोट्या बुशमन कुटुंबाच्या त्या प्रसिद्ध शिल्पाकृतीकडे पाहिल्यावर कोणालाही असेच वाटेल की, घड्याळाचे काटे मागे फिरवावे आणि त्या बुशमनच्या मेंदूचा आकार कसलाही असला तरी बिचाऱ्यांना आपल्या स्वतःच्या रीतीने शांतपणे आयुष्य जगू द्यावे. त्यांच्या वाळवंटी भूप्रदेशातील अनेक शिलाखंडांवर जनावरांच्या शिकारीची जी चैतन्यमय, रसरशीत चित्रे त्यांनी रेखाटली आहेत ती आजही युरोपियन चित्रकारांच्या कौतुकाचा विषय व्हावी इतके ते लोक निश्चितच प्रतिभावन्त होते. त्यांची जगण्याची जुनी गणपद्धती ही अनाक्रमक व दयाशील होती. परंतु तिकडे प्रथम गेलेले श्वेतवर्णी शेतकरी व गोपालक यांच्या दृष्टीने त्या बुशमन लोकांचा हाच मोठा दोष होता की, त्यांनी युरोपियनां-

पुढे मान तुकविली नाही. शेवटपर्यंत त्यांनी परकीयांच्या अतिक्रमणाचा प्रतिकार केला. म्हणून, एका समकालीनाने म्हटल्याप्रमाणे "आकाशीच्या व पृथ्वीवरील सर्वशक्तिमान शासकाने" त्यांना देखता क्षणी ठार मारले. त्या काळात क्वचित तिकडे जाणाऱ्या बाहेरील गौर व्यक्तींनी लिहिले आहे की, त्या असहाय स्त्री-पुरुषांच्या बेफाम हत्याकांडाने आपल्याला अगदी शिसारी आली आणि एरवी एवढा शहाणासुरता वाटणारा अधिकारी अशी हत्या हे देवाने सोपविलेले काम व रोजच्या कर्तव्यांचाच एक भाग समजतो हे पाहून आपल्याला धक्काच बसला. कधीमधी जाणारा एखादा प्रवासीच लिहितो की, 'आमच्यापुढे चालणाऱ्या व क्वचित धावणाऱ्या बुशमन बाटाड्याची अत्यंत मोकळी व सहज चाल व त्याचे सुरेख, बांधेसूद शरीर पाहून आपल्याला अचंबा वाटला. त्याची प्रमाणबद्ध पण लहानखुरी व नाजूक शरीरयष्टी, त्याची सरळ, अभिमानी व पौरुषयुक्त चालण्याची ढब त्याचे धीटपणे आणि खंबीरपणे पावले टाकणे आणि त्याच्या चेहऱ्यामोहऱ्यातून ओसंडणारी स्वतंत्रपणाची जाणीव हे पाहून आपल्याला अवर्णनीय आनंद झाला.[३] यंत्रसंस्कृतीशी जुळवून घेणे बुशमन लोकांना जमले नसेल, पण त्यांच्या कवटीचा आकार लहान असूनही ते मानव जातीला कलंकभूत नव्हते.

## मनोवैज्ञानिक क्षेत्र :

वांशिक श्रेष्ठता अजमावण्याकरिता मेंदूचा एकूण आकार तपासण्यापेक्षा मनोवैज्ञानिक चाचण्या घेणे जरा कमी गोंधळ व अधिक संबंधित मोजमाप आहे. त्या चाचण्यांतून मेंदूच्या कार्याच्या अंतिम फलनिष्पत्तीचा काही भाग कळतो. आणि मेंदू काय करू शकतो हाच खरा गाभ्याचा प्रश्न आहे. म्हणून गेल्या पंचवीस वर्षांत मनोवैज्ञानिक संशोधनांची एक मोठी मालिकाच तयार झाली. त्यात वेगवेगळ्या वैयक्तिक व सामुदायिक चाचण्यांमधील निरनिराळ्या वांशिक व राष्ट्रिक समूहांची कार्यकुशलता पाहून त्यांचे बुद्ध्यंक ठरविण्यात आले.

बहुतेक सर्व बुद्धिमापन कसोट्या अमेरिकेत घेण्यात आल्या. पहिल्या महायुद्धाच्य काळात अमेरिकन खड्या पलटणीमध्ये अशा चाचण्या घेण्यात आल्या. जनतेच्या सर्व थरांतील खूपच व्यक्ती या फौजांत असल्यामुळे पूर्वीच्या सगळ्या प्रयत्नांपेक्षा या प्रयत्नात चाचण्यांसाठी खूपच आदर्श असा नमुना मिळून गेला. ढोबळ अशा वांशिक व राष्ट्रिक गटात वर्गवारी करून या चाचण्यांच्या गुणांचे कोष्टक केले गेले. निग्रो, ज्यू, ब्रिटिश अथवा इटालियन वंशाचे नागरिक अशा तऱ्हेचे ते गटविभाजन होते. या प्रत्येक गटाचे सरासरी मानसिक वय काढण्यात आले. त्या निरनिराळ्या गटांच्या वयांत खूपच फरक होते सैन्यातील श्वेतवंशीय गटाचे मानसिक वय १३·१ वर्षे होते तर निग्रोचे १०·४ होते आणि गटसंकर (Overlap) फक्त १२ टक्के होता.[४] स्थलांतरितांच्या श्वेतवर्णी राष्ट्रगटात पोलिश लोक यादीच्या तळाशी होते आणि इटालियन त्यांच्या अगदी जवळ पास होते.

सैन्यातील या गुणपटावरून जे निष्कर्ष निघाले त्यांनी बुद्धिमापकांपुढे आजतागायत एक समस्याच उभी करून ठेविली आहे. त्यावर अजून ते संशोधक विचार करीत आहेत. या निष्कर्षावरील पहिली प्रतिक्रिया अशी होती की, बुद्धीचे आनुवंशिक संक्रमण होते काय या प्रश्नाचे उत्तर एकदाचे मिळाले. शिक्षण अथवा अनुभव यांनी संस्कारित नसलेल्या नैसर्गिक बुद्धिमत्तेचे मापन या बिनेट कसोटीद्वारा होते असे एक सुरवातीसुरवातीचा संशोधक टर्मन ( Terman ) याचे मत होते. युरोपच्या वेगवेगळ्या भागांतून स्थलांतर करून आलेल्या सैनिकांच्या कसोटीचे मूल्यमापन करणाऱ्या ब्रिग्हॅम (Brigham) च्या मते उत्तर युरोपातील पूर्वज असलेल्या अमेरिकनांचे गुण हे दक्षिण युरोपीय कुलपरंपरा असलेल्या अमेरिकनांपेक्षा जास्त होते. म्हणजेच, नॉर्डिक लोकांची नैसर्गिक बुद्धिमत्ता अल्पाइन व भूमध्यसामुद्रिक लोकांपेक्षा अधिक होती. निग्रोंना मिळालेले कमी गुण अर्थातच त्यांच्या युरोपियनांहून असलेल्या उपजत कनिष्ठपणाच्या प्रमाणातच होते.

परंतु गेल्या दशकात जे संशोधनाचे काम झाले त्यामुळे या निष्कर्षासंबंधी वंशांचे मानसशास्त्र अभ्यासणारी मंडळी साशंक झाली आहेत. बुद्धिमापनकसोट्या या पुष्कळ प्रकारच्या होत्या. त्यांतील बऱ्याच भाषावलंबी होत्या आणि त्यांतील काहींतून तर व्यक्तीला अवगत असलेल्या शब्दसंभाराचे मापन होत असे. उघडच आहे की, जे घरी इंग्रजी बोलत व वापरत असत त्यांना उत्स्फूर्तपणे इतर भाषा वापरणाऱ्यांपेक्षा अगदी साहजिकपणे जास्त गुण पडले. मापनात वापरलेल्या शब्दावलीतील बरेच शब्द आणि उमेदवारांना ज्या सूचना दिल्या होत्या त्यांतील काही शब्द हे नेहमीच्या बोलीभाषेतील नव्हते आणि पुष्कळ घरांतील मुलांना ते केवळ पुस्तकावरूनच कळू शकले असते. निग्रो, अलीकडेच स्थायिक झालेली मंडळी व अन्य देशांत जन्मलेल्या मातापित्यांची मुले यांच्या बाबतीत ही गोष्ट अडसर ठरली. भाषेची असली अडचण हे जन्मतः प्राप्त होणारे वैगुण्य नव्हे हे उघड आहे. नैसर्गिक क्षमतेचे मापन म्हणून या कसोटीला किती किंमत द्यायची हे ठरविताना हा मुद्दा लक्षात घ्यावलाच हवा होता.

कसोटी घेणाऱ्यांनी केवळ सैनिकांच्या कसोट्यांतच नव्हे तर पुढेही केलेल्या सर्व क्षमतामापनचाचण्यांत जाणवलेल्या आणखी एका अडचणीवर भर दिला. जेव्हा स्पर्धेतील दोन्हीही गट स्पर्धेत शक्य तितके यश मिळवण्याबाबत उत्सुक असतील तेव्हाच त्या दोन्ही गटांच्या अंतिम गुणांची तुलना करण्यात काही अर्थ आहे. या उत्सुकतेतील फरक हा परीक्षकांच्या सहज ध्यानात येणारा आहे आणि या तफावतीमुळे अंतिम निष्कर्षावरही परिणाम होतो. अमेरिकेत चाचणी घेतलेल्या चिनी व जपानी लोकांचा बुद्धिमापनांक खूपच मोठा म्हणजे ९९ आला (युरोपियनांचा १०० आला) इकडे लक्ष वेधवून गार्थ (Garth) तर असेही सुचवितो की, यांच्या तुलनेने मेक्सिकन, रेड इंडियन आणि निग्रो लोकांचा बुद्धिमापनांक इतका कमी पडला याचे कारण असे असू शकेल की, गोऱ्या

माणसाला या चाचण्यांचे वाटणारे महत्त्व त्यांना कधी वाटलेच नाही.[५] त्यांना परंपरेने ज्या गोष्टींचे महत्त्व वाटत आले आहे त्यातील कशाशीच या स्टॅन्फोर्ड-बिनेट चाचणीचे काही साम्य नाही.

चाचणीमध्ये शक्य तितकी उत्तम कुशलता दाखविण्याची संबंधित असे याहूनही ठळक फरक वेगवेगळ्या गटांत आहेत. निरनिराळ्या संस्कृतींत चांगल्या रीतीभाती कशास म्हणावयाचे याविषयी कल्पना भिन्न भिन्न असतात व या कल्पनांचा चाचणीपरीक्षेवर परिणाम होतो. पुष्कळ जमातींमध्ये, विशेषकरून अमेरिकन इंडियन टोळ्यांमध्ये व्यक्तीला अशी शिकवण दिलेली असते की, स्वतःची पक्की खात्री असल्याशिवाय कोणत्याही प्रश्नाचे उत्तर देऊ नये आणि कोणतीही घटना वर्णन करून सांगू नये. एखादा अमेरिकन शालेय विद्यार्थी जी बारीकशी अनिश्चितता मनावर घेणार नाही, ती रेड इंडियन मुलाला अवाक् बनवील. आमच्या मुलांना उत्तर द्यायला वेळ लागला अथवा उत्तर देताना मुलगा मागे पडला तर अपमान वाटेल पण रेड इंडियन मुलाला मात्र तशा वेळी अपमान वाटत नाही, परंतु आपली संपूर्ण खात्री असल्याशिवाय उत्तर द्यायचे धाडस करावे लागले तर मात्र त्याला फार अपमान वाटतो. चाचणीच्या वेळी, प्रत्येक बारीक सारीक तपशील सांगता येत नसेल तर त्याला सांगितलेली छोटी गोष्ट तो पुन्हा सांगणार नाही. ज्या माणसाला एखाद्या प्रश्नाचे उत्तर माहीत नाही, त्या माणसाच्या उपस्थितीत आपण त्या प्रश्नाचे उत्तर देऊ पाहाणे हे डाकोटा इंडियनांच्या सभ्यपणाच्या रीतीत बसत नाही. यामुळे ज्या अडचणी निर्माण होतात त्या क्लाइनबर्गने (Klineberg) नमूद केल्या आहेत.[६] वरीलप्रमाणे सभ्यपणाचे संकेत असलेल्या समाजातील मुलांची चाचणी आणि ज्या समाजात, ज्याला उत्तर माहीत आहे अशा माणसाच्या उपस्थितीत आपण उत्तर सांगण्याचा धीटपणा दाखवणे मना आहे अशा समाजातील मुलांची चाचणी आणि कोणत्याही परिस्थितीत मुले उत्तर देण्याचा प्रयत्न करतील अशा आमच्या संस्कृतीतील मुलांची चाचणी यांची एकमेकांशी तुलना होऊ शकणार नाही. ज्या समाजामध्ये टोळीप्रमुख किंवा वरिष्ठ जाती याविषयी खूपच आदर बाळगला जातो, त्यात सामुदायिक चाचणीला आवश्यक असलेली परिस्थिती अगदीच विध्वस्त होऊन जाते. अशा सगळ्या प्रकरणांमध्ये चालीरीतीच्या नियमांचा चाचणीगुणांवर फार परिणाम होतो.

अशा सगळ्या अडचणींना अंतच नाही. रंगसंगती जुळविण्याच्या चाचणीत बाली मुलांनी आपला सगळा वेळ 'एक सुरेख पट्टा' तयार करण्यात घालविला. रंगांच्या बाबतीत बाली लोक फार नखरेबाज आहेत. रंगांची काही मनोवेधक रचना करण्यात आपली सौंदर्य-दृष्टी दाखविणे शक्य असताना, सारखेच रंग शेजारी शेजारी मांडून दाखविण्यात वेळ वाया घालविणे बाली मुलांना मान्य होईना. इतर समाजात रंगांच्या चाचणीत भासणारी नेहमीची अडचण म्हणजे रंगांच्या वर्गवारीत ठिकठिकाणी फारच फरक असतो. रंगपट म्हणजे मध्यंतरी कुठेच एकदम ठळक फरक नसलेला विविध रंगांचा एक सलग पट्टा असतो.

त्यावर एके ठिकाणी रेष ओढून आपण इंग्लिश भाषेत रेषेच्या एका बाजूला पिवळा तर दुसऱ्या बाजूला हिरवा रंग आहे असे म्हणतो. दुसऱ्या एखाद्या भाषेत ही भेदरेषा दुसऱ्या ठिकाणी दाखविलेली असते. त्यांच्यात ती फिकट हिरवा आणि गडद हिरवा यांमध्ये असेल. त्या भाषेत फिकट हिरवा व पिवळा रंगांच्या काही छटा या दोहोंनाही कोवळ्या पालवीचा रंग समजतात तर गडद हिरवे आणि निळ्या रंगाच्या काही छटा हे दोन्ही रंग ' छायेतील पाण्याचा रंग ' या सदरात येतात. त्यांची रंगांची वर्गवारी रंगांच्या आपल्या वर्गवारीइतकीच समंजस आहे. परंतु चाचणीपरीक्षेतील त्यांच्या व आमच्या उत्तरांची एकाच मापकाने तुलना करता येणार नाही. रंगांच्या भिन्न वर्गवारीमुळे होणारी चूक दुरुस्त करता येण्यासारखी आहे पण आणखी काही सांस्कृतिक वैशिष्ट्ये अशी असतात की, त्यामुळे होऊ शकणारी चूक सहजासहजी दुरुस्त करता येणार नाही. ' विरुद्ध अर्थाचे शब्द हुडका ' अशा तऱ्हेच्या भाषिक चाचणीत सॅनोअन स्पर्धकांना फारच जास्त गुण मिळाले. त्यांच्या संस्कृतीत मागसाला शब्दच्छल, शाब्दिक कोड्या व चुटकेवजा सुभाषिते यांची खूपच सवय असते. परंतु बाकी लोक रंगांच्या जोड्या जनविण्यात जसे कमी पडले तसेच, आमच्या मापाने मोजल्यास हे सॅनोअन लोकही इतर प्रकारांच्या चाचणीमध्ये आमच्या मापाने मोजल्यावर कमीच पडले.

मुळात, चाचण्यांच्या यथार्थ मान्यताविषयी शंका आहेतच. तसेच, चाचण्या घेणाऱ्यांचे मत अधिकाधिक असे होत आहे की, या चाचण्या नैसर्गिक बुद्धिमत्तेपेक्षा शैक्षणिक प्रगतीच्याच निदर्शक आहेत. या दोन्ही गोष्टी विचारात घेऊनही अशा एका संशयाने मूळ धरले की, या चाचण्यांच्या निष्कर्षातून काही वंशगत फरक स्पष्ट होतात की, केवळ हे फरक स्पष्ट व्हावेत अशा रीतीने निष्कर्षांची मांडणी केली जाते? निग्रोंचे काय किंवा श्वेतवर्णीयांचे काय, गुणवत्तापट देशाच्या सगळ्याच भागात काही सारखे नव्हते. हे फरक विभागवार होते की काय हे शोधून काढावयास हवे होते. म्हणून परीक्षकांनी दक्षिणी-संस्थानांतील गौरकाय विरुद्ध उत्तरी संस्थानांतील निग्रो असे सरासरी गुणांचे कोष्टक मांडले. आणि निष्कर्ष अजबच निघाला. गुणांची मध्यमान सरासरी पाहिली असता दक्षिणी गौर कायांचे गुण उत्तरी निग्रोंपेक्षा कमी निघाले.

| | |
|---|---|
| गोरे[७] | |
| मिसिसिपी | ४१·२५ |
| केंचुकी | ४१·५० |
| आर्कान्सास | ४१·५५ |
| निग्रो | |
| न्यू यॉर्क | ४५·०२ |
| इलिनॉय | ४७·३५ |
| ओहिओ | ४९·५० |

निष्कर्षांच्या अशा तऱ्हेने केलेल्या विश्लेषणावरून आधीच्या स्पष्टीकरणातील मूलभूत तर्कदोष दिसून आला. संयुक्त संस्थानांतील निग्रोंची वस्ती दक्षिणेकडे अधिक दाट आहे. त्यांचा बुद्ध्यंक हा ते **निग्रो** म्हणून महत्त्वाचा नव्हता, तर ते **दक्षिणी** या दृष्टीनेच त्याचे महत्त्व होते. काही दक्षिणेकडील संस्थानांत शिक्षणावरचा दरडोई खर्च कमी आहे. प्रत्येक सर्वेक्षणातून व कोणाही सहजगत्या जाणाऱ्या माणसालाही तेथील निकृष्ट राहणीमान स्पष्ट दिसून येते. एरवी श्रेष्ठ म्हणून ठरलेले श्वेतवंशीय जर अशा काही संस्थानांत वाढलेले असतील तर बौद्धिक चाचणीत ते फारसे यशस्वी होणार नाहीत हे उघडच आहे. वंशा-वंशात उपजतच काही फरक असतात अशा तऱ्हेच्या निष्कर्षासंबंधी परीक्षकांनाही रास्तपणे शंका वाटली. म्हणून त्यांनी आणखी चाचण्या घेतल्या. त्यांनी गोऱ्या आणि निग्रो मुलांच्या नॅशव्हिले येथे, मग शिकागोमध्ये आणि नंतर न्यू यॉर्क शहरात चाचण्या घेतल्या. नॅशव्हिले-मध्ये निग्रो मुलांच्या आणि गोऱ्या मुलांच्या गुणांत सगळ्यात जास्त फरक होता. निग्रो अगदी खाली होते. शिकागोमध्येही निग्रोंना गुण कमीच होते. परंतु निग्रो व गोऱ्या मुलांच्या गुणांतील अंतर जरा कमी झाले आणि न्यू यॉर्कमध्ये तर निग्रो मुलांना गोऱ्या मुलांच्या बरोबरीने गुण मिळाले. लॉस एंजेलसमध्ये निग्रो संख्येने कमी आहेत आणि निग्रो व गोरी मुले एकाच वर्गात बसून शिकतात. तेथेही परीक्षकांनी चाचणी घेतली, तेथे निग्रो मुलांचा बुद्ध्यंक १०४·०७ निघाला. (या उलट, दक्षिणेकडील निग्रो मुलांचा बुद्ध्यंक ७५ निघाला होता.) 'हा अंक त्यांच्याशी ज्यांची तुलना केली होती अशा गोऱ्या मुलांच्या बुद्ध्यंकापेक्षा जरासा मोठाच होता.' [८] शिक्षणाच्या संधीप्रमाणे चाचणीच्या निष्कर्षांत फरक पडत गेले.

तरीसुद्धा काही परीक्षकांना वाटत होते की, या निष्कर्षांमुळे आधीच्या स्पष्टीकरणा-बाबत मूलभूत शंका उपस्थित होण्याचे कारण नाही कारण, केवळ अधिक चांगले निग्रोच उत्तरेला किंवा पश्चिमेला गेले होते. या स्पष्टीकरणाला 'निवडक लोकांचे स्थलांतर' असे नाव आहे. या रीतीने सगळ्यात हुशार विद्यार्थी उत्तरेला गेले की काय हे पाहण्याकरिता परीक्षकांनी दक्षिणेकडील शहरांतील शाळांची जुनी नोंदणीपुस्तके तपासली, त्या त्या शहरां-मधील एकूण निग्रो विद्यार्थ्यांची जी सरासरी होती ती व तेथून उत्तरेला गेलेल्या स्थलां-तरितांची सरासरी अगदी सारखीच होती. [९] मग त्यांनी न्यू यॉर्क शहरातील शाळांमधील निग्रो मुलांच्या चाचण्या घेतल्या. हेतू हा होता की, जर दक्षिणेतील केवळ उत्तमोत्तम निग्रो लोक उत्तरेत आले असतील व त्यामुळे त्या मुलांचा सरासरी बुद्ध्यंक वर गेला असेल तर न्यू यॉर्कमधील त्यांच्या वास्तव्याच्या कमी-जास्त मुदतीचा काही परिणाम बुद्ध्यंकावर झालेला आढळणार नाही. परंतु जे अगदी अलीकडे आले होते त्यांना सगळ्यात कमी गुण मिळाले. वास्तव्याच्या कालमर्यादेचा गुणांवर चांगलाच परिणाम होत होता. तरीही अजून एका प्रश्नाचे उत्तर मिळालेले नव्हते. न्यू यॉर्कमध्ये नव्याने आलेले निग्रो हे पहिल्यांदा आलेल्या निग्रोपेक्षा कमी प्रतीचे होते असे असू शकेल काय ? चाचण्या घेतल्यावर निकालात

दिसून आले की, वास्तविक परिस्थिती याच्या उलट होती. नमुने म्हणून घेतलेल्या गटांच्या चाचणीत उशिरा आलेल्यांना जास्त गुण मिळाले होते. तेव्हा एकूण इत्यर्थ एवढाच जमा झाला की, सामाजिक व शैक्षणिक संधी आणि परीक्षांतील गुण यांच्यामध्ये काही सह-बंध (Correlation) आहे. अमेरिकेतील एकाच आर्थिक पातळीवरील गोरे लोक व निग्रो यांमध्ये निग्रोंना परिस्थितीचे फायदे गोऱ्यांच्या बरोबरीने कधीच मिळू शकले नाहीत. पण जेथे जेथे त्यात सारखेपणा आला, तेथे तेथे निग्रोंचा गौण दर्जा कमी होऊ लागला.

यामुळे १९२० ते १९३० च्या दरम्यान बुद्धिमत्तेची चाचणी घेणारे आपल्या संशोधनाचा जो अर्थ लावीत असत त्याहून फारच निराळ्या तऱ्हेने तो आज लावला जात आहे. थॉर्नडिक ( Thorndike ) यांनी तर १९१४ मध्येच म्हणून ठेवले आहे, " भिन्न भिन्न राष्ट्रीय गट आणि वंश यांच्या बुद्ध्यंकाविषयी जी माहिती दिली जात आहे ती निरनिराळ्या गटांतील फरकांचे मापन आहेच. पण या गटांची भिन्नत्व लक्षणे एकमेकांपासून किती वेगळी आहेत हे अज्ञात आहे. आणि संस्कारामुळे त्यांच्यात किती मर्यादेपर्यंत फरक पडू शकतो हेही अज्ञात आहे.[१०] गार्थ या लेखकाने वंशसंबंधी चाचण्या घेण्यात आपले आयुष्य घालविले होते व त्याचा एतद्विषयक ग्रंथ या विषयावर प्रमाणभूत संदर्भग्रंथ मानला जातो. तो म्हणतो की, आपल्या कार्यास सुरवात केली तेव्हा त्याची मनोमन खात्री होती की, भिन्न भिन्न वंशांच्या व्यक्तींमध्ये मनोव्यापारात अगदी स्पष्ट असा फरक दिसून येईल. पण सर्व तऱ्हेच्या मनोवैज्ञानिक चाचण्या विचारात घेतल्यावर तो अशा निष्कर्षाप्रत आला की, तथाकथित कनिष्ठ प्रतीच्या लोकांना कुचकामी म्हणून शिक्का मारता कामा नये. कारण, योग्य प्रकारच्या चाचण्या घेऊन त्यांचे मूल्यमापन झालेलेच नाही.[११] बौद्धिक चाचण्यांसंबंधीचा सुस्पष्ट सारांश क्लाइनबर्गने आपल्या *Racial Differences* या पुस्तकात काढला आहे. त्यात त्याचा निष्कर्ष असा आहे, " म्हणून बुद्धिमापन कसोट्यांचा उपयोग उपजत क्षमतेच्या बाबतीत भिन्न भिन्न गटांत असलेल्या फरकाचे मोजमाप करण्यास होऊ नये. परंतु संपादित गुणांचे मापन या चाचण्यांनी सुयोग्य रीतीने करता येईल. जेव्हा कोणत्याही एकाच वंशात अथवा समूहात व्यक्तींची आपसात तुलना करावयाची असते, तेव्हा व्यक्तींच्या सामाजिक पार्श्वभूमीमध्ये असलेल्या फरकानुसार त्यांच्या गुणांत लक्षणीय फरक असतो असे दाखवून देता येईल. बौद्धिक क्षमतेत वंशभिन्नत्वाप्रमाणे उपजतच फरक असतो असे गृहीत न धरताही या तफावतींचे समाधानकारक स्पष्टीकरण देता येते."[१२] १९२१ मध्ये घेतलेल्या सैनिकांच्या चाचण्यांवरून ब्रिगहॅमने निष्कर्ष काढला होता की, अल्पाइन व भूमध्यसामुद्रिक वंशाच्या लोकांपेक्षा नॉर्डिक वंशाचे लोक श्रेष्ठ असतात. पण मागाहून त्यानेही आपला निष्कर्ष फिरविला. १९३० मध्ये त्याने लिहिले, " सध्या उपलब्ध असणाऱ्या चाचण्यांवरून निरनिराळ्या वंशसमूहांचा अथवा राष्ट्रसमूहांचा तौलनिक अभ्यास करणे उचित नाही.... अशा वंशविषयक तुलनात्मक संशोधनांपैकी प्रस्तुत लेखकाने केलेल्या संशोधनाचा दावा फारच मोठा होता. पण ते संशोधन वास्तवात अगदीच बिनबुडाचे होते.[१३]

म्हणून हल्लीचे बुद्धिमापन परीक्षक मानतात की, त्यांना जो पुरावा उपलब्ध असतो, त्यावरून व्यक्तीची कमाई, विशेषतः शैक्षणिक कमाई निदर्शनास येते. ही कमाई उपजत कल आणि विशेष प्रकारचे शिक्षण या दोहोंवर अवलंबून असते, दुसऱ्या शब्दांत सांगायचे तर आनुवंशिकता आणि परिस्थिती या दोहोंचाही त्यात भाग असतो. प्रश्न एवढाच आहे की, आनुवंशिकता हा वांशिक स्थिरांक आहे की कसे ? आज असे मानले जाते की, वांशिक चाचण्यांचे निष्कर्ष असे दर्शवितात की, नैसर्गिक कल हा वंशावंशात वाटला गेलेला नाही. जेव्हा निरनिराळ्या गटांची परिस्थिती एकाच स्वरूपाची असते तेव्हा त्यांची सरासरी (सांस्कृतिक) कमाईही सारखीच राहते. सर्वच वंशांच्या लोकांत व्यक्तिगत फरक हे सापडतीलच. पण आजपर्यंतच्या फलनिष्पत्तीवरून असे दिसते की, वंश अथवा वर्ण यांकडे लक्ष न देता कोणाही व्यक्तीला सतत व पुरेशी संधी मिळत गेली तरच मानवी कर्तृत्वाची उंची वाढविण्याकरिता ज्या योजना आखल्या जातात त्या यशस्वी होऊ शकतील. जीवशास्त्रज्ञ एच्. जे. मुलर (H. J. Muller) म्हणतो त्याप्रमाणे खरोखर "महत्त्वाच्या वैशिष्ट्यांमध्ये माणसामाणसांमधील नैसर्गिक फरकांच्या मानाने वंशावंशांमधील नैसर्गिक फरक अगदीच क्षुल्लक ठरतात. ते इतके क्षुल्लक आहेत की, सुप्रजननाच्या निष्पक्षपाती विज्ञानास आपल्या कार्यपद्धतीत ही दुसरी (वंशीय) भिन्नता लक्षातच घेता येणार नाही.[१४]

वंशविषयक मानसशास्त्रीय चाचण्या या चाचण्या म्हणून शास्त्रशुद्ध मानल्या तरीही त्यांच्या मूळ उद्देशाशी त्यांची सर्वच कार्यपद्धती न जुळणारी आहे. वंशावंशांची सापेक्ष क्षमता अजमावणे हे त्यांचे मूळचे उद्दिष्ट होते. गुरांची पैदास करणाऱ्यापुढे असाच प्रश्न असतो. ज्यांची वाढ होऊन घारी अशा चांगल्या जाती त्याला हुडकायच्या असतात. ज्या परिस्थितीत ते बैल वाढले, तिच्याकडे दुर्लक्ष करून, केवळ एका जातीच्या सगळ्या बैलांच्या सरासरी गुणवत्तेवरून तो वांशिक गुणवत्ता निश्चित करीत नाही. त्याला ठाऊक असते की, त्यातील सर्वोत्तम नमुना जर त्याने अपरिचित कुरणावर पाठवला आणि तेथे त्याची योग्य निगा राखली गेली नाही तर चिडून गप्प बसण्यापलीकडे तो बैल काहीच करणार नाही. त्यामुळे बैलांच्या त्या जातीच्या गुणवत्तेवरील त्याचा विश्वास काही ढळत नाही. पशुपालनाच्या निकृष्ट व्यवस्थेमुळे आपली जनावरे गुणवत्तेत खाली येतील हे माहीत असले तरी त्या त्या जनावरांची त्याने केलेली भलावण काही अयोग्य ठरत नाही वांशिक गट कोणत्या परिस्थितीत जगले आहेत याची पर्वा न करता, त्या गटांच्या गुणवत्तेच्या सरासरी पाठवणाऱ्या पूर्वीच्या मनोवैज्ञानिक परीक्षकाची पद्धती त्या गुरांची पैदास करणाऱ्याला समजूच शकणार नाही. त्याच्या पैदाशीतील एका जनावराने विशेष गुणवत्ता दाखविली तर ती गोष्ट इतर अनेक जनावरांच्या निकृष्टतेपेक्षा अधिक महत्त्वाची आहे. त्याचा एक पाडा नामांकित ठरला तर त्याची पुनरावृत्ती व्हावी यासाठी तो सावध राहील. काही एका विशिष्ट परिस्थितीत त्या पैदाशीतील जनावरे अमुक एक मर्यादा गाठू शकतात ही गोष्ट त्याला पुरेशी आहे.

गुरांची पैदास करणाऱ्या शेतकऱ्याला जितपत त्यांची काळजी असते, तितपत जरी मानवी कार्यक्षमतेबद्दल आपल्याला असेल, तर मनोवैज्ञानिक चाचण्यांमध्ये सरासरीवर भर देण्याऐवजी आपण वैयक्तिक कर्तृत्वावर भर देऊ. वैयक्तिक उदाहरणे सरासरीपेक्षा केवळ अधिक लक्षवेधी असतात असे नव्हे तर प्रस्तुत बाबतीत ती अधिक संबंधित असतात. पिंटनेरच्या भाषाविरहित चाचणीमध्ये सॅन्रा फे येथील सरकारी इंडियन शाळेतील एका १२ वर्षांच्या संपूर्णतः इंडियन मुलीचा बुद्धिगुणांक १४५ निघाला. श्वेतवर्णीयांच्या सरासरीपेक्षा तो ४५ ने जास्त आहे तर इंडियनांच्या सरासरीहून ७० ने अधिक आहे. राष्ट्रीय बुद्धिमापनकसोटीत सॅन ॲन्टोनियोच्या पब्लिक स्कूलमधील एका मेक्सिकन मुलाचा बुद्धिगुणांक तेवढाच म्हणजे १४५ आला. त्याचाही गुणांक त्या इंडियन मुलीइतकाच श्वेत सरासरीहून जास्त आहे आणि अमेरिकेतील मेक्सिकन लोकांच्या सरासरी बुद्धिगुणांकापेक्षा ६७ ने जास्त आहे.[१५] इंडियन आणि मेक्सिकन लोकांची अमेरिकेत जशी परिस्थिती आहे तशी असूनसुद्धा जर या वंशातील व्यक्ती चाचणीकरिता असलेल्या कसोट्यांमध्ये इतकी गुणवत्ता दाखवू शकतात, तर त्या वंशातच काही दोष आहे असे म्हणता येणार नाही. सगळ्याच वंशगटातून व्यक्तीव्यक्तींच्या कर्तबगारीत फरक असतो आणि श्रेष्ठ कर्तृत्व अंगी असलेल्या व्यक्तींना जर आपण अनुकूल परिस्थिती नाकारली– मग ते कोणत्याही का रक्ताचे असेनात– तर तेवढ्या अंशाने संस्कृती नेहमीच दरिद्री राहणार.

## ऐतिहासिक क्षेत्र

इतिहासाच्या आधारेही वांशिक श्रेष्ठत्वाचे दावे मांडण्यात आले आहेत. असे म्हटले जाते की, संस्कृतीचे उदयास्त हे वांशिक कारणांनी होत असतात आणि संस्कृतीच्या प्रगतीचे किंवा अधःपाताचे कारण शोधताना त्या संस्कृतीचे घटक असलेल्या लोकांच्या वांशिक संमिश्रणाचा शोध घेतला म्हणजे पुरे आहे. इतिहासाच्या अशा विपर्यासाबद्दल मोठमोठ्या इतिहासकारांनी खूपच वेळा विरोध दर्शविला आहे. बाराव्या शतकापासून तेराव्या शतकापर्यंत किंवा अठराव्या शतकापासून एकोणिसाव्या शतकापर्यंत जी स्थित्यंतरे घडून आली त्यांमागे किती घटक कार्यकारी होते हे नुसते ध्यानात आणले तरी पुरे. मात्र त्या काळात कोणत्याही देशातील लोकवस्तीत घडून आलेले वांशिक बदल अगदीच दुर्लक्षणीय होते. तरीही जर्मनीचे आजचे वंशश्रेष्ठतावादी धोरण हे प्रामुख्याने याच असत्य अशा ऐतिहासिक दाव्यावर आधारलेले आहे. जर्मनीत असलेली वांशिक आरोग्याची म्हणजे वंशशुद्धतेची सक्ती आणि आर्य व आर्येतर यांचे रक्तमिश्रण झाल्यास होणारी जबर शिक्षा या गोष्टी इतिहासाने निर्धारित केल्या आहेत असे म्हटले जाते. तिसऱ्या ( हिटलरच्या ) जर्मन प्रजासत्ताक राष्ट्रामधील– थर्ड राइशमधील– शिक्षणतज्ज्ञ व राजकारणी लोक सतत पुनःपुन्हा सांगत असत की वंशशुद्धता हेच महान संस्कृतींचे रहस्य होय. या प्रचाराला उत्तर असे की, कोणत्याही उच्च संस्कृतीचे लोक वंशदृष्ट्या शुद्ध रक्ताचे नव्हते. त्या संस्कृतीचा उदय त्यातील वंशमिश्रणामुळे झाला असे म्हणणेही तितकेच खरे असते. इतिहासकालाच्या

पूर्वीपासूनच वेगवेगळ्या वंशगटांचे संमिश्रण सुरू झाले आहे आणि मानवी संस्कृतीच्या उन्नतीच्या व अवनतीच्या अशा दोन्ही कालखंडांत ही वंशमिश्रणाची प्रक्रिया संस्कृतीची सहचरी आहेच. जो घटक अविचल आहे तो कोणत्याही एका दशेचे कारण धरता येणार नाही.

या इतिहासाधारित वंशवादाचे एक निराळे रूप असे आहे : मानवी संस्कृतीची प्रगती, मग ती भारत, चीन, मेसोपोटेमिया किंवा इजिप्त कुठेही होऊ दे, ही केवळ कॉकेशियन वंशाची देणगी आहे. ही प्रगती, ही ज्ञानाची देवाणघेवाण अथवा सामाजिक संबंधांमुळे होणारे उद्दीपन यामुळे घडून आलेली नाही. तर कॉकेशियन मानववंशाच्या उपजत श्रेष्ठत्वाचा तो परिपाक आहे. हा श्रेष्ठत्वाचा दावा श्वेतवंशाच्या नॉर्डिक उपशाखेच्या बाबतीत अधिकच वारंवार केला जातो. या भूमिकेवरून असे म्हटले जाते की, ग्रीस आणि रोम या दोन्हीही ठिकाणच्या संस्कृती मुख्यतः नॉर्डिकेतर लोकांच्या होत्या. परंतु त्या संस्कृतींच्या मोठेपणाला कारणीभूत असणाऱ्या व्यक्ती मात्र नॉर्डिक होत्या.

या वकिली करामतीचे आपण या आधीच परीक्षण केले आहे. त्यातील युक्तिवाद वास्तविक इतिहास नव्हे आणि इतिहासकारांनी त्याचा वारंवार इन्कार केला आहे. आजची आधुनिक संस्कृती ज्या शोधांच्या पायावर उभी आहे ते शोध लावणारे मानवगट कितीतरी निरनिराळ्या वंशांचे होते. आणि त्यांपैकी कितीतरी महत्त्वपूर्ण शोध लावले गेले तेव्हा युरोपियन लोक मागासलेल्या रानटी अवस्थेत होते, आणि लोकवस्तीच्या महान केंद्रातून नॉर्डिक हे नावही कोणी ऐकले नव्हते. या सर्वच प्रतिपादनात इतिहासातील घडामोडी संपूर्णपणे नजरेआड केलेल्या आहेत व त्याऐवजी निर्लज्ज, अवास्तव असा वांशिक अहंकाराचा मांड मांडलेला आहे.

शिवाय असे की, वरील युक्तिवाद 'वंशशुद्धते'च्या विरोधी आहे. तरीसुद्धा वंश-श्रेष्ठतावादी पुष्कळदा दोन्ही भूमिका एकदमच घेत असतात. थेंबभर ताकाने सबंध भांड्यातील दुधास विरजण लागावे त्याप्रमाणे मूठभर कॉकेशियन अथवा नॉर्डिक लोकांच्या उपस्थितीमुळे एखादी सबंध संस्कृती प्रगत होत असेल तर त्याचा अनिवार्य निष्कर्ष असा की, ही गोष्ट वंशमिश्रणाने सिद्ध होते. म्हणजे या उदाहरणात वंशवादी, वंशमिश्रण हे संस्कृतीच्या ऱ्हासाचे कारण न मानता उत्कर्षाचे कारण मानतात. वास्तवतेचे विरूपीकरण करून या अडचणीचे ते निवारण करतात. ते असे म्हणतात की, अशा विरजणाचा चांगला परिणाम झालेला दिसतो याचे कारण हे आहे की, कोणताही वंश आपल्या सर्वच इतिहासात तीच तीच बौद्धिक व भावनिक उपजत वैशिष्ट्ये प्रकट करीत असतो. उदाहरणार्थ, ट्यूटन लोक ( अथवा, नॉर्डिक ) नेहमीच आपल्या पसंतीच्या नेत्यांशी एकनिष्ठ राहतात, ते नेहमीच साहसी असतात आणि जेतेही असतात. गतेतिहासाचा कोणताही कालखं

घ्या, अथवा भविष्यकाळ कसाही सामोरा येऊ दे, या जातीमध्ये ही वैशिष्ट्ये जन्मजात राहणार आणि इतर कुठल्याच जातीत ती तशी असणार नाहीत.

परंतु खुद्द इतिहासानेच या युक्तिवादाचा चांगलाच परामर्श घेतला आहे. दोन दृष्टिकोणांतून इतिहास या भूमिकेचे खंडन करतो. पहिले म्हणजे, संस्कृतीच्या प्रगतीला कारणीभूत असलेले म्हणून सर्वच गौरवंशीयांच्या जन्मजात सामर्थ्याचा वंशवादी दावा करतो. पण अखिल गौरवंशाची म्हणून कोणती ठळक कर्तबगारी तो सिद्ध करू पाहात नाही. तो नेहमी श्वेतवंशाच्या एका नमुन्याविषयी म्हणजे नॉर्डिक शाखेविषयी बोलत असतो आणि स्वतःला तो नॉर्डिकच म्हणवतो. समाजातील खानदान घराणी अथवा शहरवासी लोक यांच्याप्रमाणेच दक्षिण व मध्य युरोपमधील शेतकरी वर्गही श्वेतवंशाचे घटक आहेत. परंतु त्यांच्या उपजीविकेच्या पद्धती, सामाजिक व बौद्धिक प्रश्नांबाबतची त्यांची आकुंचित मनोवृत्ती ही निष्पक्षपाती अभ्यासकाच्या दृष्टीने कित्येक निग्रो आणि मोंगोलॉइड 'आदिवासीं'पेक्षाही कमी सुसंस्कृत आहेत. शुद्धतम श्वेतवंशाचे जे स्कॉच-इंग्लिश लोक टेनेसी आणि केंचुकीच्या पठारांवर स्थायिक झाले ते त्यांच्या वंशाच्या कारणाने संस्कृतीचे नेते बनले नाहीत. त्यांचे आपसात सतत चालणारे रक्तरंजित कलह, त्यांचा निरक्षरपणा, त्यांनी जपून ठेवलेली जुनी लोकगीते व पोवाडे यांमुळे त्यांचे समाज-जीवन काहींना सुंदर व आकर्षक वाटत असेल. परंतु विशिष्ट वंशात जन्म झाल्यामुळे त्यांच्या संस्कृतीची उन्नती झाली असे नाही.

हा दावा जेव्हा नॉर्डिक उपशाखेकरिता मांडला जातो तेव्हाही तो तितकाच न टिकणारा असतो. जर्मन वंशवादी नॉर्डिक लोकांचे वर्णन करताना स्कँडेनेव्हियातील किंवा इंग्लंड, फ्रान्स, अमेरिकेतील नॉर्डिक लोकांसंबंधी बोलत नाही. तो जर्मन नॉर्डिक लोकांचे वर्णन करतो. फ्रेंच माणूस फ्रेंच नॉर्डिक लोकांसंबंधी बोलतो किंवा नॉर्डिक सर्वश्रेष्ठत्वाचा दावा तो अमान्य करतो व त्याच गोष्टी गॅलो-रोमन ( किंवा केल्ट किंवा अल्पाइन ) लोकांच्या नावाने मांडतो. इतिहासाचा धडा असा आहे की, जेव्हा अनुकूल परिस्थिती असते तेव्हा साहसी व जेते लोक सर्वच वंशांत व उपवंशांत उपजले आहेत. सद्गुणांची कशीही यादी करा, त्या यादीतील सद्गुणांचे दर्शन प्रत्येकच वंशात, काही विशिष्ट सामाजिक परिस्थितीत व इतिहासाच्या कोणत्या तरी कालखंडात झालेले दिसते.

प्रत्येक वंशाचा जणू एक अक्षर आत्मा असतो या मुद्द्याचे खंडन इतिहास आणखी एका रीतीने करतो. युरोपमधील देशांचे वांशिक घटक हळूहळू बदलत आहेत. पण हा बदल इतका हळूहळू होत असतो की, केवळ तेवढ्यावरून, इतिहासात नमूद असलेल्या, सामाजिक वर्तणुकीत घडून आलेल्या शीघ्र फेरफारांचा खुलासा करता येणार नाही. एलिझाबेथ व शेक्सपियर यांचे इंग्लंड एका पिढीत क्रॉमवेलचे इंग्लंड बनले. १६६० साली इंग्लंडमध्ये दुसऱ्या चार्ल्सच्या द्वारा पुनः राजेशाहीला प्रारंभ झाला. या रेस्टोरेशन काळातील इंग्लिश

जीवनाचे सुस्पष्ट चित्रण पेपी ( Pepy ) ने आपल्या 'दैनंदिनी 'मध्ये केले आहे. फक्त एक पिढीच्याच काळात त्याचे अठराव्या शतकातील इंग्लंडमध्ये रूपांतर झाले. या रूपांतराची कारणे आपणांस राजकीय व सामाजिक घटनांत सापडतात. परंतु त्या काळात वांशिक घटकांमध्ये काही बदल झाला असे नाही. तीच कथा स्पेन, फ्रान्स, जर्मनी आणि इटली यांचीही आहे. विशेष कर्तृत्वाची कशीही यादी केली किंवा बौद्धिक व भावनिक वैशिष्ट्यांची एखादी यादी केली, तरी त्यांपैकी कुठलीच गोष्ट लोकांच्या रक्तातून पिढ्यानुपिढ्या उतरून सातत्य टिकवून असते असे नाही. राजकीय व आर्थिक स्थैर्याऐवजी अस्थिरता आली की, जे सामाजिक परिवर्तन घडते, त्याबरोबर हे गुणही बदलतात. गृहीत साध्याचा दोष पत्करून आपण म्हणतो, की, ' ते त्या काळच्या परिस्थितीबरोबर बदलतात. ' परंतु युरोपात जी शीघ्र परिवर्तने घडून आली त्यांचे मूळ वांशिक घटकांच्या बदलात सापडणार नाही.

युरोपेतर जगाबद्दलही हे तितकेच खरे आहे. वंशदृष्ट्या, कित्येक शतकेपर्यंत युरोप-पेक्षा जपान अधिक स्थिर आहे. पौरस्त्य संस्कृती अनेक शतके जोपासल्यानंतर आता गेल्या काही दशकांतच जपानने पाश्चात्त्य संस्कृतीचे मानदंड उत्साहाने आणि यशस्वीरीत्या स्वीकारले आहेत. उलट्या दिशेस तोंड फिरविण्याचा हा प्रकार जपानमध्ये काही वांशिक बदल झाल्यामुळे झाला असे बिलकुल नाही. पण सामाजिक बदल लक्षात घेऊन त्याचे तपशीलवार स्पष्टीकरण देता येते ही गोष्ट सिडने एल् गलिकने (Sydney L. Gulick) १९०३ इतक्या पूर्वीच आपल्या ' Evolution of the Japanese ' या पुस्तकात दाखवून दिली आहे. त्याने म्हटले आहे की, जर वंशवाद्यांना वाटते त्याप्रमाणे जपानमधील या दोन्हीही परस्परभिन्न स्वरूपाच्या कालखंडांचे स्पष्टीकरण जपानी वंशामध्ये अंतर्भूत असलेल्या एखाद्या अचल मानसिक तत्त्वाने करता येत असेल, तर, दोन्ही कालखंडांना व्यापून राहिलेली खास स्थिर वैशिष्ट्ये कोणती हे सांगणे त्या वंशवाद्यांचे कर्तव्य आहे. परंतु त्या श्रेष्ठतावाद्यांनी जरा उतावीळपणाच केला. जपानी लोकांचे शाश्वत जीवशास्त्रीय वैशिष्ट्य सांगताना ल बॉं ( Le Bon ) म्हणाला, " जपानी माणूस हा विश्वविद्यालयाची पदवी, फार सायास न पडता मिळवू शकेल, किंवा तो वकील होऊ शकेल. परंतु, ही सगळी वरवरची सफाई आहे. त्याच्या मानसिक घडणीवर या गोष्टींचा काही परिणाम होत नाही. पाश्चात्त्यांची विचारांची पद्धत, त्यांचे तर्कशास्त्र, सगळ्यात म्हणजे त्यांचा स्वभाव हे काही जपान्यांना कसल्याही शिक्षणातून मिळवता येणार, नाही कारण की, या गोष्टी केवळ आनुवंशिकतेने येत असतात."[६] आज जपानविरुद्धची नेहमीची तक्रार ही आहे की, जपानने पाश्चात्त्य सत्ताधीशांचा स्वभाव जसाच्या तसा यशस्वी-रीत्या उचलला आहे. ल बॉं म्हणाला तशी काही ' जपानची मानसिक घडण जपानच्या शारीरिक वैशिष्ट्यांइतकीच अपरिवर्तनशील ' निघाली नाही. या अडचणीचे निवारण करण्यासाठी, दहा-वीस वर्षांमागे, जपानच्या मानसिक प्रकृतीचे वर्णनच पुष्कळदा चंचल व नादिष्ट असे केले जाई. जपानने आधुनिक जीवनपद्धती जोमाने उचलल्यामुळे आता असे

वर्णन फारसे केले जात नाही. जपानमध्ये पंधराशे वर्षे अस्तित्वात असलेली लष्करी स्वरूपाची समाजपद्धती गेल्या शतकाच्या मध्यास नामशेष झाली. तिला तर हे वर्णन बिलकुलच लागू पडत नाही. त्या शेकडो वर्षांत जपानी जीवनपद्धतीची स्थिरता व सातत्य असे होते की, युरोपियन इतिहासात त्याच्या जवळपास येणारेही काही सापडत नाही. या शतकाच्या सुरुवातीस ज्याला अंगभूत चंचलता असे नाव देण्यात आले तो स्वभावाचा पैलू म्हणजे शीघ्र अशा समाजपरिवर्तनाशी मिळते घेण्याच्या तात्कालिक प्रयत्नाचे प्रकटीकरण होते. जपान्यांच्या स्वाभाविक वागणुकीसंबंधी खास करून असेही म्हटले जाते की, ते लोक स्वभावतः व समारंभांचे आणि उपचारांचे अवडंबर माजविणारे आहेत. म्हणजेच पाश्चात्यांच्या आदर्श समोर ठेवून आखलेल्या सुव्यवस्थित वर्तणुकीचे दुसरे टोकच त्यांनी गाठले आहे. सर एड्विन आर्नोल्ड ( Sir Edwin Arnold ) यांनी त्यांच्या काळातील जपान्यांच्या संबंधी म्हणून ठेविले आहे की, त्यांचा स्वभाव हा सर्वसामान्य माणसांसारखा– म्हणजे अर्थात, आर्नोल्ड यांच्या मते युरोपियनांसारखा–असण्याऐवजी पक्षी आणि फुलपाखरे यांच्यासारखाच आहे. आताशी आपण म्हणतो की, श्रेष्ठ अशा युरोपियनांपेक्षाही अधिक निकराने जपानी लोक आपल्या उद्दिष्टासाठी झगडत असतात. निदान असे म्हणता येईल की जी तंत्रे पाश्चात्यांनी स्वीकारली आहेत, तीच आजच्या जपाननेही अंगीकारली आहेत आणि त्यामुळे आपण ती ओळखू शकतो.

ऐतिहासिक दृष्टीने पाहता जपानी लोकांचा सांस्कृतिक पवित्रा जो एकदम बदललेला आहे, त्याची सर्व प्रक्रिया नाट्यमय रीतीने पारदर्शक आहे. त्यामागील मनुष्याने केलेले प्रयत्न स्पष्ट आहेत. पूर्वी जपान्यांचे जीवन उपचारांच्या अवडंबरात संथपणे चाललेले होते, त्या जीवनात उच्च सौंदर्याभिरुची होती, सरंजामदारी पद्धतीची सामाजिक संघटना असून वंशिकी पेशावर आधारलेली जातिव्यवस्था होती. आता मात्र तेथे आधुनिक जीवनातील धावपळ, व्यापारउदीमांचे प्राधान्य आणि साम्राज्यशाही युद्धांविषयी प्रेम दिसून येते. अलिप्तपणाच्या धोरणाने पाश्चात्य परकीयांना एक हात दूर राखणे नेहमी जमण्यासारखे नाही हे जपानने ओळखले व आपला मार्ग बदलला. परकीयांपासून जेवढे शिकण्यासारखे असेल तेवढे शिकून घ्यावे व त्यांचेशी तुल्यबळ व्हावे असा जपान्यांनी निश्चय केला. म्हणून जपानी सम्राटाने १८६८ साली एक जाहीरनामा काढला. जपानच्या नव्या उद्-बोधनाच्या धोरणाचे ते पहिले वर्ष मानतात. जाहीरनाम्यात म्हटले होते : ‘जुनी असंस्कृत जीवनपद्धती बदला. सर्व जगातून अत्युत्तम ज्ञान प्राप्त करा. त्या योगे आपल्या साम्राज्याचे कल्याण होईल.’ हा सामाजिक बदल लोकांनी मोठ्या उत्साहाने स्वीकारला. आज घटके-दर्शन जपानमध्ये झालेल्या अनेकविध घडामोडींत तो प्रतिबिंबित झालेला दिसेल. ‘पौरस्त्य मनोवृत्ती’ हे जपानचे खास वैशिष्ट्य समजले जात असे. तरीही ह्या घडामोडी अत्यंत द्रुत गतीने घडून आल्या. तरीपण पूर्वीपासून होता त्याप्रमाणे आजही जपान्यांचा वंश मोंगोलॉइड हाच आहे. “एखाद्या लोकांचे स्वभाववैशिष्ट्य मूलतः बदलावयाचे असेल तर

वंशसंकर एवढाच खात्रीलायक उपाय आपल्यापाशी आहे, कारण, आनुवंशिकतेशी सामना आनुवंशिकताच फक्त करू शकते " हे ल बॉं चे म्हणणे[७] जपान्यांनी खोटे पाडले आहे.

गोऱ्या लोकांच्या संस्कृतीशी जेव्हा जेव्हा संघर्ष घडतो तेव्हा तेव्हा तद्देशीय संस्कृतीच्या लोकांमध्ये वांशिक बदल न घडताही नेहमीच त्यांच्या मानसिक व भावनिक वर्तनात अत्यंत शीघ्र गतीने व मूलभूत असे बदल घडून येतात. विस्तृत, सपाट प्रदेशामधील अमेरिकन इंडियन हा अभिमानी व निधड्या छातीचा लढवय्या होता. त्याचा हिकमतीपणा, त्याचे धैर्य, त्याचे वक्तृत्व, त्याचे दातृत्व हा प्रथम प्रथमच्या संशोधकांच्या व व्यापाऱ्यांच्या कौतुकाचा विषय होता. गोऱ्या लोकांच्या वसाहती जशा विस्तारू लागल्या तसतशा, इंडियनांच्या जीवनाचा आधार असलेल्या म्हशी व रेडे यांची कत्तल होऊ लागली आणि त्यांना अन्न मिळवणे कठीण झाले. त्यांची जमीन त्यांच्याकडून हिसकावून घेण्यात आली. जेव्हा युद्धात मदतनीस म्हणून त्यांचा उपयोग नसेल तेव्हा त्यांची शौर्यपूर्ण कृत्ये ही रक्तपाताने बदला घ्यावा अशा तऱ्हेचे गुन्हे ठरविणे गोऱ्यांच्या सोयीचे होते. पत्त्यांच्या बंगल्यासारखी, इंडियनांची संस्कृती त्याच्यासभोवार कोलमडून पडली. एका पिढीतच त्याचे स्वातंत्र्य आणि स्वतःच्या हक्काविषयी आग्रह नाहीसा होऊन गेला. त्याच्या ' वांशिक स्वत्वा 'चा त्याला काही उपयोग झाला नाही. त्या बदललेल्या परिस्थितीत तो कळाहीन दारुड्या आणि भणंग भिकारी होऊन राहिला. आजही त्याच्याकरिता ठेविलेल्या राखीव प्रदेशात हे शुद्ध रक्ताचे खरेखुरे इंडियन पुष्कळदा असे दिसतात. अर्थात यालाही काही सन्माननीय अपवाद होतेच. परंतु हे अपवाद म्हणजेसुद्धा मानसिक घडणीत झालेल्या तितक्याच मूलभूत बदलांची उदाहरणे होत. वागणुकीची ती पूर्वापार रीत या नैतिक आणि मानसिक दृष्ट्या खच्ची झालेल्या इंडियनांमध्ये राहिली नाही किंवा नवीन परिस्थितीशी अत्यंत कठीण अवस्थेतही जे जुळते घेऊ शकले, त्यांच्यातही ती राहिली नाही.

परंतु अशा तऱ्हेचे आत्यंतिक परिवर्तन अमेरिकेत गुलाम म्हणून आणलेल्या निग्रोंमध्ये घडून आले. त्यांच्यापैकी बहुतेकजण नायजेरियाच्या राज्यातून इकडे आणले होते. नायजेरियनांची कितीतरी उत्तमोत्तम सांस्कृतिक वैशिष्ट्ये होती. त्यांची उपचारप्रधान व गुंतागुंतीची राज्यव्यवस्था, त्यांचे वैभवशाली दरबार, सुदूर पसरलेल्या त्यांच्या आर्थिक जीवनातील कर्तृत्व, त्यांची मोठमोठी बाजाराची केंद्रे, विस्तीर्ण प्रदेशातून गोळा होत असलेल्या खंडण्या, वकील, साक्षीदार, आरोपीची रीतसर न्यायालयीन चौकशी वगैरे गोष्टींचा समावेश असलेली त्यांची विधिव्यवस्था या सगळ्या बाबी कोणाही अभ्यासकाला कौतुक वाटावे अशा आहेत. इतक्या उशिरा, आज, आपण नायजेरियातील मर्मभेदक लोककथांचे, आधुनिक युरोपीय कलाकारांच्या आदराला पात्र ठरलेल्या लाकडावरील कोरीव कामाचे, तालबद्ध नृत्यांचे कौतुक करतो. पण ह्या सगळ्या गोष्टी आज आपल्याला आफ्रिकेत शोधाव्या लागतात. अमेरिकेमध्ये ही सगळी गुणवैशिष्ट्ये आयात केलेल्या गुलामांपासून हिरावून घेण्यात आली– जणू काही ते त्यांत कधी सहभागी नव्हतेच. त्यांच्या राजकीय,

आर्थिक, कलाविषयक रीतीभाती विसरल्या गेल्या– ते आफ्रिकेत बोलत असलेल्या भाषासुद्धा ते विसरून गेले. त्याऐवजी दक्षिणेतील गरीब गोऱ्या लोकांसारखे ते उत्साहाने पुनरुज्जीवनवादी ख्रिश्चन मेळाव्यांना जमू लागले, गरीब गोरे म्हणत तीच स्तोत्रे ते गाऊ लागले. ती स्तोत्रे निग्रो लोक अधिक चांगली म्हणत असले, हृदयाला भिडणाऱ्या अनेक नव्या चाली त्यांनी रचल्या असल्या तरी आफ्रिकेतील त्यांची जुनी गानपद्धती ते विसरलेच. अमेरिकेतील गुलामांची स्थिती इतकी भयंकर होती की, या गोष्टी नाहीशा झाल्या तर काहीच आश्चर्य नाही. कोणत्याही एका मळ्यावरचे गुलाम एकमेकांना न समजणाऱ्या भाषा बोलणाऱ्या अनेक टोळ्यांमधून आलेले असत. त्यांच्या जीवनपद्धतीही परस्परांना अपरिचित असत. गुराढोरांसारखे एकत्र गोळा करून गुलामांच्या जहाजातून त्यांना आणले जात असे आणि एका नवख्या व भयानक जगात त्यांना बाजारात विकले जाई. मळ्यांवर त्यांना अतोनात काम पडे. निग्रोंना काही संस्कृतीच नाही असे शेरे त्यांच्या मालकांनी दिले तर त्यात नवल काय ? मालकांची चूक हीच की, गुलामांच्या व्यापारामुळे झालेली निग्रोंची अवनती हा आफ्रिकन निग्रो लोकांचा शाश्वत व जन्मजात विशेष आहे असे ते समजले. निग्रो लोकांची सांस्कृतिक कर्तबगारी अभिमान बाळगावा अशी आहे. पण कारणपरंपराच अशी घडली की, अमेरिकेत आपल्या नजरेपुढे ती कर्तबगारी येऊ शकली नाही.

बौद्धिक व भावनिक वर्तनात होणारे शीघ्र व मौलिक परिवर्तन– मग त्याची दिशा आपण प्रगतीची मानलेली असो किंवा परागतीची मानलेली असो– हेच दाखवून देते की, वर्तनाचे हे नमुने शाश्वत स्वरूपाचे असून वांशिक कारणांनी त्यांचे संक्रमण होते हे वंशवाद्यांचे म्हणणे साफ खोटे आहे. सामाजिक परिस्थिती व समाजाची मागणी यांच्यातील उलटापालटींप्रमाणे त्या वर्तनातही उलटापालट होत असते.

उपजत श्रेष्ठत्वासंबंधी आणखी एक युक्तिवाद वंशवाद्यांकडून पुढे केला जातो. त्याचा साधेपणा पराकाष्ठेचा आहे. युक्तिवाद असा : "आज गोरे लोक जगात सगळ्यात जास्त 'सुसंस्कृत' आहेत, म्हणून त्यांचे 'रक्त' सर्वश्रेष्ठ आहे." नुकत्याच आपण तपासलेल्या युक्तिवादाप्रमाणे हा युक्तिवादही 'असंबद्ध बडबड' या स्वरूपाचा आहे. कारण, उच्चतर संस्कृती हे सर्वच गोऱ्या लोकांचे लक्षण नाही, तर गौर वंशाच्या काही भागापुरतेच ते खरे आहे. संस्कृतीचा सांगोपांग विकास समजावून घेण्यासाठी आपणांस जीवशास्त्रीय घटनांऐवजी ऐतिहासिक घटनांकडे वळले पाहिजे. इतिहासाचे स्पष्टीकरण इतके सरळ, सोपे नसते. सांस्कृतिक प्रगतीच्या वेगाचा असा काही नियम सांगता येत नाही. मग तो नियम जीवशास्त्रीय असणे तर दूरच राहिले. सर्वच संस्कृतींच्या इतिहासात– मग त्या कॉकेशियन असोत, मलायी असोत वा मोंगोल असोत– आवल्याला खूप जोश असलेले कालखंड दिसतात, तसेच स्थिरतेचेही दिसतात किंवा तीच स्थिरता शिलास्थींच्या अवस्थेस पोहोचल्याचेही दिसते. ही घटना सर्वत्र दिसून येणारी असल्यामुळे कॉकेशियनांच्या आजच्या ऊर्जस्वल युगाचे स्पष्टीकरण देण्यासाठी गौरवंशाच्या जन्मजात श्रेष्ठत्वाला आवाहन करण्याचे

कारण नाही. गेल्या काही शतकांत गौरवंशाच्या संस्कृतीने भौतिक जगावर यशस्वीरीत्या ताबा मिळवण्याची दिशा पत्करली. त्यामुळे आपल्या काळात तिला वर्चस्व प्राप्त झाले. पण भविष्यात काय होईल हे आपणांस सांगता येणार नाही. आपल्या ( गौर ) संस्कृतीने अशा अनेक गोष्टींचा शोध लावलेला आहे की, आपल्या उघड उघड हिताच्या दृष्टीने ज्यांचा वापर करण्याचे गौरवंशीयांच्या बुद्धिमत्तेला जमलेले नाही. खरोखरी, हीसुद्धा एक बौद्धिक चाचणीच आहे आणि पाश्चात्त्य संस्कृतीला त्यात विशेष यश मिळाले नाही. इतिहासात कदाचित आपल्या संस्कृतीची अशीही नोंद होईल की, बुद्धिमत्ता थोडी कमी पडल्यामुळे फार मोठी सामाजिक किंमत देऊन या थोर संस्कृतीने आत्मनाश ओढवून घेतला. अशा तऱ्हेचे इतिहासातील कदाचित हे सर्वप्रथम उदाहरण होईल. स्तुतीने हुरळून जाणे धोक्याचे आहे अशी ही इतिहासातील वेळ आहे. याच क्षणी, कॉकेशियन लोकांची बुद्धी त्यांच्या वंशामुळेच श्रेष्ठ प्रतीची आहे असे म्हणून आपण आत्मस्तुतीत मग्न होतो आहोत. जीवशास्त्रदृष्ट्या कोणत्याही मानवसमूहाला अशी काही देणगी लाभलेली नसते की ज्यायोगे त्याचे विजयप्रस्थान स्वयंगतीने चालू राहील.

आपण आतापर्यंत ज्यांचे परीक्षण केले ते सर्व युक्तिवाद टाकाऊ ठरले म्हणजे वंशश्रेष्ठत्वाच्या बाजूने आणखी एक मुद्दा पुढे करण्यात येतो. तो असा : सर्वोत्तम कॉकेशियन लोक संख्येने कितीही कमी असले तरी इतर कोणत्याही माणसांपेक्षा श्रेष्ठ असतात आणि ज्या अर्थी ते नेते आणि संशोधक आहेत त्या अर्थी कॉकेशियन वंशाला अधिक उज्ज्वल भवितव्य आहे हे निश्चित. या मुद्द्याचा पाठपुरावा करण्यासाठी प्रा. हॅन्किन्स ( Prof. Hankins ) फक्त दोन आधार देतात. एक म्हणजे मेंदूचा आकार आणि वजन व दुसरा म्हणजे प्रथम प्रथम केली गेलेली बौद्धिक कसोट्यांची वंशदृष्टीने केलेली अर्थविवरणे.[१८] या दोन्ही आधारांची, आजच्या शास्त्रज्ञांचा मागोवा घेत आपण छाननी केलीच आहे. तरीही हा ' युगपुरुषा 'चा सिद्धान्त वंशविषयक चर्चेतून डोकावतोच. प्रा. हॅन्किन्सनी म्हटले आहे की, कोणत्याही गटामध्ये श्रेष्ठ व्यक्ती किती वारंवार जन्मास आल्या हेच त्या गटाचे सांस्कृतिक उत्क्रान्तीमधील कार्य ठरविताना सगळ्यांत महत्त्वाचे असते.[१९]

इतिहासविषयक या ' युगपुरुष ' सिद्धान्ताचा नेत्रदीपक विकास कार्लाइलने केला. आज साधारणतः हा सिद्धान्त भाबडेपणाचा तरी किंवा अपुरा तरी मानला जातो. १९२१ मध्ये एका समाजशास्त्रज्ञाने म्हटले की, " कालान्तराने प्रत्येक समाजात, वंशात वा राष्ट्रात श्रेष्ठत्व हे अधिक बुद्धिवान, अधिक कार्यक्षम, अधिक नीतिमान अशा व्यक्तीं-कडेच जाणार, " आजचे समाजशास्त्रज्ञ तसे म्हणत नाहीत. ती आपली एक सत्प्र-वृत्तीतून निर्माण झालेली आशा आहे आणि काही समाजांच्या बाबतीत ती खरीही ठरली आहे. पण ते खरे ठरणे हे त्या विशिष्ट समाजात व्यक्तीला मानमान्यता कशामुळे मिळते यावर अवलंबून आहे. वीस वर्षांपूर्वीच्या आशावादी समाजशास्त्रज्ञाने श्रेष्ठत्वाची जी गमके सांगितली, त्यांपैकी एकही ज्यांच्याजवळ नाही अशा व्यक्ती आज मोठ्या राष्ट्रांच्या कर्णधार

आहेत. एका अर्थी या व्यक्ती श्रेष्ठ व्यक्ती आहेत असे मान्य केले– निदान स्वतःला त्या सत्तास्थानी राखू शकतात म्हणून- तरी आपण असे म्हणू शकणार नाही की, संस्कृतीला त्यांच्या ' सेवे 'मुळे काही लाभ झाला आहे. चार पिढीत, राष्ट्रे आणि समाज हे श्रेष्ठतर शस्त्रशक्तीच्या जोरावर उद्ध्वस्त करण्यात आले आणि याच त्या ' श्रेष्ठ व्यक्तीं 'नी सांस्कृतिक प्रगतीला अडसर घातला आहे. जो सुकाणू आपल्या हाती घेईल व संस्कृतीचा सर्वनाश थांबवील असा एखादा नेता उदयास येईल किंवा नाही हे आपण वंशाच्या आधारावरून सांगू शकत नाही. कोणत्याही वंशविषयक मोजमापांच्या आधारे अशी खात्री देता येणार नाही की, जर्मनीला एखादा बुद्धिमान नेता मिळेल आणि चीनला मात्र मठ्ठ पुढारीच मिळेल. इतिहासाचा ओघ हा फार गुंतागुंतीचा असतो. वंशविषयक जीवशास्त्रातील ' युग-पुरुष ' सिद्धान्तावर आपण आपल्या संस्कृतिविषयक आशा लटकावून ठेवू शकत नाही.

## संस्कृति-संस्कृतींमध्ये भिन्नता का असते ?

माणसामाणसांत जे फरक आहेत त्यांचा खुलासा, वर दिलेल्या कारणांमुळे, वंश-संकल्पनेद्वारा होऊ शकत नाही. तरीसुद्धा फ्रेंच आणि जर्मन माणूस, चिनी आणि युरोपियन माणूस यांच्यात फरक आहेतच, आणि ते प्रत्येकाला उघडच दिसतात. जर या वेगळेपणाचा खुलासा वंशसंकल्पनेने करता येत नसेल तर मग कशाने करता येईल ? ज्या प्रक्रियांच्या द्वारा लोकांतील ही भिन्नता उत्पन्न होते, त्यांची आपणांस चांगली स्पष्ट समज नसेल तर नाइलाजाने का असेना पण, आपण वांशिक उपपत्तीवर येऊन ठेपू.

इतर सर्व प्राण्यांच्या तुलनेने मानवप्राण्यात सुप्त क्षमतांची कक्षा फार मोठी आहे. त्याच्या परिस्थितीच्या अनुरोधाने ज्या क्षमता प्रकट होतात त्याप्रमाणे तो तो माणूस घडत जातो. पक्षी चिखलाचे घरटे बनवील की काटक्यांचे बनवील हे त्याच्या आनुवंशिक प्रवृत्तीने ठरलेले असते. माणसाची आनुवंशिक गुणवैशिष्ट्ये इतकी तपशीलवार ठरलेली असत नाहीत. ती अत्यंत लवचिक असतात. कोणाही व्यक्तीची बालपणात जशी जोपासना झाली असेल त्यावरून व प्रौढपणी ज्या कोणत्या रीतीने वागण्याची त्याला संधी मिळाली असेल त्यामुळे त्याच्या सहजप्रेरणेची विविध रूपे प्रकट होतात. सहजप्रेरणेच्या या रूपांचाच केवळ, आपण अभ्यास करू शकतो. त्या सर्वांतून त्याच्या आनुवंशिक प्रवृत्ती उपस्थित असतातच. पण मुंग्या अथवा पक्षी यांच्याप्रमाणे त्याची संबंध जीवनपद्धती केवळ प्रवृत्तिद्वारा नियत होत नाही. याच मूलभूत वस्तुस्थितीवर सर्व मानवी पुरुषार्थ आधारित आहे. माणसाच्या प्रवृत्तींचा लवचिकपणा हा स्वसंरक्षणाच्या बाबतीतसुद्धा सिंहाची ताकद अथवा हत्तीचा आकार यापेक्षा अधिक महत्त्वाचा ठरला आहे. त्यामुळेच बुद्धीच्या विकासाला अनुकूल परिस्थिती उत्पन्न झाली.

म्हणून हा लवचिकपणा माणसाने आपला सर्वांत अभिमानास्पद गुण मानला पाहिजे. भोवतालच्या परिसरावर होणारी माणसाची प्रतिक्रिया ही इतर कोणत्याही प्राण्याच्या प्रतिक्रिये-पेक्षा शीघ्रतर आणि अधिक परिपूर्ण असते असे ओघानेच येते. एखाद्या अविकसित देशात,

जेथे त्याला परिस्थितीशी एकाकीपणे सामना द्यावा लागतो तेथे तो अग्रगी, आत्मनिर्भर व धैर्यवान बनतो. एखाद्या औद्योगिक शहरात दिवसाकाठी आठ तास तो यंत्रवत एकाच तऱ्हेचे काम करू शकतो (अर्थात–त्याला कामधंदा मिळाला तर). अमेरिकेत असे घडू शकेल की, एखाद्या व्यक्तीचे वडील आग्र वसाहत निर्माण करणारे असतील आणि त्यांच्या रक्ताचा वारसा असूनही ती व्यक्ती व तिचे भाऊ यंत्र चालविणारे कामगार असतील. त्या यंत्र चालविणाऱ्या मुलाला कदाचित योग्य शिक्षणाची संधी मिळेल आणि तो एखादा प्रसिद्ध विद्वान बनून आपले आयुष्य ग्रंथालयात आणि अध्यापनात घालवेल व तत्त्वज्ञान अथवा समाजशास्त्र यावरील पुस्तकेही लिहील. आनुवंशिक गुण हे पिढ्यानुपिढ्या बापाकडून मुलाकडे सरळ येत असतात पण कुटुंबातील प्रत्येक व्यक्तीमध्ये विकसित झालेली वेगवेगळी वैशिष्ट्ये ही, ज्या परिस्थितीत ती व्यक्ती वाढली, तीवरून ठरत आलेली असतात.

परंतु परिस्थितीचा कोणत्याही एका माणसावर घडणारा परिणाम हा त्याच्या जीविताबधीपुरताच मर्यादित असतो. या दृष्टीने सुमारे सत्तर वर्षांचा काळ हा फारच लहान आहे. संस्कृती शेकडो वर्षे टिकल्या आणि या अवधीत पिढ्यांमागून पिढ्यांवर विशिष्ट तऱ्हेचे संस्कार एकसारखे करण्यात आले. विशिष्ट जीवनपद्धतीचा विकास करण्याला शतकांचा अवधी मिळाला काय किंवा केवळ दोन पिढ्यांची कालमर्यादा सापडली काय, उपलब्ध मानवी कच्च्या मालाला वेगवेगळी रूपे देण्याच्या कामात समाजव्यवस्था अतिशय प्रभावशाली असतात. माणूस हा कळप करून राहणारा प्राणी आहे आणि आपल्या सहकाऱ्यांकडून त्याला नेहमीच वाहवा पाहिजे असते. अर्थात जीवनावश्यक गोष्टी तो प्रथम मिळवितो. पण त्यानंतर त्याच्या समाजात मान्यता असलेल्या रीतींनी तो इतरांकडून अहोमान्यता मिळविण्याच्या यत्नात राहतो. त्याच्या समाजात रणक्षेत्रावरील विजयास विशेष महत्त्व असेल तर तो लढाईतील जयाच्या मागे लागेल. समाजात संपत्तीला मान्यता असेल तर तो आपले यश डॉलर अथवा रुपये यात मोजेल. जातिव्यवस्था मान्यता पावली असेल तर आपल्या जातीचे आचारविचार तो कटाक्षाने पाळेल. अर्थात, समाजात नेहमीच काही व्यक्ती हट्टी असतातच. समाज जर कलावंतांना दुर्बलमनस्क समजत असेल तर अशा व्यक्ती कलावंत होऊ पाहतील, किंवा समाजाला जुलमी शासकांची घृणा असेल तर ही व्यक्ती हुकूमशहा बनू पाहील. मोठमोठ्या उलथापालथी होतात अशा काळात नेहमीच अशा हट्टी लोकांची संख्या सगळ्यांत जास्त असते. पण अंतिमतः कोणत्याही सातत्यशील संस्कृतीत बहुसंख्य लोक सांस्कृतिक संस्थांनी घालून दिलेल्या साच्यात सहजगत्या वसतात.

अशा सांस्कृतिक संस्थांचा अभ्यास म्हणजे सामाजिक मानववंशशास्त्र होय. प्रत्येक छोटी जमात कोणत्या ना कोणत्या पुरुषार्थाला विशेष मान्यता देत असते आणि समाजाभिमत ईप्सित साध्य करणे त्या जमातीतील सांस्कृतिक संस्थांमुळे शक्य होते. शौर्याची कृत्ये असे जर ते ईप्सित असेल तर त्या जमातीतील व्यक्तीचा स्वभाव काटक व सोशिक बनतो. हे ईप्सित जर आपल्या मळ्यात उत्तम पीक काढणे असेल तर माणूस उद्योगी आणि

रोजची कामे चिकाटीने करणारा असा बनतो. या प्राप्तव्यांमध्ये खूप विविधता असते. बहुतेक सर्व समाज किती तरी वेगवेगळ्या प्राप्तव्यांचा पुरस्कार करीत असतात. सहसा ही प्राप्तव्ये एकमेकांशी सुसंगत असतात. ही प्राप्तव्ये कोणतीही असली आणि ती साध्य करण्यास अवसर देणाऱ्या सामाजिक संस्था कशाही प्रकारच्या असल्या तरी एक गोष्ट निश्चित की मानवी वर्तन हे त्या संस्थांना अनुरूप असे घडत जाते.

कोणत्याही एका जमातीच्या सामाजिक संस्था त्या जमातीच्या वांशिक प्रतिभेचे अनिवार्य आविष्कार असतात असे म्हणता येत नाही. कारण त्याच वंशातील अन्य जमातींच्या सामाजिक संस्था पुष्कळदा सर्वस्वी भिन्न असतात. पश्चिमेकडील मैदानातील अमेरिकन इंडियनांचा कणखर व्यक्तिवाद आणि याच्या अगदी उलट असलेला प्युराब्लो इंडियन लोकांचा सौम्यपणा आणि नेमस्तपणा या दोन्हीही गोष्टी विभिन्न समाजजीवन पद्धती आणि दोन्ही संस्कृतींत व्यक्तींना मिळणाऱ्या विभिन्न अनुकूल परिस्थिती यांना दिलेले प्रतिसाद आहेत. वंशदृष्ट्या दोन्हीही गट एकच म्हणजे अमेरिकन इंडियन आहेत. शिवाय असे की, कोर्टेझला मेक्सिकोत दिसलेली उच्च संस्कृती आणि कॅलिफोर्नियाच्या पर्वतराजी-पासून कोलोरॅडो नदीपर्यंत पसरलेल्या विस्तृत खोऱ्यातील कंदमुळे आणि तृणधान्ये हुडकत फिरणाऱ्या छोट्या छोट्या भटक्या टोळ्यांची संस्कृती यांत असलेली तफावत ही काही वंशाधारित नव्हती. दोन्ही प्रकारच्या जीवनपद्धती अमेरिकन इंडियन लोकांच्याच होत. इतिहासाच्या ओघात जी अधिक गुंतागुंतीची परिस्थिती मेक्सिकोत उत्पन्न झाली तिला मिळालेला प्रतिसाद म्हणजे मेक्सिकोतील सामाजिक जीवनपद्धती होय.

आपणा पाश्चात्यांच्या सांस्कृतिक पार्श्वभूमीतील सामाजिक परिस्थिती काय किंवा मागासलेल्या लोकांच्या जगातील सामाजिक परिस्थिती काय ही दोन्हीही आज एक प्रकारच्या ध्येयप्राप्तीस अनुकूल असतात तर उद्या दुसऱ्या प्रकारच्या. पेरिक्लसच्या वेळी थोड्याशा कालमर्यादेपर्यंत अथेन्समध्ये गुलाम नसलेल्या नागरिकांना खूप स्वातंत्र्य दिले गेले. सर्व प्रकारच्या समस्यांची बौद्धिक उत्तरे शोधण्याला तेथे मान मिळाला. शिल्प आणि नाट्य या दोहोतही नवनवीन कलाप्रकार उदयास आले, ते मान्यता पावले. केवळ दोन पिढ्यांच्या कालावधीत एका छोट्याशा शहराने ही जी कर्तबगारी गाजवली तिचा आजही आपल्याला अचंबा वाटतो. तो क्षण निघून गेला; सामाजिक परिस्थिती बदलली. एकदा संस्कृतीचे पुढचे पाऊल उचलले गेल्यावर, ती ज्योत पुढच्या पिढ्यातून तेवती ठेवण्याकरिता ' वांशिक श्रेष्ठता ' कामास आली नाही. अनुकूल परिस्थितीत माणसे काय कर्तबगारी गाज-वितात याची एक चुणूक जवळजवळ दैवयोगाने दिसू शकली.

अथेन्सच्या काळापासून पुढे परिस्थिती कधी या ठिकाणी तर कधी दुसऱ्या ठिकाणी अशी काही प्रकारच्या कर्तृत्वाकरिता अनुकूल राहिली आहे. इटलीमधील ' नवजीवना 'चा काळ कलांच्या वाढीला अनुकूल होता आणि ज्याने बेनिव्हेन्टो चेलेनीचे ( Benvenuto

Callini) 'आत्मचरित्र' वाचले आहे असा कोणीही माणूस त्या काळातील कलेला जो सुरेख बहर आला त्याचे आश्चर्य करणार नाही. राजेरजवाड्यांकडून कलावंत म्हणून आपल्याला जे दरबारी मानसन्मान मिळाले त्याच्या वर्णनात चेलेनीने अतिशयोक्ती केली असेलही. पण त्या काळाचे ते सत्यचित्र आहे हे आपल्याला माहीत आहे. परंतु लिओनार्डो द व्हिन्सी (Leonordo de Vinci) याच्या लिखाणावरून व चरित्रावरून आपल्याला समजून येते की, अनेक प्रकारच्या बौद्धिक प्रवृत्तींचा निश्चितपणे दुःस्वास केला जात असे. जर सामाजिक अप्रियतेची कदर न करता एखाद्या बौद्धिक कर्तृत्वाच्या पाठीमागे लागले तर उच्च वर्तुळातून त्याला किती आणि कसा विरोध होत असे ते गॅलिलिओवर इन्क्विझिशन-द्वारा भरलेल्या खटल्याच्या हकीकतीमुळे प्रसिद्धच आहे.

आधुनिक काळातसुद्धा विपुल स्वातंत्र्य आणि सुबत्ता यांचे कालखंड मधून मधून अवतरतात. या स्वातंत्र्याचा आणि समृद्धीचा उपयोग ग्रीकांना एवढे आदरणीय वाटणाऱ्या बौद्धिक जीवनाकरिता झाला नाही किंवा फ्लोरेन्सच्या नागरिकांना अभिमत असणाऱ्या कलानिर्मितीकरिता झाला नाही. भौतिक जगावर विजय मिळविण्यासाठी व संपत्तीच्या संचया-साठी या कालखंडातून प्रयत्न झाले. या क्षेत्रात आपण आधुनिक युगाचे वैशिष्ट्यदर्शक असे महान यश मिळविले आहे. या प्रयत्नात यशस्वी होऊ शकेल असा व्यक्तिमत्त्वाचा प्रकार थोड्या फार फरकाने देशामागून देशात जास्त जास्त प्रमाणात पसरत आहे. ज्यांना मान मिळतो अशी कौशल्ये आणि त्यांच्या प्राप्तीसाठी उपलब्ध असलेल्या संधी निर-निराळ्या देशांत आणि त्याहून अधिक प्रमाणात, एकाच देशातील निरनिराळ्या वर्गांत भिन्न भिन्न असतात. ही भिन्नता आपण 'जसे आयरिश लोक असतात तसे', 'अगदी इटालियनांना शोभेसे', 'खास शेतकऱ्यांसारखे' किंवा 'पेढीवाल्यांना साजेसे' अशा वैशिष्ट्यदर्शक वाक्प्रचारातून व्यक्त करतो. असली सगळी स्वभावचित्रणे ही लगतच्या परिस्थितीमुळे ह्या मानवगटांना जो आकार प्राप्त झाला त्याची ओबडधोबड रेखाचित्रे असतात. जी अन्य परिस्थितीतही टिकाव धरतील अशा जन्मजात भेददर्शी विशेष लक्षणांची वर्णने म्हणून त्यांना खरेपणाचा दावा करता येणार नाही.

वंशवाद्यांनी कधी या वंशाच्या श्रेष्ठत्वाचा दावा सांगितला आहे तर कधी त्या. पण केवळ जननपेशींच्या माध्यमातून कोणत्याच समाजामध्ये श्रेष्ठत्वाचे सातत्य राहात नाही. पाश्चात्य संस्कृतीच्या भूतकाळातील इतिहासात आपण कुठेही नजर टाकली तरी आपणाला दिसते की, जेव्हा एखाद्या सुदैवी मानवसमूहाला आर्थिक संपन्नता लाभली आणि स्वातंत्र्य व काही विशिष्ट दिशेने संधीची अनुकूलता मिळाली तेव्हा त्या सुदैवी गटांना थोड्या काळापुरते का असेना, पण नेत्रदीपक यश प्राप्त झाले. जेव्हा अशी अनुकूल परिस्थिती उरली नाही तेव्हा थोड्याच काळात त्यांच्या हातातील प्रगतीची ज्योत मंद झाली. गतकालामध्ये पुरुषार्थाला अनुकूल सामाजिक परिस्थिती, मग ती कोणत्याही स्थळी असो, समाजातील काही एका विशिष्ट वर्गापुरती मर्यादित होती. उदाहरणार्थ, ग्रीक लोकसंख्येच्या

साधारणपणे एकसप्तमांश असतील एवढे अथेन्सचे (जन्मतः) स्वतंत्र नागरिक किंवा एलिझाबेथच्या अमलाखालील इंग्लंडमधील दरबारी लोक व त्यांचे आश्रित हे अशा तऱ्हेचे वर्ग होते. आता आधुनिक देशांतून साक्षरतेचे प्रमाण वाढते आहे, मताधिकार अधिकाधिक नागरिकांना मिळतो आहे आणि समाजाच्या सर्वच थरांतून काही समान विचारांचा प्रसार होतो आहे. त्यामुळे सामाजिक संधींच्या अनुकूलतेवर पूर्वीच्या काळाइतकी बंधने येत नाहीत. आपल्या मालक लोकांचे जग निराळे आहे आणि हलक्या लोकांची गरिबी वा परावलंबन ही देवनिर्मित आहेत असे मानणारी गुलामी मनोवृत्ती आपण अमेरिकेत पद्धतशीरपणे नष्ट केली आहे. युरोपमध्येही अधिक प्रगत देशांत साधारण अशीच परिस्थिती आहे. त्यांच्यासमोर दोन पर्याय आहेत. एक तर पाशवी बळाच्या जोरावर सर्वसामान्य जनतेला दडपून ठेवले पाहिजे किंवा दुसरे म्हणजे पूर्वीच्या युरोपच्या मानाने आता लोकसंख्येच्या अधिक मोठ्या भागाला जीवनातील महत्त्वाच्या सुखसोयी उपलब्ध करून दिल्या पाहिजेत. आर्थिक संपन्नता ही सार्वत्रिक करणे अजून अमेरिकेत आपल्याला जमलेले नाही. काम करण्याची संधी, वादग्रस्त मुद्द्यांवर मतस्वातंत्र्य, समान नागरी हक्क या गोष्टीही अद्याप मिळवावयाच्या आहेत. परंतु आपण प्रयत्नांची शिकस्त केली तर त्यांची प्राप्ती असाध्य नाही. त्यांच्या प्राप्तीकरिता काय उपाययोजना केली पाहिजे याचीही कल्पना दहा वर्षांपूर्वी होती त्याहून आता अधिक स्पष्ट आहे. मानवजातीविषयी आपली आकांक्षा मनापासूनची असेल तर मानवी जीवन ज्यामुळे कृतार्थ होईल अशी सामाजिक परिस्थिती निर्माण करण्यासाठी आपण स्वतःला वाहून घेऊ. आणि या बाबतीत कितीही मूर्खपणाने वागलो तरी सर्वश्रेष्ठ गुणवत्ता आपलीच राहील अशा तऱ्हेच्या वंशश्रेष्ठतावाद्यांच्या खुशामस्करीला आपण अंधळेपणाने भाळणार नाही.

ते म्हणतात :–

माणसाच्या मनावर सामाजिक व नैतिक संस्कारांचा काय परिणाम होतो याविषयीच्या विचारापासून पळवाट काढण्याचा सर्वांत हीन प्रकार म्हणजे आचार व चारित्र्य यातील फरक हे मूलभूत नैसर्गिक भेदांमुळे पडतात असे मानणे हा होय.

John Stuart Mill, *Principles of Political Economy*, London, Longmans, Green and Co.

कोणत्याही सामूहिक वैशिष्ट्याचे मूळ भौतिक परिस्थिती, सामाजिक स्थिती किंवा ऐतिहासिक परिस्थिती यात शोधण्याचे कष्ट ज्यांना नकोत किंवा मूर्खपणामुळे ज्यांना ते शोधणे जमत नाही असे नवशिके अभ्यासक कोणत्याही सामूहिक वैशिष्ट्याचे स्पष्टीकरण वंश या सवंग संकल्पनेने देऊ करतात.

E. A. Ross, *Social Psychology*. London, Macmillan and Co., 1915, P. 3.

मातापिता व अपत्ये यांमधील ठळक अशा मानसिक समस्यांचा खुलासा अंशतः आनुवंशिकतेच्या सिद्धान्ताने करता येईल. पण जेथे खूपच मानवशाखा एकत्र आलेल्या असतात अशा सबंध राष्ट्राच्या नागरिकांमधील वर्तणुकीतील साम्याचे स्पष्टीकरण आनुवंशिकतेच्या पायावर देऊ करणे चूक आहे. सामाजिक दाबामुळे राष्ट्रीय वर्तणुकीचे प्रकार बनत असतात.

Franz Boas, *Aryans and Non Aryans,* New York, Information and Service Associates, 1934 P. 11.

[ सांस्कृतिक फरक हे असतात आणि या पुस्तकात त्यावर भरही दिला आहे.] पण तत्कालीन परिस्थितीचे ते तात्पुरते परिणाम असतात. बाह्य परिस्थितिवशात जसे ते उदयास येतात, तसेच ती परिस्थिती नाहीशी झाली म्हणजे ते नाहीसे होतात.

Jean Finot, *Race Prejudice*. Translated by Florence Wade-Evans. London, Archibald Constable and Co., 1906, p. 317.

ज्याला जपानी लोकांचे व्यवच्छेदक नैतिक वैशिष्ट्य म्हणता येईल ते प्रत्येक लक्षण हे जपानच्या भूतकालातील समाजव्यवस्थेच्या स्वरूपातून जन्मलेले आहे आणि समाजव्यवस्था बदलेल तसे ते बदलते आहे हे आपण सविस्तरपणे पाहिलेच आहे. म्हणून असे म्हणू नये की कोणत्याही वंशाची नीतिविषयक वैशिष्ट्ये ही त्या वंशाला निसर्गदत्त मिळाली आहेत किंवा त्या लोकांचा मूळ स्वभावच आहेत किंवा त्यांच्या मेंदूच्या विशिष्ट रचनेमुळे आहेत किंवा केवळ बापाकडून मुलाला याप्रमाणे पिढ्यामागून पिढ्या भौतिक जन्मलाभामुळे संक्रमित होत राहतात. उलट पक्षी, वंशावंशांमधी भेददर्शी नैतिक वैशिष्ट्ये ही प्रभावी समाजव्यवस्थेमुळे ठरत असतात आणि त्या व्यवस्थेबरोबरच ती बदलत राहतात.

Sydney L. Gulick, *The Evolution of the Japanese*, London, F. H. Revell, 1903, P. 285.

माणसामाणसांच्या विद्वत्तेमध्ये तफावत असते हे खरे. पण सर्व माणसांची ज्ञानग्रहणाशक्ती सारखीच असते. बुद्धीच्या आधिपत्याखाली सद्गुणी होणार नाही असा कोणताच वंश नाही.

Cicero, खि. पू. १ ले शतक

अतिशय बुद्धिवान, कल्पक, उत्साही आणि भावनिकदृष्ट्या स्थिर असा मानवजातीचा तिसरा हिस्सा आपण निवडून काढला तर सगळ्याच वंशांना त्यात प्रतिनिधित्व मिळालेले असेल.

Franz Boas, *Anthropology and Modern Life*. London, Allen and Unwin, 1929, p. 75.

## संदर्भ

(१) Boule, Marcollin, *Fossil Man : Elements of Human Palaeoethnology*. Translated from the French by Jessie E. and James Ritchie. Edinburgh, 1923, p. 229.

(२) Pearson in *Biometrika*, Vol. 8, 1912, pp. 292–357.

(३) Burchell, quoted in W. J. Sollas, *Ancient Hunters*, London, 1911, p. 272.

(४) Yerkes, R. M., "*Psychological Examining in the United States Army*," Memoir of the National Academy of Sciences. Washington, Vol. 15, vi, 1921, p. 790.

(५) Garth, Thomas Russel, *Race Psychology, a Study of Racial Mental Differences*. London, McGraw Hill, 1931, p. 183.

(६) Klineberg, Otto, *Race Differences*. London, Harper, 1935, p. 155.

(७) पूर्वोल्लेखित पृ. १८२.

(८) Garth, पूर्वोल्लेखित, पृ. २११.

(९) Klineberg, कित्ता पृ. १८५–१८६.

(१०) Thorndike, E. L., *Educational Psychology*, Vol. III, New York, 1921, p. 207.

(११) Garth, पूर्वोल्लेखित पृ. vii व १०१.

(१२) Klineberg, पूर्वोल्लेखित पृ. १८९.

(१३) Brigham, C. C., "*Intelligence Tests of Immigrant Groups.*" Psychological Review, Vol. XXXVII, Princeton, 1930, p. 165.

(१४) Muller, H. J., *Out of the Night : A Biologist's View of the Future*. London, Gollancz, 1936, p. 120.

(१५) Garth, पूर्वोल्लेखित, पृ. २१७.

(१६) Le Bon, Gustave, The Psychology of Peoples. London, 1898, p. 37.

(१७) कित्ता पृ. ८३.

(१८) Hankins, Frank H., *The Racial Basis of Civilization*. London, Knopf, 1927, pp. 308–319, 361–366.

(१९) कित्ता पृ. ३०५.

◎ ◎

# विभाग २ : वंशवाद

प/242
9
मंत्रालय.

## प्रकरण ७ वे

# वंशवादाचा वास्तव इतिहास

वंश हा एक असा विषय आहे की, ज्याचा अनेक दृष्टिकोणांतून अभ्यास करता येईल. त्याकरिता वंशावळींच्या तक्त्यांचे संशोधन करावे किंवा मानवशास्त्रदृष्ट्या शरीराची मोजमापे घेऊन पाहणी करावी किंवा भिन्न भिन्न परिस्थितीत नांदणाऱ्या एकाच प्राणिशास्त्रीय गटाचा अभ्यास करावा किंवा जागतिक इतिहासाचे सिंहावलोकन करावे. मानवमितिशास्त्रज्ञ, वंशावळविषयक तज्ज्ञ, जननवैज्ञानिक, इतिहासकार या सगळ्यांच्या दृष्टिकोणातून तो अभ्यासता येईल. दुसऱ्या शब्दांत सांगायचे म्हणजे वंश हा वैज्ञानिक संशोधनाचा विषय आहे व त्यातील प्रमुख समस्या मानवसमूहांचे परस्परांशी असलेले जननिक संबंध ही होय. मानवी संस्कृतींच्या कोणत्याही अभ्यासात हा विषय महत्त्वाचे क्षेत्र व्यापतो आणि जगाच्या इतिहासातील महत्त्वपूर्ण घटनांशी त्याचा संबंध येतो. उदाहरणार्थ, जिवंत असलेल्या वंशातील लोकांच्या कवट्या आणि हाडे तपासून वंशाभ्यासक प्रागैतिहासिक मानवांच्या दोन खंडांतील परिभ्रमणासंबंधी माहिती सांगू शकतील. इतिहासातील अनेक घडामोडींबद्दलचे आपले ज्ञान वंशाभ्यासकांच्या पुराव्यावरच आधारलेले असते. आपण पूर्वी पाहिल्याप्रमाणे, वंशविषयक अभ्यासानेच आपल्याला कळते की, चीनवर स्वामित्व गाजविणाऱ्या मांचू घराण्याच्या अंगात एका आडदांड अश्मयुगीन आशियायी जमातीचे रक्त खेळत होते. या जमातीतील इतर मंडळी अडाणी गुराखीच राहिली. शिवाय, या अभ्यासामुळे हेही माहीत होते की, प्राचीन इजिप्तच्या प्रसिद्ध राजघराण्यांपैकी हॅमाइट वंशाचे रक्त आजच्या गाला आणि सोमाली या आदिवासी जमातीतही खेळते आहे.

काही अपक्व समतावादी मानतात त्याप्रमाणे वंश ही एक 'आधुनिक अंधश्रद्धा' नव्हे. वंश ही वास्तवता आहे. त्याच्या अभ्यासापासून संस्कृतीच्या इतिहासकारांना बरेच ज्ञान प्राप्त झाले आहे. वंशासंबंधी असेही अभ्यासविषय आहेत की, त्यांच्या अधिक अभ्यासाकरिता आज विज्ञानाजवळ पुरेसे पायाभूत ज्ञान किंवा चाचणीपद्धती उपलब्ध नाहीत. पण पुढे मागे त्या अभ्यासापासून असेही निष्पन्न होऊ शकेल की, काही निश्चित स्वरूपाची भावनिक आणि बौद्धिक वैशिष्ट्ये काही ठराविक वंशगटात सापडतात. कारण ती वंशबीजावरून ठरतात; ती केवळ अर्जित नाहीत. उदाहरणार्थ, काही वांशिक गटांची मापे घेतली असता अंतर्ग्रंथींच्या अवस्थेसंबंधी काही एक सरासरी मिळते. ती इतरांहून भिन्न असते. हीच गोष्ट संचयनालाही लागू पडते. मात्र या प्रत्येक गटात अशा पुष्कळ व्यक्ती असतात की, सर्व गटांना समान असलेल्या किमान-कमाल कक्षेत त्या बसू शकतात. परंतु इतिहासात वरचेवर अशी उदाहरणे दिसतात की, अशी काही विशेषता एखाद्या गटात उत्पन्न झालीच तरी त्यांत एक सुरक्षा-अवधी असतो. तो इतका पुरेसा असतो की, जर संधी मिळाली तर कोणताही वंश पहिल्यापेक्षा अत्यंत विरोधी स्वरूपाच्या संस्कृतीशी मिळते-जुळते घेऊन तीत सहभागी होऊ शकतो.

तात्पर्य असे की, वंश ही काही आधुनिक अंधश्रद्धा नव्हे. पण वंशवाद ही मात्र अंधश्रद्धा आहे. निसर्गतःच एखादा वांशिक गट जन्मजात हलक्या दर्जाचा आहे आणि दुसरा एखादा गट जन्मजातच श्रेष्ठ दर्जाचा आहे हे एक अंतिम श्रद्धेय तत्त्व आहे असे मत म्हणजे वंशवाद होय. काही मानववंश निपटून टाकण्यात आणि इतर काही शुद्ध राखण्यातच मानवी संस्कृतीच्या प्रगतीची आशा आहे असे मानणारा हा दुराग्रह आहे. मानवजातीच्या इतिहासात प्रगतीचा झेंडा फक्त एकाच वंशाने अखंड फडकत ठेवला आहे आणि भविष्यकालीन प्रगतीची निश्चिती केवळ तोच वंश देऊ शकतो असे हे विवेकद्रोही मत आहे. हे मत आज जगात वेगाने पसरत आहे आणि हेच मत काही वर्षांपूर्वी जर्मन राज्यसंस्थेचा पायाभूत सिद्धान्त बनविण्यात आले.

वंश संकल्पनेच्या आशयाचे जसे वैज्ञानिक भूमिकेतून संशोधन करता येते तसे काही वंशवादाचे नाही. वंशवाद हा वैज्ञानिक संशोधनाचा विषय नव्हे. 'धर्म' या गोष्टी-प्रमाणेच जिचा अभ्यास केवळ ऐतिहासिक भूमिकेवरूनच करता येतो अशी ती एक श्रद्धा आहे. शास्त्रीय ज्ञानाच्या पलीकडे असणाऱ्या कोणत्याही श्रद्धाविषयाप्रमाणेच त्याचे परीक्षण, त्याचे परिणाम, त्यावर निष्ठा ठेवणारे अनुयायी आणि त्यात गोवलेले ईप्सित यांच्या साहाय्याने केले पाहिजे. जेव्हा वंशवादी स्पष्टीकरणांमध्ये वस्तुस्थिती आणि प्रत्यक्ष घटना यांचा उपयोग केलेला असतो, तेव्हा त्या घटनांचा संदर्भ पडताळून पाहणे शक्य असते. आणि इतिहासाच्या आधारे व शास्त्रीय ज्ञानाच्या योगाने, ते स्पष्टीकरण योग्य आहे की अयोग्य आहे ते ठरविता येते. या आधीच्या प्रकरणांतून आपण तसे केलेही आहे, परंतु वंशवादी वाङ्मय हे विलक्षण भोंगळ आणि सत्य घटनांचे दाखले देण्याच्या बाबतीत विसंगतिपूर्ण आहे. कोणीही शास्त्रज्ञ त्यात उल्लेखिलेल्या घटना खोट्या ठरवू शकेल आणि

तरीही मूळ श्रद्धाविषयाला धक्का लागणार नाही. म्हणून शास्त्रीयदृष्ट्या प्रमाणे देऊन सिद्ध न करता येण्याजोग्या इतर कोणत्याही श्रद्धाविषयाप्रमाणेच वंशवाद हाही ऐतिहासिक दृष्टिकोणातून अभ्यासला पाहिजे. कोणत्या परिस्थितीत हा वाद जन्म घेतो ती परिस्थिती आणि कोणत्या हेतूंच्या पूर्तीकरिता तो वापरला जातो ते हेतू आपण तपासले पाहिजेत.

सर्वांत श्रेष्ठ अशा लोकांपैकी मी एक आहे असे सांगण्याची एक मूलतः बढाईखोर रीत म्हणजे वंशवाद होय. आपण 'श्रेष्ठ जन' आहो अशी ज्याची ठाम समजूत आहे त्याला वंशवादाइतके दुसरे सोयीचे सूत्र नाही. कारण, माझा स्वतःचा नालायकपणा अथवा इतरांचे माझ्यावरील दोषारोप यांपैकी काहीच मला माझ्या उच्च स्थानावरून च्युत करू शकत नाहीत– हे स्थान तर मी आईच्या कुशीत असतानाच निश्चित झाले आहे. माझ्या जगण्याच्या रीतीविषयीचे सर्व अवघड प्रश्न या सूत्रामुळे टाळले जातात आणि 'कनिष्ठ' लोकांनी आपले पराक्रम व आपली नैतिक मूल्ये याविषयी मांडलेले आणि मला पेचात टाकणारे दावे आपोआप फेटाळले जातात.

अत्यंत सोपेपणा हा त्याचा आणखी एक फायदा आहे. मानवी स्वभावात आणि मानवाच्या इतिहासात प्रत्यक्षात असलेल्या गुंतागुंतीला ते स्पर्श करीत नाही. आणि अगदी अडाण्यातील अडाणी माणूस लक्षात ठेवू शकेल व अभिमान बाळगू शकेल असे एक पाच शब्दांचे विधान त्यातून निघते. ते म्हणजे 'मी अभिजात वंशाचा माणूस आहे.' राजकीय हेतूंच्या सिद्धीसाठी या वंशवादी घोषणेसारखी दुसरी घोषणा नाही.

डार्विनचा काल आणि मानवशास्त्रीय मोजमापे यांच्या आधी हा सिद्धान्त हल्लीच्या स्वरूपात मांडणे अशक्यच होते. उत्क्रान्तिवाद व मापनाधारित मानवशास्त्र यांना हे सूत्र हाक घालत असते. "मी ज्या वंशाचा घटक आहे तो अभिजात वंश जीवशास्त्रीय नियमांमुळे मानवी भवितव्याचे नेतृत्व करणारा आहे आणि इतर गटांना नेस्तनाबूत करून तो वंश 'जगण्याची जास्तीत जास्त पात्रता असलेलेच टिकून राहतील' हे तत्त्व सिद्ध करीत असतो" अशा तऱ्हेचा दावा वंशवादाच्या साहाय्याने करता येतो. शिवाय असे की हे अभिजात लोक यांच्या शारीरिक मोजमापांवरून निश्चित होत असतात. सिद्धान्तास अशा तऱ्हेची झिलई करणे एकोणिसाव्या शतकाच्या आधी शक्य झाले नसते. तरीपण वंशवादाचा वास्तव इतिहास या अशास्त्रीय सिद्धान्ताबरोबर सुरू झालेला नाही.

## वंशवादाचा पूर्वेतिहास

आधुनिक वंशवादापेक्षा 'मी कुलवान आहे' या प्रतिज्ञेला अधिक दीर्घकालीन इतिहास आहे. अत्यंत साध्या, नागडे उघडे राहणाऱ्या रानटी लोकांतसुद्धा तो युद्धघोष होऊ शकतो. त्यांच्या सबंध जीवनानुभवाचा हा सिद्धान्त एक अभिन्न भाग असतो. मात्र, त्यांचा जीवनानुभव आपल्या दृष्टिकोणातून पाहता, विश्वास बसणार नाही इतक्या मर्यादित स्वरूपाचा असतो. मनुष्यजातीची उत्पत्ती सुमारे आपल्या खापरपणजाच्या काळी झाली असे

त्यांना वाटत असेल, त्यांच्या दृष्टीने जग पश्चिमेला समुद्रापर्यंत दहा एक मैल आणि पूर्वेला असलेल्या एका पर्वताच्या रांगेपर्यंत वीस एक मैल पसरलेले असेल. धडपडे असे गोरे लोक येईपर्यंत, त्यांच्या दृष्टीने, या छोट्या भूभागापलीकडे जे काय असेल ते मंगळाच्या पृष्ठभागा-इतके त्यांना परके होते. पृथ्वीवर मानवाला दीर्घकालीन इतिहास असेल असे त्यांच्या स्वप्नातही नव्हते. जगाच्या त्या छोट्याशा कोपऱ्यात त्यांचा स्वतःचा छोटासा समाज एकत्रच राहात असे व काम करीत असे. बहुतेक सर्वच टोळ्यांमध्ये असे असे की, जे एकाचे हित तेच सर्वांच्याही हिताचे असे. त्यांच्या भाषेत त्यांच्या छोट्या टोळीचे नावही मोठे अगडबंब ' मानवप्राणी ', ' मा न-व ' असे महत्त्वदर्शक असावे. ही पदवी केवळ त्यांच्या छोट्या गटालाच लागू असे. इतर लोक हे त्यांच्या अर्थाने अ-मानव. ते केवळ शिकारीचे वन्यापैकी लक्ष्य होय. त्यांची जनावरांप्रमाणे शिकार करण्यास हरकत नाही. स्वतःच्या टोळीला अन् त्या लोकांना काही समान प्राप्तव्य नव्हतेच. एकाच मातीतून देवाने त्यांना व आम्हांला घडविले नाही, किंवा, त्या एकाच पाण्याच्या घड्यातून आम्ही दोन्ही गट उपजलेलो नाही किंवा, जमिनीतील एकाच विवरातून ते व आपण बाहेर आलेलो नाही. पण माझ्या लहान गटावर देवाची विशेष मर्जी आहे, देवाने माझ्या गटाला जगात मध्यवर्ती स्थान दिले आहे आणि देवानेच सांगून ठेविले आहे की, या गटाचा नाश झाला तर सगळे जग नाश पावेल. ज्या कर्मकाण्डामुळे जग टिकून राहाते ते देवाने फक्त आपल्याच गटाला दिले आहे, अशा तऱ्हेची त्यांची धारणा असावी.

एखाद्या लहान, रानटी टोळीचा जगासंबंधी असा दृष्टिकोण हा तिच्या अनुभवाशी विसंगत नाही. त्या टोळीला अन्य कोणत्याही समूहापासून काही मागावयाचे नसते. आपल्या त्या विविक्तपणात आपला निर्वाह ती जनता व्यवस्थितपणे करीत असते आणि अन्य लोकां-पासून जर काही काढून घेता आले तर ती घेवाण म्हणजे निव्वळ फायदाच. ( देवाणीचे काही कारण नाही. ) जेथे रानटी टोळ्यांमध्ये हजारो लोकांचा समावेश असतो आणि त्यांनी मोठाले भू-भाग व्यापलेले असतात तेथेसुद्धा जवळजवळ हेच चित्र असते. टोळीरूपी अन्तर्गट म्हणजे समाजजीवनाचे असे एकक ( unit ) की जेथे फायद्यात आणि कामातही माणसे आपापला भाग उचलून एकत्र काम करतात आणि जेथे शेजाऱ्याशी वागताना काही नैतिक बंधने पाळली जातात. असा अन्तर्गट आपले मूल्य बरोबर जाणत असतो आणि स्वतःला खास महत्त्व आहे असे मानत असतो.

असा एखादा आदिम अन्तर्गट म्हणजे वंश नव्हे. तो गट म्हणजे छोटा स्थानिक उपवंश किंवा जातसुद्धा नव्हे. वंशाच्या सगळ्यात लहान घटक गटातसुद्धा एकमेकांवर मरणाघात करणारे अन्तर्गट बहुधा असतातच. त्यांचे एकमेकांशी असलेले शत्रुत्व हे वंशा-धारित नसून संस्कृतिमूलक असते. आपापले रक्त निराळे राखण्याची ते खटपट करीत नाहीत. प्रत्येक टोळीने दुसऱ्या टोळीतील स्त्रिया पळवून आणण्याची पद्धतही रूढ असू शकते. त्यामुळे त्यांची पूर्वजपरंपरा त्यांना थोर वाटणाऱ्या स्वतःच्या गटाइतकीच त्यांच्याशी शत्रुत्व

असणाऱ्या गटापर्यंतही जाऊन भिडू शकेल. किंवा, वरचेवर होणारे आपसातले शांततेचे तह परस्परांशी लग्नसंबंधांनी साजरे होत असतात. किंवा, आर्थिक आणि सामाजिक फायद्यां-साठीही लग्नव्यवहार घडू शकतात. शेजार-शेजारच्या टोळ्या एकाच वंशगटाच्या असल्या काय किंवा कोणे एके काळी ते दोन्ही टोळ्यांचे गट भिन्न होते असे मानवमितिविषयक मोजमापांनी ठरविता येत असले काय, तरी या गोष्टी घडत आलेल्या आहेतच. आपले रक्त शुद्ध राखणे ही सुधारणा तथाकथित विज्ञानावर आधारलेली आहे.

गटाबाहेरील लोकांना कंठस्नान घालणारा आणि गटातील लोकांना परस्पर आधार देणारा आणि तरीसुद्धा पुष्कळदा शत्रुगटातून बायकाही मिळवून आणणारा असा हा आदिम अन्तर्गट पुष्कळदा जगातील काही मागासलेल्या भागातसुद्धा अधिराज्यपद भोगता झाला. त्याने प्रसंगी खंडणी वसूल केली आणि साम्राज्याचीही निर्मिती केली. अगदी जगज्जेत्या अलेक्झांडरच्या चढायासुद्धा मुळात पाहता पुष्कळ रानटी आफ्रिकी टोळ्यांच्या चढायां-सारख्याच होत्या. ॲरिस्टॉटल हा अलेक्झांडरचा गुरू होय. गोरे रानटी लोक आणि आशियायी लोक ग्रीकांची बरोबरी कधीच का करू शकणार नाहीत त्याची कारणे त्याने आपल्या राज्यमीमांसेवरील ग्रंथात – Politics मध्ये– सातव्या प्रकरणात दिली आहेत. दक्षिण आफ्रिकेतील एखाद्या क्षुद्र माणसाने बाथोंगा टोळीवाल्यांविरुद्ध जसे मुद्दे मांडावेत, तशीच ती कारणे आहेत. परकीयांची सांस्कृतिक कमाई कमी दर्जाची होती हे उघडच नाही काय ? त्याचे प्रतिपादन वंशवादी नव्हते. त्यामुळे ग्रीक संस्कृती आत्मसात केलेल्या आशियायी लोकांच्या संस्कृतीची त्याने चर्चा केली नाही. त्यांची सांस्कृतिक कमाई उच्च दर्जाची होती. म्हणून त्यांच्याविषयी चर्चा करणे गैरलागू होते. ग्रीक रक्त शुद्ध राखले पाहिजे असाही मुद्दा त्याने मांडला नाही. त्याचा शिष्य अलेक्झांडर याने देशोदेश जिंकून घेत असताना आन्तर्देशीय विवाहांचा पुरस्कार केला. त्याच्या शिपायांपैकी दहा हजार सैनिकांनी भारतीय मुलींशी लग्ने केली. खुद्द अलेक्झांडरने दोन इराणी राजकन्यांशी विवाह केले.

ॲरिस्टॉटलचा दृष्टिकोण हा प्राचीन युरोपियन दृष्टिकोणाचा निदर्शकच होता त्यामुळे, आपल्या विशाल बहुराष्ट्रिक राज्याची उभारणी करताना रोमन साम्राज्याला वंश-वादापासून आधी सुटका करून घ्यावी लागावी असे घडले नाही. रोमन लोकांची उद्दिष्टे जसजशी स्पष्ट झाली आणि शाही फर्मानांनी जसजसे त्यांचे कायद्यात रूपांतर झाले, तसतसे राजधानीतील लोकांना असणारे विशेषाधिकार अधिकाधिक प्रमाणात प्रांतांतील लोकांनाही मिळू लागले. रोमन साम्राज्य हा अनेक दृष्टींनी मानवी इतिहासातील एक नवीन शोध होता. आपल्या अफाट प्रदेशापैकी पुष्कळ मोठ्या भागाला त्यांनी जुन्या काळी उपलब्ध असलेले अंतर्गटाचे फायदे देऊ केले. व्यापारी व सामाजिक संबंधांवर असलेल्या बंधनांमुळे प्रत्येक छोट्या जिल्ह्याचा विकास पांगुळला होता. ती बंधने काढून टाकण्यात आली आणि जकातीच्या सोयीनुसार मोठे प्रांत बनविण्यात आले. या प्रांतांच्या सरहद्दींवर

फक्त महसुलाकरिता कर गोळा केले जात. अशा रीतीने साम्राज्याचे शीघ्र रोमनीकरण केल्यामुळे रोमचा आर्थिक फायदाही वाढला व प्रतिष्ठाही वाढली. त्यांच्या शासनपद्धतीचा एक महत्त्वाचा भाग असा होता की, दूरच्या प्रांतांतील व्यक्तींनाही अधिकाराची मोठी पदे सतत देण्यात येत आणि त्या व्यक्तींच्या लायकीप्रमाणे त्यांना बढतीही मिळे. त्यामुळे साम्राज्याच्या सुदूर क्षेत्रातील अनेक लोक सैनिक, मुत्सद्दी, विद्वान म्हणून मोठ्या पदांवर चढले. रोमन पलटणींमध्ये उत्तरोत्तर ग्रामीण भागातील लोकांची जास्त जास्त भरती होत गेली. पहिल्यापासूनच, रोमन नागरिकत्वाचे अभिवांछित विशेषाधिकार परकीय वंशांच्या जबाबदार व्यक्तींनाही देण्यात येत असत. याची यथार्थता 'नवा करार' वाचणाऱ्या सर्वांना रोमन साम्राज्याच्या सुरवातीच्या काळात पॉलने उच्चारलेल्या त्या प्रसिद्ध गर्वोक्तीमुळे जाणवेल– "पण मी स्वतंत्र (रोमन) नागरिक आहे." पॉलच्या म्हणण्याचा आशय असा की त्याचा बाप अथवा त्याचा आजा हे दूरच्या टार्सस शहराचे ज्यू रहिवासी असूनही त्यांच्या सेवेचे बक्षीस म्हणून त्यांना रोमन नागरिकत्व बहाल करण्यात आले होते. किंवा पॉलच्या संरक्षकाप्रमाणे 'बरीच किंमत' देऊन त्यांनी ते विकत घेतलेले होते. शेवटी तर जे गुलामीत जन्मले नाहीत अशा, साम्राज्यातील सर्वच व्यक्तींना रोमन नागरिकत्व दिले गेले.

परकीयांविरुद्धच्या भेदभावाचा हा अभाव विशेष नैतिक शिकवणुकीचा परिणाम नव्हता. तो सामाजिक शक्तींचा परिणाम होता. आणि रोमन शासकीय प्रतिभेने त्या सामाजिक शक्तींचा उपयोग आपल्या फायद्याकरिता करून घेतला. अगदी अलीकडच्या काळापर्यंत साम्राज्यशाही ज्या तऱ्हेने चालविली जात असे तिला अनुरूप अशीच ही सहिष्णुता होती. पूर्वीच्या साम्राज्यवाद्यांचे प्रमुख उद्दिष्ट खंडणी गोळा करणे आणि अंकित प्रदेशांची निष्ठा राजधानीशी राखणे हे असे. अलीकडच्या काळातील साम्राज्यवाद्यांप्रमाणे खाणीत कामे करण्याकरिता अथवा मळ्यातून राबण्याकरिता नवीन नवीन मजूर भरती केंद्रे उपयोगात आणणे असे ते नव्हते. त्यामुळे जित लोकांपैकी सर्वांत लायक लोकांना मान देऊन काही अधिकार त्यांच्याकडे सुपूर्द करणे हे आर्थिक दृष्टीने फायद्याचे असे. जिंकलेल्या प्रदेशातील लोकांच्या रीतीभाती व सांस्कृतिक जीवन त्यांना जगू देण्याचे रोमन सत्तेचे धोरण असे.

अंतर्गटातील काही विशेषाधिकार ज्यात सार्वत्रिक करता येतील अशा वर्तुळाचे क्षेत्र अधिक विस्तृत करण्याचे हे ऐतिहासिकदृष्ट्या महत्त्वाचे पाऊल रोमन राज्यसत्तेच्या परकीयांविषयीच्या दृष्टिकोणामुळे उचलले गेले. जगाच्या विस्तृत भूभागावर साम्राज्यामुळे लाभणारी शांतता नांदू लागली आणि एकाच अधिसत्तेला मानणारे नागरी प्रशासन त्या भागावर अमलात आले. अशा तऱ्हेच्या नव्या सामाजिक बदलांचा अप्रत्यक्ष परिणाम प्रत्येक छोट्या छोट्या गटाची स्वयंश्रेष्ठत्वाची कल्पना मागे पडण्यात आणि त्यामुळे पूर्वीचे अडथळे दूर होण्यात झाला.

जगाच्या ज्या भागात रोमन साम्राज्य उदयास आले, त्याच भागात ख्रिश्चन धर्म जन्मास आला आणि पसरला. येशूने माणसामाणसात भ्रातृभाव मानावयास शिकविले. त्याच्या काळात पॅलेस्टाइनमध्ये समारिटन लोकांचा परके म्हणून तिरस्कार होत असे. जेव्हा एक समारिटन स्त्री येशूला म्हणाली, "तू ज्यू असूनसुद्धा, समारिटन असलेल्या मजकडे पाणी मागतोस हे कसे?– कारण की, ज्यू लोक समारिटनांबरोबर काहीच संबंध ठेवीत नाहीत." (John iv, 9), त्या वेळी ख्रिस्ताने आपली शिकवण तिला आणि तिच्या गावातील लोकांना दिली आणि "पुष्कळांना ती शिकवण श्रद्धेय बनली." त्याच्या शिष्यांना ती गोष्ट भयंकर वाटली. परंतु त्याच्या प्रवचनाच्या शेवटी त्यांचीसुद्धा खात्री पटली की, 'त्यांनी जगभर फिरावे व ख्रिस्ताची शिकवण लोकांना सांगावी हेच योग्य होय.' त्या अनुयायांतील सर्वांत प्रभावी असा जो पॉल त्याने लोकांना उपदेश केला, "कोणी ज्यू नाही की ग्रीक नाही, कोणी गुलाम नाही अथवा स्वतंत्रही नव्हे, कोणी पुरुष म्हणो नये किंवा स्त्री म्हणू नये, कारण की, लोकहो येशू ख्रिस्तात तुम्ही सर्व एकच आहा." (Galatians iii, 28).

अशा तऱ्हेचा हा कार्यक्रम व ही शिकवण ही पहिल्या शतकातील रोमन साम्राज्याच्या धर्मातीत दृष्टिकोणाला अनुरूप होती. परंतु त्याच्या सुमारे एक हजार वर्षे आधी, इराणमध्ये उदयास आलेल्या झरतुष्ट्राच्या काळाला ती धरुन नव्हती. झरतुष्ट्राने एक राष्ट्रीय संप्रदाय निर्माण केला. त्या संप्रदायाने इराणपलीकडे लक्ष दिले नाही. एखाद्या आद्ययुगीन धर्मा-प्रमाणे तो पंथही आपल्या पंथात अन्य लोकांचे धर्मान्तर घडवून आणणारा असा नव्हता. परस्परांशी सदोदित झुंजत असणाऱ्या सरंजामदारांच्या त्या काळात चीनमध्ये कन्फ्यूशियसने-सुद्धा आपल्या अनुयायांमध्ये जगातील सर्व वंशांच्या लोकांमध्ये आपल्या शिकवणीचा प्रसार करावा अशी कल्पना रुजवली नाही. ख्रिश्चन धर्माच्या वाढीच्या सुरवातीच्या काळात ख्रिश्चन धर्माने जो कार्यक्रम अनुसरला त्यामागे रोमन साम्राज्याने निर्माण केला त्याप्रमाणे सर्व वंशांच्या लोकांचा मिळून होणारा एक समाज ही धर्मातीत कल्पना होती.

येशूच्या शिकवणुकीचा पाया घालण्यास हिब्रू लोकांचा कायदा व त्यांचे प्रेषित यांचीसुद्धा मदत झाली. मोझेसच्या प्राचीन कायद्यात असे उदारवृत्तीचे नियम आहेत: "जो परका माणूस तुमच्याबरोबर राहात असेल, त्याला तुमच्यापैकीच एक समजा आणि आपल्या स्वतःप्रमाणे त्याजवरही प्रेम करा. कारण, तुम्हीसुद्धा इजिप्तच्या भूमीवर परकेच होता: मी तुमचा प्रभू आहे, परमेश्वर आहे." (Leviticus xix, 34). "तुमच्या सर्व समाजाला एकच नियम लागू राहील. आणि जो परका माणूस तुमच्याबरोबर चार पावले येईल त्यालाही तोच नियम लागू राहील. एकच नियम तुमच्या सर्व पिढ्यांना लागू राहील. प्रभूच्या समोर तो परका माणूसही तुमच्याप्रमाणेच आहे." (Numbers XV, 15).

परंतु असीरियनांच्या गुलामगिरीतून सुटल्यावर ज्यू लोकांत विभक्तीकरणाचा पुरस्कार करणारा एक विरोधी पक्ष उत्पन्न झाला. प्रेषित एझरा याने इस्राएली वंशाचे अम्मोनाइट व मोआबाइट या वंशांच्या लोकांशी विवाहसंबंध होण्यास विरोध केला. परकीयांच्यातून केलेल्या बायका व त्यांच्यापासून झालेली मुले यांना देशातून हाकलून देण्यात आले. आणि भविष्यकालीन मिश्रवंशीय विवाहांवर कडक बंदी घालण्यात आली. यामुळे आधुनिक वंशवादाच्या कितीतरी पूर्वी इस्राएलमध्ये कडवा वंशश्रेष्ठतावाद उत्पन्न झाला परंतु त्याचा काहीसुद्धा मागमूस खिस्ताच्या वचनांमध्ये दिसत नाही. वंशभेदांकडे लक्ष न देता सर्व लोकांचा एकसंध समाज निर्माण करण्याची त्याची शिकवण ही अधिक जुन्या हिब्रू कायद्यांशी सुसंगत होती आणि रोमन साम्राज्याच्या कामगिरीमुळेही त्या शिकवणीला भक्कम पाया मिळाला.

ख्रिश्चन धर्म हा राज्याचा अधिकृत धर्म ठरला तेव्हा रोमच्या ख्रिश्चन धर्मपीठाला साम्राज्यसत्तेची परंपरा आणि खिस्त व त्याचे अनुयायी यांचा उपदेश या दोहोतूनही वंशभेदनिरपेक्ष मानवी बंधुतेच्या तत्त्वाचा वारसा लाभला होता. मध्ययुगात अनेक भिन्न भिन्न राष्ट्रे व लोकसमाज यांच्यावर दीर्घकाळपर्यंत अधिसत्ता गाजवताना धर्मपीठाची वागणूक त्या वारसाला अनुसरूनच होती. जग वंशभेदाच्या अंकित झाले असताना आजसुद्धा पोपची गादी आपला दीर्घकालीन सन्माननीय वारसा संभाळून आहे आणि आपल्या अधिकृत वक्तव्यांतून पोपमहाशय वांशिक पक्षपाताला विरोधही करीत असतात.

तेराव्या शतकात युरोपमधील समाजव्यवस्थेत मूलगामी बदल घडून आला. ऐहिक जीवनावरील पोपच्या सत्तेचा ऱ्हास होण्यास याच शतकात सुरवात झाली आणि सरंजामशाहीचा शेवटही या शतकात होऊ घातला. एकंदर दीर्घकालीन संदर्भात विचार करता, असे म्हणावे की, या शतकाबरोबरच मध्ययुगीत महत्त्वाच्या संस्था अंतर्धान पावल्या आणि त्यांच्या जागी ज्या नव्या संस्था आल्या त्यांनी आधुनिक युगाला सुरवात करून दिली.

मध्ययुगाच्या सुरवातीच्या काळातील सरंजामशाहीचा हा विशेष होता की, तीत सर्वांत कनिष्ठापासून सर्वांत वरिष्ठापर्यंतचे समाजातील सर्व थर एकमेकांशी विशिष्ट रीतीने जोडलेले होते. त्यात सर्वांचाच काही फायदा असे आणि परस्परांवर निष्ठा, संरक्षण आणि सेवा यांची बंधने असत. ही स्थिती हळूहळू पालटली. सरंजामशाहीच्या अस्तानंतर शेतीवरचे वेठबिगार हे जमिनीला बांधील राहिले नाहीत आणि त्यामुळे सरंजामदार मालकांची त्यांच्याविषयी काही जबाबदारीही राहिली नाही. पूर्वी त्यांना मालकांकडून सुरक्षितता मिळत असे. पण परिणामतः जगातील उपभोग्य वस्तू त्यांच्या वाट्याला फारच कमी येत. अगदीच कफल्लक होणार नाहीत अशा तऱ्हेची शाश्वतीही त्यांना मिळे, त्यांच्या मालकांच्या घोड्यांप्रमाणे, आपल्या मालकाकडून डोक्यावर छप्पर आणि पोटाला अन्न मिळेल याची खात्री तेही बाळगू शकत. त्यांना मिळालेले हे नवे स्वातंत्र्य उपाशी राहण्याच्या स्वातंत्र्याहून फारसे अधिक नव्हते, आणि (त्यामुळे) वर्गावर्गातील संघर्षाने कटू आणि अनर्थकारक रूप घेतले.

आधुनिक युगाच्या सुरवातीपासूनच ज्यांच्या हाती सत्ता आली, त्यांना स्वामित्व वाढविण्याची संधीही अधिकाधिक प्रमाणावर मिळाली. तुल्यबल असण्याचा संभव असणारे स्थानिक गट युरोपमध्ये ईर्षेपायी पुष्कळ काळपर्यंत एकमेकांशी रक्तरंजित लढाया खेळत. जर त्यांपैकी कोणी जिंकले आणि नवीन प्रदेश आपल्या स्वामित्वाखाली आणला तर हे मोठे गट तशाच अन्य तुल्यबल गटांशी झुंज घेत. या लढाऊ गटांची, अशा रीतीने लहान लहान जहागिरींपासून मोठ्या संघटित अशा राष्ट्रांपर्यंत वाढ झाली. त्यांचे एकच सततचे असे धोरण होते ते हे की दुसरा आपल्याला जे करेल, ते आपण त्याला करावयाचे आणि प्रथम कृती आपण करावयाची. आपण अजूनही ह्या आंतरराष्ट्रीय शासनहीनतेच्या काळातच आहो. एवढेच की, युद्धमान गट हे या शतकात जवळजवळ जग व्यापून राहिलेले आहेत. या गटांचे व्यापारी आणि सामाजिक हितसंबंध ज्या प्रमाणात परस्परावलंबित असतील, त्या प्रमाणात युद्धेही अनर्थकारी ठरली आणि अद्यापही तेच घडत आहे. तेराव्या शतकापासून आजपर्यंतचा हा आधुनिक काळ हा युद्धमान गटामधील झगड्यांचाच काळ राहिला आहे. एकाच संस्कृतीच्या अंतर्गत हे गट होते. रोमन साम्राज्याच्या काळाइतक्या पूर्वीपासून ती संस्कृती एकाच शासनाखाली होती. आणि एकाच जागतिक धर्मपीठाचा ऐहिक आणि पारमार्थिक बाबतीत अधिकार मध्ययुगाइतक्या उशिराच्या काळापर्यंत तिने मानला होता. आधुनिक युगात या प्रत्येक गटाचा द्वेषभाव आणि दंडनीती ही केवळ शेजारच्या गटाच्या जीवनमरणाचा प्रश्न राहात नाही. तर त्या गटाला स्वतःलाही ती आत्मघातक ठरतात. अशा या जगात, माणसांच्या भ्रातृभावाचा जो काही प्रत्यक्षानुभवावर मिळालेला आधार होता तोही आज उखडला गेला आहे.

देवाने सर्व माणसे एकाच मातीतून घडविली आहेत या सिद्धान्ताला, अगदी पहिल्यापासूनच आधुनिक जग प्रतिकूल आहे. या जगाची युद्धमान आणि स्पर्धाशील गटात आज तूर्त विभागणी झालेली दिसते, मग ते गट म्हणजे राष्ट्रे असोत वा वर्ग असोत. या गटांना माणसाच्या बंधुभावावर श्रद्धा ठेवायला अनुभवाचा काहीच आधार नाही. उलट पक्षी, आज जगाची रीतच होऊन राहिलेल्या प्रतिस्पर्धी हितसंबंधांच्या झगड्यांच्या काळात, त्यांना गरज होती ती अशा सिद्धान्ताची की, त्यांचा अनुग्रहित गट हा देवाने एका विशेष मातीचा घडविला आहे.

## वंशवाद आणि युरोपियनांचा समुद्रपार विस्तार

आधुनिक युगाच्या सुरवातीलाच या विभक्तीकरणात भर देणारी आणि इतिहासात पूर्वी कधीच न घडलेली एक घटना घडली : नवीन जगाचा म्हणजेच अमेरिका खंडाचा शोध लागला आणि त्या पाठोपाठच आजपर्यंत अज्ञात असलेल्या अनेक बेटांवर व खंडांमध्ये वसाहती झाल्या व तेथील साधनसामग्रीचा उपसा सुरू झाला. इतक्या भिन्न भिन्न वंशांच्या लोकांची दाट वस्ती असलेल्या अशा ह्या जगाचा शोध लागल्यामुळे सर्व युरोपमध्ये मोठी

खळबळ उडाली. या खळबळीचा एक आनुषंगिक परिणाम असा झाला की, युरोपातील राजधान्यांतून सुरक्षित घरी राहिलेले लोक उमद्या रेड इंडियन मागवाधिषयीच्या शातुब्रिआँच्या (Chateaubriand) Atala आणि Paul et Virginie आणि Les Natchez अशा कल्पनारम्य कथा मोठ्या चवीने वाचू लागले. आज लोकांना माहीत आहे की शातुब्रिआँ हा स्वतः इंडियनांमध्ये कधीच राहिला नव्हता. त्यामुळे सरहद्दीवरील लोकांच्या रानटी माणसांविषयीच्या वृत्तीचा त्याला अनुभव नव्हता. कारण, घरी मागे सुरक्षित राहणाऱ्यांनी तद्देशीय इंडियन लोकांचे कितीही गोडवे गाइले तरी सरहद्दीवरील माणसे, मळ्यांचे मालक आणि गुलामांचे व्यापारी यांना तद्देशीयांची उभे राहण्याची पायरी पक्की माहीत होती. समुद्रापलीकडे जाणाऱ्या युरोपियन तद्देशीयांना आपल्या पूर्ण हुकमतीत आणावे किंवा त्यांचा समूळ नाश करावा यासाठी त्यांच्याशी निष्ठुर लढाया खेळत होते. परकीय तद्देशीयांसंबंधी निरनिराळ्या राष्ट्रांतील वसाहतवाल्यांच्या दृष्टिकोणात फरक होते (गोरे आणि तद्देशीय यांच्यात). वंशसंकर होण्याचे भय जसे इंग्लिश वसाहतवाल्यांना प्रकर्षाने वाटत होते तसे स्पॅनिश, पोर्तुगीज आणि डच लोकांना वाटले नाही. किंवा इंग्लिश लोकांप्रमाणे फ्रेंचांनी पोलादी पडद्याची जातिव्यवस्था पाळली नाही. तरी पण सरहद्दींवर जाणारे लोक, मग ते कोणत्याही राष्ट्राचे असले तरी, आपले हेतू कोणत्याही का मार्गाने असेनात, साध्य करण्यामागे असत. आणि रोमन साम्राज्यातील 'जगा आणि जगू द्या' अशा उदारमतवादी सांस्कृतिक वृत्तीने तद्देशीयांशी त्यांपैकी कोणीच वागले नाहीत.

उष्ण कटिबंधातील देशांत युरोपियनांना स्वस्त मजूर, बाजारपेठा आणि गुलाम पाहिजे होते. समशीतोष्ण कटिबंधातील देशांत त्यांना वसाहतींकरिता प्रदेश पाहिजे होता. जिकडे जिकडे युरोपियन गेले, तेथे तेथे तद्देशीय धर्म उखडून टाकण्यावर त्यांचा भर असे. स्थानिक लोकांना धर्म नाहीत, कायदे नाहीत, नीतिबंधने नाहीत, अत एव, ते मानवतेच्या कक्षेबाहेर आहेत असे मानले जाई. त्यांच्यावर खंडणी बसवली जाई आणि त्यांची मुक्तपणे कत्तल केली जाई किंवा त्यांना खुशाल पळविले जाई. उलट हल्ला करण्याखेरीज, दाद मागायचा काही उपाय त्यांच्याजवळ नव्हता आणि अशा हल्ल्यांचा परिणाम निष्ठुरपणे सूड उगवला जाणे हाच होई. लवकरच हे हल्लेप्रतिहल्लेसुद्धा अशक्य झाले आणि उरलेसुरलेले स्थानिक लोक राखीव प्रदेशात हाकलेले गेले किंवा खाणींमध्ये अथवा मळ्यांवर काम करणारे हताश गुलाम बनले. युरोपियन व्यापारी जेथे सहजासहजी पिळवणूक करू शकत नसत किंवा युरोपियन वसाहतवाल्यांना जेथे सहजगत्या वसाहत करता येत नसे अशा देशांतील स्थानिक लोकच तेवढे सुदैवी ठरले.

परंतु अशा कठोर परिस्थितीतही, तीनशे वर्षेपर्यंत वांशिक श्रेष्ठकनिष्ठतेचे अविवेकी तत्त्व उदयास आले नाही. स्थानिक लोक मानवतेच्या कक्षेबाहेर होते खरे. पण त्याचे कारण ते खिश्चन नव्हते हे होय असे मानले जात असे, ते काळ्या वंशाचे होते म्हणून नव्हे. वेगळे धार्मिक मत असल्याबद्दल छळ करण्याची कल्पना मध्ययुगापासून परिचित होती.

तसा छळ पाखंडी लोक आणि ज्यू यांचा नेहमीच होई. अजून वंशवाद क्षितिजावर डोकावला नव्हता. आजचे मुस्लिम मानतात त्याप्रमाणेच पहिल्या वसाहतवाल्यांनी मानवजातीचे दोन विभाग केले होते : जेते होते ते श्रद्धावान व जित होते ते अश्रद्ध. सुरवातीस गुलामांच्या व्यापाराचे समर्थनसुद्धा गुलाम हे पाखंडी आणि पापहतात्मे आहेत याच भूमिकेवरून केले जाई. नौकानयनकलेत अग्रेसर असलेला राजपुत्र हेन्री याच्यासंबंधी असे म्हटले जाते की, धार्मिक युद्धासाठी आत्मत्याग करण्यासही त्याने काऽकू केले नाही आणि त्याचा धार्मिक बाबतीत उत्साह इतका होता की साहसी सैनिकांच्या एखाद्या तुकडीने बरेच स्थानिक लोक पकडून आणले म्हणजे त्याला खूप आनंद होई, तो यासाठी की, पूर्वी पापहत असलेल्या आत्म्यांचे आता पापमोचन होईल.[१]

स्थानिक लोक अश्रद्ध असल्यामुळे कनिष्ठ प्रतीचे आहेत या सिद्धान्तामुळे गोऱ्या लोकांना अनेक विसंगतींना तोंड द्यावे लागले. सुरवातीच्या काळात, केवळ जगाचा एखादा नवीन भाग शोधून काढला एवढ्याच गोष्टीमुळे, संशोधन करणाऱ्या सफरीला ज्या युरोपियन राष्ट्राने पैसा पुरवला असेल, त्या राष्ट्राच्या मालकीचा तो नवा भूभाग व त्यावरील स्थानिक रहिवासी त्या राष्ट्राचे अंकित असे मानले जाई. ही कायदेशीर मालकी प्राप्त होण्यासाठी स्थानिक लोकांचे धर्मान्तर करून त्यांना खिस्ती केले पाहिजे एवढीच फक्त अट होती. त्यामुळे, प्रत्येक जहाजाबरोबर, विशेषतः कॅथॉलिक देशांमधून जाणाऱ्या जहाजांबरोबर धर्मोपदेशकही जात. बरेच वेळा हे धर्मोपदेशक चांगले शूर व निष्ठावन्त असत. जे स्थानिक लोक खिश्चन धर्म पत्करतील त्यांच्यापुरती, गोरे लोक व पाखंडी काळे लोक यांमधील दरी तात्त्विकदृष्ट्या तरी मिटल्याप्रमाणे होई. याचा सरळ अर्थ असा की, अशा धर्मान्तरित भिन्नवर्णी माणसाला गुलाम करता येत नसे. कारण, एखादा खिश्चन माणूस गुलाम आहे ही कल्पनाच त्या काळी घृणास्पद वाटे. दर्यावारंग हेन्रीने मूर लोकांविरुद्ध दीर्घ काळ जे धर्मयुद्ध चालवले होते ते खिश्चन गुलामांना गुलामगिरीतून मुक्त करण्याकरिता होते— म्हणजे खिश्चन जगावरील हा कलंक पुसून टाकावा म्हणून होते.

त्यामुळे शोषक व गुलामांचे व्यापारी यांच्या हालचालींना धर्मोपदेशकांच्या चळवळींचा अडथळा होऊ लागला. परिणामतः ज्या सागरपार देशांवर युरोपातील प्रॉटेस्टंट राष्ट्रांचे वर्चस्व होते, त्या देशांत खिस्ती धर्म स्वीकारणाऱ्या गुलामांना गुलामगिरीतून मुक्त करण्याची पद्धत हळूहळू बंद पडली. गुलामांची सोडवणूक करण्याची कटकट टाळण्याकरिता दक्षिण आफ्रिकेत डच राज्यकर्त्यांनी असा नियम केला की, गुलाम आईबापांच्या पोटी जन्मलेल्या मुलांना बाप्तिस्मा देण्यात येऊ नये अथवा धार्मिक शिक्षणही देऊ नये. शेवटी १७९२ मध्ये केप टाउनच्या चर्च कौन्सिलने लेखी ठराव केला की, राज्याचा कायदा किंवा चर्चचा नियम यापैकी कोणत्याही कारणामुळे खिश्चन गुलामाला मुक्त करण्याची जरूरी नाही. त्या ठरावात असेही नमूद केले होते की, केप टाउनमध्ये खिस्ती असलेले पुष्कळ गुलाम आहेत. म्हणून एकोणिसाव्या शतकाच्या सुरवातीला दक्षिण आफ्रिकेत, श्रद्धावान

आणि अश्रद्ध अशी मानवजातीची विभागणी करणारा सिद्धान्त वस्तुस्थिती चित्रित करणारा नव्हता आणि तीच अडचण जगाच्या इतर भागातही निर्माण होऊ लागली होती. काही वेळा, दक्षिण आफ्रिकेतल्याप्रमाणे ती गुलामगिरीच्या संदर्भात उद्भवे, तर काही वेळा, आपण नव्या जगातील जेसुइट व फ्रॅन्सिस्कन धर्मोपदेशकांच्या जुन्या निषेधपत्रिकांत वाचतो त्याप्रमाणे धर्मांतरित इंडियनांच्या कत्तलींच्या संबंधात निर्माण होई. श्रेष्ठकनिष्ठते-संबंधी नव्या सिद्धान्ताला योग्य असा काळ आता आला होता. आणि तद्देशीय लोक हे पूर्णार्थाने माणसे नव्हेत, सुसंस्कृत माणसापेक्षा बिनशेपटीच्या माकडाला ते जवळचे आहेत असे लोक म्हणू लागले. काही झाले तरी रंगातील फरक हा अतिशय ठळक होता आणि आता जरी पुष्कळ प्रसंगी धर्मातील भिन्नतेमुळे निर्माण होणारा द्वेष कमी झाला होता तरी रंगभिन्नत्वामुळे सरहद्दींवर दोन प्रतिस्पर्धी पक्ष उभे ठाकू लागले. परंतु गोऱ्या माणसाच्या श्रेष्ठत्वामागे आधारभूत असलेल्या तत्त्वात बदल हा क्रमाक्रमाने पडत गेला. तो पूर्वनियोजित नव्हता. सामाजिक परिस्थितीवर अनिवार्यपणे घडलेली ती प्रतिक्रिया होती आणि तिचा आशय बौद्धिक असण्यापेक्षा व्यावहारिक होता. सरहद्दीवरील परिस्थिती वादळी आणि तंग होती. त्यामुळे वसाहतवाले व शासनकर्ते हे त्या त्या वेळच्या गरजे-प्रमाणे वागत, आपल्या अडचणींतून वंशवादी सिद्धान्त निष्पन्न करीत नसत. सर्वांना पटेल असे समर्थन करण्याची कोशिश ते करीत नसत. स्थानिक लोक आपल्यापुढे अखेर हतबल झाले म्हणजे त्यांना पुरे होई.

ज्या समुद्रपार देशांमध्ये इंग्लंडच्या वसाहती होत्या, त्यांत अगदी पहिल्यापासूनच अन्य युरोपीय राष्ट्रांच्या वसाहतींच्या मानाने श्रद्धावान आणि अश्रद्ध या विभागणीला महत्त्व बरेच कमी होते. पहिल्यापासूनच तद्देशीयांकडे पाहण्याची इंग्रजांची वृत्ती धर्मातीत होती. त्यांच्या राज्यकारभारात धर्मप्रसारकेंद्राची स्थापना हा काही त्या प्रदेशावर हक्क सांगण्याचा आधार नव्हता; आणि जरी अशी केंद्रे स्थापली आणि स्थानिक लोकांचे धर्मांतर केले गेले असले तरी खिस्ती झालेल्या आणि न झालेल्या स्थानिक लोकांतील फरक अधिकृतरीत्या महत्त्वाचा नव्हता. तद्देशीय लोक हे काही वेळा उपयोगी असणारे पण खालच्या जातीचे लोक होत अशा रीतीने इंग्रज त्यांच्याशी वागत. ते कडकपणे अलगपणा पाळीत असत. फ्रेंच, स्पॅनिश आणि पोर्तुगीज वसाहतींमध्ये तद्देशीय स्त्रियांबरोबर सर्रास लग्ने होत असत. त्यामुळे मिश्रवर्ण प्रजा उत्पन्न झाली. पण इंग्लिश वसाहतींमध्ये मात्र मिश्रविवाह अगदी अपवादात्मक होत आणि त्याविरुद्ध भावना फार तीव्र असे. म्हणून, आज जो भाग युनायटेड स्टेट्स् म्हणून ओळखला जातो, त्या भागात वसाहत करताना सरहद्दीवरच्या इंग्रजांनी वांशिक फरक तीव्रपणे मानला. त्याला वांशिक भेद म्हणत नसत. कारण, मूळ झगडा हा जमिनीच्या मालकीकरिता होता. इंग्रजांना इंडियन लोकांच्या जमिनी पाहिजे होत्या आणि त्या जमिनी इंडियन लोकांना हुसकून लावून हव्या होत्या. नव्या जगातील जमिनींच्या, सुरवातीसुरवातीला ज्या शाही सनदा दिल्या होत्या, त्यांत तीवर

आधीच राहणाऱ्या तद्देशीय लोकांचा उल्लेखही नव्हता. जणू काही त्या भूप्रदेशावर मानवी वस्ती नव्हतीच अशा तऱ्हेचा त्यात मजकूर होता. वसाहतवाल्यांची मनोमन इच्छा अशी गोड परिस्थिती शक्य तितक्या लवकर प्रत्यक्षात आणावी अशी होती. मेक्सिकोमध्ये, स्पॅनिश लोकांनी जसा इंडियन लोकांचा उपयोग नवीन प्रदेश वसवताना किंवा शेतात मजूर म्हणून करून घेतला तसा इंग्रजांनी केला नाही. त्यांच्या एकंदर योजनेत स्थानिक लोकांशी अशा तऱ्हेचा संपर्कसुद्धा फारच जवळ नेणारा वाटे. त्यांना इंडियन लोकांचा एकच उपयोग होता तो म्हणजे फ्रेंचांशी लढण्याकरिता सहकारी म्हणून. या हिकमतीत ते संपूर्णपणे यशस्वी झाले. फ्रेंचांशी लढताना त्यांनी इरोकी ( Iroquois ) लोकांची जी मदत मिळविली तीच सेंट लॉरेन्सच्या दक्षिणेस फ्रेंच विस्ताराला पायबंद घालण्यात निर्णायक ठरली असे पुष्कळदा म्हटले जाते परंतु जेव्हा युद्धे संपली तेव्हा मात्र इंग्रजाना दिलेल्या या मदतीचा इरोकींना काडीमात्र फायदा झाला नाही. क्रान्तीच्या काळात, विशेषतः १८ २ च्या युद्धाच्या वेळी पुन्हा एकदा इंडियन जमाती आपल्या गोऱ्या दोस्तांच्या बरोबरीने लढल्या. तरीही अशा दोस्तीकरारांमुळे दोन्ही पक्षांतली दरी सांधली गेली नाही. जे वसाहतवाल्यांच्या बाजूने लढले त्यांच्या आणि ज्यांनी ब्रिटिशांची बाजू घेतली त्यांच्या अशा दोघांच्याही जमिनी हिसकावून घेतल्या गेल्या आणि त्यांना राखीव प्रदेशात हाकलून लावण्यात आले. आफ्रिका आणि भारत यांच्या तुलनेने उत्तर अमेरिकेमध्ये लोकवस्ती फार विरळ होती. आफ्रिकेत अगर भारतात, इंग्रजांना आपला प्रमुख हेतू जो अलगपणा तो सिद्धीस नेण्याकरिता जाति-भेदाचा आश्रय करावा लागला होता. त्या मानाने इथे आपला हेतू ते अधिक परिणामकारक रीतीने साध्य करू शकले. इंडियनांचा समूळ नाश करून अथवा त्यांना आपल्यापासून अगदी अलग राखून अमेरिकेत त्यांनी आपले ईप्सित साध्य केले. इंडियनांबरोबरच्या झगड्याचे स्वरूप हे जमिनीकरिता लढा आणि त्यातून उत्पन्न होणाऱ्या सूडबुद्धीच्या लढाया असे राहिले. तो झगडा तात्त्विक स्वरूपाचा नव्हता– म्हणजे असे की भिन्नवर्गीयांच्या चढाईविरुद्ध चाललेले ते धर्मयुद्ध आहे असे कोणी मानले नाही किंवा इंडियन हे आपल्या मधील मोंगोल [२] आहेत असेही कोणाला वाटले नाही.

म्हणून असे म्हणता येईल की, युरोपियन राष्ट्रांचा जो समुद्रपार विस्तार झाला त्यामुळे वंशवादी तत्त्वप्रणालींना एक पार्श्वभूमी तयार झाली आणि वंशवादाला तत्त्वज्ञानाचे स्वरूप न देताही वांशिक वैरभावाचे पहिले उग्र दर्शन तेथे घडले. युरोपमधील झगड्यात, प्रथम वर्गकलह आणि नंतर राष्ट्राराष्ट्रातील कलह यांना वंशवादाचे तत्त्व लागू केले जाई-पर्यंत आधुनिक विचारधारेत वंशवादाचा शिरकाव झाला नव्हता. परंतु ही एक विचार करण्यासारखी गोष्ट आहे की, जर सरहद्दीवरच्या वांशिक भेदभावांच्या उग्र स्वरूपात त्याचा पाया घातला गेला नसता तर कदाचित हा सिद्धान्त त्यानंतरच्या कलहांचे स्पष्टीकरण करण्यासाठी पुढे आला नसता. कारण, आपण पाहिलेच आहे की, तेथे हा सिद्धान्त वास्तविक अगदीच गैरलागू दिसतो.

## वंशवाद आणि वर्गकलह :

वंशवादाचा उगम वर्गावर्गांच्या कलहात झाला. वरिष्ठ वर्गाच्या लोकांनी सामान्य जनतेविरुद्ध पहिल्या प्रथम या तत्त्वाचा वापर केला. आधुनिक युरोपमध्ये या सिद्धान्ताचे पहिले निवेदन राजाच्याही विरोधी होते. कारण, सरदार-दरकदार हे जसे सामान्य जनांच्या वाढत्या मागण्यांमुळे वैतागून गेले होते तसेच राजा आणि त्याचे मंत्री हेही आपल्या डोक्यावर मिऱ्या वाटत आहेत असे त्यांना १७२७ साली वाटू लागले होते. सरंजामशाही आधुनिक राष्ट्रवादापुढे नामोहरम होऊ लागली होती. पण सरंजामदारी पद्धतीबद्दल व सरंजामदार असलेल्या वरिष्ठ वर्गाबद्दल काँ द बूलेव्हिए (Count de Boulainvilliers) या नॉर्मन गृहस्थाला भलताच आदर वाटत होता. आपले कुटुंबही या प्राचीन वरिष्ठ वर्गापैकी आहे असा दावा मांडून तो सिद्ध करण्याच्या कामाला त्याने वाहून घेतले होते. राजा चौदावा लुई म्हणाला होता, "मी म्हणजेच राज्यसत्ता," आपल्या अरेरावी अधिकारात त्याने सरंजामदारांवर जे कर बसविले होते, त्यामुळे बूलेव्हिएमध्ये अशी एक आकांक्षा उत्पन्न झाली की, आपल्या काळचे हे सरंजामदार राज्यसत्तेविरुद्ध उभे टाकतील आणि आपला प्राचीन गौरव पुन्हा प्रस्थापित करतील. ही आकांक्षा तशी नवी नव्हती. भिन्न परिस्थितीत इंग्लंडमध्ये या आकांक्षेने मॅग्ना कार्टा[२] ला जन्म दिला. परंतु बूलेव्हिएची पद्धत अगदीच वेगळी होती. त्याने वंशवादाला आवाहन केले. सरंजामदार हे जर्मन रक्ताचे होते. याच जर्मन टोळ्यांनी रोमन साम्राज्य पादाक्रांत केले होते. आपल्या राज्यसत्तेसंबंधी असंतुष्ट असलेला रोमन नीतिशास्त्रज्ञ टॅसिटस (Tacitus) याने इ. स. १०० च्या सुमारास या जर्मनांचे मोठ्या उत्साहाने वर्णन केले आहे. त्याचे लेखन ट्राजन (Trajan) या राजाच्या कारकीर्दीतील आहे. तेव्हाचे रोममधील एकूण जीवन त्याला अधःपतित वाटले, त्याला त्या जीवनाचा उबग आला होता. या रानवट जर्मन टोळ्यांचा काटकपणा, उग्रपणा आणि त्यांचे नेतृत्व यांची त्याने फारच स्तुती केली आहे. "त्यांचे सेनापती अधिकारपदाचा उपयोग करून सैनिकांवर ताबा चालविण्याऐवजी स्वतःच्या उदाहरणानेच त्यांच्यावर वचक बसवितात. ते शूर, साहसी आणि क्रियावान आहेत. यामुळे जे कौतुक आणि आदर सैनिकांच्या मनात ते उत्पन्न करू शकतात, त्याच्या जोरावरच ते सैनिकांकडून आज्ञापालन करवून घेतात." बूलेव्हिएच्या प्रतिपादनानुसार, अठराव्या शतकातील फ्रेंच सरदारांना पहिल्या शतकातील जर्मन टोळ्यांच्या वर उल्लेखिलेल्या उच्चवर्गीय स्वातंत्र्याचा वांशिक वारसा लाभला होता. आणि त्यांच्या रक्तातच असलेले उच्चवर्गीय नेतृत्व परत प्रस्थापित करण्याकरिता त्यांचे रक्त उसळत होते. साम्राज्याच्या रोमन कल्पनेतून जी अनियंत्रित राजसत्ता उदयास आली तिचा शेवट त्यांना करावयाचा होता. उलट पक्षी, सर्वसाधारण जनतेची वांशिक घडण निराळी होती. पूर्वी जिंकलेल्या केल्टिक व भूमध्यसामुद्रिक (गॅलो-रोमन) लोकांचे ते वंशज होते. सरदारांना ज्याप्रमाणे त्यांच्या वंशाच्या कारणाने श्रेष्ठ दर्जा मिळालेला होता, त्याच कारणाने सामान्य लोक कनिष्ठ दर्जाचे होते.

परंतु वंशाचे श्रेष्ठत्व प्रतिपादणारा काउंटचा युक्तिवाद काहीही असला तरी प्रत्यक्षात सरदारांना आपले प्राचीन स्थान कायम टिकविता आले नाही. १७९१ मध्ये झालेल्या फ्रेंच राज्यक्रान्तीच्या वेळी बूलेव्हिएने ज्या दोन फ्रान्समध्ये फ्रेंच जनतेची विभागणी केली होती, त्या दोहोंनी आपल्या श्रेष्ठकनिष्ठपणाच्या जागा बदलल्या होत्या. सामान्य जनांच्या प्रवक्त्यांनी वंशवादी युक्तिवाद आता उलट्या दिशेने वापरावयास सुरवात केली. उदाहरणार्थ, अबे सिए ( Abbe ' Sieye 's ) याने मान्य केले की, मूळच्या फ्रँक लोकांनी मिळविलेल्या विजयामुळे सरदारांना काही वंशपरंपरागत हक्क प्राप्त झाले. " पण, " तो म्हणाला, " ठीक आहे. आता आम्हा गॅलो-रोमन लोकांचा बहुजनसमाज या सरदारांना हाकलून काढेल, त्यांची सरदारकी संपुष्टात आणेल आणि अशा तऱ्हेने त्यांना जिंकेल. ज्या तत्त्वाचे ते समर्थन करतात, त्या तत्त्वाप्रमाणेच आमचे हक्क आता त्यांच्या हक्कांवर मात करतील. " त्याचे म्हणणे बरोबरच होते. वंशश्रेष्ठतेचा मूलभूत सिद्धान्त सुटसुटीत करून असा मांडता येईल की, एकदा यश मिळाल्यावर ते वाढतच जाते.

तरी पण, फ्रेंच राज्यक्रान्तीच्या ऐन काळात वंशवादाला बहुजनसमाजात मोठ्या प्रमाणावर मान्यता मिळाली नाही. १८५३ ते १८५७ या दरम्यान वंशवादाची अधिकृत वाणी उच्चारली गेली. ती म्हणजे काँ द गोबिनोचे Essay on the Inequality of Human Races हे पुस्तक बूलेव्हिएप्रमाणेच त्यानेही प्रतिपादन केले की, पिंगट केसांचे ट्यूटन लोक [ ज्यांना तत्कालीन फॅशनप्रमाणे त्याने आर्यन ( आज नॉर्डिक म्हणावे ) म्हटले, ] हेच जगाचे आशास्थान होते आणि नेहमीच राहातील. परंतु त्यात राष्ट्रवादाचा अभिमंत्र नव्हता. बूलेव्हिएप्रमाणे गोबिनो हाही फ्रेंच होता आणि फ्रान्स-मधील राजकीय घडामोडींना तो विटला होता. त्याने आपला दोन खंडांचा प्रबंध हॅनोव्हरच्या पाचव्या जॉर्जला अर्पण केला होता. हा पाचवा जॉर्ज राजा अंधळा असून जर्मन होता. त्याच्या पित्याला प्रजाजनांनी एक प्रागतिक घटना मान्य करावयास लावली होती. ती घटना जॉर्जने त्या वेळी नुकतीच फेकून दिली होती. परंतु सबंध फ्रेंच राष्ट्र हे वंशाने श्रेष्ठ आहे यावर जसा गोबिनोचा विश्वास नव्हता, त्याचप्रमाणे सबंध जर्मन राष्ट्राचे वांशिक श्रेष्ठत्वही त्याला मान्य नव्हते. फ्रान्समध्ये काय किंवा जर्मनीत काय किंवा त्याने स्वीडनला भेट दिली त्या वेळच्या स्कँडेनेव्हियात काय, शुद्ध आर्य रक्ताचे लोक मूठभर देखील नसतील. सगळीच युरोपियन राष्ट्रे गॅलो-रोमन लोकांनी व्यापली होती. आजच्या भाषेत त्या गॅलो-रोमनना केल्टिक, अल्पाइन, भूमध्य सामुद्रिक अशी नावे दिली पाहिजेत. कोणत्याही युरोपियन राष्ट्रात उच्च वंशाचे म्हणवणारे लोक इतके पुरेसे नव्हते की, त्या त्या राष्ट्रात त्यांना काही प्राधान्य मिळावे. प्रबंध लिहिताना गोबिनोची भूमिका आधुनिक राष्ट्र-वादाची नव्हती, तर, बूलेव्हिएप्रमाणे सनातनी अभिजनवादाची होती. ज्या परिस्थितीमुळे नुकतीच १८४८ ची क्रान्ती घडून आली होती, त्या परिस्थितीमुळे तो रागावला होता आणि क्षुब्ध झाला होता. अमीरउमरावांकडे नेतृत्व असलेल्या एका प्रजासत्ताकाची स्थापना

करण्याच्या दृष्टीने काम करण्याकरिता चालू झालेल्या एका नियतकालिकाचा त्याच वर्षी तो स्वतः एक संस्थापक झाला. सर्वत्र बेकारी होती त्यामुळे दैन्य पसरले होते. काहीतरी कृतीची आवश्यकता होती. काम करण्याच्या प्रत्येकाच्या अधिकाराचे तत्त्व मान्य करून घेण्यात समाजवादी नेते यशस्वी झाले होते. शासनातर्फे एक तऱ्हेची रोजंदारीची हमी देणारी योजना सुरू झाली होती. त्यांना राष्ट्रीय लघुउद्योगकेंद्रे म्हणण्यात येई. आज आपल्याला परिचित असलेली अडचण त्यांच्याही पुढे आली. अर्थोत्पादक काम सर्व बेकारांना पुरवणे शक्य होईना व नुसताच बेकारी-भत्ता (डोल) वाटणे प्राप्त झाले. या अपुऱ्या डोल-वाटपाने असंतुष्टांचे जथेच्या जथे निर्माण झाले व ते सरकारला धोकादायक होते. ही सर्वच व्यवस्था एक दिवस अचानक रद्द करण्यात आली. त्यामुळे जूनमधल्या कत्तली झाल्या.– 'आहे रे' आणि 'नाही रे' यांच्यातील आणखी एक झगडा पॅरिसमधील रस्त्यांवरच्या अडथळ्यांबरोबरीने उभा झाला.

गोबिनोच्या प्रबंधामागील ऐतिहासिक पार्श्वभूमी लक्षात घेणे जास्त महत्त्वाचे आहे. कारण, तो काही साक्षेपी अभ्यासक किंवा प्रकांडपंडित नव्हता; ज्याचे बरेवाईट सार्वजनिक जीवनाशी निगडित आहे असा तो एक प्रापंचिक माणूस होता. त्याच्या आयुष्यात त्याने मंत्रिमंडळाचा सचिव, पर्शियातील परराष्ट्रवकील, ब्राझील व अनेक युरोपियन राष्ट्रांच्या राजधान्यांतून आपल्या सरकारचा प्रतिनिधी असे निरनिराळे हुद्दे भूषविले होते. तो कादंबरीकार, नाटककार व प्रवासवर्णनकारही होता. जेथे गरीब जनता निराश होती व जगण्याकरिता काही साधने मागत होती अशा जगात तो सापडला होता. रूसोच्या 'सोशल कॉन्ट्रॅक्ट'[४] सिद्धान्ताचा आधार घेऊन किंवा अगदी हॉब्सची[५] शासनसंस्थेसंबंधीची कल्पना उचलून धरून गरिबांच्या मागण्या धुडकावून लावणे काही शक्य नव्हते. परंतु उपजत कनिष्ठपणाचा आधार दाखवून– म्हणजेच वांशिक आधारावर मात्र तसे करणे शक्य झाले असते. त्याने स्वतःच लिहिल्याप्रमाणे त्याचा उद्देश गरीब लोकांच्या वाढत्या मागण्यांशी चांगली लढत द्यावी हा होता. उदारमतवादाशी द माइस्त्रे व द बोना (de Maistre and de Bonald) यांच्याहून अधिक चांगली झुंज[६] त्याला द्यावयाची होती.

म्हणून अशा तऱ्हेचा लढा ज्याने नुकताच दिला होता त्या हॅनोव्हरच्या पाचव्या जॉर्जला आपला ग्रंथ अर्पण करताना तो लिहितो : "हळूहळू माझी खात्री झाली आहे की, वंशविषयक प्रश्न इतिहासातील इतर सर्व प्रश्नांशी निगडित आहेत. त्या एका प्रश्नाच्या उत्तराने इतर सर्व प्रश्नांचा उलगडा होतो. आणि ज्या अनेक वंशांच्या मिश्रणातून एखादे राष्ट्र निर्माण होते, त्यांच्यातील विषमतेमुळे, त्या राष्ट्राच्या भवितव्यतेची नीट उकल होते. शेवटी, मी आपली खात्री करून घेतली की, विज्ञान, कला, संस्कृती या मानवी कृतींतील जे जे म्हणून फलदायी, उदात्त व महान आहे, त्या सगळ्याचा उगमबिंदू एकच आहे. ते एकाच वंशशाखेचे कर्तृत्व आहे. जगातील सर्व सुसंस्कृत देशांतून याच शाखेच्या वेगवेगळ्या उपशाखा प्रभुत्व गाजवीत आहेत." सर्व देशांवर प्रभुत्व गाजविणारे हे खानदानी

लोक आज समान हक्कांच्या दाव्यांमुळे आणि लोकशाहीच्या अधःपातामुळे धोक्यात आले होते. जगातील मानवंशांची जेव्हा त्याने काळे, पिवळे, गोरे अशी वर्गवारी केली तेव्हा त्याच्या मताने अल्पाइन शाखा ही पीतवंशातून निघालेली व भूमध्यसामुद्रिक हे कृष्णवर्णीय वंशाचे असे होते. म्हणून युरोपमध्ये त्याच्या मताने खरे गोरे लोक म्हणावयाचे ते म्हणजे आज ज्याला नॉर्डिक म्हणतात त्याच गटाचे लोक होत. संस्कृतीचे भवितव्य ज्यांच्यावर केंद्रित करता येईल असे हे एवढेच. फक्त त्यांच्याजवळ विचारशील कार्यक्षमता, दीर्घोद्योग, सुव्यवस्थेविषयी सहजप्रवृत्ती, स्वातंत्र्यप्रीती आणि आत्मसन्मान आहे. युरोपात त्यांची स्थानभ्रष्टता झाली तर ती संस्कृतीची संध्याकाळच !

गोबिनोची शिकवण ही राष्ट्रवादाची शिकवण आहे असे मानण्यात विसाव्या शतकातील त्याच्या अनुयायांनी गोबिनोच्या शिकवणुकीचा विपर्यास केला आहे. जेथे जेथे गोबिनोच्या लिखाणात आर्यन असा उल्लेख आला तेथे तेथे आज जर्मनीत 'आधुनिक जर्मन' असा त्याचा अर्थ केला जातो. पण वस्तुतः गोबिनोने असे आग्रहाने म्हटले आहे की, आर्यन लोक हे इतरत्र आढळतात त्याहून जर्मनीत ते अधिक आहेत असे नाही. त्याच्या वंशवादी सिद्धान्तांत राष्ट्रवाद अभिप्रेत आहे असे मानणारे आधुनिक टीकाकारही त्याच्या प्रतिपादनाचा चुकीचा अर्थ लावतात आणि म्हणून ते ज्या विसंगती व व्याघात दाखवून देऊ पाहतात ती गोबिनोच्या प्रतिपादनातून उत्पन्न होतात असे म्हणण्यापेक्षा टीकाकारांच्याच गैरसमजातून उद्भवतात असे म्हटले पाहिजे. कोणतीच संस्कृती एका शुद्ध वंशाची कमाई नाही यावर गोबिनोने वारंवार भर दिला आणि तरीही तो असा निष्कर्ष काढतो की, जेव्हा समाजपुरुषाचे रक्त निर्मळ आणि शुद्ध राहात नाही तेव्हाच फक्त तो समाज रसातळाला जातो. या गोष्टीचे गोबिनोचे टीकाकार मोठे भांडवल करतात. जर गोबिनो राष्ट्रवादाचा जाहीरनामा लिहीत असता तर या गोष्टीला विसंगती म्हणता आले असते. पण कमअस्सल श्रमिक वर्गाकडून धोका उत्पन्न झालेल्या वरिष्ठ वर्गाच्या उर्वरित भागाच्या भूमिकेचे तो समर्थन करीत होता. जेथे उच्चवर्ग हा जन्मावरून ठरत असतो अशा विजेत्या खानदानी वर्गाच्या भाग्याबरोबर संस्कृतीही खालीवर हेलकावे खात असते असे सिद्ध करण्याचा प्रयत्न त्याच्या सबंध ग्रंथात आहे. जेव्हा सभोवतीच्या सामान्य जनतेमध्ये उच्च वर्ग लुप्त होऊन जातो तेव्हा देशाचा विनाश हा ठरलेलाच असतो असे त्याचे म्हणणे होते.

म्हणून आपल्या वंशवादाला आधारभूत वस्तुस्थिती म्हणून गोबिनो मान्य करतो की, सर्वच संस्कृती या अनेक वंशांच्या मिश्रणातून उत्पन्न झाल्या आहेत. त्याने वर्णिलेला आर्यवंश हा राज्यकर्त्यांचा वंश होता. आणि 'संस्कृतीची स्थापना करू पाहणाऱ्या प्रत्येकाला वाटणारच की, त्याच्या समाजाचा कणा जो मध्यमवर्ग तो पीतवंशीय लोकांचा असावा.' (फ्रान्समध्ये संख्येने बरेच अधिक असलेल्या अल्पाइनवंशीय लोकांना तो पीतवंशीय म्हणतो.) तो म्हणतो, "प्रत्येकच वंशसंकर हा वाईट आणि हानिकारक असतो असे मानणे

चुकीचे आहे. खरोखरी, सौंदर्याच्या दृष्टीने पाहता सर्वांत उत्तम वंशमिश्रण म्हणजे काळे व गोरे यांची संतती होय. (गोबिनोने भूमध्य सामुद्रिक वंशाच्या लोकांना कृष्णवंशी मानले होते. फ्रेंच माणूस काळा व गोरा यांच्या वंशसंकराविषयी बोलू शकतो, एखाद्या अँग्लो-सॅक्सन माणसाला असे बोलण्याचा धीर होणार नाही.)

सर्वच राष्ट्रे ही अनेक वंशांच्या मिश्रणांनी बनलेली असतात या वस्तुस्थितीचा अर्थ गोबिनो असा लावतो की त्या देशांतील नागरिकांचे निरनिराळे वर्ग– स्तर असतात आणि त्या देशांचा गौरव हा त्यांपैकी फक्त एका वर्गावर अवलंबून असतो. कोणत्याही संस्कृतीचा शुद्ध वंश हा आधार असतो असे मत त्याने कधीच मांडले नाही. "खिस्तजन्माइतक्या पूर्वीच्या काळीच आर्यवंशाचे शुद्धत्व संपले होते." तरी पण त्याचे सर्व प्रतिपादन हे राष्ट्राच्या नव्हे तर व्यक्तीच्या वंशप्रकारात स्थिरता असण्यावर अवलंबून होते आणि ते त्याच्या दृष्टिकोणाशी सुसंगतही होते. 'आमच्या आर्यवंशाचे श्रेष्ठत्व' हे आनुवंशिकतेने एका पिढीपासून दुसऱ्या पिढीकडे अविच्छिन्नपणे येत आलेले आणि अ–क्षर असे आहे. या वंशप्रकारावर हवामान, भूप्रदेश अथवा कालावधी, कशाचाच परिणाम होत नाही. या अविकारीपणावरच अभिजनवर्ग व सामान्य जनता यामधील अनुल्लंघ्य दरी टिकून आहे, तसेच जागतिक इतिहासातील अभिजनवर्गाचे महत्त्व व दुसऱ्या वर्गाचे क्षुद्रत्व हेही या अविकारित्वावरच आधारले आहे. संस्कृतीच्या उदात्त ध्येयांतील आपले जीवनकार्य काय आहे याची जाणीव उच्चवर्गीय आर्यवंशाच्या त्या वेळी थोड्या उरलेल्या लोकांना करून देणे आणि या जीवनकार्यासंबंधी आदर बाळगणे हेच आपले एकमेव कर्तव्य आहे अशी आर्येतरांची खात्री पटवून देणे याकरिता गोबिनोने लेखनाचा प्रपंच केला.

गोबिनोला वाटे की, आपल्या सर्वश्रेष्ठ आर्य वंशाची माणसे इतस्ततः पसरलेल्या एक एक व्यक्ती म्हणूनच शोधून काढावी लागतील, हीच माणसे त्यांच्या वंशदत्त नियती-मुळे जगाचे आशास्थान आहेत. पण त्याला हेही माहीत होते की, तो स्वतः याच वेचक माणसांपैकी एक होता. त्याने आपल्या घराण्याच्या वंशावळीचे संशोधन केले होते. ते संशोधन त्याने ८७९ साली 'The History of Ottar Jarl, Norwegian Pirate, Conqueror of Bray in Normandy and of His Descendents' या शीर्षकाखाली प्रसिद्ध केले. त्या संशोधनपर ग्रंथाच्या प्रस्तावनेदाखल म्हणून त्याचा Essay on Human Inequality हा निबंध त्याने लिहिला. व्हायकिंग्ज[७] पर्यंत जाऊन पोचणाऱ्या इतर सगळ्या वंशावळींच्या इतपतच हीही वंशावळ अस्सल होती. हा सर्व खटाटोप त्याने आवडीने केला. परिणामतः त्याने आपल्या संपन्न पांढरपेशा पित्याचा संबंध सोडला व त्या राजपुत्रांच्या वंशजांपैकी आपण एक असा संबंध जोडला. अशा थोड्या निवडक लोकांच्या वांशिक कुलपरंपरेवर त्याची श्रद्धा होती– एखाद्या राष्ट्राच्या शुद्ध वंशावर नव्हे.

गोबिनोचा प्रबंध हा आजही वंशवादावरील सर्वमान्य ग्रंथ आहे. पण त्यातील प्रतिपादन आज राष्ट्रवादी प्रचार म्हणून जगभर इतके वाचले जाते की, इतिहासातील त्याच्या वास्तविक स्थानाबद्दल गैरसमज होतो. गोबिनो हा फ्रेंचांच्या बाजूचाही नव्हता किंवा जर्मनीचाही अभिमानी नव्हता. त्याच्या अनुयायांनी यांपैकी एका अथवा दुसऱ्या बाजूचे मंडन करण्याकरिता ग्रंथावर ग्रंथ भरले तरी वास्तविक गोबिनो हा केवळ खानदानीचा अभिमानी होता. त्याला देशभक्तीचा तिरस्कार होता. त्याला वाटे की, देशभक्ती म्हणजे संकुचित असा लॅटिन प्रांतवाद आहे. उच्चवर्गीयांनी त्याच्या आहारी जाता कामा नये. त्याने लिहिले आहे की, १८७० मध्ये युद्धात फ्रान्सचा पराभव झाला याचे एक कारण म्हणजे राष्ट्रवाद. आयुष्याच्या उत्तरार्धात तो ठामपणे सरकारविरोधी होता. याच कारणाकरिता, आजचे फ्रेंच वंशवादी त्याच्या प्रतिपादनातील मुद्दे उचलतात, पण त्यांचे मूळ सांगत नाहीत. १८७० च्या युद्धातील फ्रान्सच्या एकूण वर्तनाबद्दल जो कडवटपणा त्याच्या लिखाणात आहे तो या लोकांना पसंत नसतो. उच्चवर्गीय आणि त्यांची संस्कृती यांच्या श्रेष्ठत्वास जोड नाही असा त्याचा संदेश होता आणि या श्रेष्ठतेला जेव्हा आव्हान दिले जात नसे त्या गतकालीन सुवर्णयुगाकडे त्याचे डोळे खिळलेले असत. व्यापारउदीमाविषयीचा त्याचा तिरस्कार उच्चवर्गीयांना साजेसाच होता. व्यापारउदीम या गोष्टी वांशिक संकराची कटू फळे आहेत असे त्याला वाटे. आधुनिक तांत्रिक शोधांविषयीही त्याला आदर नव्हता. मुद्रण-कला, वाफेच्या शक्तीचा शोध, अनेक यांत्रिक शोध या व अशा तऱ्हेच्या ज्या गोष्टी आहेत त्या केवळ निम्न क्रमाच्या आहेत, तिकडे अस्सल आर्य लोकांनी लक्ष देण्याचे कारण नाही. सामान्य लोकांनीच त्यात लक्ष घालावे असे त्याचे मत असे.

गोबिनोचे लिखाण १८५० ते १८६० या दशकाच्या सुरुवातीचे आहे. तेव्हा मानव-मितिविषयक मोजमापे थोडी उपलब्ध होती आणि होती ती काटेकोरही नव्हती. डार्विनचा Origin of Species हा ग्रंथही तोपर्यंत प्रसिद्ध झाला नव्हता. वांशिक गुणवैशिष्ट्यांची जी विभागणी आज ज्ञात आहे ती किंवा जननविज्ञानाचे सिद्धान्त हे त्याला अगोदरच माहीत असल्यासारखे नव्हते. डार्विननंतर वंशवादी घोषणात 'जो लायक असेल तो टिकेल' या घोषणेचा अंतर्भाव झाला. परंतु गोबिनोच्या आदर्श आर्यांच्या चित्रणात मात्र आर्य हे मानवजातीची सुंदर पुष्पे होते आणि पुष्कळदा त्यांना त्याने कुसुमकोमल असे गुण चिकटवले.

त्यामुळे त्याच्या वारसदारांनी त्याच्या सिद्धान्ताचा विकास दोन दिशांनी केला आहे. एक म्हणजे मानवमितिविषयक मोजमापांना 'अर्थ' लावून आणि दुसरी दिशा 'जो लायक असेल तो टिकेल' या घोषणेची. डार्विनच्या या उसनवारीच्या आश्रयामुळे गोबिनो-नंतरच्या वंशवादी मतांमध्ये, 'जिंकून घेणे' आणि 'बल' या बाबींना अधिकाधिक पावित्र्य दिले गेले आहे. जे जेते असतील– मग ते खास हक्क असलेले उच्चवर्गीय म्हणून चित्रित केलेले असोत वा सर्व वर्गांचा समावेश असलेले एखादे राष्ट्र असो, ते विजयी झालेले

असतात याचे कारण म्हणजे निसर्गतःच ते सर्वांत लायक असतात– अशा रीतीने 'बळी तो कान पिळी' या जुन्या म्हणीला एक 'शास्त्रीय' आधार दिला गेला.

एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धात फ्रान्समध्ये मानवमितिविषयक मोजमापे घेण्याच्या दिशेने होत असलेली वंशवादाची वाढ एकदम जोमाने झाली. फ्रान्समधील ब्रॉक (Broca), लपूज (Lapouge) व जर्मनीतील ॲमान (Ammon) यांची नावे या संदर्भात विशेष प्रसिद्ध आहेत. आपल्या अत्युत्साही संप्रदायास 'मानव समाजशास्त्र' असे नाव त्यांनी घेतले. कल्पनेत रममाण होणाऱ्या गोबिनोच्या अगदी उलट यांची रीत होती. या संशोधकांनी अफाट मोजमापे गोळा केली, संख्याशास्त्रीय पद्धती वापरल्या आणि वैश्विक समस्यांचे उत्तर शोधण्यापेक्षा विशिष्ट प्रश्नांची उत्तरे शोधण्याचा त्यांनी प्रयत्न केला. तरी पण खरोखरी, ते बूलेन्व्हिए-गोबिनो संप्रदायाचेच वंशवादी होते. कारण की, आपल्या साधनसामग्रीचा त्यांनी राष्ट्रवादाकरिता उपयोग केला नाही, त्यांचे लक्ष वर्गावर्गातील श्रेष्ठ-कनिष्ठपणाकडे होते. एकाच फ्रान्स देशात असलेले दोन फ्रान्स, एकाच जर्मनीतील दोन जर्मनी त्यांनी अभ्यासान्ती वेगळे केले. ते वेगळे भाग म्हणजे दीर्घशिरस्क (लंबकपाली) नॉर्डिक आणि पृथुशिरस्क अल्पाइन लोक होत. त्यांच्या आधीच्या वंशवाद्यांप्रमाणेच त्यांच्या मतानेही 'निवडक' लोक म्हणजे दीर्घशिरस्क नॉर्डिक होते. पश्चिम युरोपातील निरनिराळ्या मानवजातींतील श्रेष्ठकनिष्ठता कशी ठरवावी हा त्यांच्यापुढील प्रश्न होता. त्यांच्या भूमिकेत राष्ट्रवादाचा अभाव असल्यामुळे ऱ्हाइन नदीच्या दोन्ही तीरांवर हा संप्रदाय सुसंवादीपणे काम करू शकला. ॲमानने जर्मनीत बादेन (Baden) येथे काम केले तर ब्रॉक व लपूज यांनी फ्रान्समध्ये संशोधन चालविले.

मानवमितिविषयक मोजमापे मोठ्या प्रमाणात वापरून त्यांनी दाखविले की, दीर्घ-शिरस्क (नॉर्डिक) वंश हा साहसी व आक्रमक असतो तर पृथुशिरस्क (अल्पाइन) हे भित्रे व हार खाणारे असतात. लपूजने आलंकारिक भाषेत सांगितले की, दीर्घ-शिरस्क हे शिकाऱ्यांची टोळी म्हटले तर पृथुशिरस्क गट हे उधळून लावलेली मेंढरे आहेत. येथील शिकारी माणसे म्हणजे 'निवडक लोक' होत. 'जो लायक तोच टिकेल' या डार्विनप्रणीत तत्त्वाचा या संप्रदायाने जो स्वीकार केला होता त्याला हे धरूनच होते. अर्थात, युरोपातील मस्तकांच्या मोजमापांवरून शिकारी आणि मेंढरे चटकन वेगळी ओळखता येत नाहीत. तरी पण एक उदाहरण निर्णायक म्हणून विचारात घेतले गेले : ग्रामीण भागापेक्षा शहरे अधिक प्रगत असतात, त्या अर्थी हे निवडक लोक शहरात एकत्रित झाले असले पाहिजेत. खरोखर वस्तुस्थिती तशी होतीही. तथाकथित मानव-समाजशास्त्राच्या उदयापूर्वी दक्षिणमध्य फ्रान्समध्ये, उत्तर इटलीमध्ये आणि जर्मनीमध्ये अशी परिस्थिती आहे याची नोंद झालेली होती. ही गोष्ट गोबिनोच्याही लक्षात आली होती. फक्त, त्याच्या अभिजनवादी परिभाषेत तो शहरवासी अशी नोंद घेण्याऐवजी वरच्या वर्गाचे अमीरउमराव अशी गणना करीत असे. शहरातील व ग्रामीण भागातील मस्तकाच्या

आकाराच्या सरासरीत पडणाऱ्या फरकाचा अर्थ ॲमानने असा लावला की, हा सामाजिक निवडीचा पुरावा आहे. शहरातून असलेली दीर्घशिरस्कांची अधिक सरासरी हे दाखविते की, त्यांची क्षमता अधिक आहे व ते निवडीच्या तत्त्वाने तेथे आले आहेत. प्राणिजातींच्या इतिहासात नैसर्गिक निवडीला डार्विनने जे स्थान दिले तेच मानवी इतिहासात ॲमानने सामाजिक निवडीला देऊ केले. पृथुशिरस्कांच्या मानाने दीर्घशिरस्कांचे असलेले शहर-भागातील एकत्रीकरण याला ॲमानचा नियम म्हणतात आणि दीर्घशिरस्कांची वांशिक श्रेष्ठता सिद्ध करण्याकरिता त्याचा उपयोग करीत असत.

वंशश्रेष्ठतावादी परंपरा नसत्या आणि गोरटेल्या, निळ्या डोळ्यांच्या दीर्घशिरस्कांचे पवित्र मानले गेलेले श्रेष्ठत्वाचे दावे नसते तर या संप्रदायाने पुढे मांडलेल्या युक्तिवादां-वरूनच वस्तुस्थितीचा अर्थ अगदी उलट बाजू सिद्ध करणारा असाही लावता आला असता. कारण, त्यांनी गोळा केलेला सर्व पुरावा दाखवत होता की, सरासरी कपालांक एकसारखा वाढतो आहे– म्हणजे दीर्घशिरस्कांपेक्षा पृथुशिरस्क संख्येने वाढत आहेत. तसेच, त्वचेचा वर्णही जास्त जास्त काळसर होत आहे. ग्रामीण भागापेक्षा शहरातील लोकसंख्या जास्त वेगाने वाढत असल्यामुळे हे पडणारे फरक शहरात अधिक लक्षात भरतात. मग सामाजिक निवडीच्या यंत्रणेने पृथुशिरस्कांची निवड होत आहे असे का म्हणू नये? या मानव-समाजशास्त्रसंप्रदायाने केवळ कपालांकांच्या आकडेवारीवर लक्ष केंद्रित केले आणि पृथु-शिरस्क हे आयुर्मानाच्या अथवा प्रसवक्षमतेच्या बाबतीत कमी पडतात असे काही सिद्ध करण्याच्या भानगडीत ते पडले नाहीत.

या वस्तुस्थितीच्या स्पष्टीकरणांपैकी एक चूक व दुसरे बरोबर अशी निवड करण्याची गरजच नाही. कारण, ही वस्तुस्थिती सार्वत्रिक नाही असे लवकरच सिद्ध झाले. लीव्ही ( Livi ) [८] ने इटलीच्या सैन्यातील आकडेवार माहिती गोळा करून दाखवून दिले की, पिडमाँटसारख्या काही विभागांत, जर्मनीतीलप्रमाणेच भोवतालच्या ग्रामीण परिसरा-पेक्षा शहरी लोकसंख्या सरासरीने अधिक दीर्घशिरस्क होती. परंतु पालेर्मोसारख्या अन्य काही विभागात वस्तुस्थिती बरोबर उलट होती. याचे स्पष्टीकरण सोपे आहे. ग्रामीण लोकवस्तीपेक्षा शहरात अधिक मोठ्या परिसरातून लोक गोळा होतात. त्यामुळे दीर्घशिरस्क असो की पृथुशिरस्क असो, ग्रामीण क्षेत्रापेक्षा नागरी लोकवस्ती निराळी दिसते. कोणत्याही वंशाच्या श्रेष्ठ अथवा कनिष्ठपणाचा त्यात काही संबंध नाही.

मानव-समाजशास्त्राच्या या संप्रदायाने जी आकडेवारी गोळा केली त्यातील पुनरा-वर्तन हे महत्त्वाच्या फरकांपेक्षा अधिक लक्षवेधी आहे. शहरी भागात जन्मलेले आणि ग्रामीण भागात जन्मलेले लोक या दोहोंच्यातही कमाल आणि किमान यांच्यातील अंतर एकच आहे. फक्त, शहरात दीर्घशिरस्क पृथुशिरस्कांपेक्षा थोडेसे संख्येने जास्त आहेत एवढेच. हायडेलबर्गमध्ये शहरातून आलेल्या विद्यार्थ्यांचा कपालांक ८१ आहे तर ग्रामीण

भागातून आलेल्या विद्यार्थ्यांचा कपालांक ८२·७ आहे. अशा परिस्थितीत शहरातील दीर्घशिरस्कांच्या एकत्रीकरणाची ही भाषा वस्तुस्थितीचा विपर्यास ठरते. सर्व मोजमापांनी एकच सत्य सिद्ध झाले ते हे की, शहरातून व ग्रामीण भागातून सापडणाऱ्या कपालांकांचे कमाल किमान अंतर सारखेच आहे. जरी असे धरले की, सर्व नगरवासी जन्मतःच ग्रामवासीयांपेक्षा श्रेष्ठ असतात तरी, बहुतांश शहरवासी हे दीर्घशिरस्क नसतात हे खरे आहे.

आधुनिक अभ्यासकांना या मानव-समाजशास्त्र संप्रदायाचे सबंध वंशवादी प्रतिपादन बढाईखोर व विस्तृत वाटते. आणि सर्वस्वी कपालांकांवर असलेला त्यांचा भर तर संपूर्णपणे असमाधानकारक वाटतो. वंशवादी सिद्धान्तांच्या इतिहासात या संप्रदायाचे महत्त्व हे की, त्यात युगातील बदलत्या परिस्थितीचे प्रतिबिंब पडले आहे. तो संप्रदाय अद्याप राष्ट्रवादपूर्व स्थितीत होता, विसाव्या शतकातील देशभक्तीपर घोषणा त्या संप्रदायाच्या मनातसुद्धा आल्या नसत्या. त्याच्यापुढील समस्या ही राष्ट्रामधील निरनिराळ्या थरांच्या श्रेष्ठकनिष्ठपणाची होती. परंतु ही समस्या उच्चवर्गीयांची किंवा सरंजामशाहीची अशा स्वरूपात जशी बूलेन्हिए आणि गोबिनो यांनी मांडली तसे न करता, १८५०-१९०० मधील अभ्यासकांनी ती शहरी प्रतिष्ठेच्या स्वरूपात पाहिली. त्यांना अर्थातच, अमीरउमरावांच्या वंशजांची मोजमापे घेऊन त्या मोजमापांची पांढरपेशे किंवा शेतकरी यांच्या मोजमापांशी तुलना करता आली असती आणि आधीच्या पिढ्यांची जी परिस्थिती होती तशी त्यांची असती तर निःसंशयपणे त्यांनी तसे केलेही असते. या नागरी युगात त्यांनी आपली सामग्री शहरवासीयांची वैशिष्ट्ये दाखविण्याकरिता जुळवली आणि या वैशिष्ट्यांपासून शहरवासीयांची जन्मजात श्रेष्ठता उत्पन्न केली.

वंशवाद हा मुळात एका वर्गाच्या जन्मजात श्रेष्ठत्वाचा सिद्धान्त असतानाही तो युरोपमध्ये गेल्या शतकाच्या अखेरीअखेरीस काही राष्ट्रांच्या श्रेष्ठत्वाचा सिद्धान्त बनला, परंतु अमेरिकेत मात्र त्याचा मूळचा अर्थच कायम राहिला आहे. अमेरिका खंडात इतर शस्त्रसज्ज राष्ट्रांचा उपद्रव त्या मानाने कमी आहे याचे व युरोपातील सर्व वांशिक गटांचे प्रतिनिधी असलेल्या स्थलांतरितांची संख्या, त्यांचे एकमेकांशी प्रमाण व त्यांचे अलीकडेच झालेले आगमन यांचे प्रतिबिंबच या घटनेत पडले आहे. अमेरिकेत अगदी प्रथम वसाहत करणारे लोक उत्तर व पश्चिम युरोपमधून आलेले होते. पण जशी युरोपातील परिस्थिती बदलली तसे १८९० च्या सुमारास मुख्यतः दक्षिण व पूर्व युरोपमधून लोक अमेरिकेत स्थलांतर करू लागले. यामुळे जे वंशवादी वाङ्मय उत्पन्न झाले त्यात नॉर्डिक वंशाची श्रेष्ठता आणि बिगरनॉर्डिकांचा हलकेपणा आग्रहाने मांडून असा निष्कर्ष काढला आहे की, उशिरा येणारे स्थलांतरित व अगोदरचे वसाहतवाले यांच्यात रक्ताची भेसळ होऊन अमेरिकन राष्ट्र धोक्यात येत आहे. युद्धोत्तर काळात ज्या अडचणी उभ्या राहिल्या त्यांचे खापर सर्रास-पणे अमेरिकेच्या स्थलांतरितविषयक धोरणावर आणि त्या धोरणाचा फायदा घेतलेल्या अगदी

अलीकडच्या स्थलांतरितांच्या गटांवर फोडण्यात आले. उघडच आहे की, हे स्थलांतरित लोक अगदी गरीब होते आणि मुख्यतः बिनकसबी मजूर म्हणूनच काम करू शकत होते. त्यांचा सर्व मिळून एक गट मानला तर या नव्या गटाची कर्तबगारी जुन्या, १८९० पूर्वीच्या वसाहतवाल्यांच्या मानाने खूपच कमी होती. पोलिश व इटालियन स्थलांतरित हे बिगर-नॉर्डिक असल्यामुळे जन्मतःच कनिष्ठ दर्जाचे आहेत. म्हणून त्यांची ही अशी परिस्थिती आहे असे ठरवून, ऐतिहासिक व सामाजिक वस्तुस्थितीची गुंतागुंत अमेरिकन वंशवाद्यांनी एका झटक्यात सोडवली.

सिद्धान्ताच्या अशा तऱ्हेच्या स्पष्टीकरणाकरिता अमेरिकन वंशवाद्यांनी जे मुद्दे वापरले ते गोबिनो व हूस्टन चेंबर्लेन यांच्या लिखाणातून घेतले होते. मॅडिसन ग्रँट ( Madison Grant ) याच्या म्हणण्याप्रमाणे, " युरोपातील प्रत्येक राष्ट्रात असलेले नॉर्डिक रक्ताचे प्रमाण हे त्या त्या राष्ट्राच्या लढाऊ ताकदीचे व संस्कृतिसोपानावरील स्थानाचे उत्तम निदर्शक आहे. "[९] परंतु त्याने केलेला या तत्त्वाचा वापर जर्मन आणि फ्रेंच वंशवाद्यांना पसंत पडण्यासारखा नाही. तो पुढे म्हणतो, " आजचे जर्मन लोक हे मुख्यतः शेतकरी वर्गाचे वंशज आहेत.–शेतकरी वर्ग हे लेखकाने पृथुशिरस्क अल्पाइनांना दिलेले पर्यायी नाव होय– आणि यावरूनच आज जर्मन सैन्यात दिलदारपणा, स्त्रीदाक्षिण्य आणि कैदी व जखमी सैनिक यांच्याशी सभ्य वागणूक यांची इतकी भयानक दुर्मिळता का ते कळून येते. "[१०] " फ्रान्सचा ऱ्हासही याच तऱ्हेने झाला आहे. ( अल्पाइन व भूमध्यसामुद्रिक ) या रानटी व खोलवर मूळ धरलेल्या वंशगटांची फ्रान्समध्ये क्रमाक्रमाने नवीन नवीन आवक होऊ लागल्यापासून फ्रान्समधील नॉर्डिक घटकांना उतरती कळा लागली आहे आणि त्याबरोबरच राष्ट्राचा जोमही ओसरतो आहे. "[११] अशाच प्रकारे एका वंशाची जागा दुसऱ्या वंशाने घेतल्यामुळेच " आजचे स्पॅनिश लोक मूर्ख व धर्मभोळे झाले आहेत. " इंग्लंडमध्येसुद्धा नॉर्डिक लोकांची संख्या घसरते आहे. The Passing of the Great Race या पुस्तकाचा लेखक अमेरिकन आहे. त्यामुळे युरोपातील अशा या निराशाजनक परिस्थितीमुळेच अमेरिकेला चांगले दिवस येतील असे त्याला वाटते. त्यासाठी जुन्या स्थलांतरितांनी आपले प्रभावी स्थान कायम राखले पाहिजे. कारण की, अगदी यादवी युद्धाच्या वेळेपर्यंत आपल्या देशातील श्वेतवंश हा शुद्ध नॉर्डिक शाखेचा होता. नुसता नॉर्डिक नव्हे तर ट्यूटॉनिक, आणि या ट्यूटॉनिक लोकांपैकी बरेचसे अगदी कडक अर्थात अँग्लो–सॅक्सन होते. त्यामुळे ते शुद्ध ट्यूटॉनिक होते.[१२] या पुस्तकाच्या लेखनकाळीसुद्धा बहुसंख्य अमेरिकन नॉर्डिक शाखेचेच होते असे लेखकाने म्हटले आहे. जे वैभवशाली स्थान युरोपने गमावले आहे ते अमेरिकेला मिळवायचे असेल तर, ' आपल्या लोकांच्या ज्या आनुवंशिक गुणविशेषांमुळे आपल्या देशाचा धार्मिक, राजकीय वा सामाजिक पाया घातला गेला ते आनुवंशिक गुणविशेष हळूहळू नष्ट होत आहेत व त्यांपेक्षा कमी उदात्त असे गुणविशेष न कळत त्यांची जागा घेऊ पाहात आहेत या गोष्टीशी झुंज दिली पाहिजे[१३] असे ग्रँटच्या पुस्तकाला

वं...८

लिहिलेल्या प्रस्तावनेत हेन्री फेअरफील्ड ओस्बोर्न ( Henry Fairfield Osborn ) याने म्हटले आहे. यानंतरच्या अमेरिकेतील वंशवादी पुस्तकातून नॉर्डिक वंशाचे स्वास्थ्य राखण्यावर म्हणजे कमी प्रतीच्या लोकांच्या संसर्गाने भेसळ होऊन आपल्या विशेष जातीचे रक्त मिश्र न होऊ देणे यावर इतका भर दिला गेला की, तसे करणे म्हणजे देशभक्तीचा कळसच होय असे मानले गेले.

कालौघात गंजून गेलेले हे सिद्धान्त अमेरिकेत लागू करणे अत्यंत मूर्खपणाचे होते. युरोपात लिहिल्या गेलेल्या वंशवादी वाङ्मयाचे परीक्षण करताना या आधीच आपण युरोपातील नॉर्डिक वंशाचे श्रेष्ठत्व सांगणाऱ्या बिनबुडाच्या सिद्धान्ताचे परीक्षण केलेच आहे. श्रेष्ठत्वावरील या अधिकाराची ग्रँटने केवळ पुनरुक्ती केली होती. परंतु सर्वच जुने अमेरिकन वसाहतवाले हे नॉर्डिक आहेत असा युक्तिवाद युरोपातील वंशवाद्यांनी केला नव्हता. ग्रँटने हा युक्तिवाद कोणत्या मानवमितीय मापनांवरून केला होता असे नाही. तर १८६० पूर्वी अमेरिकेत आलेल्या स्थलांतरितांच्या आधीच्या राष्ट्रीयत्वाच्या याद्या पाहून केला होता. त्याने स्वतः असा मुद्दा मांडला की, या स्थलांतरितांचा जो मुख्य उगम, इंग्लंड व जर्मनी, त्यातील नॉर्डिक संख्याबहुत्व त्या काळी विलयास चालले होते, किंबहुना गेले होते. म्हणून त्याने असे सिद्ध करावयास हवे होते की, काही कारणांमुळे या देशांच्या लोकसंख्येतील नॉर्डिक अंशांची ' वांशिक निवड ' होऊन बिगरनॉर्डिक अंश मागे उरला होता. पण तसे करणे त्याला जमले नाही. प्रत्यक्षात कशीही निवड झाली असो, तरी त्यामुळे पिंगट केसांच्या इंग्रजांनी स्थलांतर केले आणि काळ्या केसांचे इंग्रज युरोपात मागे राहिले असे झाले नाही. स्थलांतरामागील प्रेरणा सर्वसाधारणपणे आर्थिक होती आणि काळ्या केसांच्या व पिंग्या केसांच्या अशा दोन्ही लोकांत ती एकाच प्रकारे कार्यशील होती.

Ales Hrdlicka [१४] याने ' जुन्या अमेरिकनांचे ' मानवमितिशास्त्राच्या आधारे एक विश्लेषण केले आहे. त्या विश्लेषणावरून ग्रँटच्या गृहीतकृत्याचा फोलपणा अगदी स्पष्ट होतो. ज्यांचे ओळीने चारही पूर्वज अमेरिकन भूमीवर जन्मले आहेत अशा दोन हजार अमेरिकनांचे या विश्लेषणासाठी निरीक्षण करण्यात आले. या जुन्या अमेरिकनांपैकी फक्त ५·३ टक्के लोकांचा केसाचा रंग फिका होता, तर १६ टक्के लोकांचा फिकट तपकिरी होता. केस, त्वचा व डोळे यांचा रंग ७५ टक्के लोकांमध्ये ' मध्यम ' किंवा ' काळसर ' होता. हक्सले ( Huxley ) आणि हॅडॉन ( Haddon ) हे लेखक म्हणतात, " Dr. Hrdlicka ' यांच्या विश्लेषणावरून जुन्या अमेरिकनांत नॉर्डिक घटकाचे प्रमाण कमी आहे यात संशय उरत नाही. [१५]

अमेरिकेतील सगळ्या वंशवादी वाङ्मयापुढे तातडीचे राजकीय उद्दिष्ट होते. ते म्हणजे स्थलांतरितांसंबंधीच्या कायद्याचा पुनर्विचार. ' वंश, धर्म, वर्ण या कारणाने भेदभाव नाही ' हे आमचे ध्येयवाक्य होते आणि ' पीडितांना ' आम्ही ' आश्रयस्थान ' देऊ करत

होतो व 'क्रांतिप्रक्रियेविषयी' उत्साहाने लिहीत होतो ते दिवस मागे गेले. आता अमेरिकन स्वभाव बदलला. सर्वच्या सर्व अमेरिकनांना संधी उपलब्ध करून देणे दिवसेंदिवस अवघड होत चालले होते. व अमेरिकेला ज्या सामाजिक अभियांत्रिकीची गरज होती, तिची किंमत मोजणे प्राप्त होते. आस्थलांतरण जास्त काळ पूर्णपणे खुले ठेवता येणार नाही हे अमेरिकेतील सामाजिक परिस्थितीमुळे शंकातीत झाले होते. चर्चेचा मुद्दा एवढाच होता की, निवड कोणत्या आधारावर करावी. ग्रँटचे The Passing of the Great Race १९१६ मध्ये प्रसिद्ध झाले. महायुद्धानंतर आस्थलांतरणात जी जलद वाढ झाली तिला रोखण्याकरिता काँग्रेसने १९२१ मध्ये Quota Act घाईघाईने संमत करून घेतला. नंतरच्या कायद्यांनी फक्त प्रत्येकाच्या वाटणीची टक्केवारी कमीजास्त केली आणि प्रमाण ठरविण्याकरिता उपयोगात आणण्याच्या तारखांत फेरबदल केले. पण मूळचेच तत्त्व त्यातही अनुसरले आहे. ते तत्त्व असे की, नवीन आस्थलांतरितांना प्रवेश द्यावयाचा तो काही विशिष्ट टक्केवारीने जी संख्या ठरेल त्याप्रमाणे द्यावा–उदा. १९२१ मध्ये ३ टक्के, १९२४ मध्ये २ टक्के –हे टक्के मोजावयाचे ते परदेशात जन्मलेल्या अमेरिकनांच्या संख्येच्या आधारे. ही संख्या कोणत्या कालातील घ्यावयाची तेही ठरले होते. उदा. १९२१ च्या कायद्यामध्ये १९१० मध्ये अमेरिकेत असलेले परदेशी जन्मलेले अमेरिकन टक्केवारीसाठी लक्षात घेतले तर १९२४ च्या कायद्यात १८९० साली अमेरिकेत असलेले परदेशी जन्मलेले अमेरिकन लक्षात घेतले. कोणत्याही एका वर्षी प्रवेश द्यावयाची संख्या ही १९२४ मध्ये १५०,००० इतकी मर्यादित केली. १९२९ मध्ये 'मूळ राष्ट्रीयत्वा'ची शर्त अमलात आली. ती शर्त अधिकच गुंतागुंतीच्या हिशेबांवर आधारलेली आहे. अमेरिका खंडातील स्वतंत्र देशातून येणारे आणि कॅनडातून येणारे स्थलांतरित या हिस्सा-निर्बंधापासून मुक्त आहेत.

वंशवादी सिद्धान्तामुळे अमेरिकन विचारपद्धती गोंधळून गेली. तसे झाले नसते तर स्थलांतरितांसंबंधीचे कायदे सामाजिकदृष्ट्या अधिक फायदेशीर अशा तत्त्वावर केले गेले असते. आरोग्य व शिक्षण ही 'मूळ राष्ट्रीयत्वा'मुळे ठरत नसून त्या केवळ वैयक्तिक बाबी असतात. खरत दगत मजुरी करणारे पण इंग्रजी बोलता न येणारे गट आपल्यात सामावून घेण्याला जो खर्च येतो त्याचा हिशेब करून, शिक्षित लोकांना प्रथम पसंती दिली जाईल असे आपण उघडपणे जाहीर करू शकलो असतो. ज्या देशातील समाजव्यवस्था आणि जीवनमान ही आमच्या पद्धतीशी जुळणारी आहेत अशा देशातून येणारे स्थलांतरित आपण निवडू शकलो असतो. परंतु दर वर्षीची ठराविक संख्या ही बऱ्याच अंशी एक अंधारात घेतलेली उडी होती. अमेरिकेच्या आर्थिक स्थितीमधील प्रत्येक बदलाबरोबर जादा मनुष्यबळामुळे होणाऱ्या सामाजिक लाभात अथवा तोट्यात बदल होतो. मागच्या मंदीच्या दशकामध्ये स्थलांतरितविषयक सरकारी सेवाविभागाने 'समाजाला भारभूत होण्याजोगा' या वाक्यांशाचा अर्थ सैलपणे लावून खरोखरी, मनुष्यबळ व नोकऱ्या यांचा

मेळ बसविण्याचा प्रयत्न केला आहे. परंतु अमेरिकेच्या आर्थिक स्थितीशी जुळते घेणे याचा अर्थ करण्याचे काम हे शासकीय कारभारावर सोडलेले आहे. त्याला कायद्याचे स्वरूप कधीच आले नाही किंवा सत्य परिस्थितीचा शोध घेणाऱ्या एखाद्या चौकशी मंडळा-कडे ते सोपवलेले नाही.[१६]

अमेरिकेच्या संयुक्त संस्थानांमधील वंशवादी वाङ्मय [१७] हे 'निग्रो'च्या म्हणजे आपल्या सर्वांत मोठ्या राष्ट्रीय स्वरूपाच्या वांशिक समस्येला मुळी स्पर्शही करीत नाही. निग्रोंना आम्ही जी वागणूक देतो ती या लेखकांच्या आवडीनिवडीशी इतकी मिळती-जुळती आहे की, त्यांना त्यात नवीन सुचविण्यासारखे काही नाहीच. उलट पक्षी, आधी आलेल्या आणि आता अधिक समृद्ध असलेल्या वसाहतवाल्यांत आणि अजून सात्मीकरण न झालेल्या मजुरांमध्ये फरक करण्यासाठी, मिळालेल्या संधीचा भरपूर फायदा उठवून त्यांनी वांशिक आधार हुडकून काढला. त्यांची कायमची खरख अशी आहे की, 'जुन्या अमेरिके'ने वांशिक आधार घेऊन आस्थलांतरणावर मर्यादा घालावी व (आतापर्यंत) निष्काळजीपणाने प्रवेश दिलेल्या कमी प्रतीच्या बिगरनॉर्डिक लोकांशी मिश्रण टाळून आपले रक्त शुद्ध ठेवावे. अमेरिकेतील वंशश्रेष्ठतावाद म्हणजे दुसरे तिसरे काही नसून एका दशकातील आस्थलांतरित पुढच्या दशकातील आस्थलांतरिताना कायमपणे कमी दर्जावर ढकलत असल्याचे दृश्य आहे. अशा तऱ्हेची निर्णयात्मक भूमिका घेण्याऐवजी थोडा काळ थांबणे शहाणपणाचे ठरेल. इव्हान्हो (Ivanhoe) च्या काळातील एखाद्या नॉर्मन माणसाने सॅक्सन लोकांना सुधारणे अशक्यप्राय आहे असे लिहिले असते तर त्याचे लिखाण, मॅडिसन ग्रँटने अमेरिकेत विसाव्या शतकाच्या तिसऱ्या दशकात बिगरनॉर्डिकांना सुसंस्कृत करण्यासंबंधी लिहिले आहे त्याहून अधिक समर्थनीय ठरले असते. पण काय उपयोग? इतिहासाने ते मत केव्हाच खोटे पाडले आहे. आणि अँग्लोसॅक्सन असणे हीच मॅडिसन ग्रँटच्या दृष्टीने सर्वांत अभिमानाची गोष्ट ठरली आहे. वंशमिश्रणामुळे पुढे आपण अँग्लो-सॅक्सन होऊ ही गोष्ट नॉर्मन माणसाला भयावहच वाटली असेल. अमेरिकेतील आजच्या अँग्लोसॅक्सन माणसालाही वंशमिश्रणाची अशीच भीती वाटते. पण अमेरिकेतील भावी पिढ्या आपल्या वांशिक वारसाबद्दल अभिमानच बाळगतील.

## वंशवाद व राष्ट्रवाद

विसाव्या शतकाच्या सुरवातीला युरोपातील राष्ट्रे एकमेकाविरुद्ध संघर्षाची भूमिका घेऊन टाकली होती. राष्ट्रवाद हा जणू जगन्नाथाचा रथ झाला. त्याच्या रगाड्याखाली बाकी सगळे वांशिकवांशिक ध्येयवाद सपाट होऊन गेले. प्रत्येक निर्णायक वेळी वर्गस्पर्धा आणि अल्पसंख्याकांचे संघर्ष नामशेष होऊन गेले. जेव्हा १९ व्या शतकाच्या शेवटल्या दशकात गोबिनोचा जवळजवळ विस्मृतीत गडप झालेला प्रबंध पुनरुज्जीवित केला गेला व त्यातील सिद्धान्तांना मोठ्या अभिनिवेशाने पाठिंबा व लोकप्रियता दिली गेली तेव्हा तो पाठिंबा

तो प्रबंध वर्गश्रेष्ठत्वाचा संदेशवाहक आहे असे म्हणून मिळाला नसून तो राष्ट्रीय देशभक्तीचा संदेश समजून मिळाला.

आधुनिक युरोप अथवा अमेरिकेमध्ये एखाद्या वर्गाचा आपला वंश शुद्ध असल्याचा दावा जर अशक्यप्राय आहे तर, एखाद्या राष्ट्राने असा दावा करावा हे विलक्षणच होय. युरोपमध्ये संपत्तीच्या वारसासंबंधी जे नियम होते त्यामुळे श्रीमंत वर्गातील घराण्यांमधून किमान एका मुलाच्या वंशजामार्फत घराण्याची परंपरा अविच्छिन्नपणे चालू राही. वास्तविक, जीवशास्त्राचा विचार करता, ज्या महापुरुषामुळे कुटुंबाला एखादे आडनाव मिळते तो आणि दुसरा कोणताही पूर्वज हे सारखेच, हे लक्षात न घेतल्यास घराण्याचा मोठेपणा आनुवंशिक असतो असा आभास निर्माण होई. परंतु एखाद्या राष्ट्राच्या बाबतीत असा सत्याचा भासही निर्माण करता येणार नाही. तरीसुद्धा ही मतप्रणाली लोकप्रिय करणे दोन कारणांमुळे सोपे झाले. एक म्हणजे, हा सिद्धान्त जेव्हा वर्गश्रेष्ठत्वाचा सिद्धान्त म्हणून पुढे आला तेव्हा त्याच्या घोषणा या लोकांना परिचित झाल्या होत्या व दुसरे म्हणजे भिन्न असलेला प्रत्येक गट म्हणजे एक वंश होय ही भाबडी कल्पना. या कल्पनेनुसार पाहता, जर्मन आणि फ्रेंच लोक जर वेगवेगळे असतील तर ते दोन वंशांचे झाले.

राष्ट्रवादाच्या या युगात वंशवाद ही एक राष्ट्रीय युद्धघोषणा झाली. ज्या ‘ पितृभूमी ’त सर्वांना आकर्षून एकत्रित करील अशा घोषणेची गरज होती, तेथे कोणत्याही माणसाला पटेल आणि अभिमान वाटेल असे एक अतूट बंधन आणि परंपरा या घोषणेमुळे निर्माण झाली. त्यामुळे हा सिद्धान्त म्हणजे मतामतांचा गलबला होऊन गेला. फ्रेंच, जर्मन, स्लाव्ह, अँग्लोसॅक्सन–प्रत्येक गट आपापले वाङ्मयीन व राजकीय प्रवक्ते तयार करून सिद्ध करू लागला की, त्यांचाच वंश काय तो युरोपियन इतिहासाच्या सुरवातीपासून संस्कृतीच्या विजयांचा मानकरी आहे. वंशासंबंधीच्या वस्तुस्थितीवर प्रत्येकाने मन मानेल तसे आघात केले व परस्परविरोधी वांशिक निष्कर्ष काढून वस्तुस्थितीचा विपर्यास केला. राष्ट्रवादी अवस्थेमध्ये वंशवादाच्या सिद्धान्तात वैज्ञानिक वस्तुनिष्ठतेचा आभासही उरला नाही.

आता, हे खरे की, जवळजवळ डार्विनच्या काळापासूनच राष्ट्रभक्तीवर वंशवादी घोषणा होतच होत्या. पण त्या इतस्ततः विखुरलेल्या आणि नैमित्तिक स्वरूपाच्या असत. १८७० मध्ये युद्धात जर्मनीने फ्रान्सचा पराभव व मानखंडना केली. त्या पाठोपाठच फ्रान्समध्ये राष्ट्रवादी वंशवादाची पहिली लाट आली हे अर्थात, अर्थपूर्ण आहे. जर्मन सैन्याने फ्रान्सवर आक्रमण केले, पॅरिस जिंकले आणि या विजयाबरोबरच ऱ्हाइन नदीच्या पश्चिमेकडील जहागिऱ्या आणि राज्ये जोडून घेऊन एक एकसंध जर्मन राष्ट्र उभारण्यात बिस्मार्क यशस्वी झाला होता. एक बलाढ्य युरोपियन सत्ता हे फ्रान्सचे स्थान तात्पुरते का असेना, पण नष्ट झाले होते. परिणामतः ज्या अंतर्गत संघर्षांनी गोबिनो पुरा दडपून गेला होता ते सर्व संघर्ष सबंध राष्ट्राने एकत्रित अनुभवलेल्या मानखंडनेपुढे नगण्य होऊन गेले. संघर्षांतील

पक्षांच्या या नव्या स्वरूपामुळे वंशवादी सिद्धान्तातच अंतर्गत बदल झाला. जर त्यांनी आपल्या गोऱ्या आणि दीर्घशिरस्क अतिमानवांचा वंश शुद्ध राखला तर ते फ्रान्समध्ये असोत किंवा जर्मनीमध्ये असोत; ते जित असोत किंवा जेते असोत, दोघांनाही गोबिनोने प्रतिपादन केलेल्या आर्य ( ट्यूटन ) लोकांच्या वर्चस्वपणात मानाचे समान स्थान होते. १८७१ मधील फ्रेंच लोकांना हे प्रतिपादन समाधानकारक वाटले नाही आणि त्यांनी ते तातडीने दुरुस्त करून घेतले. पॅरिस येथील नॅशनल हिस्टरी म्यूझियमचा संचालक कात्रफाज ( Quatrefages ) याने La Race prussiene[८] या नावाचे पुस्तक प्रसिद्ध केले. या पुस्तकात त्याने बिस्मार्कचे विजेते प्रशियन राज्य एकटे बाजूला काढून त्या राज्याची वांशिक परंपरा फ्रान्सच्या वांशिक परंपरेपेक्षा सर्वस्वी भिन्न असल्याचे दाखवले. त्याने म्हटले की, प्रशियन नागरिक हे आर्य नाहीतच. त्यांच्या वंशनिर्णयासाठी आपल्याला रशियाच्या उत्तरेस असणाऱ्या उंच, गोरटेल्या व पृथुशिरस्क फिन लोकांचा अभ्यास केला पाहिजे. युरोपवरील जुन्या आशियायी आक्रमकांचे प्रतिनिधी जे स्लाव्ह लोक त्यांच्याशी फिन लोकांचे मिश्रण झाले आणि ही जी मिश्र जात, तिनेच सर्व प्रशिया व्यापला आहे. फ्रान्सच्या उच्च संस्कृतीवर आक्रमण करून त्यांनी पुन्हा एकदा युरोपला अवकळा आणली.

फ्रान्स आणि जर्मनी यांमधील वांशिक भिन्नता आणखीही एका निराळ्याच रीतीने प्रतिपादन केली गेली. फ्रान्समधील कपालमितिशास्त्र– अभ्यासकांचा मुकुटमणी, अविश्रांतपणे काम करणारा ब्रॉक ( Broca ) याने जिवंत आणि मृत व्यक्तींच्या कपालमितींची माहिती ५ खंडांत[९] प्रसिद्ध केली आणि जे या आधीच लोकांना माहीत झाले होते, ते सिद्ध करून दिले की, फ्रान्समध्ये पृथुशिरस्क संख्येने अधिक आहेत. ब्रॉकने दाखवून दिले की, फ्रान्स हा गॅलिक ( म्हणजे अल्पाइन, केल्टिक ) पृथुशिरस्क लोकांचा देश आहे आणि गोबिनोचे पृथुशिरस्कांच्या गौणत्वाविषयीचे मत त्याने उलटेपालटे केले. तो म्हणाला की, पृथुशिरस्कांचा मेंदू दीर्घशिरस्कांच्या मेंदूपेक्षा मोठा आणि अधिक चांगला असतो यात संशय नाही. जर्मन लोक त्यांच्या नॉर्डिक रक्ताचा अभिमान खुशाल बाळगू देत. पण फ्रेंच लोकांनी त्यांच्या गॅलिक वंशाचाच अभिमान धरावा. फ्रेंच लोक गॅलिक आहेत या ब्रॉकच्या सिद्धान्तामुळे खरी अडचण मात्र दूर झाली नाही. ती अडचण अशी की जर्मन लोकसुद्धा अधिकतर पृथुशिरस्कच आहेत.

ब्रॉक आणि कात्रफाज हे मोठ्या लोकसमूहांची मानवशास्त्रास उपयोगी अशी अचूक मापने घेण्यात अग्रणी होते आणि युरोपियन लोकांच्या शारीरिक प्रकारांविषयीच्या आपल्या ज्ञानात त्यांनी बरीच भर टाकली आहे. प्रत्यक्ष मापनाचा त्यांनी आपल्या प्रतिपादनात उपयोग केला. असे करावे हे काही गोबिनोला माहीत नव्हते. वंशविषयक त्यांच्या संशोधनाने ज्ञानाची प्रगती झाली. त्यांनी वंशवादी निष्कर्ष काढले ही गोष्ट निराळी आहे. सर्व वस्तुनिष्ठ संशोधन असे दर्शविते की, माणसाची कवटी रुंद असली काय, किंवा लांबट असली काय, दोन्हीतही तितकाच चांगला मेंदू असू शकतो आणि शिवाय त्यातून असेही

निघते की, फ्रान्स व जर्मनी, दोन्ही देशांत या शरीरप्रकारांची विभागणी एकाच तऱ्हेची आहे. तरी पण अशा अनिश्चित पायावरही द्वेष्य असे शत्रुराष्ट्र आणि यातना सोसणारे आपले राष्ट्र यांच्यामधील महदंतर पक्के करण्यात आले. ब्रॉक व कात्रफाज यांच्या वंशवादी सिद्धान्तावरून दिसून येते की, वंशसंबंधी पुराव्यापासून तत्कालीन तातडीच्या राजकीय गरजांनुसार निष्कर्ष काढता येतो. असे घडण्याचे इतिहासातील हे शेवटचे उदाहरण नव्हे.

१८७० च्या पिढीतील सर्वांच्या हयातभर ब्रॉकॅने केलेली पृथुशिरस्कांची स्तुती ही एक लोकप्रिय परवलीची घोषणा होऊन राहिली. कला, टीकावाङ्मय, राजकीय प्रतिपादने सर्वांत केल्टिक संप्रदाय हे एक गूढरम्य श्रद्धास्थान झाले. ( गॅलिक, अल्पाइन हे केल्टिक याचे पर्याय होत. ) त्या वेळी इंग्लंडची लोकप्रियता फ्रान्समध्ये वाढत होती. इंग्लंडशी वांशिक संबंध वाढविण्यास, लोकप्रिय असलेल्या ' केल्टिक 'वादाची मदत झाली. आणि त्याचमुळे फ्रान्सची पूर्वेकडील सरहद्द जी ऱ्हाइन नदी ती अधिकच दुर्लंघ्य ठरली. या केल्टिकवादाच्या प्रचारात इतिहासकारही येऊन मिळाले. फ्रेंच इतिहासकारांचा मेरुमणी फुस्ते द कूलाँ ( Fustel de Coulanges ) याने सिद्ध केले की, फ्रेंच संस्कृतीच्या उभारणीत जर्मनांचा काही वाटा नाही.

ऱ्हाइन नदीच्या दुसऱ्या तीरावर जर्मनही गप्प नव्हते. त्यांनीही आपले वांशिक सिद्धान्त तयार केले. गोबिनोचे वर्गीकरण बदलण्याची फ्रेंचांना गरज होती तशी जर्मनांना नव्हती. त्याच्या ग्रंथाला राजकीय महत्त्व प्रथम जर्मनांनी आणले. एक भावनाप्रधान जर्मन राष्ट्रभक्त या भूमिकेतून रिचर्ड वॅग्नरला गोबिनोचा प्रबंध फारच मनाजोगा वाटला आणि त्याचे लिखाण जर्मनीत लोकप्रिय करण्यासाठी वॅग्नरने साहाय्य केले. परंतु १८९४ मध्ये म्हणजे गोबिनोच्या मृत्यूनंतरच जर्मनीत गोबिनोच्या नावाची संस्था Gobineau Vereinigung ही स्थापन झाली. आणि त्यानंतर १८९९ मध्ये गोबिनोच्या पहिल्या तरुण शिष्यांपैकी एक, वॅग्नरचा जावई हूस्टन चेम्बर्लेन ( Houston Chamberlain ) याने ' एकोणिसाव्या शतकाच्या आधारशिला, ' Foundations of the Nineteenth Century [२०] हा ग्रंथ प्रसिद्ध केला. या ग्रंथामुळे गोबिनोवाद हा जर्मनीतील सर्वश्रेष्ठ संप्रदाय बनला.

वंशवादातून निर्माण झालेल्या ग्रंथांपैकी Foundations of the Nineteenth Century याचे दोन जाडे खंड हे आज आपल्याला अत्यंत वैचारिक गोंधळयुक्त, बढाईखोर व पाल्हाळिक वाटतात. पण जर्मनीत त्यांचे प्रचंड स्वागत झाले. कैसरने आपल्या मुलांना ते वाचून दाखविले, सैन्यातील अधिकाऱ्यांमध्ये, वाटले आणि हुकूम काढला की जर्मनीतील पुस्तकांच्या सर्व दुकानांतून व ग्रंथालयांतून ही पुस्तके प्रदर्शित केली जावी. त्या पुस्तकाच्या आवृत्त्यांमागून आवृत्त्या निघाल्या. त्यात मांडलेले विचार हे जर्मन राष्ट्रातील सामान्य लोकांच्या विचारधारेचा भाग बनले.

Foundations मध्ये गोबिनोवर कडक टीका केलेली आहे. तरी पण दोन्ही लेखकांची वंशवादी भूमिका जवळजवळ सारखीच आहे. परंतु ज्या परिस्थितीचा विचार वंशवादी मतप्रणालीतून करावयाचा ती परिस्थिती आता बदलली होती. त्यामुळे वंशश्रेष्ठतावादाच्या इतिहासात नेहमी घडत आले आहे तसेच घडले. प्राचीन व आधुनिक वंशांचे निरनिराळ्या समूहांशी नवीन तऱ्हेने तादात्म्यीकरण केले गेले. गोबिनोचे मत होते की, जुन्या जर्मन जमातींचे– ज्या गोबिनोच्या दृष्टीने मानवोत्तमांच्या प्रतिनिधी होत्या– वंशज पुष्कळ युरोपियन राष्ट्रांच्या खानदान वर्गात आहेत. तर चेंबर्लेनच्या मताने याच जुन्या जर्मन टोळ्यांनी जर्मन राष्ट्र घडविले व आज जर्मनी या नावाने एकत्रित झालेल्या राष्ट्राचे त्या संरक्षण करीत आहेत. चेंबर्लेनने त्यांना ट्यूटन हे नाव दिले. परंतु ट्यूटन म्हणजे केवळ पिंगट केसांचे व लांबट डोक्याचे नॉर्डिक नव्हेत. ते जर तसे असते तर सर्व जर्मन राष्ट्र नियतीने ज्यांना विजयन्ते ठरविले आहे अशा ट्यूटन लोकांचे वंशज ठरले नसते. हे तर सर्वज्ञात आहे की, जर्मन लोकांपैकी काही पिंगट केसांचे आणि गोरे तर काही रंगाने काळसर आणि काळ्या केसांचे आहेत; काही दीर्घशिरस्क तर काही– म्हणजे बहुसंख्य पृथुशिरस्क आहेत. म्हणून चेंबर्लेनचे ट्यूटन हे नुसते पिंगट केसांचे, गोरे व दीर्घशिरस्क नाहीत किंवा नुसते काळसर व पृथुशिरस्कही नाहीत. त्यात दोन्ही प्रकारांचा समावेश आहे. त्याच्या योजनेत कवटीची मापे किंवा केसांच्या रंगांची कोष्टके यांना स्थान नव्हते. ट्यूटन म्हणजे केवळ टॅसिटसने ( Tacitus ) वर्णन केलेल्या जुन्या जर्मन टोळ्या नसून त्यांच्यात केल्ट आणि स्लाव्ह या दोहोंचाही समावेश होत होता. केल्ट, स्लाव्ह आणि ट्यूटन या तिन्ही जमाती एकाच शुद्ध वंशाच्या[२१] वारस आहेत. त्यामुळे प्रत्यक्षात ज्यांना ट्यूटन म्हटले जाते, त्या लोकांचा कोणताही विजय हा या सर्व देवाच्या लाडक्या लोकांचा विजय असतो, अशा प्रकारे, गोबिनोच्या वंशवादी मतांची चेंबर्लेनने अशी पुनर्मांडणी केली की, त्या श्रेष्ठतेतून कोणीही जर्मन वगळला जाऊ नये. जर्मन राष्ट्राला नीट बसेल अशी आपली प्रशस्ती त्याने घेतली. त्याला वाटले की, जर्मन राष्ट्रामध्ये या देवाच्या लाडक्या लोकांचे रक्त सर्वात शुद्ध स्वरूपात आहे. या त्याच्या तीनही निवडक वंशगटांच्या मिश्रणामुळे वंध्यत्व टळले व जर्मन राष्ट्र मोठे झाले.

चेंबर्लेनच्या दृष्टीने, श्रेष्ठ असलेल्या वंशाच्या खाणाखुणा शारीरिक वैशिष्ट्यांवरून ठरविता येत नसतील तर कशाच्या आधारावर त्या वंशाची निश्चिती करावयाची ? फक्त याच वंशाला नेतृत्वाचे तत्त्व उमगते, केवळ हाच वंश आपण निवडलेल्या नेत्यावर अचल निष्ठा ठेवतो असे त्याचे उत्तर आहे. हा गुणविशेष जर त्याला इटालियन वा फ्रेंच माणसांत सापडला तर, ते कोणत्याही देशात जन्मले असले तरी मुळात ट्यूटन आहेत असे तो ओळखून काढतो. इतर राष्ट्रांतील त्यांचे अस्तित्व चेंबर्लेनच्या दृष्टीने एवढेच सिद्ध करते की, त्या विशिष्ट राष्ट्राने जो मोठेपणा मिळवला असेल तो त्यातील जर्मन रक्तामुळे होय. चौदावा लुई, डान्टे, मायकेल एंजेलो, मार्को पोलो आणि येशू ख्रिस्त हे सर्व ट्यूटन होते असे

त्याचे म्हणणे होते. जर्मन राष्ट्रातील कोणीही नागरिक वगळला जाऊ नये अशा रीतीने 'वंश' याची व्याख्या करणे ही त्यांच्या दृष्टीने फार महत्त्वाची गोष्ट होती. "जो कोणी आपल्या कृत्यांनी आपण जर्मन आहोत असे दाखवून देईल, त्याचा वंशवृक्ष कसाही असो, तो जर्मन आहे" असे तो म्हणे. अशा प्रतिपादनात वंश याला काहीच ठराविक असा अर्थ राहात नाही. पण विसाव्या शतकातील युरोपातील मिश्रवर्ण राष्ट्रांना लागू पडतील असे वंशवादी सिद्धान्त तयार करायचे म्हणजे ही किंमत द्यावयासच हवी. चेंबर्लेनच्या लिखाणाच्या रूपाने वंशवादावर काळाने जणू सूडच उगवला.

त्याच प्रकाराने त्याने सेमेटिकवंशविरोधी तत्त्वज्ञान प्रतिपादन केले. गेल्या दशकात 'थर्ड राइश्'चे म्हणजेच नाझी राजवटीचे म्हणून जे वंशवादी तत्त्वज्ञान आपण समजत आलो, त्या सर्व ज्यूविरोधी वंशवादी घोषणा Foundations... मध्ये आलेल्या आहेत. सेमाइट व इतर यांच्यातील फरक चेंबर्लेन शारीरिक गुणविशेष अथवा वंशावळ यावरून करीत नाही. अर्वाचीन युरोपमध्ये मानवशास्त्रीय मोजमापांच्या कोष्टकांवरून ज्यू हे इतर लोकांपेक्षा वेगळे असे अचूकपणे ओळखता येणार नाहीत हे तो जाणून होता. परंतु त्यांच्या विचार करण्याच्या व वागण्याच्या पद्धती निराळया म्हणून ते शत्रू होत. 'कोणीही माणूस फार लवकर ज्यू बनतो. ज्यू माणसांशी वारंवार संपर्क आल्यामुळे, ज्यूंची वर्तमानपत्रे वाचत राहिल्यामुळे किंवा असल्याच गोष्टींनी माणसे ज्यू बनतात.'[१२] म्हणून युद्धपूर्व काळातील वंशश्रेष्ठतावाद्यांपैकी चेम्बर्लेन हा सर्वांत स्पष्टवक्ता होता असे म्हटले पाहिजे. वंशवादी युक्तिवादाचा अनिवार्य निष्कर्ष काढून तो वंश ही संकल्पना संपूर्णपणे अमान्यच करतो आणि अभिमानाने सांगतो की, वंशवादी भूमिकेशी वंशाचा काही संबंध नाही. जेव्हा जेव्हा फायद्याचे ठरले तेव्हा तेव्हा चेंबर्लेनच्या या आत्मविसंगतीचा वंशवाद्यांनी पुनरुच्चार केला आहे.

जसजसे महायुद्ध जवळ येत होते तसतसे जर्मनीतील वंशवादी वाङ्मय प्रातिभ व उत्स्फूर्त रूप घेऊ लागले, सत्य घटनांचा विरोध जुमानीनासे झाले आणि १९१४ पर्यंत वंशवाद हा एक राष्ट्रवादी संप्रदायच बनला. पहिल्या महायुद्धानंतर व वायमर प्रजासत्ताकाच्या पाडावानंतर पराभूत व खंडित जर्मनीने वंशवाद हा आपल्या राष्ट्रीय धोरणाचा पाया बनविला. जर्मन वंशवादी सिद्धान्तांचे विजेत्यांच्या गर्वघोषणांऐवजी एका मानखंडना झालेल्या, अपमानित व निराश समाजाला उत्तेजक अशा घोषणांत रूपांतर करणे हे वाटते तितके अवघड नव्हते. १९२० मध्ये तुरुंगात असताना 'माझा झगडा' ( Mein Kampf ) हा ग्रंथ लिहून हिटलरने हे रूपांतर कसे घडवून आणावयाचे त्याची दिशा दाखवून दिली. त्याच्या म्हणण्याप्रमाणे युद्धपूर्व जर्मनीने राष्ट्रीयत्वाचा वांशिक आधार दुर्लक्षिला होता. केवळ या एका नियमाने पृथ्वीतलावर जीवन शक्य होते. ज्यूधर्मरूपी नागाला या राष्ट्राने स्वतःच्या पदराखाली जोपासले आणि आता हेच ज्यू आपल्या राष्ट्रीय पराभवाला कारण झाले आहेत. तेव्हा जर्मनीमध्ये स्लाव्ह कोणाला म्हणावे, नॉर्डिक कोण,

अल्पाइन कोण हा गुंतागुंतीचा प्रश्न राजकीयदृष्ट्या अगदी गैरलागू होता. शत्रू होता तो ज्यू आणि ज्यू कोण ते त्याच्या वंशावळीवरून निश्चित सांगता येई. फारच अडचण आली तर नाझी सिद्धान्त चेंबर्लेनच्या 'एखादा माणूस वंशपरंपरेने जर्मन नसूनही सच्चा जर्मन असू शकेल' या प्रतिपादनाचा आधार घेत असे. त्याला नाझी 'बिगरजर्मन शरीरातील जर्मन आत्मा' म्हणत. परंतु ही टाळाटाळीची युक्ती अगदी अपवादात्मक परिस्थितीत वापरण्यासाठी राखून ठेविली जाई. इतर सर्व वेळी वंशवाद वापरावयाचा आधार म्हणजे कुलपरंपरा– जर्मन वंशाचा तोच की, ज्याचे मातापिता अथवा आजीआजोबा ज्यू नाहीत. अशा स्वरूपाचा वंशवाद हा राष्ट्रीय समाजवादाचा मूलाधार बनला. ॲडॉल्फ हिटलर ज्यांचा पुढारी होता अशा, त्या वेळी अप्रसिद्ध असलेल्या काही पुढाऱ्यांनी नाझी कार्यक्रमाच्या मसुद्यामध्ये ही योजना १९२० मध्ये सादर केली. ही अशी होती : फक्त जर्मन रक्ताच्या लोकांनाच नागरिकत्व आणि सरकारी अधिकाराच्या जागा मिळतील. (कोणाही ज्यू माणसाला मिळणार नाहीत.) कोणीही खरे जर्मन नागरिक बेकार राहात असतील तर नागरिक नसलेल्यांना हद्दपार करण्यात येईल. कोणत्याही परिस्थितीत जे बिगरनागरिक येथे राहाणार असतील, ते केवळ विशेष कायद्यान्वये पाहुणे म्हणूनच जर्मनीत राहू शकतात. परकीय रक्ताच्या माणसांनी जर्मनीत आश्रयांतर करण्यास सक्त मनाई आहे. इत्यादी इत्यादी.

१९३३ मध्ये हिटलरने हातात सत्ता घेतल्यावर ताबडतोब या योजनेमधील निरनिराळ्या कलमांची अमलबजावणी करणारे कायदे पास होऊ लागले आणि सेमेटिकवंशीयांचा तुरळक प्रमाणावर छळ सुरू झाला. परंतु १९३५ च्या शरद ऋतूपर्यंत 'नुरेंबर्ग कायदे' या नावाने प्रसिद्ध असलेले सर्वसमावेशक नियम पास झाले नव्हते. या कायद्यांप्रमाणे सर्व ज्यूंचे नागरिकत्वाचे हक्क काढून घेण्यात आले, ज्यू व बिगरज्यू जर्मन यांच्यामधील लग्नांना बंदी घालण्यात आली आणि अशा प्रकारच्या जोडप्यांचा विवाहबाह्य संबंध हा फौजदारी गुन्हा ठरविण्यात आला. त्याच महिन्यात सर्व ज्यू मुलांना प्राथमिक शाळांतून काढून टाकण्यात आले. यानंतर एक वर्षाने ज्यूंची मालमत्ता व बँकेतील पैसे हे भरपाई दिल्याशिवाय काढून घेतले जाऊ लागले आणि ज्यूंना व्यापार व उद्योगधंदे यातून हाकलून लावण्यासाठी या रीतीचा १९३७ मध्ये पद्धतशीर उपयोग सुरू झाला. १९३८ मध्ये ज्यूंविरुद्धची क्षोभक निदर्शने सर्वसामान्य प्रकार बनले आणि बर्लिनमध्ये मोठ्या प्रमाणावर ज्यूंची धरपकड करण्यात आली. त्याच वर्षाच्या १० नोव्हेंबरला सर्व जर्मनीभर एकदमच ज्यूंची संघटितरीत्या लुटालूट आणि कत्तल झाली. ती घटना सर्व जगाला माहीतच आहे. आणि या दंगलीत झालेले इतरांचे नुकसान हे सरकारी आज्ञेने ज्यूंकडून भरपाई करून घेतले व शिवाय त्यांच्यावर १ अब्ज मार्कस्चा दंडही बसवला हेही जगाला माहीत आहे. या वेळेपर्यंत दारिद्र्यग्रस्त व असहाय असा जर्मनी व ऑस्ट्रियामधील ज्यू निर्वासितांचा लोंढा ही आंतरराष्ट्रीय समस्या बनली होती. शिवाय १९३९ च्या सुरवातीला बर्लिनमधील ज्यू जमातील

पोलिसांनी हुकूम केला की, रोज १०० ज्यूंची नावे त्यांनी पोलिसांना कळवली पाहिजेत. या १०० लोकांना मग देश सोडून जाण्याकरिता १५ दिवसांची नोटीस देण्यात येई. या देशांतराकरिता आर्थिक मदतीची काहीही सोय केलेली नव्हती. युरोपमधील नाझींचे वर्चस्व असलेल्या भागात वंशश्रेष्ठतासिद्धान्ताला अशी कटू फळे आली.

परंतु तिसऱ्या राइशचा, नाझी राजवटीचा वंशवाद म्हणजे केवळ सेमेटिक वंशविरोध नव्हे. प्रथमपासूनच त्यात 'अखिल जर्मवंशीय' या कार्यक्रमाचा अंतर्भाव आहे. १९२० मध्ये पक्षाच्या व्यासपीठावरून सांगितलेच होते की, बृहत्‌जर्मनीतील सर्व जर्मन लोकांचे एकीकरण झाले पाहिजे. जर्मन लोक हे केवळ जर्मनी व ऑस्ट्रियामध्ये राहात नव्हते. त्यांच्याशिवाय सर्व जगभर मिळून तीस दशलक्ष जर्मन लोक विखुरलेले होते. ते 'आमच्या इतकेच श्रेष्ठ' जर्मन आहेत आणि ते रक्ताने जर्मन आहेत या दुर्निवार गोष्टीमुळे तेही जर्मन राष्ट्राचे घटक आहेत. जर्मन वंशाचे अमेरिकन जवळजवळ सत्तर लाख आहेत. यांपैकी कोणीही अगर इतर राष्ट्रांतील जर्मन वंशाच्या नागरिकांपैकी कोणीही जर नाझी राजवटीच्या विरोधकांना मदत केली तर त्यांना देशद्रोही गणले जाईल. नाझी राजवटीच्या विरोधकांमध्ये अमेरिकेतील संयुक्त संस्थानांचा समावेश नाझींनी फार पूर्वीच केला होता.

राजकीय सोयीगैरसोयीप्रमाणे नाझी राजवटीत वंशवादामध्ये बदल केलेले आहेत. चेंबर्लेनचे मत होते की, ट्यूटन हे वंशदृष्ट्या ख्रिश्चन आहेत आणि त्याने ख्रिश्चन धर्माची अतोनात स्तुती केली. तर सरकारी वर्तमानपत्रांचा प्रमुख संपादक आणि विशेषतः, वंशवाद लोकांच्या गळी उतरविण्यासाठी चाललेल्या प्रचाराचा प्रमुख जो आल्फ्रेड रोझेन्बर्ग त्याने जाहीर केले की, ख्रिश्चन धर्मपीठ हे खऱ्या नॉर्डिक लोकांच्या वाटेतील मोठी धोंड आहे. चर्चमुळे त्यांना कॅथालिक वर्चस्व सहन करावे लागते. ते कॅथॉलिक मुळात ज्यू वंशाचे आशियायी आहेत. हे वर्चस्व झुगारून देऊन आमच्या प्राचीन लढाऊ निसर्गनिष्ठ धर्माचे पुनरुज्जीवन केल्याशिवाय नॉर्डिक वंशाचे खरे स्वत्व प्रकट होणार नाही.[२३] बायबलमध्ये जे 'पर्वतावरील प्रवचन' ( Sermon on the Mount ) आहे, त्याच्या खऱ्या आशयाविषयी नॉर्डिक वंशाच्या लोकांना मूलतः तिरस्कार आहे असा त्याचा शोध होता.

राजकीय घडामोडींमुळे तर पुराण्या वंशवादात आणखीच मूलभूत फरक पडले आहेत. आपण पाहिलेच आहे की, चेंबर्लेनच्या मताप्रमाणे जर्मनीच्या मोठेपणाचे कारण म्हणजे एकाच शुद्ध वंशवृक्षापासून उत्पन्न झालेल्या केल्ट, स्लाव्ह आणि ट्यूटन यांच्यातील परस्परविवाहसंबंधाने निर्माण झालेले वंशमिश्रण. परंतु १९३४ पासून १९३९ पर्यंत नाझी राजवटीचा रशियन साम्यवादाला जो नैतिक विरोध होता, त्यामुळे निवडक लोकांमध्ये स्लाव्ह लोकांचा समावेश मान्य होण्यासारखा नव्हता. नाझींच्या प्रचारात त्यांना शत्रू मानण्यात आले. केवळ नाझी तत्त्वज्ञानाला साम्यवाद्यांचा विरोध होता म्हणून नव्हे तर ते जन्मजात, रक्तामुळे शत्रू आहेत म्हणून. ऑगस्ट १९३९ मध्ये रशियाशी अनाक्रमणाचा तह होण्या-

पूर्वीच ही भूमिका सोडून देण्यात आली. स्लाव्ह हे भिन्न वंशाचे आहेत या मुद्द्यावरील जर्मन मौनावरूनच काही सूक्ष्म निरीक्षकांनी कयास बांधला की, अशा तऱ्हेचा तह विचाराधीन असावा.

जर्मनीच्या इटलीबरोबरच्या मैत्रीमुळे अशीच एक अडचण उत्पन्न झाली. पहिल्या महायुद्धापूर्वीच्या व युद्धकाळातील सनातनी वंशवादामध्ये भूमध्यसामुद्रिक वंशासंबंधी भरपूर तिरस्कार व्यक्त होत असे. परंतु रोम-बर्लिन एकजुटीला काही वांशिक आधार दाखवणे आवश्यक होते. तेव्हा उत्तर इटलीच्या जर्मन वगाचा व आल्प्स पर्वतापलीकडील लोकांच्या सर्व कर्तृत्वसिद्धी या त्या लोकांत उत्तरेकडील लोकांचा थोडांथोडा रक्तसंबंध असल्यामुळे आहेत असे जे जुन्या जर्मन वंशवाद्यांचे मत होते त्याचा भरपूर गवगवा करण्यात आला. डान्टे, पेट्रार्क, गित्तो, लिओनार्डो आणि मायकेलएंजेलो ( Dante, Petrakch, Giotto, Leonardo and Michelangelo ) अशा थोर इटालियनांना नॉर्डिक म्हणून सिद्ध करण्याची चेंबर्लेन आणि इतर यांनी परमावधी गाठली होती. दोघेही लॅटिन वंशाचे आहोत या मुद्द्यावर १९१५ मध्ये फ्रान्सने इटलीच्या मैत्रीचा आनंदाने स्वीकार केला होता. त्याच इटलीची मैत्री जर्मनीला आता हवीशी वाटली, कारण की, दोहोंतही ट्यूटन रक्त खेळते आहे.

जपानशी मैत्री ही अधिकच अडचणीची गोष्ट होती. जेव्हा बिगरआर्यन लोकांवर हिटलर तोंडसुख घेतो तेव्हा तो जपान्यांचा अपवाद करतो आणि नाझी राजवटीचे वंशवादी कायदे जर्मनीत वास्तव्य करणाऱ्या जपान्यांना लागू नाहीत. शुद्ध रक्त म्हणून ज्यांची महती नाझींनी गायिली, त्या जर्मन आर्य लोकांबरोबर जपानी नागरिक लग्न करू शकतात. नाझी राजवटीमध्ये जेना ( Jena ) विद्यापीठात मानवशास्त्राचे प्राध्यापक असलेले हान्स गुंथर ( Hans Gunther ) यांचा विश्वास आहे की, जपानी लोकांच्या पूर्वजांपैकी काही नॉर्डिक होते. नाझी बौद्धिक प्रशिक्षणाचा प्रमुख अधीक्षक आल्फेड रोझेन्बर्ग याने जर्मन, शाळांतून शिकवण्याकरिता सरकारी फतवा काढला आहे की, जर्मनीच नेतृत्व करेल ही जीवशास्त्रीय निश्चिती आहे आणि तिच्यात जपानीही सहभागीदार आहेत. प्रचाराच्या पाठीशी जर शस्त्रास्त्रांचे बळ व राजकीय बंदिवानांच्या छावण्यांचा धाक असेल तर कोणत्याही प्रचारात केलेला मानवी मोजमापांचा विपर्यास हा धक्कादायक होत नाही.

नाझी राजवटीत वंशवाद हा वैज्ञानिक विसंगतींमध्ये गुरफटला आहे आणि तत्कालीन करार व छळणूक यांचे समर्थन करण्याकरिता उघड उघड वापरलेली ती एक दर्शनी आघाडी आहे. जर्मनी व जपान यांतील दोस्ती किती काळ टिकेल हे कोणालाच माहीत नाही. त्यामुळे पुढील काही वर्षांत कोणते वंशवादी सिद्धान्त जर्मनीत प्रचलित राहातील हे कोणीच सांगू शकणार नाही. वंशवादाचा भविष्यकाळ त्याच्या भूतकाळाप्रमाणेच असेल तर हे खरे की, हे सिद्धान्त कसल्याही वैज्ञानिक सत्यांवर अवलंबून नसून कोणत्या तहनाम्यांवर सह्या

झाल्या किंवा झाल्या नाहीत आणि कोणता राजकीय गट प्रबळ होत आहे यावर अवलंबून राहातील.

केवळ नाझी राजवटीमधीलच नव्हे तर इतर कोणत्याही राजवटीमधील वंशवाद आपण तपासला तर वंशवादी सिद्धान्ताला राजकीय हेतूंकरिताच आवाहन केले जाते याचे यासारखेच पुरावे आपल्याला मिळतील. शांतता किंवा युद्ध यांमध्ये जसे पक्ष बनतील त्यानुसार कोणतेही राष्ट्र रक्ताचे बंधुत्व असलेले म्हणून किंवा हाडवैरी म्हणून पुकारले जाते. जेव्हा पहिल्या महायुद्धाच्या छाया जगावर पडल्या नव्हत्या तेव्हा कार्लाइलने (Carlyle) व इतिहासकार जे. आर्. ग्रीन (J. R. Green) याने शूर जर्मन टोळ्या या इंग्रजांचे पूर्वज आहेत असे मत व्यक्त केले होते. इंग्रजांच्या प्रतिपादनांप्रमाणे १९१४ मध्ये तेच जर्मन पंधराशे वर्षांपूर्वी होते तसेच रानटी ठरले. ' त्यांनीच आमच्या पूर्वजांवर हल्ले केले आणि रोमन साम्राज्याच्या संस्कृतीचा विध्वंस केला. ' रानवट पूर्वेकडील तेच हूण आणि मोंगोल झाले. रशिया दोस्तांच्या बाजूने होता म्हणून केल्ट व स्लाव्ह आर्यांच्या जवळिकीला वंशवादाने मुजरा केला.

जिकडे पाहावे तिकडे राष्ट्रीय वंशश्रेष्ठतावादाचा इतिहास हा संकुचित देशाभिमानाचा इतिहास आहे. वंशासंबंधीची वस्तुस्थिती व पाश्चात्त्य संस्कृतीचा इतिहास माहीत झाला आहे व आत्यंतिक कल्पनारम्य राष्ट्रवाद आणि सत्यस्थिती यांत फरक केला गेला आहे अशा जगात वरील तऱ्हेचा वंशवाद कोणी ऐकूनही घेणार नाही. परंतु औद्धत्य आणि भीतिग्रस्तता यांनी आक्रान्त झालेल्या लोकांना सोप्या आणि धीर देणाऱ्या वक्तृत्वाने आपले समाधान करून घ्यायचे असते. आणि अशा वक्तृत्वाची गरज भागविली जाते. निराश झालेल्या लोकांनाही एखाद्या अजापुत्राची गरज असतेच. वंशवाद एका बाजूला त्यांना सांगतो की, युगायुगांच्या संस्कृतीचे तेच वारसदार आहेत आणि दुसऱ्या बाजूला त्यांनी नष्ट करावी अशी एखादी कमअस्सल जात त्यांना दाखवून देतो. वंशवादाच्या अर्ध्या शतकाचे यथायोग्य निरीक्षण केले असता असे दिसते की, वंशवाद हा विज्ञानातून निर्माण झाला नाही. विज्ञानाने त्याचा इन्कारच केलेला आहे. तो निर्माण झाला राजकारणातून. वंशवादानेही आपल्या प्रतिपादनातून विज्ञानाचा सतत विपर्यास केला आहे.

म्हणूनच आपल्या राष्ट्रवादी अवस्थेत वंशवाद हा राजकारण्यांच्या हातचे बाहुले बनला आहे. दोन्हीही बाजू एकमेकांवर वंशाचे नाव घेऊन हल्ला करीत असतात. मग दोन्हीही पक्ष वंशशास्त्रीय मोजमापांप्रमाणे एकाच वंशाचे ठरले तरी बेहत्तर. जेव्हा संबंधित दोस्तराष्ट्रे वंशदृष्ट्या भिन्न असतात तेव्हा वंशवादाचा उपयोग त्यांच्यातील वांशिक बंधुता शोधून काढण्याकरिता केला जातो. ते एक धोकादायक खेळणे आहे. ती अशी एक तलवार आहे की, जरा पाते फिरवून, त्या क्षणी जो शत्रू असेल, त्याला नेस्तनाबूत करता यावे. त्याचा इतिहास विचारात घेऊन निघणारा अपरिहार्य निष्कर्ष हाच आहे की, वंशवादी

युक्तिवाद म्हणजे स्वार्थी आक्रमणे व दोस्तीकरार छपविण्याकरिता घेतलेले मुखवटे होत. हुलकावणी देण्यास उपयोगी पडणारी ती एक पद्धत आहे. या राजकारणी दुनियेत व्यावहारिक मार्गदर्शन म्हणून, या वंशवादी घोषणांच्या मागे काय आहे हे पाहून, त्या घोषणांनी जो संघर्ष चेतविण्यात येत आहे तो नीट लक्षात घेतला पाहिजे. केव्हा केव्हा संघर्ष हे समर्थनीय असतात आणि एखादा विशिष्ट संघर्ष आवश्यकही असेल. पण वंशवादाच्या संशयास्पद पायावर हे निर्णय घेता कामा नयेत.

ते म्हणतात—

( फ्रेंच राज्यक्रान्तीपूर्वी ) भिन्न भिन्न वंशांचे लोक एकमेकांबरोबर कितीही झगडले असले तरी वांशिक विरोध हे त्यांच्या झगडण्याचे कारण क्वचितच असे. ते जमिनीकरिता झगडत. एकमेकांना लुटत. दुसऱ्यावर जय मिळवून मोठेपणा मिळवावा अशी इच्छा करत. परंतु यांपैकी कोणत्याच प्रकारात वांशिक भेदांचा विचार पुढे आला नाही.

James Bryce, *Race Sentiment as a Factor in History*. Creighton Lecture, London, 1915, pp. 25,26.

मानवी संबंधाच्या क्षेत्रात, इतर कोणत्याही संघर्षकेंद्रापेक्षा, वांशिक संबंध हे जास्त धोकादायक आहेत. जमावाच्या भावना, पूर्वग्रह आणि भीती यांना चेतावणे इतके सोपे आणि आवर घालणे इतके अवघड दुसऱ्या कोणत्याच क्षेत्रात नाही.

H. Kohn, " Race Conflict " *Encyclopedia of the Social Sciences*. Vol. XIII, 1934, p. 41.

वांशिकदृष्ट्या अल्पसंख्य असलेल्या जमातीवर जुलूम करण्याचे समर्थन करण्याचा जे प्रयत्न करतात ते वंशविषयक मानसशास्त्र शिकवितात व प्रसिद्ध करतात. हे मानसशास्त्र दुष्ट आणि मूर्खपणाचे आहे असे सांगून त्याचा निषेध सर्वच नामवंत मानवशास्त्रज्ञ करीत असतात. वंशसंबंधी राजकीय सिद्धान्त म्हणजे दुसरे तिसरे काही नसून केवळ हुकूमशहांच्या अमलाखालील जनतेची बालसदृश मनोवृत्ती लक्षात घेऊन योजलेली प्रचारसाधने आहेत.

E. A. Hooton, *Twilight of Man*, New York, G. P. Putnam's Sons, 1937, p. 129.

ज्यांच्याविषयी, त्या अहंकाराला सुखावणाऱ्या आहेत यापेक्षा अधिक काहीच म्हणता येत नाही, अशा समजुतींच्या साहाय्याने सत्तापिपासूपणा व अहंगंड यांना आधार देण्याची ( वंशवाद ) ही एक रीत आहे.

Bertrand Russell, 'The Ancestry of Facism' in '*In Praise of Idleness.*' London, Allen and Unwin, 1935, p. 114.

जास्तीत जास्त चांगले बोलावयाचे म्हणजे वंशवादावरील विश्वास हा संकुचित राष्ट्रवाद आहे, तो अपरिपक्वतेचे लक्षण आहे, अनुभवाचा अभाव आणि एकंदरीत बौद्धिक-दृष्ट्या कमजोर असलेले व्यक्तिमत्त्व आहे असे म्हणता येईल.

Friedrich Hertz, *Race and Civilization.* Translated by A. S. Levetus and W. Entz. London, Kegan Paul, 1928, p. 323.

## संदर्भ व टीपा

(१) I. D. Mac Crone, Race Attitudes in South Africa. London, 1937, या ग्रंथावरून पृ. ७.

(२) मोंगोल : हा वेड्यांचा एक प्रकार आहे. त्यांचे वेड आनुवंशिक, शारीरिक कारणातून उद्भवते. रंगसूत्रांच्या विषम वाढीमुळे ही गोष्ट घडून येते.

(३) मॅग्ना कार्टा : इ. स. १२१५ साली इंग्लंडच्या जॉन राजाकडून त्याच्या सरदारांनी काही राजकीय हक्कांची सनद मिळविली. त्या सनदेमुळेच ब्रिटिश लोकशाहीचा पाया घातला गेला.

(४) सोशल कॉन्ट्रॅक्ट : रूसो (१७१२-१७७८) याच्या मताप्रमाणे मनुष्य जन्मतः स्वतंत्र असतो. समाजात राहिल्याने त्याच्यावर बंधने येतात. सामाजिक बंधने एकमेकांनी पाळावयाची असा एक अलिखित करार मानवजातीने केलेला आहे अशी कल्पना करून त्याने आपले सामाजिक व राजकीय विचार मांडले. या कल्पनेस सामाजिक करार– Social Contract सिद्धान्त म्हणतात.

(५) हॉब्सची शासनसंस्थेसंबंधीची कल्पना : हॉब्सच्या (१५८८-१६७९) मते मनुष्य मूलतः आक्रमक असतो. स्वाभाविक स्थितीत प्रत्येक व्यक्तीचे दुसऱ्या प्रत्येक व्यक्तीशी युद्ध सुरू असते. ही स्थिती असह्य झाल्यामुळे माणसांनी स्वतःचे काही हक्क सोडून देऊन शासनसंस्था निर्माण केली. ती निर्माण झाल्यावर तिचे अधिकार अबाधित राहातात. त्याच्या मते शासनसंस्थेचा उत्तम प्रकार म्हणजे राजसत्ता होय.

(६) Letter to Prokusch– Osten, June 10, 1856, quoted by Jacques Barzun in *Race : A Study in Modern Superstition.* London, Methuen and Co, 1938, p. 93, n. 5.

(७) व्हायकिंग्ज : ८ व्या ते १० व्या शतकातील स्कॅंडेनेव्हियन चाचे. सर्व उत्तर युरोपला त्यांनी आपल्या स्वाऱ्यांनी सतावून सोडले होते.

(८) Livi, *Anthropometria Militaire,* Roma, 1896.

(९) Grant, Madison, *The Passing of the Great Raee* London, G, Bell and Sons, 1917, p. 175.

(१०) कित्ता पृ. १६७–१६८

(११) कित्ता पृ. १७७

(१०) कित्ता पृ. ७२–७४

(१३) कित्ता पृ ९ (प्रस्तावनेतील)

(१४) Hrdlicka, Ales, *Old Americans,* Baltimore, 1925.

(१५) Huxley J. S. and Haddon, A. C. *We Europeans.* London, Jonathan Cape, 1935, p. 157.

(१६) अल्पसंख्याकांच्या गटांच्या समस्यांचा उत्तम ऊहापोह Young, Donald यांच्या *American Minority People,* London, Harper, 1932 या पुस्तकात केला आहे.

(१७) या वंशवादी वाङ्मयात पुढील पुस्तकांचा समावेश आहे. Grant, Madison, *The Passing of the Great Race,* London, G. Bell and Sons, 1917.

(२) Burr, Clinton Stoddard, *America's Race Heritage,* New York, 1922.

(३) Stoddard, LoHwop, *The Revolt Against Civilization the Menace of the Under Man.* London, Chapman and Hall, 1922.

(४) Gould, Charles W., *America : a Family Matter.* New York, 1922.

(५) Osborn, Henry Fairfield, *Man Rises to Parnassu.* London, Oxford University Press, 1928.

(१८) English translation : Quatre fages, Jean-Louis Armand de, *The Prussian Race*, London, 1872. Translated by Isabella Inmes.

(१९) Broca, Paul, Memoirer d' Anthropologie. Pans 1871.

(२०) Chamberlain, Houston Stewart. *Dte Grundlagen des neinzehnten Jahrhuddr*. Munioh 1899. English Translation the Foundations of the Nineteenth Century., London, 1911, 2 Vols. Translated by John Lees.

(२१) कित्ता, खंड १, पृ. ४९९, टीप.

(२२) कित्ता, खंड १, पृ. ४९१.

(२३) Rosenberg, Alfred, Der My thus des Zwanzigsten Jahrhunderts Munich, 1955.

◎ ◎

## प्रकरण ८ वे

# मग वांशिक पूर्वग्रह का ?

आपण पाहिलेच आहे की, मानवी प्रगती ही केवळ एका वंशाचे कार्य आहे किंवा हे प्रगतीचे कार्य वंशशुद्धीच्या चळवळीवर भविष्यकाळात निश्चिन्तपणे सोपवता येईल ही कल्पना वंशविषयक सर्व शास्त्रीय ज्ञानाशी विसंगत आहे. कोणतीही महान संस्कृती एकाच शुद्ध वंशाने निर्मिली नाही आणि इतिहास, मानसशास्त्र, जीवशास्त्र किंवा मानवशास्त्र यांपैकी कोणीच सद्यःकालीन एखाद्या मानववंशाच्या भवितव्याविषयी निर्णय देऊ शकत नाहीत. वंशवाद ही शास्त्रीय ज्ञानाची कुचेष्टा आहे आणि कायमच त्याचा उपयोग एखाद्या गटाच्या – मग तो वर्ग असेल वा राष्ट्र असेल, सर्वश्रेष्ठत्वाच्या खोट्या समर्थनाकरिता केला जातो. अर्थातच समर्थक या वर्चस्वी गटाचाच घटक असतो आणि त्या गटाच्या यावच्चंद्रदिवाकरौ श्रेष्ठस्थानासंबंधी त्याचा पूर्ण विश्वास असतो.

मग वंशश्रेष्ठतावादाला आपल्या काळात इतके महत्त्व का आले आहे ? या प्रश्नाचा विचार केल्याशिवाय वंश आणि वंशवाद याविषयीची कोणतीही चर्चा पूर्ण होऊ शकत नाही. खरा बोचणारा प्रश्न तोच आहे. कारण ( वंशवादापासून ) मुक्ती मिळविण्याकरिता जे उपाय योजणे योग्य आहे असे आपल्याला वाटते ती उपाययोजना आपल्या या प्रश्नाच्या उत्तरावर अवलंबून आहे.

या प्रश्नाचे उत्तर देण्याकरिता आपल्याला 'आंतरिक जवळीक' असल्या पिंजून काढलेल्या सिद्धान्तांवर अवलंबून राहण्याची गरज नाही. इतिहासाने त्याची उत्तरे अनेकवार दिलेली आहेत; योग्य तो दृष्टिकोण मात्र पाहिजे. आपण पाहिले आहे की, वंशश्रेष्ठताविषयक

सिद्धान्त आज जसे मांडले जातात, ते रूप आधुनिक आहे. परंतु त्यातून जी मनोविकृती व्यक्त होते ती जुनीच आहे. फक्त 'समर्थक कारणे' बदलली आहेत. ही जुनी मानवी मनोविकृती अशी आहे की, माझा गट हा विशेष महत्त्वाचा, तो कमजोर झाला तर सर्वच मूल्यवान गोष्टी नाश पावतील. या मूल्याच्या एवढ्याशा अंशालाही धक्का लागण्यापेक्षा लाखो लोक नष्ट झाले तरी चालेल. म्हणून त्या महत्त्वाला कोणत्याही क्षेत्रात आव्हान देणारी व्यक्ती नेस्तनाबूत करणे हे माझे पवित्र कर्तव्य आहे.

परंतु ही संघर्षक्षेत्रे वरचेवर बदलत असतात. जेव्हा एखाद्या क्षेत्रात जय मिळतो व पूर्वीच्या लढाऊ छावण्यांमध्ये सहिष्णुता व सहकार्य प्रस्थापित होते तेव्हा त्या संघर्षाच्या घटनेकडे माणसाच्या हातून घडलेली एक चूक अशा दृष्टीने पाहिले जाते. आपल्याला वाटते की, आपण त्या माणसांपेक्षा निराळे आहोत. खरोखरी काही प्रगती आपण साधली आहे. परंतु आपल्याहून पुढच्या पिढ्या येतात त्या आपल्याकडे मागे वळून पाहतात आणि ठरवतात की आपण परस्पर-असहिष्णुता ही फक्त जीवनाच्या अन्य क्षेत्राकडे वळवली आहे. अनेक शतके धर्म हे संघर्षक्षेत्र होते. मध्ययुगात बिगरख्रिस्ती लोकांना शिक्षा देण्यासाठी चौकशी-मंडळे, इन्क्विझिशन, असत, ती म्हणजे निव्वळ रानटीपणा नव्हता. ज्या क्षेत्रात आज आपण 'जगा आणि जगू द्या' हे तत्त्व मानावयास राजी असतो, त्या क्षेत्रात 'विशेष महत्त्वाचे असे आम्हीच काय ते कमावले आहे' असा दावा त्याच्या सर्व मथितार्थासह इन्क्विझिशनमध्ये अंतर्भूत होता. आधीच्या या उद्दामपणाची निमित्ते व परिणाम यांचे परीक्षण केल्याशिवाय आपल्याला वंशवादाकडे योग्य संदर्भात पाहता येणार नाही. हा उद्दाम-पणा वंशक्षेत्रापेक्षा धर्मक्षेत्रातच दिसला हे केवळ काळाचे प्रतिबिंब आहे. एरवी, अन्य दृष्टिकोणातून पाहता वांशिक आणि धार्मिक जाच एकमेकांच्या प्रतिकृती आहेत. त्यांच्या समर्थकांनी पवित्र कर्तव्यांचे दावे एकसारखेच केले होते. दोघांच्याही समर्थकांनी कत्तली केल्या, लुटालूट केली आणि तात्पुरते का होईना, आपले खिसे भरले. ऐतिहासिक दृष्टि-कोणातून पाहता, दोघांनीही राजकीय हेतूंच्या सिद्धीकरिता असत्य आवाड्या उठवल्या होत्या व दोघांनीही उज्ज्वल संस्कृतींचा विध्वंस केला. समर्थकांपैकी एका गटाने धार्मिक बाबतीत छळवाद केला तर दुसऱ्याने वांशिक आधारावर, एवढाच फरक असला तरी धार्मिक छळ निदान वांशिक छळाइतपत समर्थनीय होता. मध्ययुगीन जगाची खात्री होती की, माणसाचे येथील अस्तित्व ही त्याच्या चिरकालीन जीवनातील एक अतिशय लहान घटना आहे; ख्रिस्तविरोधी प्रचारामुळे हजारो आत्मे नरकात जातील तेव्हा ख्रिस्तविरोधकाला ठार मारणे ही सर्वसाधारण माणुसकीच होय. हा तर्कदोष आहे असे आज आपण मानतो, पण आपल्यालाच फक्त देवाची आज्ञा झाली आहे असा ज्यांचा विश्वास होता त्यांच्या उदात्त हेतूंना आपण कमी लेखता कामा नये. केवळ उद्दामपणामुळे त्यांनी अधार्मिकांचा छळ केला असे नव्हे तर, लोक देव ह्या शब्दाशी निष्ठा ठेवतात हे पाहणे आपले कर्तव्य आहे. तसेच, जास्तीत जास्त आत्म्यांना मुक्ती मिळेल हे आपणच पाहावयाचे अशा जाणिवेने प्रेरित होऊन

त्यांनी अधार्मिकांचा छळ केला. आज आपण राष्ट्रभक्ती किंवा वर्गाभिमान ही उदात्त भावना मानतो त्याप्रमाणे अनेक धर्माधिकाऱ्यांना ही जाणीव मोठी उदात्त भावना वाटत असली पाहिजे. परंतु इतिहासाचा निर्णय मात्र असा आहे की, जेव्हा यांपैकी कोणतीही उदात्त भावना ही सर्व विरुद्धपक्षीयांचा नाश करण्याच्या मोहिमेत परिणत होते तेव्हा ज्यांचे निर्मूलन होते यांच्याबरोबरच निर्मूलन करणाऱ्यांनाही दुःख भोगावे लागते आणि अखेरीस ती एक सामाजिक शोकान्तिका होऊन जाते.

इन्क्विझिशनचे असेच झाले. इ. स. १२०० ते १२५० या काळात रोममधील खिस्ती धर्मपीठ राजकीय व ऐहिक सत्तेच्या शिखरावर होते आणि याच काळात इन्क्विझिशनला जोर होता. या दशकात जर्मनीत ज्यूंना सतावण्यात येत होते त्याप्रमाणे त्या काळात पाखंड्यांची पारध हा अल्पसंख्याकांच्या छळाचा एक उद्रेक होता. छळ करणाऱ्यांना मिळणारे अल्पकालीन फायदे दोन्हीकडे एकाच प्रकारचे होते. राजकीय हेतू सिद्धीकरिता एक आघाडी म्हणून त्या छळाचा उपयोग होई; छळ केलेल्या व्यक्तींची मालमत्ता जप्त करून छळ करणारे संपन्न बनत आणि द्वेषप्रेरक मोहिमेमुळे लोकांचे लक्ष खऱ्या समस्यांवरून उडून छळाकडे वेधले जाई. इतिहासाच्या यथार्थ निरीक्षणातून ज्या खऱ्या समस्या दिसून येतात त्या दोन होत्या. पहिली समस्या होती सदसद्विवेकबुद्धीच्या स्वातंत्र्याची. हे स्वातंत्र्य चौकशी मंडळांच्या सर्व छळातूनही अबाधित राहिले आणि राजेशाही व पुरोहितशाही यावर शेवटी त्याने मात केली. दुसरा प्रश्न होता कॅथॉलिक धर्मपीठाच्या भौतिक सुखांच्या हव्यासाचा व काही ठिकाणी तर धर्माचार्यांच्या भ्रष्टाचाराचा. खिस्ती धर्मपीठाच्या सर्वांत वरिष्ठ मंडळात सुद्धा हा प्रश्न काही काळ मोठ्या गंभीर स्वरूपाचा झाला होता. आणि हिल्डेब्रँड (Hildebrand) (पोप ग्रेगरी द ग्रेट) व क्लाव्हा (Clairvaux) येथील महंत बर्नार्ड (Bernard) यांच्या कारकीर्दीत सुधारणेचे काही धैर्याचे प्रयत्नही झाले. परंतु सुधारणेला काळ अनुकूल नव्हता, ख्रिश्चनधर्मविरोधी लोकांनी धर्मपीठाविरुद्ध स्वैराचाराची ओरड सुरू केली. या विरोधकांना चिरडून टाकण्यासाठी धर्मपीठाने एक मोहीमच सुरू केली. त्या मोहिमेत निष्ठावन्तांचे लक्ष गुंतून राहिले व खुद्द धर्मपीठाच्या पदाधिकाऱ्यांत सुधारणा करण्याचे लांबणीवर पडले.

राजकीय स्वार्थाकरिता आघाडी म्हणून इन्क्विझिशनचा उपयोग दक्षिण फ्रान्समध्ये Capetian राजांच्या वाढत्या सत्तेला होत असलेला विरोध मोडून काढण्याकरिता करण्यात आला. फ्लॉरेन्समध्ये फ्रा रुगेरी (Fra Ruggieri) च्या नेतृत्वाखालील इन्क्विझिशनने भयानक जरब बसवून घिबेलिन (Ghibelline) पक्षाचे बंड चिरडून टाकले. जेथे जेथे इन्क्विझिशनची चलती होती–मग ती फ्रान्समध्ये असो की इटलीत किंवा स्पेनमध्ये असो-तेथे तेथे सत्तेच्या राजकारणाशी त्याची दोस्ती होती. या दोस्तीची व्याप्ती ही पाखंड्यांची मालमत्ता जप्त करण्याच्या प्रघातावर आधारलेली होती. इन्क्विझिशन म्हटले की लोकांच्या मनात पाखंड्यांना जिवंत जाळणे आणि कबुलीजबाब मिळविण्याकरिता त्यांचा अनन्वित छळ

करणे याच गोष्टी येतात. परंतु समाजशास्त्रदृष्ट्या मालमत्तेची जप्ती ही अधिक महत्त्वाची होती. सुरवातीस, जप्त केलेली मालमत्ता धर्मपीठाच्या मालकीची न होता, राजे आणि ऐहिक सत्ताधीश यांच्या मालकीची होई. या संपत्तीच्या वाट्यावरील पोपच्या गादीचा आणि पर्यायाने इन्क्विझिशनचा अधिकार जवळजवळ इ. स. १२५० पर्यंत मान्य झालेला नव्हता आणि त्यातील खूप मोठा वाटा नेहमीच ऐहिक सत्ताधीशांच्या खिशात जाई. पाखंड्यांची पारध करणे एकूण फायद्याचे होते. ज्यांना सत्ता आणि संपत्ती ही पाहिजे होती ते अशा संधीचा फायदा घेत. पाखंडी हे ईश्वराशी द्रोह करीत आहेत म्हणून ते गुन्हेगार आहेत अशा सिद्धान्तामागे ते आपला फायदा दडवून ठेवीत.

ईश्वराच्या नावाखाली चाललेल्या धर्मछळमोहिमेतील सर्वांत प्रसिद्ध मोहीम तेराव्या शतकाच्या पूर्वार्धात दक्षिण फ्रान्समधील पाखंड्यांविरुद्ध झाली. हे पाखंडी अल्बेजेन्जेस (Albigenses) या नावाने प्रसिद्ध होते आणि प्रॉव्हॉन्स (Provence) मधील त्यांचे मूळ स्थान हा भाग असा होता की त्यावर रोमच्या धर्मपीठाचा तसा जरा बेताचाच प्रभाव होता. त्या काळी उत्तर फ्रान्स व प्रॉव्हॉन्स यांत काहीच समान नव्हते व प्रॉव्हॉन्स-मधील जहागीरदार हे फ्रान्सच्या राजाचे ताबेदार नव्हते. दक्षिण फ्रान्समधील तुलू (Toulouse) घराण्याला तर विशेष उज्ज्वल इतिहास होता. कला व साहित्य यां-विषयीचे प्रेम, तसेच शौर्य व संपत्ती याकरिता ते घराणे दोन शतकेपर्यंत प्रसिद्ध होते. त्या घराण्याचा अमल प्रॉव्हॉन्सच्या संपूर्ण निम्म्या भागावर बसवलेला होता. त्या जहागिरीतील शहरे ही सर्व फ्रान्समध्ये सर्वांत संपत्तिमान व स्वायत्त होती. स्पेनमधील मूर लोक व पॅलेस्टाइनमधील साराकेन (Saracen) लोक यांच्याशी त्यांची मालाची व विचारांची देवाणघेवाण चालत असल्यामुळे त्याचा त्यांच्या संस्कृतीवर चांगलाच परिणाम झाला होता. त्या काळी पाश्चात्य जगात असलेल्या कुठल्याही संस्कृतीपेक्षा या संस्कृती कितीतरी प्रकारांनी अधिक प्रगत होत्या.

मॅनिकेइझम (Manichaeism) या मध्ययुगीन संप्रदायाच्या अंतर्गत असलेला असा अल्बेजेन्जेसचा संप्रदाय होता. आपल्या आद्य पापासून मुक्ती मिळविण्याकरिता अत्यंत काटेकोर संन्यस्त वृत्तीचा ते पुरस्कार करीत. त्यांची विश्वोत्पत्तिविषयक कल्पना सर्वसमावेशक द्वैताची होती. हे द्वैत सत् व असत्, प्रकाश व अंधकार यांतील आहे. केवळ वनस्पतीं-मधील प्रकाशाचा अंश भक्षण करून व मांसाशन वर्ज्य करून आणि इंद्रियसुख देणारी तामसी कृत्ये टाळूनच पुण्यशीलता मिळविता येईल असे ते मानीत. इतर अनेक पौर्वात्य धर्मांप्रमाणे या संप्रदायातीलही जे संन्यासी असत त्यांना देवतास्वरूप मानले जाई व सामान्य लोक त्यांची पूजा करीत. या संप्रदायातील द्वैतवाद समजण्यास सोपा होता व जगातील दुःखांचे जे स्पष्टीकरण त्यात दिले जात असे ते त्या संकटमय काळात मोठे आकर्षक होते. परंतु अल्बेजेन्जेस पंथाच्या शिकवणुकीसंबंधी आपल्याला फारच थोडी माहिती आहे. आपली त्यांच्यासंबंधीची बहुतेक माहिती आहे, ती तत्कालीन धर्माधिकाऱ्यांच्या भ्रष्टाचाराविरुद्ध त्यांनी

हरकत घेतली त्याची. दक्षिणेला आणि उत्तरेला कॅथॉलिकांच्या प्रभावाखालील प्रदेश आणि मध्ये प्रॉव्हॉन्स असे होते. परंतु त्या मधल्या प्रदेशात धर्मपीठ प्रभावी नव्हते. प्रॉव्हॉन्सच्या संस्कृतीची मुळे रोममध्ये नव्हती. शहरात भरभराटीस येणारा वर्ग विशेषकरून या पाखंडपंथाला उचलून धरीत होता आणि या वर्गाचे वाढते स्वातंत्र्य चर्चला अधिकाधिक गंभीर आव्हान देऊ लागले. या काळात चर्च तर ऐहिक सत्तेच्या शिखरावर होते. पोपच्या गादीने उत्तर फ्रान्समधील निष्ठावन्त धर्माधिकाऱ्यांना फर्मान काढले की प्रॉव्हॉन्सच्या पाखंड्यांचे समूळ उच्चाटन करण्याची मोहीम त्यांनी उघडावी आणि हे धर्मयुद्ध धर्माकरिता झालेल्या लढायांपैकी सर्वात भयंकर ठरले. शहरातील स्वातंत्र्यप्रिय नागरिकांचे मोठ्या प्रमाणावर हत्याकांड झाल्यानंतर आणि दक्षिण फ्रान्समध्ये भरभराटलेली संस्कृती उद्ध्वस्त झाल्यावर शेवटी उत्तर फ्रान्सचे Capetian राजे प्रॉव्हॉन्सचेही राजे बनले व अशा रीतीने युद्धाचा शेवट झाला. पाखंडी लोकांना जाळण्याचा कार्यक्रम शंभर वर्षेपर्यंत जारी होता आणि शेवटी एकदाचा तो संप्रदाय समूळ नष्ट झाला.

आधुनिक काळात इन्क्विझिशन टिकाव धरून राहिले नाही परंतु धार्मिक बाबतीतील जाच मात्र शिल्लक राहिला. अशा संघर्षांपैकी एक प्रदीर्घ व सर्वांत भयानक असा संघर्ष १६ व्या व १७ व्या शतकातील फ्रान्समध्ये घडून आला. त्या काळच्या फ्रेंच प्रॉटेस्टंटांना ह्यूगेनो ( Huguenot ) म्हणत असत. सतराव्या शतकाच्या मध्यापर्यंत त्यांची संख्या बरीच वाढली होती. अल्बेजेन्जेस धर्मविरोधकांप्रमाणे हेही मुख्यतः समृद्ध असे पांढरपेशे होते. आणि सोळाव्या शतकातील मध्यमवर्गीयांचा राजाच्या हातात सत्ता एकवटण्याला विरोध होता. एक पिढीभर ( १५६२–१५९३ ) धर्माच्या नावाखाली रक्तरंजित युद्धे खेळली गेली. परंतु बऱ्याच अंशी आर्थिक व राजकीय स्वरूपाचा असा एक संघर्ष त्याखाली दडला होता. १५९८ मध्ये आपला नेता हा फ्रान्सचा चौथा हेन्री म्हणून गादीवर बसवण्यात ह्यूगेनो यशस्वी झाले. त्या वेळी नान्ते ( Nantes ) च्या जाहीरनाम्याने प्रॉटेस्टंटांनाही सर्व नागरी हक्क बहाल करण्यात आले. मात्र कॅथलिकांचे हक्क काढून घेण्यात आले नाहीत. हा एक लक्षात घेण्याजोगा विजय होता. आता सरकारी कायद्याने धार्मिक व राजकीय बाबतीत स्वातंत्र्य देण्यात आले. परंतु त्यापूर्वी आणि त्यानंतरही घडत आले आहे त्याप्रमाणेच या वेळीही झाले व संघर्ष चालूच राहिला. राजपद कॅथॉलिकांचे होते व कॅथॉलिक धर्माधिकाऱ्यांनी राजाचे नान्ते येथील आज्ञापत्र कधीच मान्य केले नाही. धर्माधिकारी रिशेल्यू ( Richelieu ) हा फ्रान्समधील सर्वांत प्रबळ माणूस होता. तो धर्माधिकारी होता व शिवाय राजाच्या सल्लागार मंडळाचा सभासदही होता. अंतर्गत बाबतीत त्याचे धोरण राजाच्या हाती एकतंत्र सत्ता असावी असे होते व या धोरणालाच ह्यूगेनो लोकांचा विरोध होता. त्यामुळे त्याच्या अंतर्गत धोरणावर त्याच्या ह्यूगेनोंना असलेल्या कडव्या विरोधाचा प्रभाव होता. ह्यूगेनो मंडळींचा तो धर्माच्या नावाखाली छळ करू शके. रिशेल्यूच्या मृत्यूनंतर १४ व्या लुईने राजाचे हे अधिकार पूर्णपणे अमलात

आणले. जर ह्युगेनोंना दूर करता आले तरच अनियंत्रित राजसत्तेचे त्याचे स्वप्न वास्तवात येऊ शकत होते. राजाने त्यांचा कायदेशीर छळवाद आरंभला. त्यांचा धर्म व त्यांचे नागरी हक्क यांची अमलबजावणी करण्यात तो त्यांच्याविरुद्ध पक्षपात करू लागला. 'राजाचा धर्म' स्वीकारण्याकरिता लष्कराच्या जोरावर त्यांच्यावर अनन्वित अत्याचार होऊ लागले. मग १६८५ मध्ये चौदाव्या लुईने नान्ते येथील राजाज्ञा मागे घेतली. आपले सर्वच प्रजानन कॅथॉलिक पंथीय असल्यामुळे आता या राजाज्ञांची गरज उरलेली नाही असे त्याने जाहीर केले. प्रॉटेस्टंट लोकांनी देशान्तर तरी केले किंवा त्यांना तुरुंगात तरी डांबण्यात आले. या कृत्यामुळे लुई अनियंत्रित राजा बनला व ह्युगेनोंच्या जप्त केलेल्या संपत्तीने त्याचा खजिना भरून गेला. या कृत्यामुळे फ्रान्सला आपले ४,००,००० वर नागरिक गमवावेही लागले. हे नागरिक शूर व बुद्धिमान होते. त्यांना ज्या देशांनी आश्रय दिला, ते देश त्यांनी आपल्या कर्तृत्वाने संपन्न बनविले.

वंशश्रेष्ठतावादाच्या उदयापूर्वी अल्पसंख्याकांवर कशी दडपशाही चालत असे त्या दीर्घ कथेतील अल्बेजेन्जेस विरुद्धचे धर्मयुद्ध व ह्युगेनोंची हकालपट्टी ही केवळ दोन ठळक उदाहरणे आहेत.

ही अल्पसंख्याकांवरची दडपशाही विसाव्या शतकातही सततची गांजणूक व राष्ट्रवादी लढाया या स्वरूपात चालू आहे. आज जगात आहेत त्याप्रमाणे तेराव्या व सोळाव्या शतकातही नवीन सामाजिक व आर्थिक गरजांमुळे नवीन क्षोभक चळवळी सुरू होत होत्या. जुन्या समाजव्यवस्थेच्या कोणत्या ना कोणत्या पैलूच्या विरोधात गट उभे राहात. सत्तेवर असलेला पक्ष अशा गटांना अत्याचार, वध, मालमत्तेची जप्ती अशा उपायांनी उत्तर देई. सत्तेवर असलेले पक्ष नेहमीच असे करू शकतात. परंतु इतिहासाच्या दृष्टीने अशा दडपशाहीतून मिळालेला विजय अगदी पोकळ असतो. इन्क्विझिशनच्या भरभराटीचा काळ हा जसा प्रॉव्हॅन्सच्या संस्कृतीच्या विनाशाचा काळ ठरला त्याप्रमाणेच चर्चच्या ऐहिक सत्तेच्या उताराचाही बिंदू ठरला. ह्युगेनोंच्या हकालपट्टीमुळे चौदाव्या लुईची कारकीर्द वैभवशाली ठरली. परंतु हे वैभव केवळ तात्पुरते व अनर्थकारकच ठरले. 'आप डुबे, दुनिया डुबी.' सततच्या छळामुळे काही मध्यमवर्गाचा उदय थांबला नाही किंवा सदसद्विवेकबुद्धीच्या स्वातंत्र्याची वाढती मागणीही रोखली गेली नाही.

या सर्व वस्तुस्थितीवरून दोन निष्कर्ष आपणाला वंशश्रेष्ठतावादाच्या सिद्धान्तासंबंधी काढता येतात. पहिला असा की, वांशिक छळणुकीचे स्वरूप समजण्यासाठी आपल्याला 'वंश' कल्पनेचा अभ्यास करण्याची जरूर नसून छळणूक या गोष्टीचेच निरीक्षण केले पाहिजे. वंशवादाचा विचार उदय पावण्यापूर्वीच छळणूक ही फार पुरातन कहाणी झाली होती. समाजपरिवर्तन हे अटळ असते. परंतु ज्यांचे हितसंबंध जुन्या व्यवस्थेत गुंतलेले असतात त्यांचा परिवर्तनास नेहमीच विरोध असतो. हे हितसंबंध आर्थिक असतील किंवा

मध्ययुगीन युरोपातल्याप्रमाणे धार्मिक असतील किंवा उच्चकुलीन रोमन लोकांप्रमाणे सामाजिक जवळीक साधण्यासंबंधी असतील. ज्यांचे हितसंबंध असे गुंतलेले आहेत ते बुद्ध्या अथवा न कळत, आपला गट सर्वांत महत्त्वाचा आहे आणि हे नवे हक्कदार संस्कृतीला धोका आणतील असे मानण्याकरिता कारणे हुडकून काढणार. ते वंशपरंपरागत अधिकार अथवा राजाला देवाने दिलेले अधिकार अथवा धार्मिक श्रद्धा अथवा वांशिक शुद्धता अथवा स्पष्ट असे भवितव्य अशी कवली तरी आरोळी ठोकणार. या असल्या आरोळ्या तात्कालिक परिस्थितीचे पडसाद असतात आणि आरोळ्या मारणाऱ्यांनी कितीही प्रयत्न केले तरी यांपैकी एखादी तरी सनातन सत्यावर आधारलेली आहे असे आपल्याला वाटण्याचे कारण नाही. अमेरिकन अध्यक्षीय निवडणुकीतील 'त्याने आपल्याला युद्धापासून दूर राखले' वगैरे तऱ्हेच्या घोषणांसारख्याच नॉर्डिक वंशश्रेष्ठत्वाच्या घोषणा आहेत. समाजाच्या गरजांत जरासा बदल झाला की, त्याही तशाच विरून जातील. त्या विशिष्ट घटकेचा असंतोष व श्रद्धा ज्या प्रमाणात या घोषणा व्यक्त करतील त्या मर्यादेपर्यंतच त्या उपयुक्त असतात. ज्या काळी व ज्या प्रदेशात धार्मिक हितसंबंध विशेष प्रभावी होते तेथे धार्मिक स्वरूपाच्या घोषणा राजकीयदृष्ट्या उपयुक्त ठरल्या. जेव्हा या धार्मिक हितसंबंधांवर ऐहिक विशेषाधिकारांनी कुरघोडी केली आणि धार्मिक मतभिन्नतेला तितके महत्त्व उरले नाही, तेव्हा पूर्वीप्रमाणे अल्पसंख्याकांच्या धर्मच्छळाचे समर्थन धार्मिक घोषणांच्या द्वारा होईनासे झाले.

जो कार्यभाग साधण्याकरिता धार्मिक घोषणा यापूर्वी उपयोगी पडल्या, तोच कार्यभाग साधण्याचे काम वंशवादी घोषणा आता करीत आहेत. एखाद्या वर्गाच्या वा राष्ट्राच्या फायद्याकरिता इतरांच्या छळणुकीचे समर्थन करणे असे ते काम आहे. ही वंशवादी घोषणा आपल्या काळाला विशेष अनुकूल आहे. या शतकामध्ये विज्ञान हा शब्द जादूचा मंत्र झाला आहे. दुर्दैवाने फारच वेळा तो हातचलाखीच्या खेळाकरिता वापरला जातो. आपल्या प्रतिपादनाला मदत म्हणून ज्याला विज्ञान म्हणतात त्याची मदत घेणे हे फक्त वंशश्रेष्ठतावादच करतो असे नाही. सौंदर्यप्रसाधनांच्या एका निर्मात्याने नुकतीच आपल्या मालाच्या विविध जाहिरातींची पाहणी केली. त्याला असे दिसून आले की, ज्या दोन शब्दांनी खरेदीचे आकर्षण सर्वांत अधिक निर्माण होते ते शब्द म्हणजे 'तात्काल' व 'शास्त्रीय' हे होत. प्रत्येक प्रसाधनरंग, प्रत्येक फेस पावडर यात काही 'शास्त्रीय' वैशिष्ट्य असले पाहिजे. या 'शास्त्रीयते'च्या कल्लोळाने लाखो लोकांवर परिणाम होतो. हीच कथा बनावट औषधे, औषधविक्रेत्यांकडे मिळणारी अमली पेये, आरोग्यदायक खाद्यपदार्थ यांच्या बाबतीत घडली. शेवटी निर्मात्यांनी काय काय प्रौढीवाद सांगितला आहे यावर मध्यवर्ती सरकारची देखरेख ठेवून जनतेचे संरक्षण करणे जरूर झाले. 'विज्ञान' या घोषणेने आज बहुतेक सर्व गोष्टी खपविता येतात. जितक्या सहजगत्या रूज 'विज्ञाना'मुळे विकला जातो, तितक्याच सहजपणे छळणूकही खपवली जाते. वैज्ञानिक वरचेवर सांगतो की हा जाहिरातीतील रूज इतर

कोणत्याही रुजपेक्षा निराळा नाही, किंबहुना, प्रयोगशाळेतील चाचणीत तो विशेष अपायकारक असल्याचे दिसून आले आहे. वैज्ञानिक हेही दाखवून देतो की, कोणत्याही एका वंशाला कर्तृत्व अथवा सद्गुण यांची मक्तेदारी मिळालेली नाही आणि शास्त्र या दृष्टीने वंशश्रेष्ठतावाद्यांच्या दाव्यांना काही प्रामाण्य नाही. वैज्ञानिकांच्या दृष्टीने शास्त्र म्हणजे ज्ञानाचे व्यवस्थापन होय, त्याचा 'जादू' म्हणून उपयोग करणे त्याला नापसंत असते. परंतु त्याला माहीत आहे की, वैज्ञानिक अथवा शास्त्रीय या शब्दाचे आपल्या संस्कृतीला संमोहन पडते. मग तो शब्द कोणत्याही कार्यासाठी वापरला जावो.

संघर्षाच्या समर्थनार्थ वंशवादी घोषणांच्या निवडीचे मूळ आणखी एका रीतीने आधुनिक काळाच्या परिस्थितीत रुजलेले आहे. किती तरी निरनिराळ्या वांशिक गटांचे लोक आज पाश्चात्त्य संस्कृतीमध्ये एकमेकांच्या निकट संपर्कात राहातात एवढ्यात्र कारणामुळे-सुद्धा छळणुकीसाठी वंशवादी कारणे पुढे करणे सोयीचे ठरते. वंशश्रेष्ठतावादी घोषणा दिल्या जातात याचे कारण घोषणा देणारे लोक शुद्ध वंशाचे असतात, असे नसून ते शुद्ध वंशाचे नसतात हे आहे. दुसऱ्या शब्दांत सांगावयाचे म्हणजे अशा घोषणा उठण्याचे कारण एकाच शहरात अथवा एकाच राष्ट्रात अनेक भिन्न भिन्न वंशगटांचे लोक राहात असतात किंवा ज्या अनेक राष्ट्रांची संस्कृती एकच आहे ती राष्ट्रे राष्ट्रवादी लढायात गुंतलेली असतात असे आहे. म्हणूनच अनेक वेळा दाखवून दिला जातो तो एक विरोधाभास उत्पन्न होतो. तो असा की जगातील अत्याधिक वंशमिश्रण असलेले लोकच वंशशुद्धीकरिता गगनभेदी घोषणा करीत असतात. वंशविषयक दृष्टिकोणातून पाहता हे मूर्खपणाचे दिसते खरे पण छळणूक करावयाच्या दृष्टीने पाहता अशा घोषणा अटळच आहेत. ज्या लोकांच्या अस्तित्वाची दखल घेण्याचे कारण नसते अशा लोकांविरुद्ध लढाईच्या वल्गना कोणताच समूह करीत नाही. संघर्ष उत्पन्न होण्यासाठी प्रथम संपर्क यावा हवा. म्हणून युरोपात वंशवादी घोषणा उठल्या त्या वर्गकलहात आणि राष्ट्राराष्ट्रातील संघर्षात. छळणुकीकरिता वापरण्यात येणाऱ्या जुन्या धार्मिक घोषणांची पकड सैल झाली होती. त्या ऐवजी तत्कालीन विज्ञानाची एक भ्रष्ट आवृत्ती वंशवाद्यांनी उभी केली इतिहासाच्या दृष्टिकोणातून मात्र वंशवाद म्हणजे सत्ताधाऱ्यांनी स्वतःच्या फायद्याकरिता अल्पसंख्याकांच्या केलेल्या छळाचे केवळ आणखी एक उदाहरणच होय.

या वेळेला लोकप्रिय असलेल्या छळणुकीचे वंशसंघर्ष हे केवळ समर्थन असते हे एकदा ध्यानात आणले म्हणजे सर्व वंशवादी सिद्धान्तांतील विलक्षण विरोधाभास स्पष्ट होतो. वंशवाद्यांच्या मते, वंशावंशांत एकमेकांविषयी तिरस्कार असतो. त्याचे कारण वंशवादी वारंवार असे देतात की मनुष्यमात्राच्या ठिकाणी भिन्न वंशांशी फटकून वागण्याची वृत्ती उपजतच असते. पण ज्या अर्थी वंशाचे बेमालूम मिश्रण सार्वत्रिक आहे त्या अर्थी त्यांचे हे म्हणणे खोटे आहे असे जीवशास्त्रज्ञ, इतिहासपंडित, मानवशास्त्रज्ञ इत्यादींनी वारंवार ध्यानात आणून दिले आहे. "जर निसर्गाला वंशसंकर नको असेल तर त्याचा इतका

प्रादुर्भाव कशामुळे असतो ?"[1] कोणत्याही दोन गटांतील संघर्ष आणि त्या गटात परस्पर-विवाहसंबंधाविषयी तिटकारा जोडीनेच असतात. मग ते गट कसेही बनलेले असोत. ते वांशिकच असले पाहिजेत असे नाही. फ्रान्समधील कॅथॉलिक हे ज्याप्रमाणे ह्यूगेनोंबरोबर विवाहसंबंध टाळीत त्याप्रमाणेच रोममधील उच्चवर्णीय सामान्य जनतेबरोबरचे विवाहसंबंध टाळीत असत. आपल्या स्वतःच्या वंशालाच केवळ, लैंगिक आकर्षण वाटावे अशा तऱ्हेच्या उपजत प्रवृत्तींचा एखादा गट माणसात असतो, असे नाही, तर गटाबाहेरील माणसाला प्रतिष्ठा द्यायला गटातील व्यक्ती नाराज असतात. आपले विशेषाधिकार त्याच्याबरोबर वाटून घ्यायला त्यांना आवडत नाही. जगातील त्या त्या स्थानिक लोकांबरोबरच्या आपल्या संबंधात अँग्लो-सॅक्सन लोकांनी ठरवला आहे, तसा हा विशेष गट वांशिक स्वरूपाचा असेल तर तो विशेष गट लग्नसंबंधात निवड करून राखला जातो. अर्थात त्यामुळे विवाहबाह्य संबंधांना अडथळा येत नाही. हिंदुस्थानात मोठ्या संख्येने असलेले मिश्रवंशीय लोक व अमेरिकेतील म्युलॅटो हे दोनही प्रकारचे लोक, भिन्न वंशांसंबंधी हाडवैर असले म्हणजे उपजतच तिटकारा असतो असे नाही याची साक्षच आहेत.

दृश्य अशा वांशिक भिन्नत्वावरून वांशिक पूर्वग्रहांचे जे स्पष्टीकरण देऊ पाहतात त्या तत्त्वचिंतकांचा असाच गोंधळ उडालेला दिसतो. चेहरेपट्टी आणि रंग यातील ठळक आणि उघड अशा तफावतीमुळे वांशिक पूर्वग्रह उत्पन्न होतो असे ते म्हणतात. परंतु छळणुकीचा एक क्षणिक विशेष हा प्रयोजक विशेष समजण्यात त्यांची चूक होते. इन्क्विझिशनमध्ये ज्यांचा छळ झाला ते अल्बेजेन्जेस किंवा ह्यूगेनो यांचा त्वचेचा रंग किंवा नाकाचा आकार इतरांपेक्षा निराळा नव्हता. दुसऱ्या बाजूस असे दृश्य दिसते की, केसांचा रंग अथवा डोक्याचा आकार यामुळे समूहासमूहात जितकी भिन्नता यावी तितकीच दारिद्र्या-मुळेही येऊ शकते. वंशाशिवाय इतर अनेक कारणांमुळे गट भिन्न होऊ शकतात. उदा. ते चर्चमध्ये प्रभुभोजनसमारंभास जातात की नाही, त्यांच्या शब्दोच्चारणात 'ह' कार गळतो की काय. असे म्हणतात की एका आदिवासी जमातीचे लोक आपल्याच वंशाच्या व आपलीच भाषा बोलणाऱ्या शेजारच्या जमातीच्या माणसांना दिसताक्षणीच ठार मारीत कारण एवढेच की, ही दुसरी जमात ज्या रीतीने आपले ओझे वाहून नेई ती रीत माणसाला अपमानकारक आहे असे पहिल्या लोकांना वाटे. त्वचेचा रंग स्पष्ट दिसतो यामुळे नव्हे पण वांशिक गुणविशेष पिढ्यानुपिढ्या संक्रमित होत असतात या गोष्टीमुळे मात्र आज जगात वांशिक पूर्वग्रह ही नवीन समस्या बनली आहे. एखादा माणूस प्रभुभोजनाला जाणे बंद करू शकेल, एखादा ह्यूगेनो राजा (कॅथॉलिक) ख्रिस्ती संस्कार घेईल-कारण का की, पॅरिसचे स्वामित्व मिळविण्याकरिता प्रभुभोजन पत्करले, किंवा, पिग्मॅलियन नाटकाची नायिका आपली मातृभाषा ऑक्सफोर्डच्या ढंगाने उच्चारावयास शिकेल. परंतु अगदी ठार काळा निग्रो हा 'गोरा' म्हणून खपणार नाही किंवा त्याची मुलेनातवंडेसुद्धा गोरी म्हणवण्याइतकी रंगाने उजळ होणार नाहीत. भिन्नत्वाच्या तौलनिक सातत्याचा हा प्रश्न आहे. केवळ

दिसण्याचा नव्हे. इतिहासाच्या दीर्घ कालावधीत छळणुकीचे प्रमाण केव्हा जात, केव्हा कमी झालेले दिसेल. पण हे बदल वांशिक स्पष्टतेच्या दृश्यादृश्यतेशी संबंधित नाहीत.

उरजत हाडवैर किंवा वांशिक दृश्यभेद यासारख्या तात्त्विक मुद्यांची चर्चा करतात तोवर वांशिक पूर्वग्रहाच्या स्वरूपासंबंधीची चुकीची स्पष्टीकरणे ही फारशी महत्त्वाची नाहीत. त्याहून एक फार महत्त्वाचा प्रश्न आहे. वंशसंघर्षाचे स्वरूप समजून घेण्यासाठी आपल्याला मुळात संघर्षाचे स्वरूप समजावून घेतले पाहिजे, वंशाचे नव्हे, ही वस्तुस्थिती अधिक अंत पाहणारी आहे. त्याचा अर्थ असा की, कोणत्याही एका समूहातील अथवा अनेक समूहांमधील संघर्षाची खोल रुजलेली बीजे ही वांशिक पूर्वग्रहाच्या कोणत्याही उद्रेकास कारण होतात. ज्या परिस्थितीत पूर्वी धर्माच्या नावाने डांगोरा पिटला असता त्याच परिस्थितीत आज वंशाचा उद्घोष होतो. जर सुसंस्कृत माणसांना हे पूर्वग्रह— मग ते धार्मिक स्वरूपाचे असोत वा वांशिक असोत - नाहीसे करावयाचे असतील तर समाजातील महत्त्वाच्या उपद्रवकारक चालीरीती ज्यांचा धर्म अथवा वंश यांच्याशी काहीही संबंध नाही अशासुद्धा त्यावर उपाय योजून त्या उपायांचा सर्वांनाच फायदा होईल असे पाहिले पाहिजे. ज्या कशामुळेही संघर्ष कमी होतो, ज्यामुळे बेजबाबदार सत्ताप्रभावावर मर्यादा पडते आणि ज्यामुळे लोकांना सन्मान्य रीतीने उपजीविका करता येते, त्यामुळे वंशसंघर्ष कमी होतो. हे कार्य अन्य कोणत्याही उपायाने होणे नाही.

कारण, घर्षण हे मुळात वांशिक नसते आज जगात कडवे संघर्ष कोणते आहेत हे आपणा सर्वांना माहीत आहे : राष्ट्राराष्ट्रातील स्पर्धा, ' आहे रे ' पक्षाने केलेला ' जैसे थे ' चा अतिरिक्त पाठपुरावा व ' नाही रे 'नी चढवलेले मर्मभेदक हल्ले, दारिद्र्य, बेकारी, युद्ध. निराशेने घेरलेल्या माणसांना आपल्या असमाधानाचा वचपा काढण्याकरिता कोणी अजापुत्र बळी द्यायला पाहिजेच असतो. आपल्याला जे दुःख यातना देते आहे त्याचा आपण बदला घेतला असे क्षणभर त्यांना भासावे अशी ती जादू असते. त्यांच्या शासनकर्त्यांकडून व शोषकांकडून त्यांना याकरिता उघड उघड प्रोत्साहन मिळते. अशा हिंसाचारात जनता गुंतली तर त्यांना हवीच असते. कारण ते मनात भिऊन असतात की त्यांना असे करू दिले नाही तर ते काहीतरी अधिक अडचणीत टाकणारे मागणार. म्हणून जेव्हा लष्करावरील खर्चाकरिता हिटलरने ग्राहकोपयोगी वस्तूंचा पुरवठा कमी केला, कामाचे तास वाढविले आणि खऱ्या कमाईत घट केली, तेव्हा हिटलरने राष्ट्राला असे जोराजोराने पटवून दिले की, १९१९ मधील पराभव ज्यू लोकांमुळे झाला आणि हिटलरने वांशिक दंगाधोप्यांना उत्तेजन दिले. यामुळे दोन गोष्टी साध्य झाल्या. अर्धपोटी लोकांच्या असंतोषाला सरकारला उपद्रवकारक होणार नाही अशा रीतीने वाट मिळाली आणि ज्यूंची धनदौलत सरकारला गिळंकृत करता आली.

युरोपात सेमेटिकवंशविरोधाच्या उदाहरणांची एक दीर्घ मालिकाच आहे. तिचेच

अनुसरण या घटनाक्रमात जर्मनीच्या नाझी राजवटीने केले. मध्ययुगामध्ये ज्यूंना होणारा जाच हा सर्वच मध्ययुगीन छळणुकींप्रमाणे वांशिक असण्यापेक्षा धार्मिक स्वरूपाचा होता. ज्यू आणि बिगर ज्यू यांच्यात विवाह करण्यास मनाई होती. पण ती वंशवादी उपाययोजना म्हणून नव्हे तर जसा कॅथॉलिक आणि पाखंडी यांच्यातील विवाहाचा निषेध होता, त्या रीतीनेच. जेरुसलेमच्या लढायांच्या काळात जे लोक मागे, आपापल्या ठिकाणी होते, त्यांच्या जमावांनी ख्रिस्ताच्या मृत्यूचा सूड धर्मयुद्धाच्या लढायांतील सैनिकांप्रमाणे घेण्याचे अनुकरण करून पद्धतशीर लुटालूट व दंगे केले. जिहाद पुकारणारे अरब आणि तुर्कांशी लढले; जमाव ज्यूंना मारत होते. तुर्क आणि ज्यू यांच्यात वांशिक संबंध काही नव्हता. धर्मयुद्धाच्या काळात दोघांना एकाच मापाने मोजले गेले कारण की ज्यूंनी ख्रिस्ताला मारले होते, क्रूसावर चढवले होते तर त्याचे थडगे तुर्कांच्या ताब्यात होते. किंवा, जिहादवाल्यांपासून चालना मिळालेले छळणुकीचे लोग हे एखादा वंशोच्छेद करण्याकरिता होते असेही नाही. धर्मभ्रष्ट ज्यू हे सुरक्षितता विकत घेऊ शकत. धर्मत्याग करणारा ज्यू आपल्या धर्माचा धिक्कार करी किंवा आपला धर्म लपवून ठेवी, आपला वंश लपवीत नसे. ज्यूंना अनुकूल असणारे सत्ताधीश आणि पोप फर्माने काढीत की, ज्यूंना सक्तीने बाप्तिस्मा देऊ नये, त्यांच्यावर ख्रिस्ती सणवार पाळण्याची सक्ती करू नये किंवा त्यांना चिन्हे वापरावयास लावू नये, अगदी पहिल्या महायुद्धाच्या काळापर्यंत काही मोठे वंशवादी, या संघर्षावर उपाय म्हणून ज्यू वंशाचा नायनाट करावा असे सुचवीत नसत, तर ज्यू वंशाचे इतर वंशीयांशी सात्मीकरण करावे असे प्रतिपादन करीत, प्रसिद्ध राष्ट्रवादी इतिहासकार ट्रेट्स्की ( Treitschke ) याच्या बाबतीत हे विशेष खरे होते. या शतकाच्या सुरवातीला जर्मनीतील, वंशवादापासून मुक्ततेचा विचार करणारा तो सर्वांत प्रमुख प्रवक्ता होता.

परंतु युरोपात धार्मिक छळवादाची जागा जशी वांशिक छळवादाने घेतली तसा ज्यूंचा हलकेपणा त्यांच्या वंशाला चिकटला. युरोपच्या बऱ्याच मोठ्या भागात १८८० च्या दशकात, पद्धतशीर लुटालूट व छळवाद यांची एक भरतीची लाट आली. सगळीकडेच लोकांना वाटत होते की पांढरपेशे लोक सगळे लोणी मटकावतात आणि ज्यूंनी जमिनी विकत घेण्यावर बंदी असल्यामुळे व ज्यूंच्या वस्त्या शहरात अलग काढलेल्या असल्यामुळे ज्यू हे सगळे पांढरपेशेच होते. याच कारणाकरिता त्यांचा द्वेष होत असे. आणि ज्यूंविरुद्धच्या धार्मिक स्वरूपाच्या द्वेषाची जुनी रूढी असल्यामुळे या नव्या छळणुकीला जास्त जोर आला. सेमेटिक वंशाविरुद्ध वांशिक द्वेष उभारणे फारच सोपे होते. जर्मनीमध्ये १८८० च्या दशकात सनातनी पक्षाच्या सभासदांनी जरा दुष्ट बुद्धीनेच एका सेमेटिकवंशविरोधी चळवळ्या पुढाऱ्याला उत्तेजन दिले. हेतू हा की, त्याच्या अनुयायांच्या बळावर आपला लोकशाही समाजवाद्यांना असलेला विरोध अधिक जोरकस व्हावा. ज्यूंची प्रार्थनामंदिरे जाळली गेली, ज्यूंविरुद्धच्या हिंसाचारांना शिक्षा होईना. ज्यू लोकांच्या धर्मविधीत मानवहत्या केली जाते हा आरोप परत एकदा केला गेला. १८९० च्या दशकामधील प्रसिद्ध

ड्रायफस प्रकरण म्हणजे फ्रान्समधील सेमेटिकवंशविरोधी चळवळीचा कळसच होय. युद्धपूर्व काळातील युरोपातील सेमेटिकवंशविरोधाचा हा जवळजवळ अत्युच्च बिंदूच म्हणता येईल. प्रतिगामी पक्षाचे लोक सैन्यात मोठ्या प्रमाणावर होते आणि एक प्रमुख ज्यू सैन्याधिकारी कॅ. आल्फ्रेड ड्रायफस याच्या चौकशीचा फार्स, बनावट पुराव्याच्या आधाराने त्याच्यावर सिद्ध केलेला देशद्रोहाचा आरोप हे संघर्षाचे प्रकरण वर्षभर चालू होते. त्याने फ्रान्सला अक्षरशः हादरून सोडले. परंतु असे झाले की, तो कट उघडकीला आणला गेला, ड्रायफस निर्दोष सुटला आणि असे उघडकीला आले की, जे खरे देशद्रोही होते त्यांनी सेमेटिक-वंशविरोधाचा फायदा घेऊन एका ज्यूच्या आड लपण्याचा प्रयत्न केला होता. यामुळे अर्थात, फ्रान्स सन्मानित झाले.

आधुनिक वंशवादाच्या बुरख्यातील युरोपियन सेमेटिकवंशविरोधाचा जितका जवळून अभ्यास करावा, तितके लक्षात येते की, खरा कलह हा वांशिक स्वरूपाचा नसून, तो जुनाच, नागरिकत्वाच्या असमान हक्कांबद्दलचा आहे. जेव्हा एखाद्या गटाला, मग तो औद्योगिक कामगारांचा असो वा धार्मिक संप्रदायाचा असो वा वांशिक गट असो, कायद्यापुढे पक्षपाताने वागवले जाते किंवा आयुष्यात समान संधी, स्वातंत्र्य व उपजीविकेची साधने त्याला नाकारली जातात, तेव्हा काही शक्तिशाली हित-संबंधी गट त्या गोष्टींचे भांडवल करणार व या पक्षपाताला जबाबदार असणाऱ्यांवरचा रोष, दुसऱ्या तुलनात्मक दृष्टीने बिनधोक अशा मार्गाकडे वळवणारच. ज्यूंच्या बाबतीत असे आहे की, धर्मविषयक छळाच्या जुन्या जमान्यातील द्वेष निर्माण करणारे परवलीचे शब्द आपल्याला वंशपरंपरेने मिळालेलेच आहेत. त्यांना एखाद्या नव्या चौकटीत घालून सहज अर्थ देता येतो. शिवाय एक दुर्लभ फायदाही त्यात आहे. पक्षपाताने वागवल्या जाणाऱ्या इतर अल्प-संख्याकांहून ज्यूंचे वेगळेपण असे की, ज्यूंजवळ पुष्कळदा खूप संपत्ती असते. त्यामुळे एखाद्या दरिद्री राजसत्तेचे वा जनतेचे ते छळणुकीकरिता ठळक असे लक्ष्य बनतात.

म्हणून अल्पसंख्याकांविरुद्धच्या इतर सर्व संघर्षांप्रमाणेच, सेमेटिकवंशविरोधावरही उपाय असा की, सर्वंकष असे नागरिकत्वाचे हक्क आणि कोणत्याही क्षेत्रात आपले कर्तृत्व अजमावण्याची संधी ही सर्व माणसांना मिळाली पाहिजेत. खोटा आरोप ठेवलेल्या एखाद्या ज्यूला न्यायालयात गुन्हेगार ठरवले जाईलच असे काही देशद्रोह्यांना वाटले नसते तर ड्रायफस प्रकरण घडले नसते. जर्मनीत १९३८ मध्ये जी राष्ट्रव्यापी स्वरूपाची पद्धतशीर लुटालूट झाली त्यात भाग घेणाऱ्यांना जर सरकार आपल्याला जबाबदार धरेल अशी जरब असती तर असे दंगे झाले नसते. अल्पसंख्याकांच्या सर्व हक्कांची जपणूक करणे हे केवळ ज्यांचा छळ होतो त्यांच्या सुरक्षिततेकरिता आवश्यक आहे असे नाही. अल्पसंख्य हे केवळ हुतात्मे ठरतील पण छळ करणारे हे रानटीपणाकडे झुकतात. मानवी समतेची किंमत मानवी हक्कांच्या रूपात चुकवण्यास आपण असमर्थ असू किंवा अनुत्सुक असू तर छळवणूक करणारे आपण या सापळ्यात सापडू व रानटी बनून जाऊ.

अमेरिकेतील यादवी युद्धापासूनच्या निग्रोंच्या समस्येतून हाच समाजशास्त्रीय पाठ मिळतो. कायद्यासंबंधी, शैक्षणिक, आर्थिक व सामाजिक भेदभाव अंतिमतः नष्ट करणे हेच कोणत्याही वर्णाविषयक कार्यक्रमाचे एकच विश्वासार्ह उद्दिष्ट असू शकते. अमेरिकेतील जवळजवळ सर्वच दक्षिणेकडील संस्थानांत अशी भेदमुक्ती अंतिम उद्दिष्ट म्हणूनसुद्धा मान्य झालेली नाही. या वस्तुस्थितीची दोन कारणे आहेत. एक म्हणजे गुलामांवरील स्वामित्वाचा दृष्टिकोण तेथे टिकून आहे आणि दुसरे असे की, संयुक्त संस्थानांत निग्रो लोक फार मोठ्या संख्येने मानहानिकारक परिस्थितीत रहात आले आहेत. बरेच निग्रो पूर्ण नागरिकत्व मिळण्यास अजून अपात्र आहेत असे मान्य करू या; तरीसुद्धा अधिक अनुकूल परिस्थितीत ते कशा तऱ्हेचे नागरिक बनतील याचा निर्णय करण्याआधी, ज्यामुळे त्यांचे दारिद्र्य व अज्ञान कायम रहाते ती सामाजिक परिस्थिती सुधारणे जरूरीचे आहे. जी सरधोपट मानहानी आपल्या वैयक्तिक जीवनाने दूर करता येत नाही अशा मानहानीचे बळी न होता सन्माननीय जीवन जगणे व त्याचा आदर राखला जाणे हा एक मानवी हक्क आहे. या हक्काला मान्यता देण्याने अमर्याद असे दूरगामी सामाजिक परिणाम घडून येतील.

अमेरिकेमध्ये ज्या ठिकाणी व ज्या वेळी सामाजिक संस्थांद्वारा निग्रोंना हे हक्क मिळणे शक्य झाले तेथे त्याचे परिणाम, यादवी युद्धानंतरच्या संयुक्त संस्थानांतील निग्रोंच्या स्थितीशी तुलनाच करता येणार नाही इतके चांगले झाले आहेत. लॉर्ड ब्राइस (Lord Bryce) हा एक अत्युत्कृष्ट निरीक्षक आहे. तो ब्राझीलसंबंधी म्हणतो, "आफ्रिकेच्या पूर्व व पश्चिम किनाऱ्यावरील पोर्तुगीज वसाहतींखेरीज, ब्राझील हा जगातील एकच असा देश आहे की जेथे, युरोपियन व आफ्रिकन वंशांचा संकर कायदा अगर रूढी यांचा अडथळा न येता घडून येत आहे. मानवी समता व दृढ संबंध या तत्त्वांबरहुकूम कार्य येथे चालू आहे. हे कार्य इतके समाधानकारक रीतीने चालू आहे की, वर्गसंघर्ष जवळजवळ नाहीच. कायदा हातात घेऊन गोरा माणूस येथे निग्रोला ठेचून मारीत नाही किंवा वाईट वागणूकही देत नाही. राजकीय प्रक्षोभाचा भाग म्हणून क्वचित घडलेली उदाहरणे सोडल्यास दक्षिण अमेरिकेत लिंचिंगचे प्रकार मी कुठेच ऐकले नाहीत. तेथे निग्रोंवर उर्मटपणाचा आरोप केला जात नाही आणि मालमत्ता व नीतिमत्ता याविषयी ढिल्या कल्पना असलेल्या कोणत्याही अज्ञानी समाजात असेल तितपतच गुन्हेगारीचे प्रमाण या निग्रो समाजात दिसून येते. ब्राझीलमधील युरोपियन लोकसंख्येवर या रक्तमिश्रणाचा परिणाम अंतिमतः काय होईल याचे भाकित मी करू इच्छित नाही. काही ठळक उदाहरणे पाहता, असे म्हणता येईल की त्यामुळे बौद्धिक दर्जा घसरेलच असे नाही."[२]

अशी परिस्थिती ब्राझीलमध्ये शक्य झाली याचे कारण असे की, पोर्तुगीजांनी कोलंबसानंतर ज्या वसाहती स्थापिल्या, त्या सर्वच ठिकाणी वांशिक पक्षपात त्यांनी मुळीच मानला नाही. बिगर पोर्तुगीज संस्कृतींच्या आधुनिक ब्राझीलमधील वाढत्या प्रभावामुळे मात्र निग्रोंना काही थोडा त्रास झाला आहे. निग्रोविरुद्धच्या भेदभावामुळे नेहमी घडून

येणारे परिणाम येथेही वाढत्या भेदभावाबरोबर दिसून येत आहेत. परंतु संयुक्त संस्थानांच्या तुलनेने ब्राझीलमध्ये त्यांचे प्रमाण कमी आहे. पण जेव्हा पक्षपात अगदीच कमी होता तेव्हा सामाजिक परिणाम चांगले होते.

तेव्हा, वांशिक छळवाद किमान पातळीवर आणावयाचा असेल तर त्या छळवादाची कारणे कमी केली पाहिजेत; वंशच कमी करण्याची जरूरी नाही. भिन्न वंश ही गोष्ट स्वतः संघर्षाचे मूळ नव्हे. जेव्हा जेव्हा एखाद्या समूहाविरुद्ध– चालू संदर्भात वंश हा तो समूह होय– भेदभावपूर्ण वागणूक होऊन त्या समूहाचा एक वर्ग घडविला जातो, तेव्हा तेव्हा संघर्ष निर्माण होतो. वंश म्हणजे मग एक अल्पसंख्याकांचा गट होतो. या गटाला कायद्याने संरक्षणाचा हक्क नाकारला जातो, उपजीविकेचा हक्क हिरावला जातो आणि समाजजीवनात सहभागी होऊ दिले जात नाही. हा गट वंशदृष्ट्या वेगळा मानला जातो की नाही यामुळे मूळ सामाजिक समस्येत फरक पडत नाही. यापैकी कोणत्याही परिस्थितीत अल्पसंख्याकां-विरुद्धचे भेदभाव नष्ट करणे हेच निरोगी सामाजिक उद्दिष्ट आहे.

या उद्दिष्टाच्या सिद्धीपासून आधुनिक जगात आपण इतके दूर आहो की, असे काही साध्य होणे अशक्यप्राय वाटणे अगदी साहजिक आहे. तरीही वंश संघर्षापासून जग मुक्त करण्याकरिता हा पर्याप्त कार्यक्रम नव्हे. अल्पसंख्यांकरिता मानवी हक्कांचे कायदे करणे एवढेच केवळ पुरेसे असत नाही छळवाद करणारे जे बहुसंख्य लोक असतात यांनाही, सुरक्षित व सभ्य जीवन जगण्याची आपल्याला संधी आहे असा विश्वास वाटा-त्वयास बळकट आधार हवा. नाहीतर कायदे कसेही असले तरी, कसलेही हवाले दिले असले तरी, ते एखादे सावज हुडकून काढणार आणि आपल्या निराशेच्या बदल्यात त्याला अजापुत्र म्हणून बळी देणार. कोणत्याही देशात, बेकारी नष्ट व्हावी म्हणून, जीवनमान सुधारावे म्हणून, नागरी स्वातंत्र्याची सुरक्षितता राहावी म्हणून, जे जे काही केले जाईल, ते ते वंशसंघर्ष मिटविण्याच्या कामी उचललेले एक पाऊलच होय. कोणत्याही राष्ट्रात लोकांना दहशत बसविण्यासाठी, व्यक्तींची मानखंडना करण्यासाठी, नागरी स्वातंत्र्य हिरावून घेण्यासाठी, अभिलक्षणीय संधी नाकारण्यासाठी जे काही केले जाते ते संघर्ष वाढविण्यास कारणीभूत होते. सुसंस्कृतपणाच्या दिशेने माणसाने कितीही प्रगती केली असली तरी, कोंबडीच्या घरकुलाबाहेर त्याची प्रगती झालेली नाही. एखाद्या कोंबड्याने एखाद्या कोंबडीला चोचीने मारले तर ती कोंबडी त्या कोंबड्यावर उलट आक्रमण करीत नाही तर दुसऱ्या एखाद्या कमी ताकदवान कोंबडीवर हल्ला करते. ही दुबळी कोंबडी आणखी दुबळ्या कोंबडीवर हल्ला करते असे शेवटल्या पिल्लापर्यंत चालते. माणसातसुद्धा अशी हल्ल्यांची साखळी असते. जे बळी ठरले आहेत. मग ते श्रेष्ठतर वंशातील असले तरीही त्यांना आणखी एक बळी हवाच असतो.

खरी वस्तुस्थिती अशी आहे की, वंशवादामुळे ओढवणारी उद्ध्वस्तता टाळण्याकरिता जो कार्यक्रम आहे, त्याच्या या दोन्ही बाजू म्हणजे विशेषाधिकार असलेल्यांना व नस-

लेल्यांना– दोहोंनाही, लोकशाहीद्वारा संधी उपलब्ध करून देणे, या एकमेकांपासून वेगळ्या काढता येणार नाहीत. कापडाचे उभे आणि अडवे धागे यांच्यातील संबंधासारखा त्यांचा एकमेकांशी संबंध आहे. वंशश्रेष्ठतावादी घोषणांचा एक मोठा राजकीय फायदा असा की, दलितांनाही त्या वापरता येतात. भय आणि असुरक्षितता यामुळे बेकार आणि कमी उत्पन्नाच्या गटात जो द्वेष निर्माण होतो त्याला या तथाकथित वांशिक श्रेष्ठत्वाच्या घोषणेद्वारा बाहेर यावयास एक वाट मिळते. अमेरिकेत केलेल्या निरीक्षणांवरून हे पुष्कळ वेळा दिसून आले आहे की, कमी उत्पन्नवाल्या गटात सेमेटिकवंशविरोधाची तीव्रता सर्वांत अधिक असते आणि जनता मंदीच्या गर्तेत लोटली जाते तोच काळ वांशिक छळणूक कळसाला पोचण्याचा असतो. म्हणून जेव्हा अमेरिकेत दक्षिण भागातील निग्रोंचे राहणीमान, आरोग्यमान व शिक्षण यांचा दर्जा सुधारण्याचा प्रयत्न होतो तेव्हाच दक्षिण भागातील गरीब गोऱ्या लोकांचेही एकूण जीवनमान उंचावले गेले पाहिजे. जोपर्यंत आपण 'लोकशाही अमलात आणून' राष्ट्राचे सर्व मनुष्यबळ राष्ट्राच्या सामायिक फायद्याच्या कामी लावत नाही तोपर्यंत अमेरिकेत वंशवादी छळणूक राहणारच. देशाच्या पुष्कळ भागात, जोपर्यंत राहत्या घरांची परिस्थिती व श्रमिकांची स्थिती सुधारत नाही, तोपर्यंत या दारिद्र्याचा सूड कोणावर तरी उगवला जाणारच. जोपर्यंत कायद्याने उद्योगधंद्यांचे नियंत्रण करून सामाजिक दायित्व प्रत्यक्षात आणले जात नाही तोपर्यंत सर्वांत असह्य अशा वांशिक गटांची पिळवणूक होणार आणि वांशिक निंदानालस्ती करून त्या पिळवणुकीचे समर्थनही होत राहाणार.

ज्या धोरणामुळे अशी परिस्थिती कायम राहाते व बिघडत जाते ती धोरणे अदूरदर्शी स्वरूपाची आहेत हे आता अर्थशास्त्रज्ञांना व मुत्सद्द्यांना कळून चुकले आहे. अल्बेजेन्जेसच्या चळवळीच्या वेळी व ह्युगेनोंना हाकलून काढतेवेळी ज्या चुका झाल्या त्याच चुकांची पुनरावृत्ती ही धोरणे टिकवू पाहणारे करीत आहेत. आपल्या स्वतःच्याच शाश्वत कल्याणाची किंमत मोजून ते एक तात्पुरता व भासमान फायदा मिळवीत आहेत. राष्ट्रीय समृद्धीची तुम्ही कितीही पातळ चकती काढलीत तरी तिला दोन पृष्ठभाग असतात : विक्री होण्यासाठी क्रयशक्ती असली पाहिजे व रोजगारी वाढविण्यासाठी उत्पादन वाढविले पाहिजे. आधुनिक उद्योगधंद्यात व अर्थकारणात कोणतेही गट एकमेकांविरुद्ध उभे ठाकले तरी परिस्थिती अशी आहे की, त्यापैकी कोणत्याही एका गटाला जास्त लाभ होण्याकरिता महत्त्वाची अट म्हणजे दुसऱ्याही गटाचा जास्त लाभ व्हावा अशी असते. त्यांच्यातील संघर्ष हा खरोखरी आत्मघातक असल्यामुळे स्पर्धकांच्या स्वतःच्याच फायद्याकरिता हे जरूर आहे की, कायद्याने घातलेली दूरदर्शी नियंत्रणे दोन्ही पक्षांवर बसवली जावीत.

राष्ट्राची स्थिती समाधानकारक राखण्याची जबाबदारी शासनावर असते याला अधिकाधिक मान्यता द्यावयास गेल्या दशकात आपण शिकलो आहोत. आणि ऐतिहासिक दृष्टिकोणातून पाहता दूरगामी भविष्यात शासनाच्या या भूमिकेत काटछाट न होता, तिचा व्याप अधिक वाढता राहणार असे दिसते. लोकशाही राज्य-व्यवस्थेच्या व्याख्येत ज्या किमान गोष्टींचा अंतर्भाव

होईल, त्यांना सार्थ ठरविणारी जी लोकशाही राष्ट्रसत्ता असेल. तिच्यात राष्ट्रातील जनतेच्या सर्व विभागांचे प्रतिनिधित्व असते. अंतिमतः सर्व राष्ट्राला लाभदायक ठरतील असे कार्यक्रम तिला विचारात घेता येतात. ही आम जनतेची जबाबदार राष्ट्रीय सरकारखेरीज अन्य कोणी आज कशी काय उचलू शकेल याची शंकाच वाटते. गेल्या दशकात सरकारी नियंत्रणात वाढ झाली आहे, पाश्चात्त्य जगात सर्व राष्ट्रांचे खजिने बेकारांना साह्य करण्यासाठी उघडले जात आहेत आणि वृद्धापकाळाकरिता सक्तीचा विमा उतरण्याची पद्धत अनेक देशांत जारी आहे. या आणि इतर राष्ट्रीय प्रयत्नांचा उपयोग आर्थिक तफावत कमी करण्याकरिता होऊ शकेल. नागरी हक्कांच्या स्वातंत्र्यातील समता ही अशा कार्यक्रमांशी घनिष्ठपणे निगडित आहे. जोपर्यंत नागरी हक्क हे निरनिराळ्या गटांना अधिकाधिक सम प्रमाणात दिले जात आहेत तोपर्यंत शासनाच्या वर्धिष्णू भूमिकेचा धसका घेण्याचे तसे काही ऐतिहासिक कारण दिसत नाही. अधिक चांगली अमेरिका बनविण्याच्या उद्देशाने जो कोणताही कार्यक्रम असेल त्याचे खरे उद्दिष्ट असेच असले पाहिजे की, सर्वच माणसांना स्वाभिमानाने जगणे शक्य व्हावे आणि समृद्धीचे लाभ विस्तृत लोकसंख्येला मिळतील अशी त्यांची खात्री असावी.

जेव्हा सामायिक लाभाकरिता माणसे एकत्र काम करतात आणि तसा सामायिक लाभ त्यांना प्राप्त होतो तेव्हा संघर्ष नाहीसा होतो हे सांस्कृतिक मानवशास्त्रज्ञाला सर्वांत चांगले समजेल. मानवशास्त्रज्ञाला ज्ञात असलेल्या बहुतेक सर्व टोळ्यांमध्ये त्याला एकाच वेळी एकाच ठिकाणी दोन नीतिसंहिता अभ्यासिता येतात. एक असते मोकळ्या मनाची आतिथ्यशीलता, उदारपणा व सर्वांना असेल ते वाटून घेण्याची प्रवृत्ती आणि चोरी, खून यांसारख्या आक्रमक कृत्यांची निंदा करण्याची प्रवृत्ती तर दुसरी असते दिसेल त्याचा खून पाडण्याची, हालहाल करण्याची प्रवृत्ती व दरोडेखोरीचा उदोउदो करण्याची रीत. ज्यांच्या आर्थिक व सामाजिक कृत्यांपासून लाभ होतो त्यांच्याबरोबर वागताना माणूस पहिली संहिता आचरणात आणतो. त्या सर्वांचा एक आंतर्गट तयार होतो. या गटात फक्त नैतिक दुर्वर्तनाबद्दलच शिक्षा होते. शिकारीत यश कोणीही मिळविले तरी सर्व आंतर्गटाला त्याचा फायदा होतो. कोणाही व्यक्तीजवळ काही विशेष कौशल्य असेल तरी सर्व गटाची मिळून ती महत्त्वाची बाब ठरते. टोळीच्या कल्याणाकरिता आणि वृक्ष व पशू अशा सामायिक लाभ असलेल्या गोष्टींच्या वृद्धीकरिता पुरोहित धार्मिक समारंभ करतात. परकी लुटारू लोकांपासून लढवय्ये आपल्या छोट्या गटाचे रक्षण करतात. ज्या टोळ्यांशी आपला काही सामायिक संबंध नाही अशा टोळ्यांबरोबर वागताना माणूस दुसरी नीतिसंहिता वापरतो. त्यांच्या कुठल्याही कृत्यामुळे याला अन्न अथवा निवारा मिळत नाही, याचे संरक्षण होत नाही किंवा हा सुखी होत नाही. ते तटबंदीबाहेरचे असतात. तो आपल्या शत्रूंना आधी मारतो की ते त्याला प्रथम मारतात एवढाच काय तो प्रश्न असतो.

जेव्हा समाजातील चालीरीती वा संस्थांमुळे होणारा लाभ वाटला जाण्याची सोय होते, तेव्हाच या आंतर्गटाच्या नीतिसंहितेचा उदय होतो. जेव्हा वाढता अन्नपुरवठा ही सामायिक

लाभाची गोष्ट नसते, तर एका माणसाच्या जिवावर दुसऱ्याने ती मिळवावी अशी गोष्ट ठरते; पाऊस जसा सर्वांकरिता पडतो तसा अतिमानवी शक्तींचा सर्वांच्या कल्याणासाठी उपयोग न करता, शेजाऱ्यावर सूड उगवण्यासाठी जादूटोण्याच्या रीतीने उपयोग केला जातो; जेव्हा विधिविषयक, आर्थिक वा राजकीय संस्था माणसाला त्याच्या शेजाऱ्यांच्या दयाबुद्धीच्या हवाल्यावर सोडतात तेव्हा छळवादाची वाढ होते. सर्व माणसांचा जो लाभ अथवा जी हानी ती मग माझी स्वतःची लाभहानी राहात नाही आणि ज्यात आंतर्गटाची नीति-संहिता आचरणीय आहे असा टोळी हा एक गट उरत नाही. त्यातून जो छळवाद उत्पन्न होतो तो बहुतेक वेळा चेटुकाचे स्वरूप घेतो. चेटूक ही फार भयंकर गोष्ट आहे. जेव्हा समाज चेटक्याला कायदेशीर शिक्षा करीत नाही तेव्हा बळी ठरणाऱ्याला दाद मागावयास जागाच उरत नाही. गेस्टॅपो व ऑग्पस अस्तित्वात असलेल्या आधुनिक राष्ट्रांत व पायबंद नसलेल्या चेटक्यांच्या समाजात बरेच साम्य आहे. असे समाज ' द्वेष, द्वेष, आणखी द्वेष ' ही हिटलरची घोषणा खरोखरी कृतीत उतरवतात.

टोळीचे सर्व घटक टोळीच्या उद्योगात सहभागी असतात आणि एकमेकांच्या कामगिऱ्यांमुळे त्यांचा खरोखर फायदा होत असतो या घटनेचे प्रतिबिंब म्हणजे आंतर्गटाची नीतिसंहिता होय. गटाबाहेरच्यांशी शत्रुत्व आणि गटातील माणसांना परस्पर पाठिंबा हे दोन्हीही मानववंशाला जन्मप्राप्तच आहेत; एखाद्या दीर्घ सामाजिक उत्क्रांतीनंतर काही थोड्या निवडक व्यक्तींना प्राप्त झालेली व तुरळक अशी ती गोष्ट नव्हे. परहितवादाची व कर्तव्यांची शिकवण देणाऱ्या, नीतिप्रधान, उच्च स्वरूपाच्या धर्मांच्या कितीतरी आधी तिचा उदय झाला. जेव्हा सामाजिक व्यवस्थेमुळे असा पाठिंबा लाभदायक असतो तेव्हा ती आपोआप उत्पन्न होते. सर्वांत खालच्या पातळीवरील रानटी लोकांतही ती असते आणि आधुनिक संस्कृतीची एक मौलिक देणगी ही की तिने आंतर्गटाची व्याप्ती वाढविली आहे. या बाबतीतील प्रगती अतुलनीय अशी आहे. कामगार म्हणून किंवा भांडवलदार म्हणून किंवा पक्षाचे सभासद म्हणून किंवा राष्ट्राचे नागरिक म्हणून म्हणा, आपले असलेले सामाजिक साध्य आज लाखो लोक जाणतात. तर पूर्वी एखादा लहानसा भूभागसुद्धा एक-मेकांशी काही समान बंधन न मानणाऱ्या डझनावारी छोट्या, परस्पर शत्रुत्व करणाऱ्या गटांत विभागलेला असे. उत्पादनप्रक्रियेची वाढती जटिलता, वाहतुकीची सुलभता, आर्थिक व्यवस्थांचे परस्परावलंबित्व यांमुळे आज असे झाले आहे की संस्कृतीच्या अगदी दूरच्या कोपऱ्यातील लोकांनाही इतर कुठल्याही भागावरील संकटाचा परिणाम भोगावा लागतो.

त्यामुळे, परस्परांना पाठिंबा व परस्परांवर अवलंबन या आंतर्गटाच्या वैशिष्ट्यांचा खूपच मोठा विस्तार करण्याचा पायाच संस्कृतीच्या प्रगतीमुळेच घातला गेला आहे. आपण स्वतःच निर्माण केलेल्या जगाच्या खऱ्याखुऱ्या गरजा पूर्ण करण्याच्या दृष्टीने माणसाने आपल्या संस्था जुळवून घेतलेल्या नाहीत. या सांस्कृतिक मागासलेपणामुळे आज आंतर-राष्ट्रीय जीवनाच्या पायालाच धोका निर्माण झाला आहे. मानवी व्यवहारांचे तळमळीचे

अनेक गाढे अभ्यासक अगदी निराश झालेले आहेत. आमच्या वाडवडिलांचे जग उद्ध्वस्त झाले आहे याचे कारण त्यांनी मानवी स्वभावाच्या खऱ्या बाजूकडे दुर्लक्ष केले व लुटारू जनावरांवर त्यांनी एक शांतिपूर्ण समाजव्यवस्था लादण्याचा यत्न केला हे होय. हल्लीच्या घटनांवरून आपण धडा हाच घ्यावयास हवा की, माणूस निसर्गतः एक हिंस्र प्राणी असून आपल्याहून दुबळ्या सहजीवींना तो नेहमीच फाडून खाऊ बघणार. वांशिक छळवाद व युद्धे ही मानवाची अटळ नियती आहे हे आपण मान्य केले पाहिजे असे त्यांचे मत आहे. मानवशास्त्रशाला हा निराशावादी सल्ला उघड उघड असत्य दिसणारा आहे. आंतर्गट नीतिसंहिता ही बाह्य-गटसंहितेइतकीच नैसर्गिक आहे. **फक्त एवढेच की, काही विशिष्ट सामाजिक परिस्थिती असेल तरच आंतर्गटसंहितेचा वापर होतो.** योग्य ती परिस्थिती असल्याशिवाय आपल्याला ती वापरात आलेली मिळणार नाही. खुद्द आपल्या राष्ट्रात याचा अर्थ असा होतो की, अधिक चांगली अमेरिका अशी असेल की, जेथे केवळ काही गटांनाच लाभ न मिळता सर्वच नागरिकांना ते मिळत राहतील. जोपर्यंत समृद्धीच्या अंतर्भागी उपासमार आणि बेकारी नांदते आहे तोपर्यंत आपण प्रलयालाच हाक घालतो आहोत. तो प्रलय टाळावयाचा असेल तर आपण 'पक्का निश्चय केला पाहिजे' की, सर्व माणसांना काम मिळविण्याचा व जीवनावश्यक वेतन मिळविण्याचा मूलभूत हक्क बजावता येईल. शिक्षण, आरोग्य व योग्य असा निवारा हा सर्वांना उपलब्ध व्हावा आणि वंश, धर्म अथवा वर्ण याकडे दुर्लक्ष करून सर्वांच्या नागरी स्वातंत्र्याचे रक्षण होत राहील.

वंशसंघर्ष नाहीसा करणे हे सामाजिक अभियांत्रिकीचे कार्य आहे. पण शिक्षणाचे काय ? असे पुष्कळदा म्हटले जाते की, वांशिक पूर्वग्रह नष्ट करण्याचे उत्तरदायित्व आपल्या शिक्षणपद्धतीवर असावे आणि विशेष तऱ्हेचे शिक्षण देऊन सहिष्णुता अंगी बाणविण्याचे प्रयत्न झाले आहेतही. ही विशेष लक्षणीय गोष्ट आहे. परंतु तिच्या परिणामकारकतेच्या मर्यादा आपण स्पष्टपणे जाणल्या पाहिजेत. नाहीतर हा उपाय अयशस्वी झाल्यास आपला घात झाला म्हणून आसवे ढाळावी लागतील. सर्वच शिक्षण, मग ते मुलांचे असो वा प्रौढांचे असो, महत्त्वाचे आहे आणि जरूरीचे आहे. कारण की, शिक्षणामुळे मनाचे उद्बोधन होते आणि प्रेरणा पूर्वग्रहरहित बनतात. असे होणे अत्यावश्यक आहे कारण त्याशिवाय भेदाभेद नाहीसे करणे कधीच जमणार नाही आणि अनुकूल संधीभोवतालची कुंपणेही भुईसपाट होणार नाहीत. परंतु सत्प्रेरणांच्या द्वारा जेव्हा हे कार्य घडून येते तेव्हाच त्या सामाजिकदृष्ट्या परिणामकारक ठरतात. म्हणतातच, 'नरकाची वाट सद्हेतूंचीच बनलेली असते.' असले हेतू अंधळेपणाने केवळ साधनीभूत न मानले जाता, साध्यच समजले गेले असतात. हे एक अतिसामान्य विधान आहे. परंतु वंशविषयक बाबतीत शाळांचे काम काय या चर्चेत त्या विधानाचे पुष्कळदा विस्मरण होत असते. वंशश्रेष्ठतावादाशी दोन हात करताना शिक्षणाच्या महान शक्तींचा आपणांस योग्य उपयोग

करून घ्यावयाचा असेल तर दोन उद्दिष्टे स्पष्टपणे वेगळी राखली पाहिजेत. एका बाजूला, शाळांतून नेहमीच्या सामाजिक शास्त्रांच्या अभ्यासातून वंशासंबंधी वस्तुस्थिती व आपली संस्कृती घडविण्यात निरनिराळ्या मानववंशांचा असलेला भाग हे शिकविणे इष्ट आहे. तर दुसऱ्या बाजूस, क्रियाशील लोकशाहीची ध्येये त्यांच्या नजरेसमोर ठेवणे आवश्यक आहे; वेगवेगळ्या समूहांचे परस्परावलंबन मुलांना समजावून देणे, आपल्या सामाजिक परिस्थितीपेक्षा ज्यांची स्थिती अधिक चांगली आहे त्यांच्याशी व ज्यांची वाईट आहे त्यांच्याशीही आपल्या स्थितीची तुलना करून पाहण्यास उत्तेजन देणे जरूर आहे. असमाधानकारक परिस्थिती ही निसर्गातील अपरिहार्य घटना नसून, जी आपल्या प्रयत्नांनी दूर करता येईल अशी घटना आहे हा विचार करण्यास मुलांना शिकविणे आवश्यक आहे. अशा तऱ्हेचे शिक्षण देऊनच केवळ, शालेय शिक्षणाद्वारा वंशसंघर्षात काही सुधारणा घडवून आणण्याचा पाया घालता येईल. चिनी संस्कृतीचा मोठेपणा किंवा ज्यू लोकांची शास्त्रीय कामगिरी एवढेच शिकवून काम होईल असे मानता येत नाही. तेही शिकविणे योग्य आहे. परंतु तेवढ्यावरच सोडून जर मुलांमध्ये वांशिक सहिष्णुता यावी अशी आशा बाळगली तर आपण स्वतःला फसवितो आहोत. वंशसंघर्ष नष्ट करण्याचे काम शिक्षणावर सोपवावे असे प्रतिपादन करणाऱ्या बहुतेक सर्व युक्तिवादांतील खरी अडचण ही आहे की, त्यात वंशसहिष्णुतेचे शिक्षण द्यावे असे सुचविलेले असते. वंशसहिष्णुता सामाजिक अभियांत्रिकीचे कार्य आहे असे मानलेले असत नाही. अशा केवळ शैक्षणिक कार्यक्रमातून दांभिकतेखेरीज काहीच साध्य होणार नाही.

जो कार्यक्रम वंशवादाला विरोध करण्यास उपयोगी ठरेल त्याला ‘ लोकशाही कार्यान्वित करणे ’ असे नाव आज दिले जाते. अमेरिकेत हा कार्यक्रम जितपत साध्य होईल तितपत, कोणत्याही परस्पर साहाय्यकारी आंतर्गटाच्या सभासदांमध्ये असते तशी वर्तणूक येथे घडेल. बदल हा नेहमी अवघड असतो आणि बदलामुळे अव्यवस्था उत्पन्न होते हे आपण लक्षात ठेवले पाहिजे. परंतु ज्या दिशेने आपण जाणार ती दिशा नक्की असेल, तर बदलाची किंमत देण्याचा निश्चय आपण करू शकू. अरब लोकांमध्ये एक म्हण आहे : “ तुला काय हवे ? ” प्रेषित म्हणाला, “ घे हवे ते आणि दे त्याची किंमत. ” जी लोकशाही कार्यान्वित करावयाची, तिची किंमत आपण मोजली पाहिजे. परंतु सुदैवाने या ठिकाणी आपल्याला निःशंक राहता येईल. कारण असे की, अर्थकारण करताना अमेरिकेची पुनर्रचना करणे, नवी घरे बांधणे यात सरकारी पैसा गुंतविताना, भूसंधारण, आरोग्य, शिक्षण यांद्वारा व विम्याच्या लाभातून राष्ट्राची क्रयशक्ती वाढविताना आपण ही किंमत मोजत असतो व त्याचे उत्तम फायदे मिळवीत असतो हे आपल्याला ठाऊक आहे. नाझी जर्मनीत जशी समाजव्यवस्था आहे, त्याकतारिही किंमत द्यावीच लागते. खालावलेल्या जीवनमानात, माणसांना पशुतुल्य बनवून, मानवी मूलभूत हक्क नाकारून, विज्ञान व बौद्धिक जीवनाची हत्या करून, विध्वंस करून आपण जी किंमत देतो ती लोकशाहीकरिता

द्याव्या लागणाऱ्या कोणत्याही किंमतीपेक्षा जास्तच आहे. पीडितांचा छळवाद करताना शेवटी नाझी हेच बळीं झाले.

आपले राष्ट्र ज्यांनी स्थापन केले त्या आपल्या पूर्वजांचा विश्वास होता की कोणालाही बळी दिल्याशिवाय देशाचे शासन चालू शकते. ते चूक नव्हते हे सिद्ध करण्याची जबाबदारी आपल्यावर आहे.

ते म्हणतात ... ...

कोणत्या एका वंशाचा लाभ किंवा हानी होण्यात इतर सर्व वंशांचा सारखाच लाभ किंवा हानीचा भाग असतो.

James Russell Lowell in *The Crisis*

नाहीसा करता येणार नाही असा कोणताच झगडा पौर्वात्य व पाश्चात्त्य संस्कृतींच्या दरम्यान नाही. उलट पक्षी, त्या एकमेकांच्या अनिवार्यपणे स्पर्धक नसून एकमेकांना पूरक आहेत.

"Paul Samuel Reinsch, *Intellectual and Political Currents in the Far East*. London, Constable & Co. 1911, P. 35.

आपली प्रत्यक्ष परिस्थिती बदलण्याऐवजी आपल्या सामाजिक दर्जात बदल करून तो उंचावण्याच्या व सुधारण्याच्या निग्रोंनी केलेल्या प्रत्येक प्रयत्नाला न चुकता विरोध झाला आहे, त्यामुळे पूर्वग्रह उत्पन्न झाले आहेत आणि वांशिक वैराला उत्तेजन मिळाले आहे. अशा तऱ्हेने उत्पन्न झालेला वांशिक पूर्वग्रह ही केवळ सनातनी वृत्तीची अत्यंत प्राथमिक अशी अभिव्यक्ती आहे.

R. E. Park, "*Bases of Race Prejudice*," Annals of the American Academy, Vol. CXL, Nov. 1928, P. 13.

वंशाला अशा रीतीने एक फार मोठे सामाजिक महत्त्व आहे...सांस्कृतिक प्रतिष्ठेचे ते प्रातिनिधिक चिन्ह बनविले गेले आहे आणि त्यायोगे दुर्बळ गटांच्या पिळवणुकीचे व त्यातून अपरिहार्यपणे निघणाऱ्या सांस्कृतिक व राजकीय परिणामांचे समर्थन करता येते. सांस्कृतिक प्रतिष्ठेचे ते चिन्ह असल्यामुळे आपोआपच व्यक्तींची वर्गवारी करताना ते उपयोगी पडते आणि या वर्गवारीतून व्यक्तींच्या स्वातंत्र्यावर मर्यादा घालून आणि त्यांना लभ्य असलेल्या सांस्कृतिक मूल्यांवर नियंत्रण घालून त्यांचा विकास थोपविता येतो.

E. B. Reuter, *American Race Problem*. New York, T. Y. Crowell Co., 1927, p. 34.

वास्तविक आपले व्यक्तित्व बनविण्यात कितीतरी सामाजिक आणि बौद्धिक घटकांचा वाटा असतो. पण त्यांच्याकडून आपले लक्ष उडून दुसरीकडे जावे असे वंशवादी विचार-सरणीचे तात्त्विक तात्पर्य असते. कारण या विचार-रीतीत आनुवंशिकतेतील गूढ हे स्पष्टी-करण म्हणून दिले जाते.

Jacques Barzun, *Race : a study in Modern Superstition.* London, Methuen and Co. 1938, p. 282.

आपल्या समाज-शरीरात वंशवादाने आपले विषारी सुळे खोल घुसवू नयेत म्हणून त्याच्याशी मुकाबला करण्याची खास जबाबदारी वैज्ञानिकांवर आहे. आमच्या शाळा, कॉलिजे व वाङ्मय यांमधून विज्ञानाचा बुरखा घेऊन जी असत्ये धिंगाणा घालीत आहेत त्यांची हकालपट्टी वैज्ञानिकच करू शकेल. कोणत्याही एका वंशाला, राष्ट्राला अथवा वर्गाला शासक होण्याचा ईश्वरदत्त अधिकार आहे ह्या दाव्याला काहीच आधार नाही हे तोच दाखवू शकेल.

Henery A. Wallace, U. S. Secretary of Agriculture, in an address delivered at the World's Fair, New York. October 14, 1939.

कोणत्याही स्वरूपातील परकीयांविरुद्धची युद्धआघाडी म्हणजे ज्याला अमेरिकावाद म्हणता येईल त्याची उद्वेगकारक विटंबना होय. रुगाइत जगास आम्ही सर्वांत महत्त्वाची देणगी देऊ शकतो ती असे सिद्ध करून की भिन्न वंशांचे स्त्री-पुरुष शांततेने आणि लोकशाही मार्गाने एकत्र नांदू शकतात. इतिहासात पुरेसे पाठीमागे जाऊ तर आपण सर्वच परके होतो असे दिसून येईल.

New York Times, Editorial, December 7, 1939.

## संदर्भ

( १ ) Castle, W. E., "Biological and Social Consequences of Race-Crossing" American Journal of Physical Anthropology, Vol IX, pp. 145–146.

( २ ) Bryce, James, 'South America, Observations and Impressions.' London, Macmillan and Co., 1912, pp. 477, 480.

◎ ◎

# वैज्ञानिकांनी केलेले ठराव
## आणि
## वैज्ञानिकांचे जाहीरनामे

अमेरिकेतील विद्यापीठांतील प्राध्यापकांच्या संघटनेने ( २८ डिसेंबर १९३८ रोजी एकमताने मंजूर ) केलेला ठराव :

या ठरावांन्वये अमेरिकन असोशिएशन ऑफ युनिव्हर्सिटी प्रोफेसर्स ही संघटना आपल्या १९३८ च्या वार्षिक सभेत हुकूमशाही राजवटींच्या कृत्यांबद्दलची चीड व्यक्त करीत आहे. शिक्षकांचा वंश, धर्म अथवा राजकीय मते या कारणांमुळे या राजवटी शिक्षकांचा छळ करतात. सत्याचा शोध व प्रसार हे कॉलेजातील व विद्यापीठातील शिक्षकांचे प्राथमिक कर्तव्य आहे असे आम्ही मानतो. या त्यांच्या कर्तव्यास या छळामुळे प्रतिबंध होतो. अशा तऱ्हेच्या राजवटीखाली राहून आपल्या सरकारच्या कृतीचा जे आमचे व्यवसाय-बंधू निषेध करीत आहेत त्यांच्या निषेधास आम्ही सहानुभूतिपूर्वक मान्यता प्रकट करीत आहोत. शक्यता आहे की, त्यांचा निषेध त्यांच्या मौनातही दडला असेल.

* * *

' सायन्स ' या नियतकालिकात ( भाग ८९, क्र. २२९८, जानेवारी १३, १९३९ ) प्रसिद्ध झालेला अमेरिकन मानवशास्त्रीय संस्थेचा डिसेंबर १९३८ चा ठराव :

प्रामाणिकपणे आणि पूर्वग्रहरहित दृष्टीने सत्याचा शोध करणे ही एक आणि ते सत्य सापडल्यावर आणि ज्ञान झाल्यावर ते जाहीर करणे ही एक अशा विज्ञानाच्या प्राथमिक अटी आहेत. म्हणून :

आणि सत्याची स्थापना व्हावी म्हणून नव्हे तर अशास्त्रीय अशा वंशवादाचा विजय व्हावा यासाठी कित्येक देशांतून मानवशास्त्र हे वेठीस धरले जात आहे आणि त्याचा पुरावा विपर्यस्त करून त्या पुराव्याचा चुकीचा अर्थ लावला जात आहे म्हणून : ठराव केला जातो की,

अमेरिकन मानवशास्त्र संघटना या प्रकारच्या वंशवादाचा धिक्कार करीत आहे आणि खाली दिलेल्या वस्तुस्थितिविषयक निवेदनास आपली मान्यता देत आहे.

( १ ) मनुष्यजातीच्या मोठ्या समूहात आनुवंशिकतेने आलेली समान शारीरिक वैशिष्ट्ये असा अर्थ ' वंश ' या संकल्पनेत येतो. याहून अधिक मानसशास्त्रीय अथवा सांस्कृतिक असा काही अर्थ त्यास असेल तर विज्ञानाने अद्याप त्याची निश्चिती केली नाही

( २ ) ' आर्यन ' व ' सेमेटिक ' या पदांना वंशदृष्ट्या बिलकुल महत्त्व नाही. त्यांनी फक्त दोन भाषिक कुलांचा बोध होतो.

( ३ ) वांशिक कनिष्ठता अथवा अमुक एका धार्मिक गटात असणे अथवा भाषिक वारसा या कारणांनी एखाद्या लोकसमूहाला विषम वागणूक द्यावी यासाठी मानववंशशास्त्रात कसलाही वैज्ञानिक आधार नाही.

* * *

डिसेंबर १९३८ ला भरलेल्या अमेरिकन मानसशास्त्रीय संस्थेच्या वार्षिक बैठकीत स्वीकृत झालेल्या मानसशास्त्रज्ञांच्या निवेदनातील उतारे :

आज जर्मनीत आणि इटलीत वांशिक फरकांवर भर दिला जात आहे. युनायटेड स्टेट्समध्ये व इतरत्रही अशा तऱ्हेचा भर वाढेल अशी चिन्हे दिसत आहेत. म्हणून मानसशास्त्रज्ञ व इतर सामाजिक शास्त्रांतील तज्ज्ञ यांना यासंबंधात काय म्हणावयाचे आहे हे कळणे महत्त्वाचे आहे.

मानसशास्त्रज्ञांनी निरनिराळ्या लोकांवर प्रयोग केले. पण तथाकथित निरनिराळ्या वंशांमध्ये ज्यायोगे फरक करता येईल अशी मूलभूत आनुवंशिक मानसिक वैशिष्ट्ये त्यांना सापडली नाहीत. डेन्व्हर विद्यापीठाचे टी. आर. गार्थ यांचे ' रेस सायकॉलॉजी ' ( Race Psychology ), कार्नेल विद्यापीठाचे प्राध्यापक फ्रँक एस्. फ्रीमन यांचे ' इंडिव्हिज्युअल डिफरन्सेस ' ( Individual Differences ) हे पुस्तक, कोलंबिया विद्यापीठाचे प्राध्यापक ओटो क्लाइनबर्ग यांचे ' रेस डिफरन्सेस ' ( Race Differences ) हे पुस्तक, व बर्नार्ड कॉलेजच्या डॉ. ॲन ॲनॅस्टासी यांचे ' डिफरेन्शिअल सायकॉलॉजी ' ( Differential Psychology ) हे पुस्तक यांसारख्या पुस्तकांतून प्रसिद्ध झालेल्या वरील प्रकारच्या प्रयोगांच्या सर्वेक्षणांचा आधार आमच्या या निवेदनास आहे. ज्यूइश,

जर्मन अथवा इटॅलियन अशा प्रकारची मनोरचना जन्मप्राप्त असते असे म्हणण्यास पुरावा नाही. कोणत्याही समूहाच्या घटकांना, ते ज्या समाजात राहतात त्याची संस्कृती स्वतःच्या जीवशास्त्रीय आनुवंशिकतेमुळे आत्मसात करता येणार नाही असे म्हणावयास थोडाही आधार नाही. जर्मनीत राहणाऱ्या ज्यूंच्या बाबतीतच केवळ हे खरे आहे असे नाही तर जे मानवसमूह शारीरिकदृष्ट्या एकमेकांहून वेगळे आहेत त्यांनाही ते लागू पडते. एकाच संस्कृतीमध्ये अथवा बौद्धिक वारसामध्ये सहभागी होण्यासाठी जनसमूहांचे रक्ताचे नाते असावयास हवे या नाझींच्या सिद्धान्ताला वैज्ञानिक निष्कर्षांचा बिलकुल पाठिंबा मिळत नाही.

आजचा वांशिक विद्वेष आणि होणारी छळणूक यांच्या उगमाचे स्पष्टीकरण इतरत्रच सापडेल असे मानवशास्त्रज्ञांना वाटते. नाझींचे वंशविषयक सिद्धान्त वस्तुस्थितीवर आधारलेले नसून प्रचंड विकाराधीन मनोवृत्तीच्या दडपणाखाली ते घडलेले आहेत हे उघड आहे. आपल्या दुर्दैवाबद्दल इतरांना दोष द्यावा ही मानवी प्रवृत्ती सर्वज्ञात आहे. आपल्या आर्थिक आणि राजकीय अडचणींचा वचपा ज्यू लोकांवर काढणे हे मानसशास्त्रीयदृष्ट्या सोयिस्कर आहे हे नाझी लोकांच्या लक्षात आले. आपला देश खंडित झाला याबद्दल चेकोस्लो-व्हाकियामधील काही प्रदेशातूनसुद्धा ज्यू लोकांना दोषी धरले जाते. जर्मनीतील ज्यू लोकांच्या भांडवलावर अलीकडे जो प्रचंड कर बसविला आहे त्यामुळे या एकंदर प्रकरणाला उघड उघड आर्थिक बाजू आहे यातही संशय राहात नाही. ज्यू लोकांकडील संपत्ती काढून घेण्याची अतिशय निकड वाटत असल्यामुळे ज्यूंनी काही कारवाया अथवा कट केले आहेत अशा कल्पना केल्या जातात. या केवळ सबबी अथवा व्याज-बौद्धिक समर्थने होत. ही वृत्ती नवी नाही आणि केवळ मध्य युरोपातच ती सापडते असे नाही.

वांशिक आणि राष्ट्रीय मनोवृत्ती या मानसशास्त्रदृष्ट्या मोठ्या गुंतागुंतीच्या असतात. त्यांची आर्थिक, राजकीय अथवा ऐतिहासिक पार्श्वभूमी लक्षात घेतल्याशिवाय त्यांचे नीट आकलन होत नाही. वंशावंशामधील अथवा राष्ट्राराष्ट्रांमधील मनोरचनेचे उपजत फरक अशा रीतीने त्या मनोवृत्तींचे स्पष्टीकरण देण्यासाठी मानसशास्त्रज्ञांस काही आधार आढळला नाही. असा फरक प्रस्थापित करण्यासाठी आतापर्यंत पुष्कळ प्रयत्न झाले. ते सर्व अयशस्वी ठरले. जरी ते यशस्वी झाले असते तरी, ज्या प्रकारची जुलमी वागणूक आज जर्मनीत दिली जाते, तिचे समर्थन करता आले नसते. उपजत बुद्धिमत्ता अथवा व्यक्तिमत्त्वाची आनुवंशिक वैशिष्ट्ये या बाबतीत वंशावंशामध्ये अथवा राष्ट्राराष्ट्रांमध्ये काही फरक असतात. हे सिद्ध करण्यासाठी निर्णयात्मक पुरावा मानवी गटांच्या अभ्यासातून वैज्ञानिकांस मिळालेला नाही. एखादी व्यक्ती या मानवी गटाची सभासद असण्याऐवजी त्या गटाची आहे यामुळे ती खालच्या दर्जाची आहे अशा रीतीने तिला वागणूक देणे निश्चितच चूक आहे. भिन्न भिन्न वांशिक आणि राष्ट्रीय गट एकत्र येऊन ज्या रीतीने एक समान संस्कृती निर्माण करू शकतात तिचे स्पष्ट दिग्दर्शन येथे अमेरिकेत आपणांस उपलब्ध आहे.

मंडळाचे सभासद

एफ्. एच्. ऑलपोर्ट ( F. H. Allport ), सिरॅक्यूज विद्यापीठ
गॉर्डन ऑल्पोर्ट ( Gordon Allport ), हार्वर्ड विद्यापीठ
जे. एफ्. ब्राउन ( J. F. Brown ), कान्सास विद्यापीठ
हॅडले कॅन्ट्रिल ( Hadley Cantril ), प्रिन्सटन विद्यापीठ
एल्. डब्ल्यू. डूब ( L. W. Doob ), येल विद्यापीठ
एच्. बी. इंग्लिश ( H. B. English ), ओहिओ राज्य विद्यापीठ
फ्रँकलिन फिअरिंग ( Franklin Fearing ), कॅलिफोर्निया विद्यापीठ, लॉस एंजेल्स
जॉर्ज डब्ल्यू. हार्टमान ( George W. Hartmann ), कोलंबिया विद्यापीठ
आय्. ग्रेशेफस्की ( I. Krechevsky ), कोलोरॅडो विद्यापीठ
गार्डनर मर्फी ( Gardner Murphy ), कोलंबिया विद्यापीठ
टी. सी. श्नाइडला ( T. C. Schneirla ), न्यू यॉर्क विद्यापीठ
इ. सी. टोलमन ( E. C, Tolman ), कॅलिफोर्निया विद्यापीठ

( हे निवेदन Society for the Psychological Study of Social Issues या संघटनेच्या कार्यकारी मंडळाने तयार केले आहे. या संघटनेत ४०० हून अधिक मानसतज्ज्ञ आहेत. )

* * *

ऑगस्ट २८–३०, १९३९ या दिवशी एडिंबरा येथे भरलेल्या ७ व्या आंतरराष्ट्रीय प्रजननशास्त्र कॉंग्रेसच्या वेळी जीवशास्त्रज्ञांनी काढलेल्या जाहीरनाम्यातील उतारे :

प्रजननशास्त्राच्या साहाय्याने, अत्यंत परिणामकारक रीतीने, जगातील सर्व माणसे अधिक चांगली कशी करता येतील या प्रश्नातून ज्या समस्या निर्माण होतात, त्या निव्वळ जीवशास्त्रीय समस्यांहून अधिक व्यापक आहेत. आपल्या शास्त्रातील तत्त्वे जेव्हा तो व्यवहारात आणू पाहतो, तेव्हा या समस्यांशी टक्कर देणे जीवशास्त्रज्ञाला भागच पडते. सामाजिक परिस्थितीत काही महत्त्वाचे बदल आणि त्यांच्याशी संलग्न असे मानवी वृत्तीतील बदल घडून आल्याशिवाय मनुष्यजातीत परिणामकारक वांशिक सुधारणा होणार नाही. आज समाजातील निरनिराळी माणसे जन्मतःच हक्कदारीत खूप तफावत असलेल्या वेगवेगळ्या वर्गांत पडतात. त्याऐवजी, ज्यात सर्व घटकांना समान संधी मिळेल अशी आर्थिक

आणि सामाजिक परिस्थिती निर्माण केल्याशिवाय दोन व्यक्तींच्या आंतरिक गुणवत्तेची तुलना करता येणार नाही ही एक गोष्ट झाली.

वांशिक सुधारणेच्या संदर्भात दुसरी मोठी अडचण म्हणजे भिन्न भिन्न लोकसमूह, राष्ट्रे अथवा वंश यांच्यामध्ये विद्वेष वाढीस लागेल अशा तऱ्हेची आर्थिक आणि राजकीय परिस्थिती. युद्ध आणि आर्थिक शोषण ज्याने होते अशी परिस्थिती आधी नष्ट केली पाहिजे. त्याशिवाय वंशविषयक पूर्वग्रह नष्ट करता येणार नाहीत. तसेच, अमुक लोकांना अथवा अमुक प्रकारची शारीरिक वैशिष्ट्ये असणारांनाच चांगली अथवा वाईट जनुके ( वंशबीजे ) असण्याचा मक्ता असतो हा अशास्त्रीय सिद्धान्तही त्याशिवाय नष्ट होणार नाही. हे होण्यासाठी त्यातील सर्व लोकांना समान हितावर आधारलेले सर्व जगाचे मिळून एक कार्यक्षम संघराज्य केले पाहिजे.

तिसरीही एक गोष्ट आहे. भावी पिढ्यांची मूल्यात्मकता विचारात घेऊन आईबाप आपल्या मुलांचे वर्धन आणि संगोपन तेव्हाच करतील की, जेव्हा त्यांना भरपूर आर्थिक सुरक्षितता मिळेल. आहेत त्याहून अधिक मुलांना जन्म देऊन त्यांना जतन करणे हे आईबापांपैकी कोणालाच ओझे वाटू नये या दृष्टीने प्रत्येक मुलागणिक आर्थिक, वैद्यकीय, शैक्षणिक आणि इतरही मदत देऊ केली पाहिजे. मुलाला जन्म देऊन त्याला वाढविणे हे काम स्त्रीवरच अधिक पडते. म्हणून विशाल सामाजिक जीवनात आणि कार्यात सहभागी होण्यात तिच्या मातृत्वामुळे अडचण येऊ नये यासाठी तिला विशेष संरक्षण दिले पाहिजे. ही उद्दिष्टे प्राप्त होण्यासाठी उत्पादनव्यवस्था ही मूलतः कामगारांच्या आणि ग्राहकांच्या हितासाठी उभारलेली असली पाहिजे. रोजगारीच्या अटी या आईबापांच्या आणि विशेषतः आईच्या गरजांना अनुलक्षून असल्या पाहिजेत; निवासस्थाने, गावे आणि सार्वजनिक सेवा यांची अशा रीतीने पुनर्रचना केली पाहिजे की मुलांचे हित हे त्यांचे प्रमुख प्राप्तव्य असले पाहिजे.

या तऱ्हेच्या मानवी शक्ती मुक्त होतील अशी आर्थिक पुनर्रचना होण्याचा दिवस अद्याप आला नाही. पण तो आणण्याची तयारी करणे हे आजच्या पिढीचे काम आहे. या मार्गावरील उचललेले प्रत्येक पाऊल ही जमेची बाजू होय. त्या योगे कोणाच्या स्वप्नातही नसेल अशा मर्यादेपर्यंत मानवाची वांशिक सुधारणा होण्याची शक्यता निर्माण होईलच. पण त्याशिवाय अधिक प्रत्यक्ष फायदा म्हणजे आपल्या आधुनिक संस्कृतीला धोकादायक अशा आसुरी शक्तींवर माणसाला विजय मिळण्याची शक्यताही त्याने निर्माण होणार आहे.

( मूळ जाहीरनाम्यावर खालील लोकांच्या स्वाक्षऱ्या आहेत. )

( १ ) एफ्. ए. ई. क्र्यू, एफ्. आर्. एस्.
( २ ) जे. बी. एस्. हाल्डेन, एफ्. आर्. एस्.
( ३ ) एस्. सी. हारलंड
( ४ ) एल्. टी. हॉगबेन, एफ्. आर्. एस्.
( ५ ) जे. एस्. हक्सले, एफ्. आर्. एस्.
( ६ ) एच्. जे. म्युलर
( ७ ) जे. नीडहॅम.

◎ ◎

# विषयसूची

विषय पृष्ठक्रमांक

अंकमापन पद्धती १५
अथेन्स ८२, ८४
अफ़गाण ३५
अमेरिकन १४, २८, ६६
अमेरिकन इंडियन ३१, ८२
अमेरिका ४२, ९९
अम्नोनाइट ९८
अरब १५, १६
अरबी भाषा ९
अरेबियन ९
अलास्का ३७
अल्जेरियन ३१
अल्पाइन ३४, ३५
अल्बेजेन्जेस १३३
अश्मयुग १४, ३८
असीरिअन ९८
आयरिश ८३
आर्क्टिक टंड्रा ३७
आफ्रिका १२
आर्नोल्ड एडविन ७६
आर्मेनियन भाषा ११

विषय पृष्ठक्रमांक

आर्मेनियन लोक २५
आर्यन ११
आर्यभाषा १२
आशिया ३७
आस्थलांतरण ११५
ॲंग्लोइंडियन ४०
ऑस्ट्रेलियन २५, २९
ऑस्ट्रेलिया २५, ३७
इंग्लंड १७, ३४, ७४, ७५
इंग्लिश ९, १०, ११
इजिप्त १७, ९७
इजिप्शियन १४
इटली ७५, ८२, १११
इटालियन ६५, ८३
इतिहास ३८
इन्क्विझिशन १३२, १३३
इराणी ३९
इरोक्वी १०३
इलिनॉय ४४
इस्टोनिया ३४
इस्राएल ९८

विषय पृष्ठक्रमांक

उत्क्रांतिवाद ९३
एजियन समुद्र १९
एलिजाबेथ ७४
एस्किमो २६
ऐनू ३३
ओहिओ ४४
ॲटिला ४३
केतट ४४
कोल्टिक ४३
कौल लावणे १२
कॅथॉलिक १०१
कॅलिफोर्निया ११, ८२
कॉल्व्हिनिझम ४, ८
कॉकेशस ११, ३५
कॉकेशियन ९, २७, २८, ७३, ७८–७९
कॉकेसॉइड २४, २९
ख्रिश्चन ९७, १०२
ख्रिस्ती १२
गाला ९१
गॅलिक ११८
गॉथ ४५
ग्रीक ११, १४, ३१
ग्रीस १७
चीन १७
चिनी ९, १०, १२, १४, २५, ३१, ६६
जपानी ६६
जर्मन ११, १९, ७४
जर्मनी ३४, ३५, ७५, १०५
जादू टोणा १४६
जे सुइट १०२

विषय पृष्ठक्रमांक

जॉर्जियन ४५
ज्यू ६५,१०१
झुत्र ९१
ट्यूटन ४५,७३
ट्यूटॉनिक ४२
ट्यूटॉनिझम १८
ट्रॅन्ससिल्व्हानिया १९
डच १००
डोर्डो ४३
ताजिक ३५
तुंगू १५
तुर्कस्तान १२,१४
दक्षिण आफ्रिका १०२
नवाश्मयुग १४
नाझी ११
नायझेरिया ७७
निआंडरथल १४,३७
निग्रॉईड २४,२९
निग्रो ९,२४,२६,२८,६६,६८,६९,७७,७८
नॉर्डिक १६,१८,३४,५६,६६ ७०,७३,७४,१०७
नॉर्मन ११६
नॉर्मंडी ४३
न्यू टेस्टामेंट ४ (नवा करार)
न्यूयॉर्क ६९
पदार्थविज्ञान १८
पर्शियन ११
पिग्मी २७,६२,६४
पिटकेर्न ४०
पिटॅनिज ४३

विषय पृष्ठक्रमांक

पुराणवस्तुसंशोधन १४
पुरातत्त्वशास्त्र १४
पेन्सिल्व्हानिया ४४
पेपी ७५
पोर्तुगीज १०,१००,१०२
पोलाद १४
पोलिश ६५
पॅलेस्टाइन ९७,१३३
पॉलेनेशियन ११,३३
प्यूराब्लोइंडियन ८२
प्रागैतिहासिक काल १४
प्राणिशास्त्र ३३,३८
प्रॉटेस्टंट १०१
प्रॉव्हॉन्स १३३
फिन ११८
फिनलंड ३४
फ्रान्स ३४,७४,७५
फ्रेंच १०,१९,७४,१०२
फ्रॅन्सिस्कन १०२
बदाऊन १५
बांटू ११
बाथोंगा ९५
बिसिगॉथ ४३
बीजगणित १५
बृहदश्मयुग १९
बेरिंगची सामुद्रधुनी १७
बेल्ज ४३
बेल्जम ३४
बोअर ४०
बोऑ ३२, ६०
बोर्नू ४६
बॅप्टिस्ट १२

विषय पृष्ठक्रमांक

बॅस्टार्ड ४०
ब्राझिल १४२
ब्रिटिश ६५
भारत १७, २६
भूगोल ३८
भूमध्यसामुद्रिक ३४
मंकाला १२
मलायी १५, १६
मांचू १५, १६, ९१
मानसशास्त्र १३०
मिनेसोटा ४४
मूर १५, १०१
मृगकुल ३८
मेंडेल ५२
मेक्सिकन ६६, ७२
मेक्सिको ८२
मेथॉडिस्ट १२
मेसापोटेमिया १७
मोंगोलॉइड १५, १६, २४, २८, २९, (मंगोल, मोंगोल, मंगोल्लियन) ६१, ६२, ७८
मोआब्राइट ९८
मॅग्नाचार्टा १०४
मॅनिकेइझम १३३
मॅलेनेशियन २६, ३३
म्युलेटो १३८
युकागीर १५
यूरेशियन ४७
यूरोप २६, ३७
युरोपियन २६
युरोभारतीय ११
रशिया ३४

विषय पृष्ठक्रमांक

रसायनशास्त्र १८
रुमेनिया ३४
रेड इंडियन ६६, ६७
रेतसीअस् २९
रेनडिअर ३८
रोम १७
रोमन काळ १५
रोमन साम्राज्य ९५, ९७, १००
लिंचिंग १४२
लिथुआनिया ३४
लोकशाही १४८
लॅटिन ११
लॉस एंजल्स ६९
वटवाघुळ २२
वर्गकलह १०४
वास्तुशिल्पशास्त्रश १५
व्हेल २२
व्हेन्डॅलिझम ४४
शिकॅगो ६९
संस्कृत ११
समारिटन ९७

विषय पृष्ठक्रमांक

सारोकन १३३
सिंत्री ४३
सेमाइट ३४
सेव्हाय ४३
सैबेरिया १५
सोमाली ९१
सॅक्सन ११६
स्कॅंडिनेव्हियन १३
स्कॅंडिनेव्हिया १०५
स्पॅनिश १००, १०२
स्पॅनिश भाषा १०
स्पेन ७५
स्लाव्ह भाषा ११
स्लाव्होफिलिझम १८
स्वीडन १०५
स्वीडिश ३१
हिब्रु ९७
हूण ४३
हमाइट ३४,९१
हॉटेन्टॉट ३३,४०
हॉलंड ३४
ह्युगेनो १३४

# व्यक्तिनाम सूची


व्यक्तिनाम पृष्ठक्रमांक

अबेसिए १०५
अलेक्झांडर ९५
आल्फ्रेड ड्रायफझ १४१
आल्फ्रेड रोझेन्बर्ग १२३
इव्हान् हो ११६
एच. बी. इंग्लिश १५४
एझ्रा ९८
एफ्. ए. ई. क्र्यू १५६
एल्. टी. हॉग्बेज १५६
एल्. डब्ल्यू. डूब १५४
एस्. सी. हारलंड १५६
ओसबोर्न ११४
ॲडम २२
ॲन ॲनास्टासी १५२
ॲमॉन ११०, ११२
ॲरिस्टॉटल ९५
ऑलपोर्ट १५४
कन्फ्यूशिअस ९७
कात्रफाज ११८
कार्लटन कून ३४, ३६
कार्लाईल, टॉमस ११, ७९

व्यक्तिनाम पृष्ठक्रमांक

कुव्हिए २३
कैसर ११९
कोर्टेझ ८२
कोलंबस १४२
कॅन्ट्रिल १५४
कॉ. द. गोबिनो ११, १०५, १०७-९, ११२
कॉ. द. बूलेव्हिए १०४, ११२
क्रॉमवेल ७४
क्लाइनबर्ग ७०, १५२
क्लाव्हा १३२
गटे २३
गलिक ७५
गार्डनर मर्फी १५४
गार्थ ७०, १५२
गित्तो १२४
गॅलिलिओ ८३
गॉल ४२
ग्रॅट ११६
ग्रीन ११, १२५
ग्रेशोफस्की १५४

म. रा. ... ग्रंथालय
ग्र. २५२/१
ग्रंथालय क्र.

| व्यक्तिनाम | पृष्ठक्रमांक |
| --- | --- |
| चार्लस (दुसरा) | ७४ |
| जे. नीडहॅम् | १५६ |
| जे. बी. एत्र. हाल्डेन | १५६ |
| जॉफ्रे सेंट हिलेरी | २३ |
| झरतुष्ट्र | ९७ |
| टोलमन् | १५४ |
| टॅसिटस | १०४ |
| ट्राजन | १०४ |
| ट्रेटस्की | १४० |
| डान्टे | १२० |
| डार्विन | २२, २३, ५२, ५८, ९३ |
| डेनिकेर | २४ |
| थिओडोर वाइट्झ | २३, ६० |
| द कूलॉं | ११९ |
| द बोना | १०६ |
| द माइस्ले | १०६ |
| नान्ते | १३४ |
| पाचवा जॉर्ज | १०५ |
| पेट्रार्क | १२४ |
| पेरिक्लस | ८२ |
| पोप | ९८ |
| पॉल | ९६, ९७ |
| फ्रा रुगेरी | १३२ |
| फ्रॅंक एस. फ्रीमन | १५२ |
| फ्रॅंकलिन फिअरिंग | १५४ |
| फ्रॅन्सिस्कन | १९१ |
| बर्नार्ड | १३२ |
| बारो द मॉंतेस्क्यू | २२ |
| बिस्मार्क | ११७ |
| बूफॉ | २१ |
| बूले | ६२ |
| बेनिव्हेटो थेलेनी | ८२ |

| व्यक्तिनाम | पृष्ठक्रमांक |
| --- | --- |
| ब्राऊन | १५४ |
| ब्रॉक | २४, ११० |
| ब्रिगहॅम् | ६६, ७० |
| मायकेल एंजेलो | १२० |
| मार्कोपोलो | १२० |
| मुल्लर एच. जे. | ७१ |
| मोझेस | ९७ |
| मॅक्समुल्लर | ११, १२, २० |
| येशू | ९७ |
| येशूख्रिस्त | १२० |
| रिचर्ड वॅग्नर | ११९ |
| रिशेल्यू | १३४ |
| रूसो | १०६ |
| ल बॉं | ७२ |
| लिओनार्डो द व्हिन्सी | ८३ |
| लीव्ही | १११ |
| लॉर्ड ब्राइस | १४२ |
| वॅथे द लपूज | ३, ११० |
| व्हायकिंग्ज | १०८, १०९ |
| व्हॉल्टेअर | ४२ |
| शेक्सपिअर | ७४ |
| इनाइडला | १५४ |
| हक्सले | ४२ |
| हार्टमन | १५४ |
| हिटलर | १३९ |
| हिल्डेब्रॅंड | १३२ |
| हूटन | १६, २०, ३६ |
| हेन्री | १०१ |
| हॅडॉन | ११४ |
| हॅन्किन्स | १६, २०, ७९ |
| हॉब्ज | १२० |